28-03-2007 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A

SSP/ 10:00

28-03-2007 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही) A-1

SSP/ MAP/ KGS/ 10:00

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित नाहीत.

उपसभापती : सभागृहामध्ये कॅबिनेट मंत्री उपस्थित नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक 10.01 वाजता, 10 मिनिटांसाठी स्थगित झाली.)

नंतर श्री.रोझेकर.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>स्थगितीनंतर</u>

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

<u>कॅबिनेट मंत्री सभागृहात उपस्थित नसल्याबाबत</u>

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आजचे कामकाज सुरु होतांना कॅबिनेट मंत्री सभागृहात उपस्थित नसल्यामुळे आपण सभागृह दहा मिनिटांसाठी स्थगित केले होते. कॅबिनेट मंत्री सभागृहात उपस्थित नाहीत, असे वारंवार घडत आहे. सरकारला आता तंबी देण्याऐवजी ज्यावेळी सभागृहात मोठया संख्येने सन्माननीय सदस्य उपस्थित असतील त्यावेळी द्यावी, अशी माझी विनंती आहे.

उपसभापती : सन्माननीय मंत्री, श्री.अशोक चव्हाण हे माझे बंधू आहेत, त्यांना मी तंबी देणार नाही. तुम्ही देखील माझे बंधू असल्यामुळे सांभाळून घेतले पाहिजे.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : नियम स्थगित ठेवणे

मु.शी : नियम स्थगित करण्याबाबत मंत्र्यांचा प्रस्ताव

डॉ.सुनील देशमुख (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विधानपरिषद नियम 289 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो :-

"महाराष्ट्र विधानपरिषद नियमातील नियम 228 (1) मधील सात दिवसांच्या कालावधीबाबतची तरतूद सन **2007-2008** च्या अर्थसंकल्पावरील चर्चेच्या संदर्भात स्थगित करण्यात यावी."

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेच्या बाबतीत नेहमीच असे घडते. ही प्रथा बरोबर नाही. प्रत्येकवेळी सात दिवसांच्या कालावधीची तरतूद स्थगित करण्याबाबतचा प्रस्ताव मांडला जातो आणि चर्चेला वेळ मिळत नाही. अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेसाठी किमान सात दिवसांचा कालावधी मिळाला पाहिजे. वेळेवर अशाप्रकारे प्रस्ताव मांडला जातो आणि दोन दिवसात अर्थसंकल्पावरील चर्चा उरकून घेतली जाते, हे बरोबर नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मागील अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेच्या वेळी अशाच प्रकारचा प्रस्ताव ज्यावेळी सभागृहात मांडला गेला होता त्यावेळी आम्ही या प्रस्तावाला विरोध केला होता. त्यावेळी आम्हाला असे सांगण्यात आले होते की, कामकाज सल्लागार समितीमध्ये हा प्रस्ताव मांडण्यात आला होता व सर्व पक्षाच्या गटनेत्यांनी या प्रस्तावाला मान्यता दिलेली आहे. आमच्या नेत्यांनी या प्रस्तावाला मान्यता दिली असेल तर प्रश्न नाही. परंतु, मी यासंदर्भात माहिती घेतली. कामकाज सल्लागार समितीमध्ये हा प्रस्तावच मांडण्यात आला नव्हता आणि मान्यताही घेण्यात आलेली नाही. त्यामुळे अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांवर कशासाठी अन्याय करायचा ? सन 2007-2008 च्या अर्थसंकल्पाला तर अधिक गांभीर्य प्राप्त झाले आहे. कारण, सन्माननीय अर्थमंत्र्यांनी त्यांच्या अर्थसंकल्पावरील भाषणास सुरुवात करतांना असे सांगितले आहे की, शेतकरी बांधव सरकारवर खूष आहेत आणि त्यामुळे त्यांनी जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत आघाडीला मतदान केले आहे. आज आपण पहातो

..3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

आहोत की, शेतकरी आत्महत्या करीत आहेत. त्यामुळे या सर्व बाबींची अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेच्या निमित्ताने चिरफाड करणे आम्हाला महत्वाचे वाटते आणि त्यासाठी चर्चेला पुरेसा वेळ मिळणे आवश्यक आहे. माझ्याकडे नुकताच एक फॅक्स संदेश आलेला आहे, तोही यासंदर्भातीलच आहे. म्हणून सन्माननीय अर्थ राज्यमंत्र्यांनी जो प्रस्ताव मांडला आहे तो आम्हाला मान्य नाही. जर त्यांचा आग्रहच असेल तर या प्रस्तावावर मतदान घ्यावे.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, संपूर्ण महाराष्ट्रातील लोकांचे अर्थसंकल्पीय अधिवेशनाकडे लक्ष असते. विधानसभेत व विधानपरिषदेत होणा-या अर्थसंकल्पावरील चर्चेतील बारीक बारीक विषयाकडे समाज लक्ष ठेवून असतो. आता सभागृहात अतिशय कमी संख्येने सन्माननीय सदस्य उपस्थित आहेत. सोमवार, दिनांक 26 मार्च, 2007 रोजीच्या कार्यक्रम पत्रिकेवर देखील अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेचा विषय दर्शविण्यात आला होता. त्यावेळी सन्माननीय सदस्यांची आपापसात जी चर्चा झाली त्यावरुन सात दिवसांच्या कालावधीची तरतूद स्थगित करण्याबाबतचा प्रस्ताव योग्य वाटत नाही, मान्य नाही, असेच सन्माननीय सदस्यांचे म्हणणे होते. आजच्या कार्यक्रम पत्रिकेवर अर्थसंकल्पावरील चर्चेचा विषय पाहिल्यानंतर माझ्या मनात यासंदर्भात थोडी चिंता निर्माण झाली. सभागृहात बहुसंख्य सदस्य अनुपस्थित असतांना चर्चा करणे योग्य होणार नाही. त्यामुळे सन्माननीय अर्थ राज्यमंत्र्यांनी मांडलेला प्रस्ताव त्यांनी मागे घ्यावा कारण तो आम्हाला मान्य नाही.

यानंतर कुमारी जयश्री.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ सुनील देशमुख : सभापती महोदय, अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा विस्तृतपणे झाली पाहिजे, याबद्दल आमचे दुमत नाही. परंतु आता सभागृहात सदस्यही कमीच आहेत.

श्री.दिवाकर रावते : महोदय, सदस्य येणार आहेत, सन्माननीय सदस्यांनी आम्हाला सांगितलेले आहे की, आम्ही येणार आहोत.

डॉ.सुनील देशमुख : सदर चर्चा जरी आता फक्त साडेबारा वाजेपर्यंत असली तरी जर कोणालाही असे वाटले की, चर्चा अपूरी आहे अथवा कोणाचे भाषण राहिले आहे, तर लक्षवेधी सूचने नंतर सदर चर्चा पुन्हा घेण्यात येणार आहे. कामकाज पत्रिकेवरच तसे दाखविले आहे.

श्री.दिवाकर रावते : महोदय, सर्वांना आता ही सवयच लागली आहे की, सभागृहातील कामकाज कसेतरी लवकर गुंडाळावयाचे आणि निघून जावयाचे. या सदनामध्ये जे कामकाज चालते त्याचे उत्तरदायीत्व सरकारला जनतेसमोर द्यावे लागते. वर्षातून 100 दिवस अधिवेशन झाले पाहिजे, अशा प्रकारचे निर्णय आणि संदेश असतांना सुध्दा कोणीही त्याचे पालन करीत नाही. कामकाज सल्लागार समितीमध्ये असे ठरले की, आता राज्याच्या विधानसभा व विधानपरिषदेमध्ये लोकसभेप्रमाणे कामकाज लवकर सुरु करावे म्हणजे विधानसभा सभागृहाचे कामकाज सकाळी 11.00 वाजता आणि विधानपरिषद सभागृहाचे कामकाज दुपारी 12.00 वाजता सुरु होईल आणि संध्याकाळी सात वाजेपर्यंत दोन्ही सभागृहांचे कामकाज आटोपेल. म्हणजे सकाळी नऊ वाजल्यापासून रात्री उशिरापर्यंत सभागृहाचे कामकाज चालवून सर्वांना वेठबिगारी करावयाला लावण्यापेक्षा हा निर्णय चांगला आहे. कामकाज पूर्ण करण्यासाठी अधिवेशनाचे दिवस वाढविण्यात यावे. अधिवेशनातील कामकाजाच्या दिनदर्शिकेमध्ये विनियोजन विधेयक सर्वात शेवटी ठेवण्यात यावे कारण अर्थसंकल्पावरील विनियोजन विधेयक मंजूर झाल्यानंतर इतर विषयांवर चर्चा झाली काय आणि नाही झाली काय नंतर उरलेले सर्व कामकाज म्हणजे चोथा अशी सत्ताधारी पक्षाची भूमिका असते. महत्वाची विधेयके देखील दोन तासामध्ये,अर्ध्या तासामध्ये, उरकण्यात येतात, सभापती महोदय, केवळ आपण विनंती करता म्हणून आम्ही ऐकतो. माझी एकच विनंती आहे की, तुम्ही विरोधी पक्षाला सभागृहात भाषण करावयाचा त्यांचा अधिकार पूर्णपणे द्या व सरकारच्या सदस्यांना त्यांचे भाषण अथवा मागण्या पत्रान्वये पाठविण्यात येऊन मान्य करण्यात येतील असे सांगा. सभागृहाचे कामकाज फक्त श्राध्द घालण्यासारखे चालवावयाचे हे कुठेतरी थांबले पाहिजे व या सभागृहाच्या कामकाजात कुठेतरी गांभीर्य आले पाहिजे, अशी आमची प्रामाणिक इच्छा आहे.

C - 2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

सन्माननीय विरोधी पक्ष नेते यांनी या संदर्भामध्ये ठाम भूमिका घ्यावी, अशी मी त्यांना विनंती करतो.

उपसभापती : आता आपण सभागृहात जे म्हणणे मांडले, त्याबद्दलचा निर्णय उद्या कामकाज सल्लागार समितीमध्ये घेण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : महोदय, कामकाज सल्लागार समितीमध्ये हा विषय आला नव्हता, म्हणून सभागृहापुढे हा प्रस्ताव येण्याचे काही कारणच नाही. कामकाज सल्लागार समितीमध्ये जर सदर विषयाबाबत काही निर्णय झाला असता तर आम्ही समजू शकलो असतो.

उपसभापती : सदर बाब आपण उद्या कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये मांडली तरी काही हरकत नाही.

श्री.जयंत प्र. पाटील : अर्थसंकल्पावर नियमाप्रमाणे 7 दिवसांची जर सविस्तर चर्चा आयोजित करण्यात आली असती तर आम्ही अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये विस्तृतपणे आपले विचार मांडू शकलो असतो.

श्री.मधुकर चव्हाण : महोदय, मला असे वाटते की, या ठिकाणी दोन दिवसामध्ये अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा आटोपून इतरही कामकाज चर्चेसाठी ठेवले जाते. सत्ताधारी बाकावरुन सायं 5.30 वाजता " आता कामकाज संपवा " असे सांगितले जाते. 45 दिवसांच्या अगोदर म्हणजे विवक्षित वेळेच्या अगोदर माननीय सदस्य प्रश्न,अर्धा तास चर्चेच्या सूचना,लक्षवेधी सूचना वगैरे देतात. त्यांच्यावर चर्चा न होता सर्व कामकाज लवकर गुंडाळले जाते. दिनांक 26 मार्च,2007 रोजी " शेतक-यांच्या आत्महत्या " या विषयावर चर्चा आयोजित केली होती, ती पण लवकर संपवा असे समोरच्या बाकावरुन सांगण्यात आले होते. हे सर्व कुठेतरी थांबले पाहिजे.

यानंतर श्री.बोरले...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : आपण 10 मिनिटांकरिता सभागृहाची बैठक स्थगित करु या. विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर व इतर काही सन्माननीय सदस्यांना बरोबर घेऊन आपण यासंदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांशी चर्चा करु आणि नंतर निर्णय घेऊ. माननीय मुख्यमंत्र्यांशी चर्चा केल्याशिवाय मी यासंदर्भात आता काहीच निर्णय देणार नाही. सभागृहाची बैठक मी 10 मिनिटांकरिता स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक 10 वाजून 20 मिनिटांनी 10 मिनिटांकरिता स्थगित झाली.)

यानंतर श्री.गागरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

28-03-2007 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही) E-1

PNG/ MAP/ KGS/ पूर्वी श्री.बोरले 10:30

10.34

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय,

नंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. फुंडकर .....

सभापती महोदय, या ठिकाणी माननीय अर्थ राज्यमंत्र्यांनी जो प्रस्ताव मांडला आहे त्यासंबंधात मला आपल्याला काही सांगावयाचे आहे. आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये 'अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा - शेवटचा दिवस' असे दाखविण्यात आलेले आहे. म्हणजे आम्हाला अर्थसंकल्पावर चर्चा करण्यासाठी केवळ एकच दिवस मिळणार आहे. त्याशिवाय इतर कामकाज आहेच. सभापती महोदय, कामकाज सल्लागार समितीमध्ये ही चर्चा झाली नसेल पण कामकाज मात्र याप्रमाणे ठरविले गेले आहे. तेव्हा माझी या संबंधात आपल्याला एक सूचना आहे. अर्थसंकल्पावर या सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना व्यवस्थित चर्चा करावयाची असेल, आपले विचार, आपली मते येथे व्यक्त करण्याची संधी द्यावयाची असेल तर आजचा प्रश्नोत्तराचा तास वगळता इतर सर्व कामकाज स्थगित करून आज केवळ अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा केली जावी आणि आजचे स्थगित केलेले इतर कामकाज उद्या, परवा वा अन्य कोणत्याही दिवशी घेण्यात यावे. मात्र आज दिवसभर अर्थसंकल्पावर चर्चा केली जावी, अपवाद केवळ प्रश्नोत्तराचा तास. असे केले तरच सर्व सन्माननीय सदस्यांना आपण न्याय देऊ शकतो. अन्यथा सदस्यांवर या प्रस्तावान्वये अन्यायच होईल. सदस्यांना अर्थसंकल्पावर आपापली मते, विचार व्यक्त करता येणार नाहीत आणि ही चर्चा त्या अभावीच संपवावी लागेल. म्हणून आपण माझ्या या सूचनेला मान्यता द्यावी अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, हे दरवर्षीचे, प्रत्येक अधिवेशनाचे दुखणे झालेले आहे. या बाबत कामकाज सल्लाकार समितीमध्ये असलेल्या सर्व पक्षीय नेत्यांनी काळजी घेणे आवश्यक आहे असे मला वाटते. खालच्या सभागृहामध्ये काय झाले वा होणार आहे किंवा करण्याचे ठरविले आहे त्याप्रमाणे या वरच्या सभागृहामध्ये करण्याचा निर्णय आपल्याला घ्यावा लागतो. खरे म्हणजे खालच्या सभागृहाचे कामकाज त्यांनी ठरवावे आणि वरच्या या सभागृहाचे कामकाज आपण ठरवून त्याची अमलबजावणी करावी, त्यामध्ये खालच्या सभागृहामध्ये काय ठरविले गेले आहे वा जाणार आहे याचा दबाव असू नये असे मला वाटते. या संबंधात मी माननीय विरोधी पक्षनेत्यांनाही याप्रमाणे विनंती करीन. जे काही कामकाज ठरले आहे त्याप्रमाणे पार पाडताना कित्येकदा मंत्री सभागृहात उपस्थित नसल्यामुळे देखील वेळ जातो. आज देखील तसा वेळ गेला आहे तो वेगळाच. शिवाय आज दोन तीन विधेयके देखील दाखविलेली आहे. या ठिकाणी मला हेही सांगितले पाहिजे

..... एफ 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

की, सरकारने हे गृहीतच धरले आहे की, आम्ही अशा अशा प्रकारे विधेयके आणली की, ती लगेच येथून मंजूर करून घ्यायची. मागील वेळेस देखील अशीच फसवाफसवी झालेली आहे. त्याबाबत मी पत्र दिलेले आहे पण अजून त्याचे उत्तर मिळत नाही. माननीय मुख्यमंत्री शेवटच्या दिवशी येथे सभागृहात उपस्थित होते. तेव्हा परिवहन खात्याची दोन विधेयके येथे आलली होती. त्यापैकी एक विधेयक मंजूर करून घेतले गेले आणि दुसरे विधेयक वित्त विषयक विधेयक होते. त्यावर आम्हाला चर्चा करावयाची आहे त्यामुळे आता ते विधेयक मंजूर करू नये असे आम्ही सांगितले होते. परंतु तरीही ते विधेयक मंजूर केल्याचे रेकॉर्डवर दाखविले गेले आहे. त्या विधेयकावर बोलावयाचे म्हणून मी माझी टीपणेही काढलेली आहेत आणि ते विधेयक केव्हा चर्चेला येणार म्हणून माहिती घेण्याचा प्रयत्न केला असता ते विधेयक मंजूर केले गेले असल्याचे दाखविण्यात आले आहे. म्हणजे अशा प्रकारे घाईघाईने विधेयके या सभागृहामध्ये आणून ती घाईगडबडीने मंजूर करून घेण्याचीच सरकारची प्रवृत्ती दिसते आहे, ती आम्हाला धोका देणारी आहे, ती अत्यंत चुकीची आहे. त्या संबंधात मी पत्रदेखील दिलेले आहे पण त्यावर मला अजूनही उत्तर आलेले नाही. आता आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये 4 लक्षवेधी सूचना, तीन विधेयके आणि तीन अर्धा तास चर्चा दाखविल्या आहेत. अशा प्रकारे मोठ्या प्रमाणात कामकाज दाखविल्याने सदस्यांना योग्य तो न्यायच मिळत नाही. म्हणून माझी आज माननीय मंत्र्यांना तसेच विरोधी पक्षनेत्यांना विनंती आहे की, कामकाज सल्लागार समितमध्ये ठरले त्याप्रमाणे सर्व कामकाज करावे मात्र विधेयके ही एप्रिल पासून घेण्याचे सुरू करावे. विधेयकावर चर्चा करण्याचा आमचा अधिकार आम्हाला गमवावयाचा नाही. वाटल्यास, सरकारने अधिवेशनाचा कालावधी वाढवावा. पण सरकार तेही करीत नाही, जणू काही सरकारला याबाबत काहीच वाटेनासे झालेले आहे. अध्यादेशाची विधेयके देखील अशाच प्रकारे संमत करून घेतली जातात. आता तर त्यावर कोर्टाचेही निर्बंध आले आहेत की, तुम्हाला अध्यादेश किती काढता येतील, त्यावरील कायदा पास करून घेण्याची जबाबदारी ही सरकारची आहे, तर मग सरकार अधिवेशन लवकर का गुंडाळते, सरकारने वाटल्यास अधिवेशनाचा कालावधी वाढविला पाहिजे. विधेयकांच्या बाबतीत असेच होते की, खालच्या सदनामध्ये मंजूर केल्यानुसार येथे विधेयक दाखविले जाते आणि लगेचच त्याच दिवशी वा दुसऱ्याच दिवशी ते या सभागृहात आणून मंजूर करण्यास सांगितले जाते. ते विधेयक सदस्यांना वाचण्यास देखील अवधी मिळत नाही. अगदी

..... एफ 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते .....

जुलाब लागल्यागत विधेयके येथे आणली जातात आणि संमत करून घेतली जातात. जणू काही या सभागृहाला काही महत्त्वच नाही. येथील सदस्यांना विधेयक वाचण्याची देखील संधी दिली जात नाही. खरे तर त्यासाठी 7 दिवस वेळ दिला गेला पाहिजे. तेवढा नाही तर किमान 2 दिवसांचा तरी वेळ दिला जावा. त्यासाठी गरज भासल्यास अधिवेशनाचा कालावधी वाढविला गेला पाहिजे. यामध्ये सर्व तांत्रिक बाबी असतात. त्या पूर्ण करण्याची, दोन्ही सभागृहामध्ये, सदस्यांमध्ये समन्वय साधण्याची जबाबदारी ही संसदीय कार्य मंत्र्यांची आहे पण त्यांच्याकडून तो समन्वय साधला जात नाही. ..

(यानंतर श्री. सरफरे ..... जी 1 ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री दिवाकर रावते...

त्यामुळे सभागृहामधील कामकाजाची ओढाताण होते. कामकाज पत्रिकेमधील अनेक महत्वाच्या विषयांना न्याय मिळत नाही. सभापती महोदय, आपण याठिकाणी मला माझे म्हणणे मांडण्याची संधी दिली त्याबद्दल आपणास धन्यवाद देतो. कामकाज सल्लागार समितीमध्ये जरी आम्ही सदस्य नसलो तरी देखील आपण आमच्या वतीने कामकाज सल्लागार समितीमध्ये या विषया संदर्भात मार्गदर्शन करावे अशी मी आपणास विनंती करतो.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आपण केवळ आम्हाला सभागृहामध्ये विनंती केली म्हणून आपला व या सदनाचा सन्मान आम्ही करीत आहोत. सभापती महोदय, या कामकाज पत्रिकेमध्ये माननीय वित्त मंत्र्यांच्या प्रस्तावाच्या वाक्य रचनेमध्ये चलाखी करण्यात आली आहे. ही वाक्यरचना अशी आहे की, "महाराष्ट्र विधानपरिषद नियमातील नियम 289 अन्वये अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेच्या संदर्भात विधानपरिषद नियमातील नियम 228 (1) मधील सात दिवसांच्या कालावधीची तरतूद स्थगित करण्यात यावी". आपण ही तरतूद कायम स्वरुपामध्ये करुन आम्हा सभासदांची फसवणूक करीत आहात. यामध्ये माझे काही चुकत असेल तर आपण आम्हाला सांगा. मी या संदर्भात कुणावरही हेत्वारोप करीत नाही. त्या दिवशी संध्याकाळी या संदर्भात चर्चा झ ाल्यानंतर सभागृहाचे कामकाज स्थगित झाले. 21 तारखेला जिल्हा परिषदांच्या अध्यक्षांच्या निवडणुकीच्या कार्यक्रमाकरिता आपण सभागृहाच्या कामकाजाला सुट्टी दिली. आपली राजकीय सोय बघण्याकरिता जनतेच्या विविध प्रश्नांवर आपण अन्याय करीत आहात. 21 तारखेच्या जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांच्या निवडणुकीच्या कार्यक्रमामध्ये सहभागी होण्याकरिता कोणतेही आमदार त्या ठिकाणी जाणार नव्हते. तरीदेखील सर्व आमदारांनी मान्य केले होते...

उपसभापती : ती बाब सर्वांनी मान्य केली होती.

श्री. मधुकर चव्हाण : माझे व्यक्तिगत मत असे आहे की, आपली राजकीय सोय बघण्यासाठी सभागृहातील कामकाजावर अन्याय होत आहे. परवाच्या दिवसाचे शिल्लक राहिलेले कामकाज आज दाखविण्यात आले होते. त्यामुळे आजच्या लक्षवेधी सूचना आणि अर्धा तास चर्चेच्या सूचना आपल्याला उद्यापर्यंत ढकलाव्या लागणार आहेत. माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी विधेयकासंबंधी मुद्दा उपस्थित केला. त्यांना विधेयकावर चर्चा करण्याकरिता उपोषणाला बसावे लागले. सभागृहामध्ये विधेयक मांडण्यात आल्यानंतर त्यावर चर्चा करण्यात येईल असे सांगितले

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण...

जाते. या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांचा पूर्ण आदर ठेवून सांगू इच्छितो की, विधेयकावर कुणालाही बोलू न देता ते एका मिनिटामध्ये संमत करुन घेतले जाते. विधेयकांवर आमचे विचार मांडण्याचा आम्हाला पूर्ण अधिकार आहे. सभापती महोदय, आपला पूर्ण मान ठेवून मी सांगू इच्छितो की, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी केलेल्या सूचनेप्रमाणे आजच्या कामकाज पत्रिकेमधील कोणतेही कामकाज बाजूला न सारता उद्या पूर्ण दिवसभर ते कामकाज घेण्यात यावे. नियम 93 च्या निवेदनाच्या संदर्भात सांगू इच्छितो की, पहिल्या दिवशी नियम 93 ची सूचना दिल्यानंतर दुसऱ्या दिवशी त्यासंबंधीचे निवेदन येणे अपेक्षित असतांना ते करण्यात आले नाही. जी निवेदने शासनाला अडचणीची वाटतात, त्यामध्ये भ्रष्टाचाराचा वास असतो अशी कोणतीही निवेदने करण्यात येत नाहीत. तेव्हा आजचे संपूर्ण कामकाज उद्या पूर्ण दिवस घेण्यात यावे अशी माझी विनंती आहे. आणि अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेच्या संदर्भातील नियमामध्ये असलेली सात दिवसांच्या कालावधीची तरतूद फक्त याच अधिवेशनापुरती स्थगित करण्यात यावी असे समजण्यात यावे.

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेच्या संदर्भातील विधानपरिषद नियमातील सात दिवसांच्या कालावधीची तरतूद स्थगित करण्यात यावी अशाप्रकारचा प्रस्ताव माननीय वित्त मंत्र्यांनी मांडला. वास्तविक पहाता, या विषयासंबंधी कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये चर्चा होऊन ठरविण्यात आले आहे. त्यामुळे सभागृहामध्ये यासंबंधी वेगळी भूमिका मांडण्यात आलेली नाही. सभापती महोदय, शासनाला हा अर्थसंकल्प 29 मार्चपूर्वी मंजूर करुन घेणे आवश्यक आहे. त्यामुळे पुढील आर्थिक अडचणी निर्माण होणार नाही. त्या दृष्टीने कामकाज सल्लागार समितीमध्ये त्यासंबंधी निर्णय घेण्यात आला. कामकाज सल्लागार समितीमध्ये सर्व पक्षांचे नेते उपस्थित असतात. त्या बैठकीमध्ये जो निर्णय घेण्यात आला आहे त्यापेक्षा वेगळी भूमिका सभागृहामध्ये घेण्यात आलेली नसल्यामुळे माननीय सदस्यांनी या विषयासंबंधी उपस्थित केलेले मुद्दे याठिकाणी ग्राह्य होऊ शकत नाहीत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी जो खुलासा केलेला आहे, तो चुकीचा असून ते रेकॉर्डवर आलेले आहे...

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, कामकाज सल्लागार समितीमध्ये जे मान्य केले जाते त्याला आमची मान्यता आहे अशाप्रकारचा गैरसमज करुन घेतला जात आहे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : मी यासंबंधी खुलासा करतो.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये अंदाजपत्रकावरील चर्चेचा कार्यक्रम ठरविण्यात आला होता. परंतु अशाप्रकारचा प्रस्ताव आणण्यात येईल यासंबंधी कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये चर्चा झालेली नाही.

श्री. दिवाकर रावते : तसे नाही. कामकाज सल्लागार समितीमध्ये 30 तारखेपर्यंतचा कार्यक्रम ठरविण्यात आला. त्याप्रमाणे हे कामकाज होईल. जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांच्या निवडणुकीकरिता आपण सभागृहाच्या कामकाजाची पळवा पळवी केली हा आपला राजकीय भाग आहे. सर्व आमदारांना त्यांच्या मतदारसंघामध्ये उपस्थित रहाण्याकरिता आपण 20 व 21 तारखेची सुट्टी घेऊन टाकली. त्याऐवजी आपल्याला 20 तारखेला बजेट मांडणे सोयीचे होते. तो दिवस पुढे मॅच झाला असता.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (पुढे सुरु..

20 व 21 तारखेला सुट्टी घेऊ असे विधानसभेच्या कामकाज सल्लागार समितीमध्ये ठरले, म्हणून आपण विधानपरिषदेच्या कामकाज सल्लागार समितीमध्ये तसे ठरविले. 31 मार्चच्या आतमध्ये अर्थसंकल्प मंजूर करण्याची जबाबदारी होती तर आपण मधेच सुट्टी कशासाठी घेतली ? सुरुवातीला अधिवेशन 11 मार्चला सुरु होणार होते, परंतु जिल्हापरिषदेच्या निवडणुकीमुळे दोन दिवस पुढे ढकलले आणि 14 मार्चपासून अधिवेशनाला सुरुवात केली. सरकारने या संदर्भात कोणतेच नियोजन केले नाही. ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आत्महत्या केली,त्याला आम्ही जबाबदार आहोत काय ? या संबंधात सहकार मंत्री महोदयांनी उत्तर द्यायला पाहिजे अशी आमची मागणी होती परंतु त्यांच्याकडून उत्तर न येता, माननीय उपमुख्यमंत्री महोदयांनी उत्तर दिले. ते उत्तर शेतकऱ्यांचे अपमान करणार आहे, हे मी पुढे बोलणार आहे. कामकाज सल्लागार समितीमध्ये अर्थसंकल्पावरील चर्चा एक दिवस सीमित करायची की दोन दिवस सीमित करावयाची हे स्पेसिफिक ठरविलेले होते. अर्थसंकल्पावरील चर्चा एक दिवसामध्ये करावयाची असे ठरविलेले होते काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय....

उपसभापती : या विषयावर सभागृहाचा 45 मिनिटांचा वेळ गेलेला आहे.

श्री.विनोद तावडे : मी माझे म्हणणे एक मिनिटामध्ये मांडतो. सभागृहामध्ये कामकाज सल्लागार समितीचा विषय वारंवार चर्चेला येत आहे. विधानसभेच्या कामकाज सल्लागार समितीमध्ये असे ठरवले होते म्हणून आपण आपल्या सभागृहाच्या कामकाज सल्लागार समितीमध्ये असे ठरविले असे सांगितले जाते. आपल्या कामकाज सल्लागार सल्लागार समितीला काही किंमत आहे की नाही ? नाही तर दोन्ही सभागृहाची मिळून संयुक्त कामकाज सल्लागार समितीची बैठक घ्यावी. आमच्या भावना आपण आपल्यामार्फत कामकाज सल्लागार समितीला कळवाव्या.. विधानसभेमध्ये एखादे विधेयक पास झाल्यानंतर विधानपरिषदेमध्ये चर्चा होऊन ते मंजूर व्हायला पाहिजे. कन्हेअन्सचे विधेयक विधानसभेमध्ये पास होऊन वर्ष झाले तरी देखील आपल्याकडे ते चर्चेला आलेले नाही. असे बरेच मुद्दे आहेत. ते आपण कामकाज सल्लागार समितीमध्ये मांडावेत. विधानपरिषदेला गृहीत धरले जात असेल तर दोन्ही सभागृहाच्या कामकाज सल्लागार समित्यांची एकत्रित बैठक घेऊन निर्णय करावा.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, विधानसभेच्या कामकाज सल्लागार समितीमध्ये विधानसभेचे सन्माननीय सदस्य असतात आणि विधानपरिषदेच्या कामकाज सल्लागार समितीमध्ये विधानपरिषदेचे सदस्य असतात. विधानसभेच्या कामकाज सल्लागार समितीमध्ये घेतलेले निर्णय आपण येथे मान्य केलेच पाहिजेत असे बंधन नाही. त्या समितीमध्ये विविध पक्षाचे सन्माननीय गटनेते सदस्य असतात. आपल्या कामकाज सल्लागार समितीमध्ये अर्थसंकल्पावर दोन दिवस चर्चा मान्य केलेली होती. परंतु सन्माननीय श्री.नितीन गडकरी साहेबांनी सोमवारी असे सांगितले की ही चर्चा परवा ठेवा. विरोधी बाजूकडूनच तसा प्रस्ताव आलेला होता. त्याप्रमाणे आज सकाळी 10 वाजता आपण अर्थसंकल्पावर चर्चा करण्यासाठी ही विशेष बैठक बोलाविलेली आहे. आपण जी काही सूचना केली त्याप्रमाणे अर्थसकल्पावर दिवसभर चर्चा करण्याची आमची तयारी आहे.

उपसभापती : विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी ज्या भावना मांडल्या त्या संदर्भात कामकाज सल्लागार समितीमध्ये मी आणि सन्माननीय विरोधी पक्षनेते आम्ही दोघे मांडू. तरी आजचा प्रश्नोत्तराचा तास घेऊन बाकीचे सर्व कामकाज बाजूला ठेवून अर्थसंकल्पावर चर्चा करायची काय ? यासंबंधात सरकारच्या वतीने मंत्री महोदयांनी सांगावे.

श्री.अशोक चव्हाण : आमची काही हरकत नाही.

उपसभापती :आता मी माननीय मंत्री महोदयांचा प्रस्ताव मतास टाकतो.

श्री.पांडुरंग फुंडकर : या प्रस्तावामध्ये "सात दिवसाच्या कालावधीची तरतूद ही या अधिवेशनापुरती स्थगित करण्यात यावी," असे वाक्य ॲड करावे.

श्री.अशोक चव्हाण : तशी दुरुस्ती करण्याची आवश्यकता नाही. तशी कायद्यामध्येच तरतूद आहे. त्याचा वापर करणे, न करणे हा कामकाज सल्लागार समितीचा अधिकार आहे.

यानंतर श्री.बरवड....

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

उपसभापती : हे काही परमनंट नाही. हा प्रस्ताव आतापुरता आहे. पुढच्या वेळी देखील तसा प्रस्ताव आणता येतो. हा विषय उद्याच्या कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये मांडणे आवश्यक आहे.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

मु.शी.: सन 2007-08 च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

उपसभापती : आजपासून अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेस प्रारंभ होईल. ही चर्चा आज दिनांक 28 मार्च, 2007 रोजी सकाळच्या सत्रात न संपल्यास दुपारच्या सत्रात होणार आहे. चर्चेसाठी एकूण जो वेळ उपलब्ध होईल त्यापैकी वित्त मंत्र्यांच्या उत्तरासाठी असलेला एक तास जमेस धरुन निम्मा वेळ सत्ताधारी पक्षांच्या सदस्यांकरिता आणि निम्मा वेळ विरोधी पक्षाचे सदस्य व स्वतंत्र सदस्य यांना देण्यात येईल. या चर्चेत भाग घ्यावयाचा असेल त्यांनी आपली नावे आपल्या प्रतोदामार्फत माझ्याकडे पाठवावीत. आता माननीय विरोधी पक्ष नेते चर्चेला सुरुवात करतील.

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, राज्याचे माननीय अर्थराज्यमंत्री डॉ. सुनील देशमुख यांनी दिनांक 22 मार्च, 2007 रोजी महाराष्ट्र राज्याचा सन 2007-08 चा अर्थसंकल्प विधान परिषदेत सादर केला. या अर्थसंकल्पाचे थोडक्यात वर्णन करावयाचे झाले तर महाराष्ट्रासारख्या पुरोगामी आणि प्रगतिशील राज्याला प्रगतीकडे नेण्यासाठी गती नसलेला अर्थसंकल्प असेच करावे लागेल. अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर दुसऱ्या दिवशीच्या वर्तमानपत्रांमध्ये आलेल्या काही राजकीय नेत्यांच्या राजकीय अभिनिवेश असलेल्या प्रतिक्रिया सोडल्या तर ज्यांची राजकीय पार्श्वभूमी नाही अशा विचारवंतांच्या, अर्थशास्त्रज्ञांच्या, वृत्तपत्राच्या ज्या प्रतिक्रिया आल्या होत्या त्या पाहिल्यानंतर या अर्थसंकल्पाबाबत शिळ्या कढीला ऊत आणण्याचा अर्थमंत्र्यांचा प्रयत्न आहे असाच निष्कर्ष निघतो. या अर्थसंकल्पाबाबत काही वर्तमानपत्रांच्या ज्या प्रतिक्रिया आलेल्या होत्या त्यातील काही मोजक्या प्रतिक्रिया मी आपल्याला वाचून दाखवतो. "लोकसत्ता" नावाच्या दैनिकाने "अपेक्षांना हरताळ" असा अग्रलेख लिहिला. "अगदीच मिळमिळीत" या शीर्षकाखाली "लोकमत" दैनिकाने अग्रलेख लिहिला. "अपेक्षा भंग" या शीर्षकाखाली "नवशक्ती" दैनिकाने अग्रलेख लिहिला. "ना नवीन योजना, ना नवीन घोषणा" या शीर्षकाखाली "सकाळ" या दैनिकाने अग्रलेख लिहिला. "राज्याच्या बजेटमध्ये मुंबईला ठेंगा" या शीर्षकाखाली "महाराष्ट्र टाईम्स" दैनिकाने अग्रलेख लिहिला. मुंबईचे पालकत्व श्री. जयंतराव

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS/

श्री. पांडुरंग फुंडकर.....

पाटील विसरले असे "लोकमत" दैनिकाने आपल्या अग्रलेखात लिहिले. या वर्षी सलग नववा अर्थसंकल्प सादर करीत असताना माननीय अर्थमंत्र्यांनी या ठिकाणी एक सोपस्कार पार पाडलेला दिसतो असे म्हटले तर ते अतिशयोक्तीचे होणार नाही. माननीय अर्थमंत्री श्री. जयंत पाटील यांच्यापूर्वी या राज्यामध्ये तत्कालीन अर्थमंत्री श्री. सुशीलकुमार शिंदे यांनी सुध्दा नऊ अर्थसंकल्प मांडले होते. परंतु नऊ अर्थसंकल्प मांडत असताना मात्र महाराष्ट्राच्या नाकी नऊ आणले आणि त्या कालखंडामध्ये कोणत्याही पध्दतीने महाराष्ट्राची प्रगती झाली नाही. यावेळी 510 कोटी रुपये शिलकीचा अर्थसंकल्प सादर केलेला आहे. या अर्थसंकल्पाने राज्याच्या जनतेची घोर निराशा केली आहे. या अर्थसंकल्पापासून राज्याच्या जनतेला ज्या अपेक्षा होत्या त्या अपेक्षांचा भंग या अर्थसंकल्पाने केलेला आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या, विजेचे भारनियमन, महागाईचा उडालेला प्रचंड भडका, बेरोजगारी या प्रश्नांची तड लावण्यासाठी कोणतीही ठोस पावले राज्य सरकारने उचलल्याचे या अर्थसंकल्पामध्ये दिसत नाही. गहू, तांदूळ, डाळी इत्यादी जीवनावश्यक वस्तूंवरील व्हॅट आकारणीस फक्त सहा महिन्यांची मुदतवाढ देत या अर्थसंकल्पामध्ये गरीब लोकांचे आजचे मरण उद्यावर ढकललेले दिसते. मुंबईसह संपूर्ण राज्याचा विचार करता हा अर्थसंकल्प पुचाट आणि फुसका आहे असे या अर्थसंकल्पाबाबत प्रतिक्रिया देत असताना म्हणावे लागेल. कोणताही अर्थसंकल्प मांडत असताना राज्याच्या प्रगतीला दिशा देणारा अर्थसंकल्प असला पाहिजे अशा प्रकारची संकल्पना आजतागायत होती. सरकारचे पुढील वर्षाचे धोरण काय असेल, पुढच्या वर्षी सरकार कोणत्या दिशेने जाणार आहे, पुढच्या वर्षी सरकार या राज्यातील जनतेला कोणत्या पध्दतीने चांगल्या प्रकारची प्रगतीची दिशा देणार आहे ? हे या अर्थसंकल्पात प्रतिबिंबित होत असते. परंतु या अर्थसंकल्पाला कोणताही चेहरा नाही, कोणतेही स्वरुप नाही आणि कोणतीही दिशा नाही. मला माननीय अर्थमंत्र्यांना प्रश्न विचारावासा वाटतो की, हा अर्थसंकल्प शेतीप्रधान आहे काय, या अर्थसंकल्पाला शैक्षणिकदृष्ट्या काय महत्त्व आहे ?

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. रामनाथ मोते)

यानंतर श्री. शिगम .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर....)

काय या अर्थसंकल्पात औद्योगिकीकरणाला चालना आहे, काय हा अर्थसंकल्प बेरोजगारांना दिलासा देणारा आहे, काय हा अर्थसंकल्प सामाजिक न्याय देणारा आहे, काय हा अर्थसंकल्प विदेशी गुंतवणूक आकर्षित करणारा आहे, काय हा अर्थसंकल्प विद्युतीकरणामध्ये महाराष्ट्राला स्वयंपूर्ण करणारा आहे ? या सर्व प्रश्नांची उत्तरे "नाहीच" अशीच येणार आहेत. सभापती महोदय, सिंचनाच्याबाबतीत देखील हा अर्थसंकल्प महाराष्ट्राला पुढे नेणारा नाही. भ्रष्टाचारामुळे आणि कर रचनेमुळे राज्याचे खूप नुकसान होत आहे. महसूली गळती बंद करण्यासाठी कोणतीही उपाययोजना या अर्थसंकल्पामध्ये केलेली नाही. अर्थसंकल्प सादर करताना माननीय अर्थराज्यमंत्र्यांनी विकासाची घौडदौड दाखविणारी आकडेवारी आमच्या समोर मांडली. आपल्या अर्थसंकल्पीय भाषणाच्या पृ.क्र. 5 वरील परिच्छेद क्रमांक 10मध्ये माननीय अर्थमंत्री असे म्हणतात की, "मला सभासगृहास सांगण्यास विशेष आनंद होत आहे की, सन 2007-08 या वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये रुपये 510.68 कोटी इतकी महसुली शिल्लक अपेक्षित आहे." सभापती महोदय, गतवर्षीचा अर्थसंकल्प मांडत असताना 305.85 कोटीची महसुली शिल्लक दाखविण्यात आली होती. महसुली, भांडवल व लोकलेखा मिळून 8479.04 कोटीची एकूण शिल्लक दाखविण्यात आली होती. परंतु त्या शिलकीचे काय झाले ? माननीय अर्थमंत्र्यांनी आपल्या भाषणात यासंबंधीची कबुली दिलेली आहे. अर्थमंत्र्यांनी सन 2006-07च्या अर्थसंकल्पामध्ये 8479 कोटी शिल्लक राहील असा अंदाज व्यक्त केला होता. सुधारित अंदाजपत्रकामध्ये मात्र 890.33 कोटीची तूट दाखविली. हे मी म्हणत नाही तर माननीय अर्थमंत्र्यांनी हे सांगितलेले आहे. 8479 कोटीच्या शिलकीऐवजी 890 कोटीची तूट मागील वर्षात दाखविण्यात आली. मग शिल्लक आणि तूट याबाबतीत अशा प्रकारची पार्श्वभूमी असताना आताच्या 510 कोटीच्या शिलकीवर आम्ही कसा काय विश्वास ठेवायचा ? हा अर्थसंकल्प मांडल्यानंतर माननीय अर्थमंत्र्यांनी आपली पाठ थोपटून घेतली. त्यांनी त्या दिवशी वृत्तपत्रांना असे स्टेटमेंट दिले की, "राज्यातील जनतेने कर्जाला मुळीच घाबरुन जाऊ नये. कितीही कर्ज झाले तरी त्याची चिंता राज्यातील जनतेने करु नये." गेल्या 5-6 वर्षामध्ये राज्यातील जनतेवर कर्जाचा प्रचंड डोंगर उभा राहिलेला आहे. सन 2000-2001मध्ये 50319 कोटीचे कर्ज होते. सन 2005-06मध्ये 1 लाख 25 हजार कोटी कर्ज होते. सन 2006-07मध्ये

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर....)

1लाख 32 हजार कोटी कर्ज होते आणि आता सन 2007-08मध्ये संभाव्य कर्ज 1 लाख 44 हजार कोटी इतके होण्याची शक्यता आहे. सभापती महोदय, या राज्यातील प्रत्येक माणसावर 13700 कोटीचे कर्ज या राज्य सरकारने उभे केलेले आहे. राज्यसरकारने सन 2000-01मध्ये कर्जापोटी 5225 कोटी रु. व्याज दिलेले आहे. सन 2005-06मध्ये 9321 कोटी रु. व्याज दिले. सन 2006-07मध्ये 11999 कोटी रु. व्याज दिले आणि 2007-08 या वर्षामध्ये 11999 कोटीच्यावर हा व्याजाचा आकडा जाणार आहे. जवळपास 12 हजार कोटी रुपयाचे व्याज राज्य सरकारला कर्जापोटी द्यावे लागणार आहे. राज्यावर जे काही कर्ज झालेले आहे त्या कर्जाची परतफेड राज्याने किती केली, हा प्रश्न आहे. राज्य सरकारने कर्जफेड केली असती तर या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून राज्यातील जनतेला थोडासा तरी दिलासा मिळाला असता. सभापती महोदय, महाराष्ट्र राज्यामध्ये पाऊस चांगला झालेला आहे. सन 2006-07च्या हंगामामध्ये राज्यामध्ये सरासरी पेक्षा 17.3 टक्के पाऊस जास्त झाला.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

सभापती महोदय, राज्यामध्ये सन 2006-07 या आर्थिक वर्षात सन 2005-06 च्या मानाने 11 टक्के अन्नधान्य उत्पादनात वाढ झाली. सन 2006-07 च्या मानाने सन 2005-06 या वर्षामध्ये 31 टक्के कापूस उत्पादनात वाढ झाली. सन 2006-07 या आर्थिक वर्षात सन 2005-06 च्या मानाने 5 टक्के तेलबियांच्या उत्पादनात वाढ झाली. सन 2006-07 या आर्थिक वर्षात सन 2005-06 च्या मानाने 61 टक्के ऊस उत्पादनात वाढ झाली. महसुली रक्कमेत 13.33 टक्के वाढ झाली. तरीही माननीय अर्थमंत्र्यांची इच्छाशक्ती नसल्यामुळे या राज्यावरचे कर्ज वाढतच चालले आहे. कर्जात वाढ होत चालली आहे आणि व्याजाचा भुर्दंड सुध्दा दरवर्षी वाढत चालला आहे. या वर्षी कर्जापोटी 12500 कोटी रुपयांचे व्याज द्यावे लागले. महाराष्ट्रात पाऊस चांगला झाला. महाराष्ट्रात कृषि उत्पादन चांगले झाले. कापसाचे उत्पादन चांगले झाले. ऊसाचे उत्पादन चांगले झाले. असे असताना कर्ज परतफेडीची कोणत्याही पध्दतीची दिशा दाखविली नाही हे दुर्दैव आहे. या राज्याचे दरडोई उत्पन्न महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणीमध्ये दाखविण्यात आले आहे. राज्यामध्ये 58 टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात राहणारी असून दरडोई उत्पन्न 7980 रुपये म्हणजे दरमहा 658 रुपये व दरदिवशी 21 रुपये इतके उत्पन्न आहे. म्हणजे 58 टक्के जनतेची रोजची कमाई 21 रुपये आहे. महाराष्ट्र हा देशात एक नंबरवर असलेला प्रदेश आहे, राज्य आहे असे वारंवार आपण म्हणतो. परंतु महाराष्ट्रातील 58 टक्के माणसांचे दररोजचे उत्पन्न फक्त 21 रुपये आहे. असे असताना आपणच आपली पाठ थोपटून घेत असाल तर सरकारची कीव करावीशी वाटते. राज्याचे सरासरी दरडोई उत्पन्न 32600 रुपये असून देशाचे सरासरी दरडोई उत्पन्न 25716 आहे. कृषि व बिगर कृषि क्षेत्रामध्ये दरडोई उत्पन्नामध्ये प्रचंड तफावत निर्माण झाली. शहरात राहणाऱ्या माणसांचे दरडोई उत्पन्न वाढत आहे. परंतु ग्रामीण भागात राहणाऱ्या माणसांचे दरडोई उत्पन्न दिवसेंदिवस कमी होत चालले आहे. ग्रामीण भागात फक्त 21 रुपये दरदिवशी प्रत्येक माणसाचे उत्पन्न आहे असे महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणीमध्ये म्हटले आहे.

सभापती महोदय, अंदाजपत्रकामध्ये शासनाकडून घोषणा केल्या जातात. अर्थसंकल्प सादर करताना आर्थिक शिस्तीचे गुलाबी चित्र रंगविले जाते. गुलाबाचे फूल लावून अर्थमंत्री अर्थसंकल्पीय भाषणाचे वाचन करतात. तसेच महाराष्ट्राच्या प्रगतीचे गुलाबी चित्र रंगविले जाते.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

अवास्तव योजना जाहीर केल्या जातात. अनुदानांची मोठमोठी आकडेवारी दिली जाते. हा आकडेवारीचा जो खेळ खेळला जातो त्याने राज्याचा विकास साधला जात नाही. सन 2004-05 चा अर्थसंकल्प सादर करीत असताना अर्थमंत्र्यांनी जे भाषण केले होते त्यातील एक उदाहरण मी याठिकाणी सांगू इच्छितो. ज्या उदाहरणाचा सभापती महोदय, आपल्याशी संबंध येतो. तो प्रश्न परवा विधानपरिषदेत उपस्थित झाला होता. या प्रश्नावर आम्हाला बहिर्गमन करावे लागले होते. सन 2004-05 चा अर्थसंकल्प सादर करीत असताना वसतीशाळेतील शिक्षकांना मानधन देण्याचे जाहीर केले होते. त्या मानधनाचे काय झाले? वसतीशाळा योजना सन 2001 मध्ये सुरु झाली. सन 2004-05 चा अर्थसंकल्प सादर केला त्यावेळी या वसतीशाळातील शिक्षकांना मानधन देण्याचे जाहीर केले होते. अद्यापही हे मानधन सुरु केले जात नाही. या वसतीशाळा शिक्षकांना किती वेतन दिले जाते हे मी परवा सभागृहात सांगितले होते. दरमहा फक्त 1000 रुपये मानधन दिले जाते. म्हणजे प्रतिदिन 30 ते 32 रुपये इतके उत्पन्न या वसतीशाळांमध्ये शिकविणा-या शिक्षकांचे आहे. घरामध्ये पोळ्या लाटणारी महिला, काम करणारे मजूर, शेतावर जाणारे मजूर यांना दररोज 50 ते 60 रुपये इतकी मजुरी मिळते. घरात पोळ्या लाटणाऱ्या महिलेपेक्षा कमी वेतन घेऊन वसतीशाळेतील हे शिक्षक विद्यादानाचे काम करतात. त्यांच्या वेतनासंबंधी सन 2004-05 च्या अर्थसंकल्पात जाहीर करुनही आजतागायत मानधनात वाढ केली जात नाही ही दुर्दैवाची बाब आहे. या राज्याची भावी पिढी कशी तयार करणार आहात? या बाबीसंबंधी सरकार किती उदासीन आहे हेच यावरुन दिसून येते.

(नंतर श्री.जुन्नरे....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

सभापती महोदय, हे शासन फक्त मोठमोठया घोषणा करण्याचे काम करते परंतु केलेल्या घोषणा प्रत्यक्षात कधीच अंमलात आणीत नाही. या शासनाने सन 2005-2006 मध्ये उच्च प्राथमिक स्तरावर मुलींची होणारी गळती व अनुसूचित जाती जमातींच्या विद्यार्थ्यांची होणारी गळती रोखण्यासाठी मुक्तशाळा योजना राबविण्याचे धोरण जाहीर केले होते. सन 2005-2006 चा अर्थसंकल्प सादर करतांना या योजनेच्या संदर्भात उल्लेख करण्यात आला होता. परंतु यासंदर्भात काहीही अंमलबजावणी करण्यात आली नाही. सन 2006-2007 चा अर्थसंकल्प सादर करतांना प्रत्येक तालुक्यात अनुसूचित जातीच्या मुला-मुलींसाठी निवासीशाळा करण्याचे जाहीर केले होते परंतु या संदर्भात देखील काहीही अंमलबजावणी झाली नाही. शासनाने जेव्हा ही योजना जाहीर केली होती त्यावेळेस मी सभागृहात उपस्थित होतो, त्यावेळी सन्माननीय सदस्यांनी या योजनेचे बाके वाजवून स्वागत केले होते. मागच्या वर्षी या शासनाने ज्या काही घोषणा जाहीर केलेल्या आहेत त्यातील एक तरी योजना या शासनाने पूर्ण केलेली आहे काय? या शासनाने अर्थसंकल्प सादर करतांना वसतीशाळा शिक्षकांना मानधन देण्याचे जाहीर केले होते, उच्च प्राथमिक स्तरावर मुलींची होणारी गळती व अनुसूचित जाती-जमातींच्या विद्यार्थ्यांची होणारी गळती रोखण्यासाठी मुक्तशाळा योजना जाहीर केली होती, प्रत्येक तालुक्यात अनुसूचित जातीच्या मुला-मुलींसाठी निवासी शाळा करण्याचे जाहीर केले होते परंतु कोणत्याही घोषणेची अंमलबजावणी या शासनाने केलेली नाही. मुक्त शाळा सुरुच झाल्या नाहीत. अद्याप कोणत्याही तालुक्यात अनुसूचित जाती-जमातींच्या मुलींसाठी स्वतंत्र निवासीशाळा सुरु झालेली नाही. त्यामुळे याही वर्षी जाहीर झालेल्या घोषणांवर विश्वास कसा आणि का ठेवायचा?

सभापती महोदय, बजेटमध्ये ज्या खात्यासाठी तरतुदी केल्या जातात त्याप्रमाणे त्या खात्याने किमान 90 टक्के रक्कम खर्च करणे ही अपेक्षा असते ही रक्कम शेवटच्या एक दोन महिन्यात खर्च न करता ती वेळच्यावेळी खर्च करणे आवश्यक असते. परंतु घडते मात्र वेगळेच. परंतु ही रक्कम 11 महिने खर्चच केली जात नाही ज्यावेळेस फेब्रुवारी-मार्च महिना उजाडतो तेव्हा विभागाला जाग येते, मग रक्कम खर्च करण्यासाठी धावपळ होते आणि ही रक्कम फेब्रुवारी-मार्च महिन्यामध्ये खर्च करण्याचा प्रयत्न केला जातो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

सभापती महोदय, केंद्र शासनाने सन 2006-2007 मध्ये जो निधी राज्य शासनासाठी मंजूर केला आहे तो महाराष्ट्र शासनाने अल्प प्रमाणात खर्च केलेला आहे.

सभापती महोदय, सर्वात आश्चर्याची बाब म्हणजे शासनाच्या माहिती संचालनालयासाठी मंजूर झालेल्या निधीपैकी संचालनालयाने नोव्हेंबर 2006 पर्यंत एक नवा पैसाही खर्च केला नव्हता. सरकारचे निर्णय लोकांपर्यंत पोहोचविणे, धोरणात्मक बाबतीत लोकांच्या सूचना स्वीकारणे, जनतेची गा-हाणी सरकारपर्यंत पोहोचविणे, गरीब व कष्टकरी वर्गासाठी असलेल्या योजनांची माहिती गावपातळीपर्यंत पोहोचविणे अशी महत्वाची कामे, माहिती जनसंपर्क महासंचालनायाकडून अपेक्षित असतात, परंतु त्यासाठी निधी खर्च करण्याबाबत या खात्याची ही अशी दुर्दशा आहे. खरे तर ग्रामीण भागातील कोणत्याही सामान्य माणसास देखील एखाद्या शासन निर्णयाची वा परिपत्रकांची प्रत विनामूल्य वा अल्प किंमतीत मिळणे आवश्यक असतांना त्यासाठी असलेला पैसाही खर्च करावयाचा नाही ही कुठली आर्थिक निती आहे? सामान्य माणसाचे सोडाच, आज एखाद्या आमदाराला देखील एखादा जी.आर. मिळवायचा असल्यास त्याला मंत्रालयात दहा ठिकाणी चकरा माराव्या लागतात. माहिती संचालनालयाने नोव्हेंबर पर्यंत एक पैसा देखील खर्च केलेला नाही. माहिती संचालनालय केवळ नावासाठीच आहे आणि ही परिस्थिती केवळ माहिती संचालनायाचीच नाही तर अनेक विभागाची आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये गेल्या सात वर्षात 3750 शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. कृषी खाते उदासीन असल्यामुळेच शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. शेतक-यांच्या आत्महत्येनंतरही कृषी खाते जागे झालेले नाही. कृषी खात्यासाठी केलेल्या 253 कोटी 56 लाखांच्या तरतुदीपैकी केवळ 136 कोटी 84 लाख रुपये खर्च झालेले आहेत. शेतक-यांसाठी हे शासन खूप काही करते, मोठया प्रमाणात तरतूद करीत आहे हे दाखवायचे परंतु प्रत्यक्षात शेतक-यांसाठी रक्कम खर्चच केली जात नाही. शेतक-यांसाठी रक्कम खर्च केली तर ती फार कमी प्रमाणात खर्च केली जाते.

पर्यावरण खात्यावरील मंजूर 100 लाखापैकी शून्य रक्कम खर्च झालेली आहे. हे खाते आता मोठे झालेले आहे, पॉवरफूल झालेले आहे. आता हे खाते प्रत्येक गोष्टीला अडविण्याचे काम करीत आहे.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

आता प्रत्येक विभागाला प्रत्येक कामासाठी पर्यावरण विभागाची एन.ओ.सी.घ्यावी लागते. पर्यावरण विभागाची एन.ओ.सी. नसेल तर कोणतेही कामे होऊ शकत नाहीत. इतका पॉवरफूल हा विभाग झालेला आहे. या विभागाने मागील वर्षात मंजूर अनुदानापैकी एक नया पैसा देखील खर्च केलेला नाही.

वन विभागाच्या बाबतीत बोलावायाचे झाले तर, या विभागाची परिस्थितीसुध्दा पर्यावरण विभागासारखी आहे. या विभागासाठी 54 कोटी 94 लाख इतकी तरतूद करण्यात आली होती त्यापैकी फक्त 2 कोटी 67 लाख इतका खर्च करण्यात आलेला आहे. कोकणातील सन्मानीय सदस्य येथे नेहमीच ओरड करतात की, कोकणात हत्तींमुळे, माकडांमुळे, हरणांमुळे, डुक्करांमुळे शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. विदर्भात सुध्दा हरणांमुळे शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. पण त्याबाबतीत कोणताच बंदोबस्त करण्यात आलेला नाही. विभागासाठी फक्त तरतूद मंजूर करुन घ्यावयाची पण ती प्रत्यक्षात खर्च न करता तशीच पडून द्यायची ही वृत्ती बरोबर नाही. जवळपास 52 कोटी रुपये पडून राहिले. जर खर्च करायचा नसेल तर कशासाठी इतकी तरतूद करायची ? तेव्हा यापुढे शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी प्राण्यांच्या बंदोबस्तासाठी रक्कम खर्च करण्यात यावी.

सार्वजनिक आरोग्य विभागाबाबत बोलावयाचे झाले तर सार्वजनिक आरोग्य विभागाचेच आरोग्य बिघडलेले आहे. या विभागासाठी 819 कोटी 94 लाख रुपयांची तरतूद करण्यात आली होती. परंतु प्रत्यक्षात फक्त 61 कोटी रुपये खर्च करण्यात आले. सन्माननीय मंत्री महोदय श्री.हर्षवर्धन पाटील यांना मी सांगू इच्छितो की, त्यांचे सरकार गतीमान आहे ? राज्यात चिकुन गुनियाची साथ आली,त्यामध्ये अनेकांचा बळी गेला. शासनाच्या सिव्हील हॉस्पीटलमध्ये, ग्रामीण रुग्णालयांमध्ये साधी सलाईनची व्यवस्था नव्हती. आरोग्य विभागासाठी 819 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. परंतु ही रक्कम खर्च करण्यात आली नाही. ग्रामीण भागातील रुग्णांनी स्वत:कडील एक-दोन हजार रुपये खर्च करुन उपचार घेतले. परंतु शासनाकडून त्यांना योग्यप्रकारे मदत झाली नाही. ग्रामीण रुग्णालयापर्यंत हा निधी पोहोचला नाही. प्रत्येक विभागाच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

बाबतीत निर्णयाचे केंद्रीकरण करण्यात आले. परंतु त्याप्रमाणे निर्णय झाले नाहीत. कोणत्याही कामास दहा विभागाची परवानगी लागते, परंतु त्यांच्यात समन्वय नसल्यामुळे निर्णयाची अंमलबजावणी व्यवस्थितपणे झाली नाही. माननीय वित्तमंत्री श्री.जयंत पाटील हे विद्याविभूषित आहेत. त्यांना विभागांतील कम्युनिकेशन गॅप दूर करता आला असता, परंतु त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले. कागदावर तरतूद दाखवावयाची परंतु प्रत्यक्षात ती खर्च करायची नाही. या सर्व कागदी कसरती आहेत.

सभापती महोदय, माननीय वित्तमंत्र्यांनी गेल्या दोन-तीन वर्षात अर्थसंकल्पामध्ये प्रशासकीय खर्चामध्ये लक्षणीय कपात केल्याचे दाखवून शाबासकी घेण्याचा प्रयत्न केला. मी अर्थसंकल्प वाचलेला आहे. सन 2005-06 या वर्षात कर्मचाऱ्यांचे वेतन, भत्ते, निवृत्ती वेतन यावर 68.43 टक्के कपात केलेली आहे. सन 2006-07 मध्ये 61.79 टक्के कपात केलेली आहे. तर सन 2007-08 मध्ये ही कपात 69.82 टक्के अपेक्षित आहे असे त्यांचे म्हणणे आहे. ही बाब स्वागतार्ह असली तरी त्या गोष्टीस दुसरी देखील बाजू आहे. युतीचे सरकार असताना वाशिम आणि नंदूरबार असे दोन नवीन जिल्हे झाले. या दोन्ही जिल्ह्यांमध्ये अजूनही अनेक विभागांची कार्यालये नाहीत. हे नवीन जिल्हे होऊन सात वर्षे झाली. तरीही त्याठिकाणी प्रशासकीय कार्यालये नाहीत.

यानंतर कु.गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर सुरु .....

सभापती महोदय, शेतकऱ्यांमध्ये आत्महत्या होत आहेत, आत्महत्या झालेल्या शेतकऱ्याला न्याय देण्यासाठी सरकारच्या माध्यमातून जी अनुदाने द्यावयाला पाहिजे ती प्रशासकीय कार्यालय नसल्यामुळे दिली जात नाही. नंदूरबार सारख्या आदिवासी जिल्हयामध्ये कामगार न्यायालय नसल्यामुळे तेथील बालकामगारांचे सर्वेक्षण धुळे जिल्हयाच्या आयुक्तांमार्फत केले जाते. येथील हजारो पदे रिक्त आहेत. अपंगांच्या पदांचा अनुशेष आहे. वर्षानुवर्षे या जागा भरल्या गेलेल्या नाहीत. बेरोजगार , तरुण यांच्यासाठीची पदे रिक्त ठेवण्यात आलेली आहेत. महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणीमध्ये असे सांगितले आहे की, एकूण 36 लाख बेरोजगारांची नोदणी झालेली आहे. या 36 लाख बेरोजगारांसाठी या अर्थसंकल्पामध्ये कोठल्याही प्रकारचे धोरण किंवा कोठल्याही प्रकारची तरतूद केली गेलेली नाही. युती सरकारच्या काळात युती सरकारने बेरोजगारांना बेरोजगारी भत्ता देण्याचा निर्णय घेतला होता. परंतु तो भत्ता देण्याचा निर्णयही या शासनाने मागे घेतला आहे. आणि यामुळे ही पदे आज रिक्त आहेत. वर्षानुवर्षे या पदांचा अनुशेष भरला जात नाही. आम्ही प्रशासकीय खर्चात कपात करीत आहोत अशा प्रकारच्या फुशारक्या येथे मारल्या जातात. यामुळे तुमची फसवणूक तुम्हीच करीत आहात. प्रशासकीय खर्चात तुम्ही एका बाजूला कपात करीत असाल आणि दुसऱ्या बाजूला मोठया प्रमाणात जागा रिक्त असतील , बेरोजगारांना काम मिळत नसेल, अपंगांचा बॅकलॉग भरला गेलेला नसेल तर या कपातीला काहीही अर्थ उरत नाही. राज्याच्या एकूण उत्पन्नापैकी 60 टक्के पेक्षा जास्त उत्पन्न राज्याला व्हॅटमुळे मिळते.या राज्यामध्ये व्हॅट कर लावून अनेक वर्षे झाली परंतु अजुनही कर खात्याची पुर्नरचना केलेली नाही. या खात्याचे आधुनिकीकरण करण्यासाठी संगणक व विदेशी तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला व त्यासाठी मोठया प्रमाणात खर्चही करण्यात आला होता. पण आज आपण तेथील अवस्था पाहिलीत तर आपल्या लक्षात येईल की, या खात्यातील संगणक हे धूळ खात पडलेले आहेत व त्या ऑफिसेसमध्ये पुरेसा स्टाफ नाही. अध्यक्ष महोदय, या खात्याचे करनिर्धारण अनेक वर्षापासून केले गेलेले नाही. राज्याच्या उत्पन्नाचे परताव्याचे आकडेदेखील अजून स्पष्ट केलेले नाहीत. कर खात्यामधील ऑफीसमध्ये परतावे किती द्यावयाचे आहेत याचा हिशोब अजूनपर्यंत झालेला नाही.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर निर्धारण सुध्दा अनेक वर्षापासून पेंडींग आहे त्यामुळे माफी योजना राबविण्याची पाळी या सरकारवर येणार आहे. व्यवसाय कराचे अयोग्य प्रशासनच व्यवसाय कराची माफी योजना राबविण्यास कारणीभूत ठरणार आहे. करमाफी योजना तुम्ही आणत आहात याचा अर्थ शासन कर वसूली करण्यामध्ये अपयशी ठरलेले आहे असा निघू शकतो. आपण अर्थसंकल्पामध्ये अन्नधान्य , गहू, तांदूळ, डाळी, मिरची आटा, सोलापूरी चादरी, टॉवेल इत्यादी वस्तूंवर कर सवलत 6 महिन्यांनी वाढविली आहे. त्यानंतर आपण काय करणार आहात ? 6 महिन्यानंतर ही कर सवलत आपण निश्चितपणे वाढवणार आहात असा कोणताही उल्लेख परवाच्या अर्थसंकल्पीय भाषणात केलेला नाही. सभापती महोदय, जीवनावश्यक वस्तूंवर ब्रिटीशांनी देखील कर लावला नव्हता. आणि आपण येथे उल्लेख केला की, 6 महिने या वस्तूंवर कर लावणार नाही. मग त्या नंतर कर लावणार आहात का ?आपण गोरगरीबांच्या तोंडातील घास काढून घेण्याचा हा डाव रचलेला आहे.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री. पुरी..

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

सभापती महोदय, भ्रष्टाचार आणि सदोष कर रचनेमुळे राज्याचे फार मोठे नुकसान होते. परंतु महसुली गळती बंद करण्याच्या दृष्टीने या अर्थसंकल्पामध्ये कुठल्याही प्रकारची तरतूद नाही. तसेच, आपण विक्रीकर खात्याच्या पुनर्रचनेसंबंधी नेहमीच सांगता. परंतु यासाठी कुठलीही सुधारणा आपण अर्थसंकल्पामध्ये सुचवलेली नाही. फक्त, टाईम बाऊंड व पुढे ढकलणे एवढाच आपला कारभार चालू आहे. भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक ही एक शासनाची लेखा परीक्षणाची फार मोठी यंत्रणा असून ही यंत्रणा ऑडीट करते. या यंत्रणेने अनेकदा राज्य सरकारच्या वित्त खात्यावर ताशेरे ओढलेले आहेत. परंतु हे सरकार त्यांनाही मानण्यास तयार नाही. महालेखापरीक्षकांनी ऑडीट केले व त्यावर ताशेरे ओढून ऑडीट ऑब्जेक्शन काढले, ते दूर करण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा आपण त्यास केराची टोपली दाखवता, हे योग्य नाही. सभापती महोदय, आज मूल्यवर्धित करप्रणाबाबतीत राज्य व केंद्र सरकारमध्ये घोळ चालू आहे. याबाबतीत आपल्या राज्याचा समान दृष्टीकोन नाही. याबाबतीत मी हॉटेल व्यावसायिकाचे उदाहरण देतो. आपल्याकडे हॉटेल व्यावसायिकांवर विविध कर लावले जातात. या व्यावसायिकांवर विविध कर लावताना, संबंधित हॉटेलमध्ये येणाऱ्या ग्राहकांचा विचार केला जातो. महाराष्ट्र ऐषआरामकर कायदा 1987 मधील कलम 3 नुसार हॉटेलचालकास आखलेल्या दराने ऐषआराम कर लावला जातो. प्रतिदिन रुपये 200 ते 1200 पेक्षा कमी भाडे देऊ शकणारे ग्राहक असतील तर त्यांना 4 टक्के कर लावावा व रुपये 1200 पेक्षा अधिक असतील तर त्यांना 10 टक्के कर लावावा, असे कायद्यानुसार ठरले आहे. याचाच अर्थ, 1200 रुपयांपेक्षा जास्त भाडे देऊ शकणारे असतील तर त्यांना 10 टक्के कर लावला पाहिजे. असे असताना मुंबई, ठाणे, बृहन्मुंबई या जिल्हयांतील हॉटेल व्यावसायिकांनी आत्तापर्यंत शासनाकडे फक्त 6 टक्केच कर भरलेला आहे. त्यांनी 10 टक्के कर भरलेला नाही. त्यांच्याकडून उर्वरित 4 टक्के कराची वसुली करण्याच्या दृष्टीने कुठल्याही प्रकारची उपाययोजना विक्रीकर खात्याने आखलेली नाही. उलटपक्षी पंचतारांकित व्यावसायिक संघटनांनी हा ऐषआराम कर 6 टक्क्यापर्यंत खाली आणावा असा शासनावर दबाव आणत आहेत. त्यांच्या मागणीस शासनाने बळी पडू नये अशी माझी शासनास विनंती आहे. उलट, काटेकोरपणे या कराची वसुली व्हावी, अशी माझी इच्छा आहे. सभापती महोदय, गेल्यावर्षी शासानाने शिलकी अर्थसंकल्प मांडला. परंतु प्रत्यक्षात शिलकी अर्थसंकल्प मांडूनही तूट

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

निर्माण झाली. पंचतारांकित व्यावसायिकांनी विक्रीकर विभागाच्या अधिकाऱ्यांशी संगनमत करुन कर चुकवेगिरी केली. त्यांनी असेसमेंट व्यवस्थित केले नाही. अशाप्रकारे विक्रीकर विभागाच्या अधिकाऱ्यांशी संगनमत करुन पंचतारांकित हॉटेल व्यावसायिकांनी कोटयावधी रुपयांची कर चुकवेगिरी केलेली आहे. त्यामुळे याबाबतची फेरचौकशी व्हावी व जेवढे पंचतारांकित हॉटेल्स असतील व ज्यांनी कराचे असेसमेंट व कर पत्र भरले असेल त्यांची ताबडतोबीने फेरचौकशी करुन या कर चुकवेगिरी करणाऱ्या लोकांवर कारवाई करावी, अशी माझी शासनास विनंती आहे.

सभापती महोदय, या शासनाकडून आम्हाला फार मोठी अपेक्षा होती. नेहमीच शेतकऱ्यांच्या नावावर कुंकू लावून लोकप्रतिनिधी सभागृहात येतात. निवडणुकीच्या काळात शेतकऱ्यांच्या नावाने कुंकू लावून मते घेतात. परंतु प्रत्यक्षात याठिकाणी आल्यानंतर हे लोकप्रतिनिधी शेतकऱ्यांना पूर्ण विसरुन जातात. अशाप्रकारे शेतकऱ्यांच्या नावाचे कुंकू लावून आपण सत्तेवर येता आणि त्यांचे भांडवल करुन आपण त्यांनाच विसरुन जाता, हे शेतकऱ्यांचे दुर्दैव आहे. विदर्भातील हजारो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. याबाबत मला सांगावेसे वाटते की, विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा विषय आता इतिहासजमा झालेला आहे. कारण, माननीय मुख्यमंत्र्यांनी आत्ताच स्टेटमेंट केले की, आता शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण कमी झालेले आहे.

नंतर श्री.रोझेकर...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखी नोंदी

श्री.पांडुरंग फुंडकर.....

परंतु, वस्तुस्थिती तशी नाही. सन्माननीय अर्थ राज्यमंत्री आपण विदर्भातील आहात. यावर्षी म्हणजे जानेवारी, 2007 पासून तीन महिन्यांच्या कालावधीमध्ये 233 शेतक-यांनी आत्महत्या केलेली आहे. विधिमंडळात वित्तमंत्री ज्या दिवशी अर्थसंकल्प सादर करीत होते त्यादिवशी विदर्भातील तीन शेतकरी आत्महत्या करीत होते. ही स्थिती विदर्भातील शेतक-यांची आहे. सरकारच्याच पाहणी अहवालानुसार आजही विदर्भातील चार लाख शेतकरी हे आत्महत्येच्या वाटेवर आहेत. आजपर्यन्त विदर्भातील शेतकरी आत्महत्या करीत होता आता हे लोण मराठवाड्याकडे सरकत चालले आहे. सन्माननीय ज्येष्ठ नेते, श्री.दिवाकर रावते आणि आम्ही असे ठरविले होते की, शेतक-यांच्या आत्महत्येसंबंधी या सभागृहात चर्चा उपस्थित करावयाची नाही. म्हणून चर्चेचे नवीन विषय आम्ही निवडले होते. दुर्देवाने, 20 तारखेला लातूर जिल्हयातील गंगापूर येथील शेतकरी फुलारी याने आत्महत्या केली. त्यानंतर 24 तारखेला लातूर जिल्हयातीलच वंजारवाडी भागातील शेतकरी नागनाथ आदरवाड याने आत्महत्या केली. कापूस उत्पादक शेतक-याला भाव मिळत नाही म्हणून तो कर्जबाजारी होतो, कर्ज फिटत नाही, भाव मिळत नाही, माल विकला जात नाही म्हणून मुला-मुलींची लग्न त्याला करता येत नाहीत आणि त्यामुळेच विदर्भातील शेतकरी आत्महत्या करीत होते. पण आज पश्चिम महाराष्ट्रातील, मराठवाड्यातील शेतकरी आत्महत्या करीत आहेत. त्यांनी असा कोणता गुन्हा केला होता ? पिकवलेला ऊस कारखाना नेत नाही म्हणून गंगापुरच्या फुलारी या शेतक-याला आत्महत्या करावी लागली. प्रगत राज्य, गतीशील राज्य, काम करणारे सरकार असे बिरुद मिरविणा-या सरकारच्या काळात कारखाना ऊस नेत नाही. घाम गाळून पिकविलेला ऊस कारखाना नेत नाही, मालाला मार्केट मिळत नाही, माल विकला जात नाही म्हणून आमच्या अन्नदात्या शेतक-यांना आत्महत्या कराव्या लागत असतील तर अर्थ राज्यमंत्री, डॉ.सुनील देशमुख यांना माझा प्रश्न आहे की, तुम्ही कुठल्या दिशेने राज्याला नेणार आहात ? महाराष्ट्र प्रथम क्रमांकाचे राज्य आहे, असे तुम्ही म्हणता आणि त्याच राज्यात नागनाथ, फुलारी यांच्यासारख्या शेतक-यांना आत्महत्या कराव्या लागत आहेत. सन्माननीय सदस्य, श्री.पाशा पटेल यांनी सांगितले होते की, दर तासाला 1 कापूस उत्पादक शेतकरी आत्महत्या करीत असेल तर दर तासाला तीन ऊस उत्पादक शेतकरी आत्महत्या करतील, इतकी

...2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

भयानक परिस्थिती आहे. कापूस उत्पादक शेतक-यांच्या आत्महत्येच्या चर्चेला सन्माननीय उपमुख्यमत्र्यांनी थातूरमातूर उत्तर दिले. एक टिपरु ऊस देखील पडून राहणार नाही, कारखान्यांना सर्व ऊस उचलावा लागेल, अशा प्रकारे घोषणा त्यांनी केली. ऊस शिल्लक असतांना कारखाने बंद करु नका, असा दमही त्यांनी कारखान्यांना दिला. पण कारखान्याला परवडले नाही तर कुणीही कारखाना तोटयात चालविणार नाही आणि त्यामुळे हजारो टन ऊस शेतात उभा राहणार आहे. एक दिवस या राज्यात असा येईल की, कापुस उत्पादकच नव्हे तर ऊस उत्पादक शेतक-यांच्या आत्महत्या होतांना आपल्याला पहावे लागणार आहे, अशी परिस्थिती पुढच्या कालखंडात येणार आहे. कापूस उत्पादक शेतकरी आत्महत्या करीत आहे, ऊस उत्पादक शेतकरी आत्महत्या करीत आहे एवढेच नव्हे तर सन्माननीय सदस्य, श्री.अरुण गुजराथी साहेबांना मी सांगू इच्छितो की, मी शेतकरी मेळाव्यासाठी आपल्या भागात गेलो होतो. तीन शेतकरी मेळाव्यांना मी उपस्थित होतो. तेथील केळी उत्पादक शेतकरी सांगत होते की, साहेब आपल्या कापूस उत्पादक पट्टयातील शेतकरी जेव्हा आत्महत्या करीत होते, तेव्हा आम्ही पहात होतो. पण आज विजेच्या भारनियमनामुळे आम्हा केळी उत्पादक शेतक-यांवर देखील आमहत्या करण्याची पाळी आली आहे. केळी उत्पादक शेतकरी देखील आत्महत्या करणार आहेत, असे सुतोवाच त्या भागातील शेतक-यांनी केले. या राज्यातील शेतकरी जर अशा प्रकारे मरणार असतील तर राज्यात कुणी जगू शकणार नाही, शेतकरी जगला तर आपण जगणार आहोत. सन्माननीय रोजगार हमी योजना मंत्री, श्री.हर्षवर्धन पाटील यांना मी सांगू इच्छितो की, शेतक-याला जगविणे हे शासनाचे प्रथम कर्तव्य आहे. परंतु, सरकार या कर्तव्यापासून दूर जात आहे, हे मी त्यांच्या मुद्दाम निदर्शनास आणून देत आहे. कापूस उत्पादक शेतक-यांसाठी एक दीर्घकालीन धोरण जाहीर करण्यात येईल, असे सरकारने हिवाळी अधिवेशनामध्ये जाहीर केले होते. काय झाले या धोरणाचे ? नागपूरचे अधिवेशन पार पडले, आता मुंबईमध्ये अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु आहे पण हे धोरण अद्याप जाहीर झालेले नाही, एवढेच नव्हे तर, या धोरणावर विचारही सुरु झालेला नाही. पण सरकार जाहीर करुन मोकळे झाले. हेक्टरी 1500 रुपयांप्रमाणे द्यावयाची मार्जीन मनीची मदत 400 कोटी रुपयांवरुन 900 कोटी रुपयांवर जाणार आहे.

यानंतर कुमारी जयश्री.....

अशुद्धीत मत / शोधनेसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

शासनाने यासाठी किती तरतूद केली आहे, 450 कोटी रुपयांची, कसा पैसा देणार शेतक-याला शासन ? मार्जिन मनीची तीन टक्क्यांची रक्कम दोन टप्प्यात शेतक-यांना देण्यात येईल, असे आपण हिवाळी अधिवेशनात जाहीर केले. एक टप्पा संपला दुसरा टप्पा सुरु झाला. मागच्या वर्षी आपण ऊस उत्पादक शेतक-याला दर हेक्टरी 1,000 रुपये मदत देण्याचे जाहीर केले व यावर्षी आपण असे जाहीर केले की, 1500 रुपये मदत हेक्टरी कापूस उत्पादक शेतक-याला देणार आहोत.

श्री.हर्षवर्धन पाटील : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांच्या भाषणात मला व्यत्यय आणावयाचा नाही, परंतु चुकीचे रेकॉर्डवर राहू नये यासाठी मी एक गोष्ट सांगू इच्छितो की, शेतक-याची तीन टक्क्यांची रक्कम जी सरकार दोन टप्प्यांमध्ये देणार होते, त्यापैकी 768 कोटी रुपयांचे वाटप पूर्ण झालेले आहे. दुसरा मुद्दा जो आपण या ठिकाणी उपस्थित केला होता की, दीर्घकालीन उपाययोजनेच्या बाबतीमध्ये काय झालेले आहे ? सरकारने दीर्घकालीन योजनेच्या संदर्भात प्रस्ताव तयार केलेला आहे.

श्री.दिवाकर रावते : माननीय मंत्री महोदयांनी रेकॉर्डवर अमूक एक गोष्ट चुकीची राहू नये म्हणून जशी काळजी घेतली, तशीच काळजी शेतक-यांना सदर तीन टक्के रकमेचे चेक दोन टप्प्यात वाटणा-या सरकारी अधिका-यांच्या अनागोंदी कारभाराबद्दल घेतली असती तर अधिक बरे झाले असते. सरकारी अधिका-यांनी शेतक-यांच्या पैशांचे चेक आपल्या नातेवाईकांना वाटले, त्याबद्दल केलेल्या कारवाईची माहिती व सद्यस्थितीही सभागृहात सांगण्यात यावी, कारण तो पैसा शेतक-याचा आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : शेतक-यांना देण्यात येणा-या चेकवर चूकीची नावे छापल्यामुळे त्यांचे चेक परत आले.

श्री.हर्षवर्धन पाटील : महोदय, मला सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांच्या भाषणात व्यत्यय आणावयाचा नाही, परंतु सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जो मुद्दा मांडला त्याबद्दल मला असे सांगावयाचे आहे की, सदर शासकीय अधिका-यांविरुध्द केलेल्या कारवाईचा अहवाल मी सभागृहाच्या पटलावर ठेवीन.

श्री.दिवाकर रावते : सभागृहाच्या पटलावर कशाला ठेवता, त्यासंबधी निवेदन करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : आपण जे चेक शेतक-यांना दिले, त्यामध्ये कोणाचे आडनाव,गाव,नाव,वडिलांचे नाव चुकलेले असल्यामुळे लाखो रुपयांचे चेक परत आले. सदर चेक दुरुस्त करुन आपण शेतक-यांना लवकरात लवकर पैसे परत देणार आहात का ? नागपूर अधिवेशनामध्ये आपण कापूस उत्पादक शेतक-यांना दर हेक्टरी 1500 रुपये देण्याची घोषणा केली व त्याबद्दलचा जी.आर.आता मार्चमध्ये काढण्यात आला, कापसाचा हंगामही संपला. जर घोषणा झाल्यानंतर जी.आर.निघायाला तीन आणि चार महिने वेळ लागणार असेल तर प्रत्यक्ष शेतक-यांना मदत मिळावयास किती वेळ लागेल याची कल्पनाच केलेली बरी, यावरुन हे सरकार कापूस उत्पादक शेतक-याच्या बाबतीत किती उदासीन आहे हे दिसून येते. कापूस उत्पादक शेतक-याला दर हेक्टरी 1500 रुपये प्रमाणे जर पाच हेक्टर शेत असलेल्या शेतक-याचा जर 20 क्विंटल कापूस झालेला असेल तर शासनाच्या तीन हजार रुपये अनुदानाप्रमाणे मार्केटमध्ये 2500 ते 2600 रुपये भाव असणारा कापूस शेतक-याला फक्त 1900 रुपये क्विंटल या भावाने विकावा लागतो म्हणजे त्याचे दर क्विंटलमागे 700 ते 800 रुपयांचे नुकसान होते. त्या शेतक-याचे पूर्ण उत्पन्नावर 14,000 रुपये नुकसान होते, त्यातून शासनाची 3,000 रुपये मदत जर वजा केली तर 11,000 रुपये त्या शेतक-याचे नुकसान होते. या देशामध्ये प्रचंड प्रमाणात महागाई वाढत चाललेली आहे. प्रत्येक वस्तूचे भाव वाढत चालले आहे. शेतक-याच्या मालाचा भाव त्याच ठिकाणी स्थिरावला आहे. शेतकरी कसा जिवंत राहणार आहे ?

यानंतर श्री.बोरले....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर .....

शेतक-यांच्या आत्महत्येचे मूळ कारण हे आहे की, शेतक-याला उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळत नाही. शेतक-याला उत्पादन खर्चावर आधारित भाव दिला, पंपासाठी वीज दिली, शेतीसाठी पाणी दिले तर शेतकरी आत्महत्या करणार नाहीत. परंतु महाराष्ट्र राज्यामध्ये शेतक-यांची उपेक्षा केली गेली आहे. मग तो कापूस ऊपादक शेतकरी असेल, ऊस उत्पादक शेतकरी असेल किंवा फळबाग शेतकरी असेल, सर्व शेतक-यांची उपेक्षा केली गेली आहे. म्हणून शेतक-यावर आत्महत्या करण्याची पाळी आलेली आहे.

सभापती महोदय, मी मुंबई शहराचा उल्लेख करणार आहे. माननीय अर्थमंत्री श्री.जयंत पाटील मुंबई शहराचे पालकमंत्री आहेत. ते मुंबई शहरासाठी अर्थसंकल्पामध्ये पॅकेज जाहीर करतील, अशी मुंबईतील जनतेची अपेक्षा होती. परंतु मुंबईतील जनतेचा अपेक्षाभंग झालेला आहे. महाराष्ट्र टाईम्स या वृत्तपत्रात "मुंबईकरांना ठेंगा" असा अग्रलेख आला होता. शासनाने मुंबईतील जनतेच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम केले आहे. मुंबई शहरासाठी अर्थसंकल्पामध्ये निधीची तरतूद का केली नाही ? कारण मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये मुंबईच्या जनतेने त्यांना हात दाखविला, आणि याच बदल्याच्या भावनेने त्यांनी मुंबई शहरासाठी अर्थसंकल्पामध्ये निधीची तरतूद केली नसावी, असा मी जाहीरपणे आरोप करीत आहे. केंद्र शासनाकडून मिळणा-या मदतीच्या आशेवर मुंबई शहराला सोडून देण्याचे काम मुंबईच्या पालकमंत्र्यांनी करावे, यासारखे मुंबईतील जनतेचे दुसरे दुर्दैव काय असणार ? मुंबई नागरी परिवहन प्रकल्प टप्पा क्र.1 व 2, मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प, जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण प्रकल्प, शिवडी-न्हावा जलसेतू प्रकल्प, हे सर्व प्रकल्प पूर्ण करण्यासाठी केंद्र शासनाकडून केव्हा मदत मिळेल, याची राज्य शासन वाट बघत आहे. कोंडवाडयात एखाद्या जनावराला ठेवले असता ते जनावर कोंडवाडयाच्या दरवाजाकडे तोंड करुन उभे असते, त्या जनावराला असे वाटते की, माझी येथून सुटका करण्यासाठी कोणी तरी येणार आहे. या सरकारचे तोंड दिल्लीकडे आहे. मुंबईतील प्रकल्प पूर्ण करण्यासाठी केंद्र शासन कधी मदत देते, हे पाहण्यासाठी राज्य शासन दिल्लीकडे तोंड करुन उभे आहे.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर .....

सभापती महोदय, अर्थसंकल्पीय भाषणाच्या पृष्ठ क्र.33 व 36 वर जुन्याच घोषणांना उजाळा देण्यात आला आहे. मिठी नदी विकास व संरक्षण प्रकल्प या प्रकल्पावर 55 कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. परंतु या प्रकल्पाच्या दुस-या टप्प्यासाठी लागणा-या 800 कोटी रुपयांचे काय ? यासंदर्भात अर्थसंकल्पात उल्लेख करण्यात आलेला नाही. राज्य शासनाने मिठी नदी विकास प्रकल्प पूर्ण करण्यासाठी अर्थसंकल्पामध्ये किती तरतूद केली आहे ? 46 हजार बाधित कुटुंबियांपैकी फक्त 7 हजार कुटुंबियांचे पुनर्वसन करण्यात आले आहे. उर्वरित 39 हजार बाधित कुटुंबियांसंदर्भात अर्थसंकल्पामध्ये एक शब्द देखील उच्चारलेला नाही. या प्रश्नाचे उत्तर माननीय अर्थमंत्री देणार नाहीत, याची कला कल्पना आहे. परंतु मुंबईकरांना विकासाचे मृगजळ दाखविण्यामध्ये माननीय अर्थमंत्री कमी पडलेले नाहीत, ही गोष्ट खरी आहे.

सभापती महोदय, विशेष आर्थिक क्षेत्राची देखील हीच परिस्थिती आहे. एका गोष्टीबाबत मात्र माननीय अर्थमंत्र्यांनी दाखविलेल्या चातुर्याबद्दल दाद दिली पाहिजे. माननीय अर्थमंत्र्यांनी मागच्या अर्थसंकल्पामध्ये विशेष आर्थिक क्षेत्राबाबत पूर्ण परिच्छेद छापलेला होता. परंतु या वर्षी अर्थसंकल्पामध्ये विशेष आर्थिक क्षेत्राचा साधा उल्लेख देखील करण्यात आलेला नाही. विशेष आर्थिक क्षेत्राबाबत माननीय मुख्यमंत्री, महसूल मंत्री, उद्योग मंत्री यांच्यामध्ये शीतयुद्ध सुरु आहे. कॅबिनेट सब-कमिटीच्या बैठकीमध्ये एकमेकांवर आरोप केले जातात. खरे म्हणजे काही मंत्री उघडपणे आरोप करतात तर काही मंत्री उघडपणे आरोप करीत नाहीत. एकमेकांवर आरोप करुन विशेष आर्थिक क्षेत्राचा प्रश्न चिघळलेला आहे. माननीय अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्पामध्ये विशेष आर्थिक क्षेत्राचा उल्लेख चातुर्याने टाळलेला आहे. भूमिपुत्रांना त्यांच्या भूमिपासून दूर करण्यामध्ये आणि देशोधडीला लावण्यामध्ये जे प्रत्यक्षपणे सहभागी आहेत त्यांना याचे फळ भोगावे लागणार आहे. रायगड जिल्हयातील 45 गावांना बाधित करणारा हा प्रकल्प आहे. लोकांना अंधारात ठेऊन, त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेणा-यांना गळफास लागल्याशिवाय राहणार नाही.

यानंतर श्री.गागरे .....

अशुधीरत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर .....

त्यांना साथ देणाऱ्यांनी कितीही नामनिराळे राहण्याचा प्रयत्न केला तरी त्यांना तसे राहता येणार नाही. शासनाने दिनांक 26 आक्टोबर 2006 रोजी विशेष आर्थिक क्षेत्र घोषित करण्याबाबत एक नवीन नोटिफिकेशन काढलेले आहे. या नोटिफिकेशनाची धास्ती घेऊन शेतकऱ्यांनी त्यांच्या जमिनी अल्पभावात विकल्या आहेत. दलालांनी आवई उठविली की, सरकारने नोटिफिकेशन काढले आहे, आता शेतकऱ्यांचे काही खरे नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी त्यांच्या जमिनी दलालांना अल्पभावात विकल्या. यातील 70-80 टक्के व्यवहारामध्ये दलालांनी एस.ई.झेडचा धाक दाखवून जमिनी विकत घेतल्या आहेत, हे दलाल कोण आहेत ? याची चौकशी करुन त्यांना शिक्षा केली पाहिजे. शेतकऱ्यांना फसविणाऱ्यांना शिक्षा केली पाहिजे. पश्चिम बंगालमध्ये नंदीग्राम येथे एस.ई.झेड च्या विषयावर बरेच वातावरण पेटले आहे, महाराष्ट्रामध्ये एस.ई.झेड. च्या नावाखाली असे प्रकार चालत असतील तर पश्चिम बंगालमधील नंदीग्रामसारखी परिस्थिती महाराष्ट्रातही निर्माण होईल अशी भिती वाटते.

सभापती महोदय, विजेच्या प्रश्नाबाबत बऱ्याच वेळा चर्चा झालेली आहे, त्यामुळे मी या विषयावर फार वेळ बोलणार नाही. महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पात विजेसाठी 1200 कोटी रुपयांची तरतूद केल्याचा उल्लेख केलेला आहे. याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांनीही स्टेटमेंट केलेले आहे की, वीजेसाठी 1200 कोटी रुपये तरतूद केलेली आहे, यापैकी 692 कोटी रुपये वीजनिर्मिती करण्यासाठी वापरले जाणार आहेत व उर्वरित रक्कम वीज टंचाई दूर करण्यासाठी वापरण्यात येणार आहेत. मी सन्माननीय अर्थराज्यमंत्री डॉ.सुनील देशमुख यांना असा प्रश्न विचारु इच्छितो की, 692 कोटी रुपयामध्ये किती मेगावॅट वीजनिर्मिती केली जाणार आहे ? एक मेगावॅट विजनिर्मिती करण्यासाठी किती रुपये लागतात ? 692 कोटी रुपयामध्ये किती मेगावॅट वीजनिर्मिती केली जाणार आहे ? महाराष्ट्रातील वीज टंचाई कधी दूर होणार आहे. सध्या महाराष्ट्रातील ग्रामीण व शहरी भागात वीजेची समस्या कधी नव्हे एवढी भीषण झालेली आहे. ग्रामीण भागातील रब्बी पिकावर भारनियमनाचा मोठया प्रमाणावर परिणाम झालेला आहे. पूर्वी 10-12-14 तास भारनियमन व्हायचे, आता ग्रामीण भागामध्ये 18-18 तास भारनियमन केले जात आहे. रब्बीच्या

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ SBT/ KTG/

श्री.पांडुरंग फुंडकर .....

पिकास पाणी देताना विजेच्या भारनियमनाचा विपरित परिणाम पिकावर झाला असून ती जळून चालली आहेत. बऱ्याच शेतकऱ्यांनी नवीन वीज कनेक्शन घेण्यासाठी रक्कम भरलेली आहे, पण माझ या माहितीनुसार अजूनही राज्यातील दोन लाख शेतकऱ्यांना वीज कनेक्शन दिलेले नाही. सन्माननीय मंत्री डॉ.सुनील देशमुख यांच्या जिल्हयामध्येही रब्बीचे पीक उभे आहे, त्यांना शेतकऱ्यांच्या भावना समजतील अशी अपेक्षा आहे.

सभापती महोदय, सरकारने निवडणूक काळात अशी आश्वासने दिली होती की, राज्यातील शेतकऱ्यांना मोफत वीज पुरविण्यात येईल, कापसाला 2700 रुपयांचा भाव देण्यात येईल. त्यामुळे शासनाने शेतकऱ्यांना पुरेशी वीज पुरविली पाहिजे. शेतकऱ्यांनी वीज मंडळाकडे पैसे भरुनही वीज कनेक्शन दिले जात नाही. भिकेचा कटोरा धेऊन भीक मागण्याची वेळ या शासनाने शेतकऱ्यांवर आणलेली आहे. ज्यांनी विजेचे कनेक्शन मागितले आहे त्यांना ती मिळत नाही व विजेचे कनेक्शन आहे त्यांची पिके भारनियमनामुळे जळून चालली आहेत.

सभापती महोदय, मागच्या आठवडयात मी सभागृहात उल्लेख केला आहे की, अमरावती जिल्हयातील अंजनगाव सुरजी येथील मते नावाच्या शेतकऱ्याने आत्महत्या केलेली आहे. या शेतकऱ्याने वीज मंडळाच्या कार्यालयात जाऊन रोगार हे विषारी किटकनाशक औषध प्राशन केले. कारण वीज मंडळाचे अधिकारी श्री.ऊईके यांनी या शेतकऱ्याची पाईपलाईन काढून टाकली होती. या शेतकऱ्याने गहू लावला होता, वीज कनेक्शन घेतले होते, गव्हाला पाणी भरणे चालू होते. गहू बऱ्यापैकी वर आला होता. त्याचवेळी वीज मंडळाच्या अधिकाऱ्यानी कनेक्शन कापून टाकले, शेतकरी गव्हाकडे पहात राहिला व गहू त्याच्याकडे पहात राहिला, त्यामुळे शेवटी त्या शेतकऱ्यास मुलाबाळांकडेही पाहता आले नाही, नाईलाज म्हणून त्याला मरावे लागले. माननीय अर्थराज्यमंत्री डॉ.सुनील देशमुख यांच्या जिल्हयातील घटना आहे.

नंतर श्री.सुंबरे.....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. फुंडकर ....

यापेक्षा कोठले दुर्दैव आहे ? काय तुम्ही स्वत:ला शाबासकी घेता. खरे तर राज्यकर्त्यांसाठी ही नामुष्कीची गोष्ट आहे. ज्या राज्यातील शेतकऱ्यांचा ऊस कारखान्याला नेला जात नाही म्हणून शेतकऱ्याला आत्म्हत्या करावी लागते आहे, ज्या राज्यामध्ये शेतकऱ्याच्या कापसाला भाव मिळत नाही म्हणून शेतकऱ्याला आत्महत्या करावी लागते ते राज्य प्रगतीकडे चालले आहे असे कोण म्हणू शकेल ? ते राज्य अधोगतीकडे चालले आहे असेच म्हणावे लागते. असे झाले तर त्याचा उद्रेक हा होणारच आणि त्याचाही इशारा आम्ही येथे सरकारला यापूर्वी दिलेला होता. तसा उद्रेक झाला देखील. नागपूर जिल्ह्यामध्ये कळमेश्वरला पोलिसांवर लोकांनी दगडफेक केली. चंद्रपूरमध्ये बल्लारपूर येथील सरकारी कार्यालयावर, वीज वितरण कंपनीच्या कार्यालयावर हल्ले झाले. इतकेच नाही तर तेथील लोकप्रतिनिधी आमदारांच्या घरावर देखील हल्ले करण्यास लोक मागेपुढे पहात नाहीत. सरकारच्या अशा कारभारामुळे आज ग्रामीण भागामध्ये लोकप्रतिनिधींना बाहेर फिरणेही मुष्किल झाले आहे असेच सर्वत्र वातावरण निर्माण झालेले आहे. सभापती महोदय, विजेच्या संदर्भात मी आपल्याला सांगू इच्छितो की, 1997 पर्यंत महाराष्ट्र राज्य विजेच्याबाबतीत स्वयंपूर्ण होता. महाराष्ट्रात तोपर्यंत भरपूर वीज होती, इतकी की, इतर राज्यांना महाराष्ट्र वीज देत होता. परंतु त्यानंतर राज्यात विजेचा तुटवडा भासू लागला आणि गेल्या 4-5 वर्षात तर त्यामुळे होणाऱ्या भारनियमनाचे प्रमाणत वाढतच चालले आहे. विजेच्या तुटीचे प्रमाणदेखील वर्षगणिक वाढत गेलेले आहे. 2003-04 मध्ये राज्याला 2042 मे.वॅ. वीजेची तूट होती ती 2004-05 मध्ये 3 हजार मे.वॅ. वर गेली. त्यानंतर 2005-06 मध्ये ती जवळपास 4000 मे.वॅ.वर पोहोचली आणि 2006-07 मध्ये ती तूट आता साडेपाच हजार मे.वॅ. इतकी वाढलेली आहे. अशा प्रकारे दरवर्षी एक हजार मे.वॅ. वीजेचा तुटवडा राज्यामध्ये पडतो आहे आणि ही तूट भरून काढण्यासाठी नवीन वीज निर्मितीसाठी केव्हाही या राज्यातील राज्यकर्त्यांनी लक्ष दिलेले नाही. 1997 नंतर या राज्यात एकाही मे.वॅ. विजेची निर्मिती सरकार करू शकलेले नाही की असलेली क्षमता वाढविण्याचा प्रयत्न केला आहे. विविध स्रोतांद्वारा किती वीज राज्यामध्ये निर्माण होऊ शकते हे पाहिले तर वीज निर्मिती क्षमता वाढविण्याच्या बाबतीत देखील आपण मागे आहोत. आपल्याकडील थर्मल पॉवर मधील वीज निर्मिती क्षमता 6396 मे.वॅ. इतकी असताना आज तेथे केवळ 5 हजार मे.वॅ. वीज निर्मिती होत आहे. गॅसमधून 850 मेवॅ. पैकी प्रत्यक्षात 450 मे.वॅ. वीज निर्मिती होत आहे, हैड्रो-पॉवर मध्येही केवळ

..... टी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. फुंडकर ....

700 मे.वॅ. वीज निर्मिती केली जात आहे, टाटामध्ये 1750 पैकी केवळ 500 मे.वॅ. वीज निर्मिती केली जात आहे आणि दाभोळ वीज प्रकल्पाची वीज निर्मिती क्षमता 2200 मे.वॅ. असताना तेथे केवळ 50 मे.वॅ. वीज निर्मिती केली जात आहे. अशा प्रकारे जवळपास केवळ 2500 मेवॅ वीज आपल्याला मिळते आहे आणि पाच ते साडेपाच हजार मे.वॅ. विजेचा तुटवडा आपल्याकडे निर्माण झालेला आहे. सभापती महोदय, एकूणच विजेच्या बाबतीत आपण सर्वच आघाड्यांवर आपण अपयशी ठरलो आहोत. एकाही मे.वॅ. विजेची निर्मिती आपणकरू शकलो नाही याची कबुली मंत्री महोदय, येथे दरवेळेस देत आले आहेत आणि 2010 पर्यंत आम्ही वीज देऊ शकणार नाही हेही त्यांच्याकडून स्पष्ट शब्दामध्ये बेशरमपणे सांगितले गेले आहे. त्यांनी स्पष्टपणे सांगितले आहे की, तुम्ही काहीही करा पण आम्ही 1010 पर्यंत भारनियमन काढू शकणार नाही. सभापती महोदय, राज्यात विजेचा तुटवडा असताना, जी वीज निर्मिती होते आणि तिचे वितरण होते त्यामध्ये जे गळतीचे प्रमाण आहे त्यावर तरी आपण नियंत्रण ठेवले आहे काय ? तर त्याही बाबतीत सरकार अपयशी ठरलेले आहे. राज्यात जवळपास 51 टक्क्याच्या वर गळतीचे प्रमाण आहे. त्याचीही आकडेवारी माझ्याकडे जिल्हानिहाय आहे. त्याचप्रमाणे विजेच्या बिलांच्या थकबाकीचे प्रमाण देखील मोठे आहे. बीड जिल्हा तर या थकबाकीमध्ये अग्रेसर आहे. 31 डिसेंबर 2006 पर्यंत जवळपास 4 अब्ज 54 कोटी इतकी विजेची थकबाकी आहे. भिवंडीमध्ये देखील तेच आहे. तेथे 100 मे.वॅ. वीज दिली गेली असेल तर त्यातील केवळ 24 युनिटस्चीच वसुली केली जाते. भिवंडीमध्ये तर सरकारी जागेवरील अतिक्रमण काढण्यास गेले तर पोलिसांचे देखील मुडदे पाडले जातात आणि अशा ठिकाणी विजेच्या बिलांची वसुली करावयाची आहे, कोण ती करणार आहे ? ....

(यानंतर श्री. सरफरे ..... यू 1 ...

अशुद्धारित प्रत/ शीघ्रलेखापासून नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

आणि म्हणून ही विजेची गळती थांबविली पाहिजे. वीज बिलाची वसूली वेळच्या वेळी केली गेली तर जवळपास 200 कोटींची बचत होईल. आणि वीज वितरण कंपनीने 2800 मेगावॅट विजेची होणारी चोरी रोखली तर शेतकऱ्यांसाठी 24 तास विजेचा पुरवठा केला जाऊ शकतो. माननीय पंतप्रधानांनी मागील महिन्यात अनेक राज्याच्या ऊर्जा मंत्र्यांची बैठक बोलाविली होती. त्यामध्ये राज्याच्या ऊर्जा मंत्र्यांनी वीज गळतीचे प्रमाण 40 टक्क्यावरुन 15 टक्क्यावर आणल्याचे सांगितले. परंतु दरवर्षी 4 ते 5 टक्क्यांनी विजेची गळती वाढत आहे. आंध्र प्रदेश, गुजरात आणि कर्नाटक राज्यांमधील विजेची गळती कमी होऊ शकते. तर मग आपल्या राज्यामध्ये कां होऊ शकत नाही?

सभापती महोदय, विद्युत मंडळाचे विभाजन करुन त्याच्या चार वेगवेगळया कंपन्या करण्यात आल्या. परंतु विभाजन करुन देखील वीज निर्मिती, वितरण इत्यादी बाबतीत कोणत्याही प्रकारची प्रगती झाली नाही. दिवसें दिवस भार नियमनाचे नव्याने वेळापत्रक तयार केले जात आहे, आणि आम्ही वीज गळती रोखण्यामध्ये 100 टक्के यशस्वी झालो असे सांगितले जात आहे. सभापती महोदय, माझ्या हातामध्ये "दै. सामना" हे वर्तमानपत्र आहे. त्यात म्हटले आहे की, " एवढया मोठया प्रमाणात विजेची तूट असतांनाही सरकार मागील पाच वर्षामध्ये एकच उत्तर देत आहे" सरकारच्या म्हणण्यानुसार पारस येथे 250 मेगावॅट, परळी येथे 250 मेगावॅट, खापरखेडा येथे 501 मेगावॅट, भुसावळ येथे 501 मेगावॅट, घाटघर येथे 250 मेगावॅट, दाभोळ येथे 740 मेगावॅटचे प्रकल्प कार्यान्वित करीत आहोत. ही सर्व वीज एकत्र केली तर 2500 मेगावॅट इतकी वीज आपल्याला मिळते. असे असतांना राज्याला साडे पाच हजार मेगावॅट इतक्या विजेची आवश्यकता आहे. खरे म्हणजे आपल्याला 3 हजार मेगावॅट विजेचा तुटवडा येणार आहे. आणि दरवर्षी 1 हजार मेगावॅट इतकी विजेची तूट वाढणार आहे. असे असतांना आपण दिलेल्या आकडेवारीनुसार फक्त 2500 मेगावॅट वीज निर्माण करीत आहोत. आज तुटवडा 5500 मेगावॅटचा असतांना आणि दरवर्षी 1 हजार मेगावॅट इतक्या विजेची मागणी वाढत असतांना पुढील दहा वर्षात महाराष्ट्राला किती वीज लागणार आहे, त्यानुसार आपण वीज निर्मितीची आखणी करुन व त्यानुसार आर्थिक तरतूद करुन धोरण ठरविण्याची गरज आहे. त्या दृष्टीने या अर्थसंकल्पामध्ये आपण विचार केलेला नाही. आपण या ठिकाणी उद्याचा विचार केला आहे, हा विचार करुन आपली उद्याची गरज भागेल. परंतु पुढील पाच वर्षाचा विचार आपण केला नाही. तो विचार करुन धोरण आखण्याची गरज आहे, परंतु त्यादृष्टीने आपण विचार केला नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

सभापती महोदय, मी शेवटचा एक मुद्दा सांगून माझे भाषण संपवितो. हे राज्य छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले यांचे असल्याच्या वारंवार घोषणा केल्या जातात. छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा फुले यांच्या नावाने हे राज्य चालविण्याचा जणू काही या राज्य सरकारने विडा उचलला आहे. सभापती महोदय, मला आठवते की, माजी मुख्यमंत्री माननीय श्री. सुशीलकुमार शिंदे यांनी ज्यावेळी अर्थसंकल्प मांडला होता. त्यावेळी समाजातील सर्व घटकांना न्याय देणारा अर्थसंकल्प असल्याचे मी म्हटले होते. परंतु कालचा अर्थसंकल्प बघितल्यानंतर एक वेळ आपण मंडल आयोगाच्या शिफारशी स्वीकारतो, त्या स्वीकारल्यानंतर आपण सामाजिक न्यायाची भाषा फक्त बोलतो परंतु खऱ्या अर्थाने सामाजिक न्याय मिळतो कां? आपण सामाजिक न्यायाची भाषा बोला परंतु त्या पध्दतीने आपण वागले पाहिजे तसे तुम्ही वागत नाही. या अर्थसंकल्पामध्ये मौलाना आझाद महामंडळाला त्वरेने 1 कोटी 34 लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली त्याबद्दल मी आपणास धन्यवाद देतो. तिला आमचा विरोध नाही, ती दिली पाहिजे. परंतु त्याचबरोबर अण्णा भाऊ साठे महामंडळ, अहिल्यादेवी शेळी-मेंढी विकास महामंडळ, वसंतराव नाईक ओ.बी.सी. महामंडळ व इतर महामंडळांना थोडीफार तरतूद केली जाते. असे करुन समाजातील सर्व घटकांना न्याय दिला असे जर आपणास वाटत असेल तर ते आपले ढोंग आहे. त्यांच्या नावाने डांगोरा पिटण्याचे काम राज्य सरकार करीत आहे. फुले आंबेडकरांचे नाव घेता परंतु त्या दृष्टीने अर्थसंकल्पामध्ये कोणतीही कृती केली जात नाही, मागासवर्गीयांसाठी कोणतीही आर्थिक तरतूद केली जात नाही.

सभापती महोदय, गेल्या चार वर्षापासून प्रत्येक अर्थसंकल्पामध्ये आणि माननीय राज्यपालांच्या प्रत्येक अभिभाषणामध्ये अरबी समुद्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक करण्यासंबंधीचा एक परिच्छेद छापलेला असतो. परंतु या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांना हे शासन विसरले, फुल्यांना विसरले, आंबेडकरांना विसरले, शाहू महाराजांना विसरले. अशाप्रकारे जर आपण हळू हळू छत्रपती शिवाजी महाराजांना विसरणार असाल तर ते योग्य नाही.

(यानंतर श्री. किल्लेदार)

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर (पुढे सुरू...

सभापती महोदय, अरबी समुद्रात छत्रपती शिवरायांचे स्मारक सहा महिन्यात बांधू अशाप्रकारची घोषणा केली होती त्या घोषणेला बगल दिली. या ठिकाणी सुध्दा सरकारने राज्यातील जनतेला फसविले. शिवरायांच्या नावावर जनतेची फसवणूक करणार असाल तर निश्चितच या राज्यातील जनता माफ करणार नाही, एवढे सांगून मी माझे दोन शब्द संपवितो.

यानंतर हिंदीतील भाषण....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान (नाम-नियुक्त) : सभापति महोदय, वर्ष 2007- 08 के अर्थसंकल्प को समर्थन देने के लिए मैं खड़ी हुई हूँ. इस वर्ष हमारे माननीय अर्थमंत्री ने जो अर्थसंकल्प सादर किया है, वह एक अच्छा ह्यूमन फेस रखने वाला, पायाभूत सुविधाओं पर विशेष ध्यान देने वाला, आम आदमी को टॅक्सेशन और मंहगाई के चक्रव्यूह से बचाकर चलने वाला, ग्रामीण भाग की तरफ ज्यादा झुकाव रखने वाला, फिस्कल कंसोलिडेशन से राज्य को फिस्कल स्टेबिलाइजेशन की ओर एक अच्छे फिस्कल मेनेजमेंट के माध्यम से ले जाने वाला, महसूल में बढ़ोतरी करने वाला, महसूली खर्च में कटौती करने वाला, 510 करोड़ रुपए सरप्लस दिखाने वाला और राज्य का ग्रॉस स्टेट डोमेस्टिक प्रोडक्ट को 9.3 प्रतिशत दिखलाने वाला यह अर्थसंकल्प है. इस प्रकार का अर्थसंकल्प यहां पर सादर किया गया है.

सभापति महोदय, इस बजट में पाणी पुरवठा, रस्ते, जलसिंचन, ऊर्जा इत्यादि पर की गई तरतूद और बॅकलॉग दूर करने के लिए हजारों करोड़ रुपए की तरतूद आम आदमी को दिलासा देने वाली दृष्टि दिखाती है. लेकिन यह दुनिया का दस्तूर है :

"कभी किसी को मुकम्मिल जहाँ नहीं मिलता,
कहीं जमीन तो कहीं आसामान नहीं मिलता"

और इसीलिए कहीं न कहीं, कुछ न कुछ सुझाव देने के लिए स्कोप रह जाता है. मैं कुछ सुझाव शासन के सामने पेश करना चाहती हूँ.

सभापति महोदय, इस देश के महापुरुषों ने ऐसा विजन और मिशन और ऐसे कई उदाहरण हमारे सामने प्रस्तुत किये है जिनसे समाज के हर वर्ग को न्याय मिले, , चाहे वे राष्ट्रपिता महात्मा गांधी हों, चाहे शाहू, फुले या अंबडेकर हों, चाहे यशवंतराव चव्हाण हों, चाहे वसंतदादा पाटिल हों या वसंतराव नाईक हों, इन सभी मान्यवरों द्वारा दिखाए गए रस्ते पर चलने के लिए शासन कटिबद्ध है. "The lives of great men all remind us that we must make our lives sublime and departing, leave behind us footprints on the sands of time."

सभापति महोदय, यह कहा गया है कि "Budgets reflect how Governments mobilize and allocate public resources and how they aim to meet the social and economic needs of people. Budgets act as indicators of commitment to the stated policy of the Government."

. . . V 3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान . . .

सभापति महोदय, जहां तक लोगों के सामाजिक और आर्थिक जरुरतों का संबंध है, हमें "less privileged sections" पर विशेष ध्यान देने की आवश्यकता है. अगली पंचवार्षिक योजना की चौखट पर तो यह और भी ज्यादा आवश्यक नजर आता है. एग्रीकल्चर, इरीगेशन, हॅल्थ, एज्यूकेशन, इन्फ्रास्ट्रक्चर से संबंधित सामान्य सुविधाओं का लाभ तो हर नागरिक को मिलता है और उसका वह अधिकार भी है. लेकिन सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक स्तर पर "less developed, under privileged, backward sections of society" को विशेष आर्थिक सहूलियत देने का धोरण हमारा वारसा है. जहां तक "privileged and less privileged" की परिभाषा है, इनको हम "gender, class & community and geographical areas" के हिसाब से वर्गीकरण करके 3 हिस्सों में देख सकते हैं. इन 3 हिस्सों के बारे में मैं अपनी बात आपके सामने रखना चाहती हूँ.

. . . भाषण जारी, नंतर तालेवार.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान ...

इसमें पहला सेक्शन है- महिला. आज तक इस देश में जेंडर न्यूट्रल बजट हुआ करता था. सिर्फ महिला एवं बाल कल्याण विभाग की तरफ से महिलाओं की उन्नति के लिए कुछ योजनाएं बनाई जाती थीं. लेकिन देश की आठवीं पंचवर्षीय योजना में पहली बार एक जेंडर पर्सपेक्टिव्ह हायलाईट किया गया था. 9 वीं पंचवर्षीय योजना में वूमन कंपोनेंट प्लान को एक महत्वपूर्ण स्ट्रेटेजी बताते हुए केन्द्र और राज्य सरकार को यह सुझाव दिया गया था कि वूमन रिलेटेड सेक्टर के लिए 30 प्रतिशत फंड इयरमार्क किया जाए. वर्ष 2001 में "National Policy for Empowerment of Women gender perspective in the budgeting process as an operational strategy" की दृष्टि दिखाई दी तथा 10 वीं योजना में इस कमिटमेंट को दोहराया गया. आज 11 वीं पंचवर्षीय योजना का एप्रोच पेपर यह आग्रह करता है कि, "Gender Equity requires adequate provisions to be made in policies and schemes across Ministries and departments." सभापति महोदय, एक्रास मिनिस्ट्रीज एंड डिपार्टमेंटस्. केन्द्रीय वित्त मंत्री ने अपने बजट भाषण में कहा है कि, "This year's Gender Budgeting Statement covers 33 demands for Grants covering 27 Ministries/departments and five Union territories. The total magnitude of the Gender Budget has also gone upto Rs. 31,177.96 Crores." 27-28 जून, 2005 को नेशनल डेवेलपमेंट कौंसिल की बैठक में देश के प्रधान मंत्री ने इस बात महत्वपूर्ण बताते हुए जोर दिया कि सभी राज्यों को इस क्षेत्र में हाथ से हाथ मिलाकर काम करना चाहिए. " The issue of gender bias is another area which needs focused attention. In the Union budget for 2005-06, we have made a beginning in gender budgeting by incorporating a separate statement highlighting gender sensitivities of budgetary allocations under 10 demands for grants, to be extended to all Central Ministries. But this task will remain incomplete unless all the States join hands in ensuring development justice to women."

सभापति महोदय, अगर उदाहरण दिया जाए तो वर्ष 2001 की गणना के अनुसार कृषि क्षेत्र में 55 प्रतिशत जनसंख्या निर्भर है जिसमें महिलाओं की संख्या लगभग 80 प्रतिशत है. इसमें

...2

श्रीमती फौजिया खान ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

से 50 प्रतिशत महिलाएं खेत मजदूर है. लेकिन कृषि क्षेत्र को जो फंड दिया जाता है, उसमें से सिर्फ 6 प्रतिशत फंड महिलाओं तक पहुंचता है, जो कि पूरे बजट का एक प्रतिशत से भी कम है. 50 प्रतिशत महिलाओं के विकास के लिए 1 प्रतिशत बजट रखा जाता है. यह बहुत कम बजट है इसलिए महिलाओं की उन्नति के लिए बजट बढ़ाने के बारे में विचार करने की आवश्यकता है, ऐसा मैं समझती हूं. हमारे देश में महिला नीति बनाना वाला महाराष्ट्र पहला राज्य है. महिलाओं को 30 प्रतिशत आरक्षण लागू करने वाला भी महाराष्ट्र पहला राज्य है. इसलिए महिलाओं की उन्नति के लिए भी अधिक से अधिक बजट देने के संबंध में पहला कदम बढ़ाने वाला राज्य महाराष्ट्र ही होना चाहिए. जिस राज्य में 42 प्रतिशत ग्रामीण महिलाएं साक्षर नहीं है और महिलाएं जो कि परिवार का न्यूक्लिअस होती है, अगर राज्य में महिलाओं की साक्षरता का प्रमाण बढ़ाना है, अगर आयएमआर, एनएमआर और लिटरेसी रेशों को नियंत्रण में लाना है और हम अगर यह मानते हैं कि महिला आर्थिक क्षेत्र में बराबर की सहभागी है, चाहे वह सहभाग सीधे कामगार के रुप में हो या अप्रत्यक्ष रुप से केअर कम्युनिटी की भूमिका में हो, तो राज्य शासन को वूमन कम्पोनेंट प्लान की दिशा में कदम उठाना पड़ेगा. सभी संबंधित विभागों में जेण्डर बजट सेल शुरु करने पड़ेंगे. और यह पहल करने वाले सिर्फ विजनरी वित्त मंत्री और आघाड़ी शासन ही हो सकते है, ऐसा मुझे विश्वास है.

सभापति महोदय, दूसरा सेक्टर है-"Geographical Area" यानी भौगोलिक क्षेत्र. इस क्षेत्र में प्रिविलेज्ड लेस प्रिविलेज्ड का दृष्टिकोण रखना हो तो वह है रीजनल. राज्य में प्रति व्यक्ति आय में अच्छी वृध्दि हुई है और इस बात के लिए राज्य शासन अभिनंदन का पात्र है. लेकिन यह वृध्दि मुंबई और पुणे के आर्थिक विकास की वजह से है. महाराष्ट्र के इकॉनॉमिक सर्वे के अनुसार राज्य की जीएसडीपी में 9.3 तक वृध्दि अपेक्षित है लेकिन कृषि और संलग्न सेवा में यह वृध्दि सिर्फ 6.6 प्रतिशत अपेक्षित है.

यानंतर श्री शर्मा ...

अशुधारित प्रत / शोधनीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान का भाषण जारी (पूर्वी तालेवार) . . . .

राज्य का दरडोई उत्तपन्न 32,587 है तो कृषि क्षेत्र जहां पर 55 प्रतिशत लोकसंख्या रहती है, वहां पर दरडोई उत्पन्न सिर्फ 7,900 है. यदि हमें गरीबी निर्मूलन की गति को बढ़ाना है तो इस क्षेत्र पर सब से ज्यादा फोकस करना आवश्यक है. विदर्भ में किसानों की आत्महत्या की बढ़ती हुई संख्या के अनुसार 6 जिलों की पहचान की गई है. लेकिन नंदूरबार, गडचिरोली के स्तर पर मराठवाड़ा के जिन जिलों में ह्यूमन डिवलपमेंट इन्डेक्स सब से कम है, दरडोई उत्पन्न सब से कम है, उन जिलों के लिए ह्ययूमन डिवलपमेंट मिशन के जरिए काम तो हो रहा है, लेकिन यह पर्याप्त नहीं है. अपने भाषण में माननीय वित्त मंत्री ने कहा है कि इन जिलों में एम्पॉलयमेंट जनरेशन को प्रमोट करने के लिए मेगा प्रोजक्ट पॉलिसी के क्राइटेरिया को शिथिल किया गया है. लेकिन मैं उनसे पूछना चाहती हूँ कि इस बारे में और क्या कदम उठाए जा रहे हैं ?

सभापति महोदय, आप औरंगाबाद का उदाहरण ले लीजिए. औरंगाबाद एशिया का सब से ज्यादा तेजी से विकसित होने वाला शहर है, लेकिन वहां पर इन्डस्ट्री क्यों टिक नहीं पायी ?

मेरा मंत्री महोदय से प्रश्न है कि क्या इस बात की स्टडी करने के लिए एक सेपरेट मशीनरी स्थापित हो सकती है ? आज परिस्थिति बदल रही है, ग्लोबल विलेज की बात हो रही है. 1990 में यह सोचा जाता था कि मल्टी-नेशनल्स के आने से स्मॉल सेक्टर इन्डस्ट्री समाप्त हो सकती है. मगर आज हम देख रहे हैं कि नये रिफोर्म्स की वजह से मायक्रो, स्मॉल और मीडियम एन्टरप्राइज बहुत अच्छी प्रगति कर रहे हैं. इन एन्टरप्राइज के बारे में दृष्टिकोण बदलने की आवश्यकता है. आज हमारे देश में 39 प्रतिशत उत्पादन और 34 प्रतिशत एक्सपोर्ट इस क्षेत्र से होता है. लेकिन low human development index के जिलों में और खास तौर से औरंगाबाद में food processing industry के लिए विशेष कदम उठाने की आवश्यकता है. यहां पर 55 प्रतिशत कृषि क्षेत्र है, लेकिन केवल 2 प्रतिशत food processing होता है. आज हर देश में ज्यादा से ज्यादा food processing हो रहा है. यूनाइटेड स्टेट्स में यह 66 प्रतिशत है, थायलैंड में 75 प्रतिशत है और मलेशिया में यह 85 प्रतिशत है. महाराष्ट्र सरकार को इस ओर ध्यान देने की आवश्यकता है. ह्यूमन डिवलपमेंट मिशन के बारे में सरकार को एक निश्चित धोरण बनाना चाहिए और इस कार्य के लिए बजट बढ़ाने की आवश्यकता है. हमें "planned micro enterprises in clusters" को बढ़ावा देने की जरुरत है. आज लिज्जत पापड़ की प्रगति का उदाहरण हमारे सामने है.

. . . 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . श्रीमती फौजिया खान

सभापति महोदय, मेरा तीसरा मुद्दा क्लास कम्युनिटी के बारे में है. क्लास कम्युनिटी के अनुसार पिछड़ेपन को दूर करने के लिए शासन कई अच्छे कदम उठा रहा है. शासन ने शिक्षण शुल्क समिति का गठन किया था. प्रोफेशनल कॉलेजों में एस.सी. के विद्यार्थियों के लिए फीस का भुगतान करने का उल्लेख किया गया है. लेकिन ओ.बी.सी. के विद्यार्थियों के लिए भी यह घोषणा हुई थी और इसके बाद ओ.बी.सी. के विद्यार्थियों ने प्रोफेशनल कॉलेज में एडमीशन लिया है. शासन के ऊपर भरोसा करके इन विद्यार्थियों ने एडमीशन लिया है, इसलिए इनकी फीस का भुगतान शासन को करना चाहिए.

सभापति महोदय, एस.सी., एस.टी., ओ.बी.सी. के लोगों को सर्टिफिकेट देने के लिए शासन ने कमेटी बनाई हैं, लेकिन जहां तक मुसलिम समाज का संबंध है, उसमें जाति का उल्लेख डॉक्युमेंट के अन्दर नहीं होता था.

. . . भाषण जारी, नंतर तालेवार.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान.....

लोगों को परेशान होना पड़ता था इसलिए अक्तूबर 1995-96 में जी.आर. जारी हुआ था, जिसके द्वारा तलाठी, संरपंच और ग्रामसेवक को ओ.बी.सी. के सर्टिफिकेट की जांच करने का अधिकार दिया गया था. इस अधिकार के अनुसार वे सर्टिफिकेट की जांच करेंगे और वे यह मान्य कर लेते हैं कि सर्टिफिकेट सही है तो वह प्रमाणपत्र वैध माना जाना चाहिए. लेकिन इस जी.आर. पर अमल नहीं हो रहा है. भटक्या व विमुक्त जाती के संबंध में भी यही स्थिति है. महसूली पुरावा न होने की स्थिति में यह जी. आर. जारी किया गया है. लेकिन आज महानगरपालिका, नगरपालिका, जिला परिषद चुनाव और अन्य चुनाव में इस जी.आर. के अनुसार कार्यवाही नहीं हो रही है. इसकी वजह से अनेक उम्मीदवार अपात्र घोषित किए गए. इन अपात्र उम्मीदवारों में सारे मुस्लिम हैं. इस जी. आर. के अनुसार चुनाव में खड़े होने की इज़ाजत न दिए जाने के कारण मुस्लिम उम्मीदवारों पर अन्याय हुआ है. इसलिए मेरी विनती है कि इस जी.आर. का पालन किया जाना चाहिए और मुस्लिम उम्मीदवारों पर होने वाले अन्याय को दूर किया जाना चाहिए.

सभापति महोदय, अनुसूचित जाति-जनजाति, नव बौध्द इत्यादि वर्गों के लिए विभिन्न योजनाएं बनाई गई है. अनुसूचित जनजाति के लोगों के आर्थिक, सामाजिक और शैक्षिक विकास के लिए अनेक योजनाएं बनाई गई हैं. आदिवासियों के विकास के लिए टीएसपी है. इनके साथ ही साथ मुस्लिम भी पिछड़े वर्ग में आते हैं. चूंकि आदिवासी वर्ग की बेकवर्डनेस आयडेंटीफाय हो चुकी हैं इसलिए उनके लिए योजनाएं बनाई गई है. सच्चर कमेटी ने देश के मुस्लिमों का सर्वे किया. सच्चर कमेटी की रिपोर्ट के अनुसार मुस्लिम की संख्या 12 प्रतिशत है और सरकारी आंकड़े बताते हैं कि मुस्लिम समुदाय सबसे ज्यादा पिछड़ा हैं. अब ये आयडेंटीफाय हो चुका है कि मुस्लिम समाज भी पिछड़ा समाज है तो यह पुरोगामी सरकार मुस्लिम समाज के लिए क्या करेगा ? मेरी सरकार से यह मांग है कि महाराष्ट्र में मुस्लिमों के संबंध में फेक्चुअरल सर्वे किया जाए.

माना की तगाफुल न करोगे लेकिन,
खाक हो जाएंगे हम, तुम्हें खबर होने तक

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापति महोदय, तगाफुल का अर्थ है-दुर्लक्ष. हम मानते हैं कि मुस्लिमों की तरफ दुर्लक्ष नहीं किया जाएगा, लेकिन जो अन्याय हो रहा है, वह न हो, इसलिए इस ओर ध्यान दिया जाना चाहिए.

सभापति महोदय, मौलाना आजाद अल्पसंख्याक महामंडल के लिए 39 करोड़ 60 लाख रुपये का प्रावधान किया गया है. इस के माध्यम से लाभ उठाने वाले लाभार्थियों की संख्या 3983 हैं. अब तक इस महामंडल की ओर से 23 करोड़ 45 लाख रुपये खर्च किए जा चुके हैं. यानी प्रावधान से कम खर्च हुआ. खर्च कम क्यों हुआ, यह बात जब उठती है तो नियम की बात आती है. यानी नियम में न बैठने के कारण लोग लाभ नहीं उठा पा रहे हैं. इसलिए मेरा यह सुझाव है कि नियम शिथिल करने की आवश्यकता है. नियम शिथिल न करने की वजह से पिछड़े वर्ग के लोग लाभ नहीं उठा पा रहे हैं. इसलिए इस संबंध में विचार किया जाए, ऐसी मेरी विनती है. आज अल्पसंख्याक के लिए 1.54 करोड़ रुपये की तरतूद की गई है. गणना के अनुसार 12 प्रतिशत मुस्लिक जनसंख्या है. 12 प्रतिशत इतनी बड़ी लोकसंख्या के लिए इतनी कम तरतूद करने से क्या फायदा होगा, बेरोजगारी कैसे दूर होगी ?

तेरे जहाँ में ऐसा नहीं की प्यार नहीं,
पर जहां उम्मीद है वहां प्यार नहीं मिलता.

सभापति महोदय, जहां तक उर्दू माध्यम के स्कूलों का संबंध है, मैं यह बताना चाहती हूं कि वहां शिक्षकों के प्रशिक्षण की अवधि कम की गई है. सरकार का आदेश है कि हर ब्लाक में उर्दू विषय के एक्सपर्ट की पोस्ट क्रिएट की जानी चाहिए. इसलिए मेरी यह मांग है कि एमपीएसपी में उर्दू यूनिट बनाया जाना चाहिए. दूसरा मेरा यह सुझाव है कि उर्दू स्कूलों में आवश्यक स्टाफ भरा जाना चाहिए और जरुरत पड़ने पर नई पोस्ट क्रिएट की जानी चाहिए. पदों को भरने के लिए जाहिरात दी जाती है लेकिन महीनों पद भरे नहीं जाते. अकोला जिले में 89 पदों को भरने के लिए जाहिरात दी गई थी लेकिन अब तक पद भरे नहीं गए. जिन लोगों ने आवेदन किया है वे नियुक्ती का इंतजार कर रहे हैं. अगर यही स्थिति रही तो उर्दू स्कूलों के शिक्षक ट्रेंड कैसे होंगे ?

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापति महोदय, अल्पसंख्यांक समुदाय के लोगों को मायनारिटी कॅरेक्टर सर्टिफिकेट दिया जाता है. पहले यह सर्टिफिकेट हर विभाग की ओर से दिया जाता था. लेकिन अब यह सर्टिफिकेट प्रदान करने का अधिकार सामान्य प्रशासन विभाग के अधिकारी श्री माडवटकर को दिया गया है. जो मुस्लिम समाज का व्यक्ति है उसके नाम से ही पता चल जाता है कि वह व्यक्ति मुस्लिम है, अल्पसंख्यांक समाज का है. फिर भी सर्टिफिकेट को रिनीव करने के लिए शर्त रखी गई है. इसमें हरेसमेंट होता है. जब हरेसमेंट होगा तो शिक्षा की प्रगति कैसे होगी, मुस्लिम समाज की प्रगति कैसे ?

यानंतर श्री शर्मा..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . . श्रीमती फौजिया खान जारी (पूर्वी तालेवार)

सभापति महोदय, जिला परिषद के स्कूल में अगर टीचर्स की संख्या कम होती है तो सब से सीनियर टीचर को सरप्लस माना जाता है, जबकि प्राइवेट अन-एडेड स्कूल में सब से जूनियर टीचर को सरप्लस माना जाता है. दोनों जगह पर एक प्रकार का प्रोवीजन होना चाहिए. इसलिए मेरा मंत्री महोदय से निवेदन है कि 1981 के सेवा शर्त नियम 26(2)(एक) में अमेंडमेंट करनी चाहिए.

सभापति महोदय, एस.सी., एस.टी., वी.जे.एन.टी. और अल्पसंख्यक समुदाय के बच्चे फीस देकर स्कूल में पढ़ाई नहीं कर सकते, इसलिए सरकार को "permanent no grant system" हटाना चाहिए. इन स्कूलों को शासन की सहायता की आवश्यकता है. शिक्षण के क्षेत्र में जी.डी.पी. 6 प्रतिशत होना चाहिए. महाराष्ट्र जैसे प्रगतिशील राज्य को एज्यूकेशन के बारे में संवैधानिक प्रावधान को लागू करते हुए फ्री एज्यूकेशन पर अमल करना चाहिए, ऐसी मेरी मांग है.

सभापति महोदय, जीवनदायी योजना में 1.50 लाख रुपए प्रति लाभार्थी दिए जाते हैं. यह बहुत अच्छी बात है कि इसमें कॅन्सर के रोगियों को भी शामिल किया गया है. लेकिन इसकी तरतूद नहीं बढ़ाई गई है. इसका मतलब यह है कि इस योजना में कॅन्सर के रोगी तो शामिल हो जाएंगे, लेकिन लाभार्थी कम हो जाएंगे. ऐसा नहीं होना चाहिए. जिसको भी यह बीमारी है, उसको इस योजना का लाभ मिलना चाहिए, इसलिए मेरी सरकार से मांग है कि इस राशि में बढ़ोतरी की जाए.

सभापति महोदय, अंत में किसानों से संबंधित एक महत्वपूर्ण मुद्दा आपके सामने रखना चाहती हूँ. सन् 2005 में अतिवृष्टि हुई थी और सरकार ने किसानों को राहत पहुंचाने की दृष्टि से कम्पेनसेशन दिया था. लेकिन इन्श्योरेन्स कंपनी ने किसानों को इन्श्योरेन्स का पैसा नहीं दिया है. उनकी 80 प्रतिशत फसल नष्ट हो गई है. इन्श्योरेन्स का पैसा मिलना किसान का अधिकार है. इसलिए इन्श्योरेन्स कंपनी को ताकीद देना चाहिए कि वह किसानों के इन्श्योरेन्स का भुगतान करे. अगर किसानों को उनका पैसा नहीं मिलता है तो वे आत्महत्या की ओर प्रवृत्त होते हैं, इसलिए शासन को इस बारे में कदम उठाना चाहिए.

सभापति महोदय, मैंने अपने सुझाव शासन के सामने रखें हैं. मुझे आशा है कि शासन इनके ऊपर जरुर विचार करेगा. एक बार फिर से अर्थ-संकल्प का समर्थन करते हुए मैं अपना भाषण पूर्ण करती हूँ. ..... (भाषण पूर्ण) . . . Z 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : माननीय सभापती महोदय, सन 2007-2008 च्या अर्थसंकल्पावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. अर्थसंकल्प हा शासनाचा आरसा असतो, शासनाचा दीशा दर्शक कार्यक्रम असतो. शासन कशा प्रकारे काम करणार आहे, शासन कोणत्या पध्दतीने काम करु इच्छिते त्याचे चित्र म्हणजे अर्थसंकल्प होय. अर्थसंकल्पाला अनन्यसाधारण महत्व आहे. अर्थसंकल्प किंवा बजेट याचा उल्लेख घटनेमध्ये नाही. ज्यावेळेस बजेट मांडले जाते तेव्हा सर्व जनतेचे लक्ष बजेटकडे असते. बजेट शब्दाच्या एका एका लेटरला महत्व आहे. BUDGET मधील "B" म्हणजे " Buying Power" वाढवली पाहिजे, लोकांची क्रय शक्ती वाढवली पाहिजे, पर्चेसिंग पॉवर वाढवली पाहिजे. अर्थसंकल्पामुळे नागरीकांची, ग्रामस्थांची, शेतक-यांची खर्च करण्याची शक्ती वाढवली पाहिजे. लोकांची क्रय शक्ती वाढली, पर्चेसींग पॉवर वाढली म्हणजे तो अर्थसंकल्प चांगला असा त्याचा अर्थ होतो. BUDGET मधील "U" म्हणजे "Use money wisely." एक एक पैसा कशा रितीने खर्च करावायचा असा त्याचा अर्थ आहे. "जोडनिया धन उत्तम व्यवहारे, उदास विचारे वेचू करी." BUDGET मधील "D" म्हणजे "Development." सभापती महोदय, "D" for Development. पैसा विकासावर कशा रितीने खर्च केला पाहिजे हे महत्वाचे आहे. BUDGET मधील "G" म्हणजे "Good for Economics". Sir, if economics is good then politics is bound to be good. सभापती महोदय, अर्थव्यवस्था चांगली असेल तर कायदा आणि सुव्यवस्थेची स्थिती आपोआप सुधारते.

यानंतर श्री. अजित.....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.अरुण गुजराथी.....

या सगळ्यांसाठी अर्थव्यवस्था महत्वाची आहे कारण ही बाब कायदा आणि सुव्यवस्थेपर्यंत पोहोचते. तसेच बजेटमधील "E" म्हणजे - "E" for Economics for poor and "T" for Transparency in Taxation. अर्थसंकल्पाच्या दृष्टीकोनातून आपण कोठे आहोत आणि राज्य कोठे चालले आहे याचा निश्चितपणे निर्णय घेतो. दोन-तीन महत्वाच्या बाबी संदर्भात मला शासनाचे अभिनंदन केले पाहिजे. महसुली उत्पन्नात होणारी वाढ ही फार चांगल्या पध्दतीची आहे. ज्यास आपण राजकोषीय स्थैर्य म्हणतो. राज्यकोषीय स्थैर्य आणणे ही राज्याच्या दृष्टीने अतिशय महत्वाची बाब आहे. सन 2003-04 आणि 2006-07 मध्ये जमेची वाढ 20.69 टक्के आणि महसुली खर्च 14.14 टक्के झालेला आहे. म्हणजे साधारणत: 6 टक्के जमेची वाढ झालेली आहे. ही बाब अत्यंत महत्वाची आहे. सन 2007-08 मध्ये 13.33 टक्के जमेची वाढ तर खर्च 6.82 अपेक्षित आहे. असे झाले तर महाराष्ट्राला राजकोषीय स्थैर्य चांगले मिळू शकेल.

सभापती महोदय, योजनेतर आणि महसुली खर्चावर नियंत्रण असणे ही देखील बाब महत्वाची आहे. मागील वर्षात 97.13 आणि 89.76 टक्के इतका खर्च होता तो आता 82.47 टक्के झालेला आहे. आपण या वेगाने पुढे गेलो तर राज्य निश्चितपणे प्रगतीपथावर राहील.

वेतन, निवृत्ती वेतन आणि व्याज यावरील खर्च मागील तीन वर्षात 67 टक्के होता तो 64 टक्के झालेला आहे. यावर्षी 60 टक्के व्हावा अशी अपेक्षा आहे. 50 टक्केपेक्षा जास्त खर्च होऊ नये अशी अपेक्षा आहे. आपण जर वेतन,पेन्शन आणि व्याज यावर 60 टक्के खर्च करु लागलो तर विकासाची कामे कशी होणार ? आपल्याला जर पुढील पाच वर्षाचे नियोजन करायचे असेल तर कोणत्याही परिस्थितीमध्ये वेतन, निवृत्ती वेतन आणि व्याज यावरील खर्च 50 टक्केपेक्षा जास्त होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे.

सभापती महोदय, मला पेन्शन संदर्भात एक मुद्दा मांडावयाचा आहे. वेतनावर आणि पेन्शनवर किती रक्कम खर्च होते याचा विचार झाला पाहिजे. पेन्शन देऊ नका असे माझे म्हणणे नाही. पेन्शन ही शासनाने सुरु केलेली Welfare Activity आहे. आपण दरवर्षी जवळपास 5600 कोटी रुपये पेन्शनवर खर्च करतो. तेव्हा पेन्शन देण्यासंदर्भात वेगळा असा अर्थ विषयक प्रकल्प

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी.....

तयार केला पाहिजे. जेणेकरुन बजेटमध्ये पेन्शनसाठी तरतूद करण्याची गरज भासणार नाही. आपण पेन्शनवर जवळपास 40 टक्के रक्कम खर्च करतो. तेव्हा या बाबीकडे लक्ष देऊन एक वेगळा फंड करुन त्यातून त्यांचे कॉन्ट्रीब्युशन झाले पाहिजे अशी तजवीज करण्यात यावी.

सभापती महोदय, आता 3 टक्के सी.एस.टी.होणार आहे. अगोदर 4 टक्के होता, म्हणजे 1 टक्का नुकसान होणार आहे. हा एक टक्का केंद्र शासन रोख देणार की अन्य पध्दतीने देणार याबाबत विचार केला पाहिजे.

आपण शेतकरी हा केंद्रबिंदू मानून अर्थसंकल्प तयार करतो. परंतु आपली शेती विषयक तरतूद फार कमी आहे. पण पाटबंधारे विभागासाठी केलेली तरतूद ही 4400 कोटी रुपयांची आहे. या तरतुदीमध्ये कोणतीही कपात होणार नाही ही गोष्ट फार महत्वाची आहे. आता शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या टक्केवारीत कपात होत चालली आहे. ही वस्तुस्थिती असली तरी पुढील काळामध्ये शेतकऱ्यांना आत्महत्येचा विचार करण्याची आवश्यकता भासणार नाही अशी कृषी विषयक रचना आपल्याला निर्माण करावयाची आहे आणि ते फार मोठे आव्हान आहे.

यानंतर कु.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी सुरु ....

सभापती महोदय, या दृष्टीकोनातून मी असे म्हणेन की, बियाण्यांच्या नवनवीन योजना शासनाने सुरु केल्या पाहिजेत, अशा प्रकारे शेतक-यांच्या दृष्टीने सबंध अर्थव्यवस्थेत शासनाने नव्याने लक्ष घालण्याची आवश्यकता आहे. आपल्या देशामध्ये 70 टक्के लोक हे शेतीवर अवलंबून आहेत , त्या शेतीसंदर्भात विचार करणे अत्यंत महत्वाचे आहे. माझी आपणास विनंती आहे की, या राज्यातील कृषी विद्यापीठ आहेत त्यांना आपण संशोधनासाठी जादा निधी देण्याची आवश्यकता आहे. हे संशोधन आपण शॉर्ट डयूरेशन क्रॉप तयार करण्यासाठी म्हणजेच कमी पाणी , कमी जमीन व कमी मुदतीत आपल्याला पीक कसे घेता येईल या संदर्भात हे संशोधन असावे. असे संशोधन झाले तरच शेतकरी जगणार आहे असे मला वाटते. लिबरलायझेशन, ग्लोबलायझेशनच्या संदर्भात शेतकऱ्यांचे अस्तित्व टिकविणे अत्यंत महत्वाचे आहे. कॉंट्रेक्ट ॲग्रीकल्चरला आता सुरुवात झालेली आहे. काही कंपन्या एका एकरला 10 हजार रुपये देतात., 15 हजार रुपये देतात. परंतु या शेतकऱ्याला एकरमागे 5 हजार रुपये देखील उत्पन्न मिळत नाही तेव्हा त्याला असे वाटते की, आपण आपली जमीन कंपनीला दिल्यास आपल्याला तेवढे तरी पैसे मिळतील म्हणून तो आपली जमीन कंपनीच्या स्वाधीन करतो पण ही गोष्ट स्वेच्छेने झाली पाहिजे. सभापती महोदय, आपण म्हणतो की, 6 टक्के दराने शेतकऱ्यांना कर्ज द्यावे . माननीय मुख्यमंत्री महोदयांनी घोषणा केली होती की, शेतकऱ्यांना बँकेने जर 6 टक्के दराने कर्ज दिले नाही तर त्या बँका बरखास्त करण्यात याव्यात. या संदर्भातील कारवाई आपण अत्यंत कडक पध्दतीने केली पाहिजे. आपण 2 टक्कयांपर्यंत रिबेट देणार आहोत. अशा प्रकारे रिबेट देणारे व शेतकऱ्यांना 4 टक्के दराने व्याज देणारे महाराष्ट्र राज्य हे प्रथम क्रमांकाचे राज्य या देशामध्ये राहणार आहे. सभापती महोदय, कर्जाची परतफेड करण्याची मुदत 31 मार्च पर्यंत आहे. तोपर्यंत जे शेतकरी कर्जाची परतफेड करतील त्यांनाच याचा लाभ मिळणार आहे. ही मुदत आपण 31 जून पर्यंत करावी अशी शेतकऱ्यांची मागणी आहे.ही मागणी अत्यंत योग्य अशीच आहे. या वर्षी ऊसाच्या गाळपामुळे शेतकऱ्यांना पैसे मिळण्यास ऊशीर झालेला आहे. आपण जर हा निर्णय घेतला नाही तर शेतकऱ्यांना 6 टक्के या दराने कर्ज देण्याचा जो निर्णय आहे त्याचा फायदा या शेतकऱ्यांना मिळणार नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी...

माझ्या मतदार संघामध्ये धानोरा नावाचे एक गाव आहे. तेथे 240 शेतकरी आहेत. आपण 31 मार्च ही मुदत ठेवली तर केवळ 60 शेतकऱ्यांना 6 टकके या दराचा फायदा मिळेल. व इतरांना मिळणार नाही. हा फायदा जास्तीत जास्त शेतकऱ्यांना द्यावयाचा असेल तर त्या दृष्टीकोनातून ही मुदत वाढवून देणे अत्यंत महत्वाचे आहे असे मला वाटते. सभापती महोदय, मी आपणाला सांगेन की, पैशाशिवाय अर्थसंकल्पाला काहीही अर्थ नाही. मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो की, ज्याप्रमाणे मुंबईत मंत्रालय आहे त्याप्रमाणे दिल्लीत एक मंत्रालय मिनी मंत्रालय निर्माण करुन 5-6 सेक्रेटरी तेथे ठेवावेत . तेथील केंद्र शासनाच्या ज्या ज्या योजना असतील त्या सर्व योजनांचे पैसे महाराष्ट्राला कसे मिळतील या दृष्टीने त्यांनी काय केले या संदर्भात लक्ष दिले तर ते अत्यंत उत्कृष्ट होईल. माननीय विरोधी पक्षाच्या नेत्यांनी मुंबईच्या बाबतीत असे म्हंटले होते की, MUTP, MIP यांच्या संदर्भात प्रयत्न सुरु आहे. मुंबईच्या रोजगारामध्ये वाढ करावयाची असेल तर मॅन्युफॅक्चरर ॲक्टीव्हीटी ऐवजी सर्व्हिस ॲक्टीव्हीटी, एन्टरटेंन्मेन्ट टुरिझम , एज्यूकेशनल टुरिझम, मेडिकल टुरिझम सुरु करणे आवश्यक आहे. अमेरीकेतील किवा कोणताही एखादा परदेशी पर्यटक आपल्या देशात आला तर त्याला विमानाचे भाडे व येथील फाईव्ह स्टारचे भाडे स्वस्त वाटते. असा एखादा परदेशी पर्यटक आला तर आपल्या देशातील 50 लोकांना रोजगार मिळतो असे म्हणतात. रोजगार वाढविण्याच्या दृष्टीकोनातून ही अत्यंत महत्वाची बाब आहे. आपण असे म्हणतो की, आमच्याकडे गुंतवणूक इतकी वाढत आहे . परंतु रोजगार मात्र त्या प्रमाणात वाढत नाही. ज्या प्रमाणात गुंतवणुक वाढत आहे, औद्योगिक गुंतवणूक वाढत आहे ,त्याच प्रमाणात रोजगार देखील वाढणे आवश्यक आहे. म्हणून ज्या प्रमाणे कॅपिटल एम्प्लॉईड महत्वाचे आहे, तितकेच लेबर एम्प्लाईड देखील महत्वाचे आहे. अनुदान देत असताना याचा विचार झाला पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..3..

श्री. अरुण गुजराथी .....

आता मी येथे माझा शेवटचा मुद्दा मांडतो. कॅपिटल एक्सपेंडिचर आऊटसाईड रेव्हेन्यू अकाउंट हे शब्द बजेंटमध्ये अत्यंत महत्वाचे असतात . ग्रीन बुक मधील पान क्रमांक 23 मध्ये म्हंटले आहे की, रिवाईज्ड एस्टीमेट मध्ये म्हंटलेले आहे की, 11हजार 11कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. आणि त्यापैकी फक्त 10 हजार 78 कोटीची तरतूद आपण वापरलेली आहे. Sir, it reveals that there is a decrease of Rs.1040/- cores as a capital expenditure outside the Revenue.

यानंतर श्री. पुरी.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी ....

सभापती महोदय, अर्थसंकल्पाच्या दृष्टीकोनातून तीन पुस्तके अत्यंत महत्वाची आहेत. ज्या पध्दतीने ग्रीन बुक महत्वाचे त्याच पध्दतीने पिवळे बुकही अत्यंत महत्वाचे आहे. बजेटमध्ये रुपया येतो कुठून आणि तो जातो कुठे ? हे यामध्ये आहे. या तीन पुस्तकांच्या माध्यमातून संपूर्ण अर्थसंकल्पामध्ये राज्याची दिशा कुठे जात आहे, हे या पुस्तकांमध्ये दिलेले आहे. पिवळ्या पुस्तकातील 31 पानावर वेतन 8300 कोटींचे असून निवृत्ती वेतन 5600 कोटी रुपयांचे आहे. मी शासनाचे अभिनंदन करतो की, गेल्या दोन वर्षामध्ये शासनाला एकाही रुपयाचा ओव्हर ड्राफ्ट घेण्याची आवश्यकता भासली नाही. राज्याचा आर्थिक दृष्टीकोन हा फार उत्तम आहे. मागील 5 वर्षामध्ये सातत्याने या सभागृहामध्ये किती ओव्हर ड्राफ्ट काढले ? किती रुपयांचे काढले ? त्याची कारणे काय ? याबाबत विचारणा होत होती. परंतु गेल्या दोन वर्षामध्ये राज्याने एकाही पैशाचा ओव्हर ड्राफ्ट काढलेला नाही, याबद्दल शासन अभिनंदनास पात्र आहे. आपले ॲरिअर्सचे येणे 4,924 कोटी रुपयांचे आहे. आपण ही ॲरिअर्सचे येणे वसूल करण्यासाठी प्रयत्न केले तर फार मोठी रक्कम आपल्याला मिळू शकेल. यासंदर्भातील माहिती पान 26 वर दिलेली आहे, त्याचा आपण विचार करुन वसुली करावी, अशी मी माननीय वित्त राज्यमंत्र्यांना विनंती करतो. सभापती महोदय, कॉन्टिजन्ट लायबिलिटी ही प्रत्यक्ष नसते. कोणीतरी कोणालातरी कर्ज देताना जामिन देण्यासाठी ती असते. गव्हर्नमेंट गॅरंटी आणि कॉन्टिजन्ट लायबिलिटीची जबाबदारी 59,469 कोटी रुपयांची आहे. मला वाटते की, हे कुठेतरी थांबले पाहिजे. यासंबसंधीची सविस्तर माहिती पुस्तकात दिलेलीच आहे. सन्माननीय डॉ.दीपक सावंत यांनी तोटयात चालणाऱ्या महामंडळांचा उल्लेख केला. तोटयात चालणाऱ्या महामंडळांचे दायित्व कोणी घेतले नाही तर त्याचा बोजा राज्य सरकारवरच पडणार आहे. कॉन्टिजन्ट लायबिलिटी, ॲरिअर्स आणि नॉन टॅक्स रिसिप्टस्संदर्भात आपण प्रयत्न केले तर मोठयाप्रमाणात पैसे आपल्याला मिळेल, त्यामुळे याबाबत शासनाने लक्ष द्यावे.

याठिकाणी महसुली जमा आणि महसुली खर्चामध्ये 2 पैशांचा फरक पडलेला आहे. महसुली जमा 77 पैसे असून महसुली खर्च 79 पैशांचा आहे. आपण आर्थिक शिस्त पाळली पाहिजे. महसुली जमापेक्षा महसुली खर्चाची टक्केवारी जास्त असणार नाही, हे आपण पाहिले पाहिजे. तसेच, भांडवली जमा 23 पैसे असून भांडवली खर्च 21 पैशांचा आहे, यामध्येही 2

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुणभाई गुजराथी ....

पैशांचा फरक आहे. आपण केंद्र शासनास 80 टक्के महसूल मिळवून देतो व केंद्र शासन आपल्यास 20 टक्केच अनुदान देते. त्यामध्ये 8 पैसे आपल्याला केंद्र शासनाच्या रुपाने मिळतात, 11 पैसे अनुदानाच्या रुपाने मिळतात व एक टक्का पैसा हा कर्जाच्या रुपाने मिळतो. यामध्ये 80 टक्के पैसा हा आपलाच असतो, परंतु 20 टक्केच पैसा आपल्याला केंद्र शासनाकडून मिळतो. आपल्या राज्याला जेवढा महसूल मिळत नाही त्याही पेक्षा जास्त महसूल आपण केंद्र शासनास मिळवून देतो. आपण केंद्र शासनास सेंट्रल एक्साईज आणि इनकम टॅक्सच्या माध्यमातून 50 ते 56 हजार कोटी रुपये देतो. त्याप्रमाणात आपल्याला मात्र केंद्र शासनाकडून आर्थिक मदत मिळत नाही. जेवढा पैसा मिळतो त्यामध्ये परप्रांतीयांनाही सांभाळायचे, केंद्र शासनासही पैसा द्यायचा, आपल्याही लोकांना सांभाळायचे व येथील जीवनस्तर कसा उंचावले हेही पहायचे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य अतिशय अभ्यासपूर्ण मुद्दे मांडत आहेत. याठिकाणी माझा सर्वच पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना सवाल आहे की, महाराष्ट्र राज्यातून 48 खासदार लोकसभेत निवडून जातात.

नंतर श्री.रोझेकर....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार.....

राष्ट्राचा अर्थसंकल्प मांडला जाण्यापूर्वी महाराष्ट्रातील सर्व खासदारांची एकत्रित बैठक माननीय मुख्यमंत्री घेत असतात. पण असा अनुभव आहे की, या बैठकीला 48 खासदारांपैकी केवळ 15/16 खासदार उपस्थित असतात. राज्याच्या हिताचे प्रश्न लोकसभेत मांडत असतांना तेथील चित्र आपण पहावे. तामिळनाडू राज्याचा प्रश्न असेल तर त्या राज्यातील सर्वपक्षीय खासदार एकत्र येऊन सरकारवर तुटून पडतात. केरळचा प्रश्न असेल तर त्या राज्यातील सर्वपक्षीय खासदार एकत्र येऊन सरकारवर तुटून पडतात. पण महाराष्ट्राचा प्रश्न येतो त्यावेळी प्रश्न मांडणा-या खासदाराव्यतिरिक्त महाराष्ट्रातील इतर खासदार स्वस्थ बसून राहतात. सन्माननीय सदस्य, श्री.अरुण गुजराथी हे एका पक्षाचे अध्यक्ष आहेत. त्यांनी पुढाकार घेऊन आपल्या खासदारांना सूचना देऊन महाराष्ट्राला जास्तीत जास्त निधी मिळावा यासाठी प्रयत्न करावा, अशी माझी विनंती आहे.

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य, श्री.मधुकर सरपोतदार यांनी जे विचार या ठिकाणी मांडले ते राज्याच्या हिताचे आहेत. निश्चितपणे त्याची नोंद घेण्यात येईल, कारण त्यामध्ये कोणतेही राजकारण दिसून येत नाही.

सभापती महोदय, अर्थमंत्र्यांनी सांगितले की, राजकोषीय स्थैर्यता निर्माण होत आहे. महसूली जमा वाढत आहे तर महसूली खर्च कमी होत आहे. अर्थसंकल्पाच्या पिवळया पुस्तकातील पान क्रमांक 30 वर यावर्षी जे कर्ज घेतले आहे, जी कर्जफेड केली आहे, त्यासंबंधीची माहिती दिली आहे. सन 2006-2007 या वर्षात 19026 कोटी रुपयांचे कर्ज घेण्यात आले आहे आणि 8897 कोटी रुपयांची कर्जफेड करण्यात आली आहे. भविष्यात जेवढी कर्जफेड आपण त्या वर्षात करु त्यापेक्षा जास्त कर्ज घेण्यात येणार नाही, या पद्धतीने कुठे तरी आर्थिक शिस्तीच्या संदर्भात पाहिले तर, योग्य होईल, असे मला वाटते. एकूण कर्जाचा विचार केला तर 13449 कोटी रुपयांचे कर्ज या राज्याच्या डोक्यावर आहे. परंतु, उत्पन्नात वाढ होत असल्यामुळे त्याची फार काळजी करण्याची गरज आहे, असे मला वाटत नाही. कारण, राज्य शासनाला आत्मविश्वास आहे.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी (बसून) : सभापती महोदय, माननीय सदस्य, श्री.अरुण गुजराथी साहेब अर्थसंकल्पाचे मनापासून विश्लेषण करीत आहेत, असे वाटत नाही.

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, मी माननीय सदस्य, श्री.नितीन गडकरी यांना सांगू इच्छितो की, अर्थसंकल्पाचे एका शब्दात वर्णन करावयाचे झाले तर "राज्यकर्त्यांचा आणि राज्याचा आत्मविश्वास वाढविणारा हा अर्थसंकल्प आहे" असे त्याचे वर्णन करावे लागेल. माननीय अर्थमंत्र्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणाचा जो पहिला भाग आहे त्या भागातील पृष्ठ क्रमांक 4 वर असे नमूद केले आहे की, "राज्याच्या आर्थिक प्रगतीचा दर आणि महसूलातील वाढ अशीच चालू राहिल्यास कर्जाच्या परतफेडीसाठी कोणतीही अडचण येणार नाही, असे मला वाटत आहे." यावरुन असे दिसते की, राज्य सरकारचा आत्मविश्वास वाढलेला आहे.

सभापती महोदय, असे असले तरी यावर्षी प्रशासकीय खर्चासाठी दोन हजार कोटी रुपये Other Administrative Charges मध्ये दर्शविण्यात आले आहेत. मी माननीय अर्थमंत्र्यांचे लक्ष फायनान्शियल स्टेटमेंटच्या पृष्ठ क्रमांक 41 कडे वेधू इच्छितो. या ठिकाणी मागच्या वर्षी 'Other Administrative Charges' म्हणजे 'इतर प्रशासनिक सेवा' याअंतर्गत केलेली तरतूद 133.44 कोटी रुपयांवरुन 179.76 कोटी रुपयांवर गेली आहे आणि 'इतर प्रशासनिक खर्चामधील वाढ' असे एका ओळीत या दोन हजार कोटी रुपयांचा ऊहापोह केलेला आहे. पोलीस खात्यासाठी 200 कोटी रुपयांची तरतूद केल्याबद्दल मी अभिनंदन करतो आणि ही रक्कम राज्य शासन देणार आहे, याबद्दल विश्वास आहे. तरी देखील "2070' या लेखाशीर्षाखाली जी दोन हजार कोटी रुपयांची तरतूद प्रशासनिक खर्चासाठी केलेली आहे, ही तरतूद कशासाठी केलेली आहे, यासंदर्भातील मार्गदर्शन माननीय मंत्र्यांनी उत्तराच्या भाषणात केले तर योग्य होईल. या खर्चाचा तपशील सभागृहाला समजला पाहिजे तसेच तो जनतेपर्यन्त गेला पाहिजे. म्हणून इतर प्रशासनिक खर्चामध्ये अशा पद्धतीने वाढ का झाली, याची माहिती मंत्री महोदयांनी दिली पाहिजे.

सभापती महोदय, राज्याचा जो प्लॅन आहे तो एकूण 20200 कोटी रुपयांचा आहे. त्यामध्ये शेतीसाठी 736 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. मी मघाशीच सांगितल्याप्रमाणे पाटबंधारे प्रकल्पांसाठी केलेली 4000 कोटी रुपयांची तरतूद देखील शेतक-यांसाठीच आहे. परंतु, शेतीसाठी एक वेगळा अर्थसंकल्प तयार केला तरी काही हरकत नाही, या संदर्भात काय करता

..3.....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखी नोंद

श्री.अरुण गुजराथी.....

येईल हे शासनाने पहावे. राज्याचे दरडोई उत्पन्न हिंदुस्थानच्या दरडोई उत्पन्नापेक्षा जास्त असले तरी शेतक-यांचे दरडोई उत्पन्न किती आहे, याचाही विचार आपल्याला करावा लागणार आहे. कारण, त्यांचे उत्पन्न कमी आहे.

यानंतर कुमारी जयश्री.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी : माननीय उपसभापती)

श्री.अरुण गुजराथी.....

मुंबई,ठाणे,पुणे ही शहरे सोडून आपल्या राज्यातील इतर शहरांचे जे दरडोई उत्पन्न आहे ते इतर राज्यांतील शहरांच्या मानाने दीड पटीने कमी आहे, हे मी मान्य करतो. ते दरडोई उत्पन्न वाढविण्याच्या संदर्भात करावयाची कार्यवाही अतिशय महत्वाची आहे. सन 2007 -2008 च्या अर्थसंकल्पात काही कपात होणार नाही, हे बघणे देखील अत्यंत महत्वाचे आहे. दुसरे मला याबाबत असे सांगावयाचे आहे की, पुरवणी अर्थसंकल्प मूळ अर्थसंकल्पाच्या 5 ते 10 टक्क्यापेक्षा जास्त नसावा. योजनेतर महसूली खर्चावर नियंत्रण आणण्याच्या संदर्भात या सरकारला आलेल्या यशाबद्दल मी या सरकारचे अभिनंदन करतो, परंतु प्रशासकीय सेवा खर्चामध्ये झालेली वाढ का झाली ? याची कारणे शोधण्यात यावी. बजेट इन ब्रीफ मध्ये मी आपल्याला सांगितले त्या प्रमाणे भांडवली खर्चाकरिता आपण जो प्रचंड पैसा देतो व सोशल सिक्योरिटीकरिता जो पैसा देतो त्याचा विनियोग चांगल्या पध्दतीने झाला पाहिजे. असे जर झाले तर आपले राज्य हे पहिल्या क्रमांकाचे,प्रगतीशील व सामाजिक न्याय देणारे राज्य आहे, असे म्हणता येईल. आपण मागच्या वर्षी जी वैद्यकीय शिक्षणाच्या व अभियांत्रिकी शिक्षणाच्या प्रवेश परीक्षांमध्ये तसेच, अभ्यासक्रमांमध्ये शिष्यवृत्त्या देण्यास सुरुवात केली, ती अतिशय स्तुत्य आहे. सामाजिक न्याय हा अर्थसंकल्पाचा आत्मा समजून महाराष्ट्रातील गरीब जनतेला न्याय देण्याच्या दृष्टीकोनातून या राज्याचा अर्थसंकल्प तयार केला गेला पाहिजे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. जयहिंद,जय महाराष्ट्र.

EE - 2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : सभागृहाची बैठक आता मध्यंतरासाठी स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक दुपारी 1.00वाजता पुन्हा भरेल.

(दुपारी 12.43 ते 1.00 पर्यंत मध्यंतर)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे.

माहूर (जि. नांदेड) तीर्थक्षेत्रावर सक्रांतीच्यावेळी 147 वारकऱ्यांना झालेली विषबाधा

(1) * 24503 **श्री. प्रकाश शेंडगे , श्री. नितीन गडकरी , श्री. विनोद तावडे , श्री. जगदीश गुप्ता , श्री.सय्यद पाशा पटेल , श्री.केशवराव मानकर , श्री. श्रीकांत जोशी** : सन्माननीय **अन्न व औषधे प्रशासनमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) माहूर तीर्थक्षेत्रावर संक्रांतीच्या महापर्वानिमित्त ठाकूर बाबांची यात्रा करीता अनेक दिंड्या शहरात आल्या असताना दिनांक 16 जानेवारी, 2007 रोजी वा त्या सुमारास रात्री 7 वाजाता उपवास सोडल्यानंतर 11 वाजता तीन वारकरी दिंड्यातील, 147 वारकऱ्यांना विषबाधेमुळे उलट्या व मळमळ झाल्याने सर्वांना ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, रुग्णालयात दाखल करण्यात आलेल्या रुग्णांपैकी किती रुग्णांची प्रकृती चिंताजनक आहे,

(3) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली काय,

(4) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे ?

श्री.बाबा सिद्दीकी, श्री.मनोहर नाईक यांच्याकरिता : (1) होय.

(2) रुग्णालयात दाखल झालेल्यांपैकी कोणत्याही रुग्णाची प्रकृती चिंताजनक नाही.

(3) होय.

(4) या प्रकरणी दाखल रुग्णांपैकी एका रुग्णाचा पोलिसांनी घेतलेला उलटीच्या नमुन्याचा अहवाल प्राप्त झाला असून त्यामध्ये अन्न विषबाधेस कारणीभूत जीवाणू आढळून आले आहेत. अशा प्रकारच्या घटना टाळण्याच्या दृष्टीने प्रशासनाकडून प्रसार माध्यमांकरवी जनजागृती केली जाते तसेच अन्न आस्थापनांच्या वेळोवेळी तपासण्या करुन नमुने घेतले जातात.

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, माहूर हे मराठवाडयातील तीर्थक्षेत्र आहे. तेथील पिण्याच्या पाण्याकडे आणि सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेकडे शासनाने दुर्लक्ष केल्यामुळे ही घटना घडलेली आहे. माहूर तीर्थक्षेत्रावरील कुंडातील पाण्याची स्वच्छता केलेली नाही. शासन माहूर तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी नेमकी कोणती उपाययोजना करणार आहे ? जेणे करुन असे प्रकार वारंवार घडणार नाहीत.

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 24503 .....

श्री.बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, पानी की वजह से यह घटना नहीं हुई है. वारकरी लोगों ने अन्न-धान्य धोकर नहीं पकाया था, इस वजह से यह घटना हुई. इस प्रकार की स्वास्थ्य अधिकारी की रिपोर्ट मेरे पास है.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, तीर्थक्षेत्राला भेट देणा-या भाविकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न महत्वाचा आहे. मांढरदेवी यात्रेच्या वेळी जो प्रकार घडला त्याची आपणा सर्वांना कल्पना आहे. माझा प्रश्न असा आहे की, माहूर तीर्थक्षेत्रावर ज्यावेळी भाविक यात्रेसाठी येत असतात त्यावेळी तेथील स्थानिक प्रशासनाने त्या ठिकाणी देखरेख केली पाहिजे. स्थानिक अधिका-यांनी स्वत: तेथे वास्तव्य केले पाहिजे. परंतु माहूर तीर्थक्षेत्रावर पाण्याची टंचाई असल्यामुळे बरेच अधिकारी यात्रेच्या वेळी तेथे हजर नसतात, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ? यात्रेच्या वेळी भाविकांच्या सुरक्षिततेची स्थानिक तहसिलदार व इतर अधिका-यांनी कोणती दक्षत घेतली होती ?

श्री.बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, सभापति महोदय, वारकरी लोगों ने जहां से सामान लिया था, उसकी जांच की गई, उसके एनॉलाइसिस में कुछ नहीं निकला. यात्रा के समय शासन की तरफ से बराबर इन्तजाम किया जाता है. जन-जागृति करने के लिए विज्ञापन भी दिए जाते हैं. स्थानीय टी.वी चैनल पर जन-जागृति करने के बारे में भी शासन की तरफ से निर्देश दिए गए हैं.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, दाखल रुग्णांपैकी एका रुग्णाच्या उलटीच्या नमुन्याच्या अहवालामध्ये अन्न विषबाधेस कारणीभूत जीवाणू आढळून आले आहेत. याचा अर्थ असा की, ही विषबाधा कमी अधिक प्रमाणात पाण्यामुळे झाल्याची शक्यता आहे.

यानंतर श्री.गागरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.24503 .....

श्री.नितीन गडकरी.....

कारण माहूर गडावर विषबाधा झाल्याचा एक रुग्ण आढळला आहे. मी मागच्या आठवड्यात नाशिक जिल्हयात प.पू.अण्णासाहेब मोरे यांच्या कार्यक्रमाला गेलो होतो, त्या ठिकाणीही पिण्याच्या पाण्याचा मोठा अभाव आहे. माझी विनंती आहे की, तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी शुध्द व स्वच्छ पाणी मिळण्याची आवश्यकता आहे, यासाठी फार मोठा खर्च येणार नाही. परंतु सध्या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी रोगराई व विषबाधेचे प्रकार घडत आहेत, पुन्हा अशा घटना घडणार नाहीत म्हणून उपाययोजना करणे आवश्यक आहे. सन्माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत, त्या जिल्हयाचे पालक मंत्री श्री.मनोहरराव नाईक आहेत, त्याच्या गावाजवळ हे घटनास्थळ आहे. तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी यात्रेकरुना पिण्याचे स्वच्छ पाणी मिळाले पाहिजे, या दृष्टीने सरकारने कार्यवाही करणे आवश्यक आहे.

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, माहूर गड येथे मी परवाच भेट देऊन परिस्थितीची पाहणी केलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी याबाबत सांगितलेली परिस्थिती खरी आहे. फार मोठया संख्येने भाविक तेथे येतात. तेथे किमान पिण्याच्या पाण्याची व्यवस्था असली पाहिजे म्हणून मी त्याच वेळी जिल्हाधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिलेल्या आहेत. माहूर गडासाठी एक विकास आराखडा तातडीने तयार करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत, या विकास आराखडयामध्ये रस्ते, वीज, पाणी, आरोग्य विषयक सुविधांचा एकत्रित समावेश असेल. माहूर गडाचा तीर्थक्षेत्र म्हणून विकास करण्याची आवश्यकता राज्य सरकारला निश्चितपणे वाटते, त्या दृष्टीने योग्य ते निर्णय घेण्यात येतील. यापुढेही आवश्यक त्या सुविधा तातडीने पुरविण्याच्या सूचना जिल्हाधिकारी व जिल्हा परिषद यांना दिल्या जातील.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी याबाबत लक्ष घालून योग्य त्या सूचना दिलेल्या आहेत, त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. माहूरची देवी आमचेही दैवत आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी जिल्हाधिका-यांना सूचना दिलेल्या आहेत, परंतु त्याऐवजी बांधकाम विभागाला सूचना दिल्या तर बरे होईल असे वाटते. सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे बी.ओ.टी.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तत्वावर येथे सुविधा पुरविता येतील. शासनाकडून आवश्यक तेवढे निधी देता आला नाही तर लोक हा खर्च सोसतील. परंतु तेथे फार गर्दी होत असल्याने आवश्यक त्या सुविधा पुरविणे गरजेचे आहे. माझ्या माहितीनुसार बांधकाम विभागाने नाशिक जिल्हयातील वनी तीर्थक्षेत्राचा विकास आराखडा तयार केलेला आहे, त्याच धर्तीवर माहूर गड येथील विकास आराखडयाचे काम जिल्हाधिकाऱ्यांकडून बांधकाम विभागाकडे देण्यात यावे, अशी मी सूचना करतो.

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, जिल्हाधिकारी सबंधित विभागाशी समन्वय साधून विकास आराखडा तयार करतील. विकास आराखडयाची अंमलबजावणी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येईल.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ठाणे महानगरपालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयातील डॉक्टर व कर्मचारी यांची अपूरी संख्या

(२) * २७३२४ श्री. गुरुमुख जगवानी , श्री. रामनाथ मोते , श्री. संजय केळकर , श्री. विनोद तावडे , श्री. मधुकर चव्हाण : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील गोरगरीब जनतेला माफक दरात आरोग्य सुविधा मिळण्याकरीता ठाणे महानगरपालिकेने कळवा येथे छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय सुरु केले, पंरतु तेथे गेल्या १५ ते १६ वर्षापासून डॉक्टर व कर्मचाऱ्यांची भरती प्रक्रिया पूर्ण होत नसल्याने अपुऱ्या कर्मचाऱ्यांवर सदर हॉस्पिटल चालवावे लागत असल्याने नागरीकांची गैरसोय होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णालय प्रशासनाने १९९१ पासून राज्य शासनाच्या नगरविकास विभागाकडे वारंवार कर्मचारी भरती प्रकरणी विनंत्या करुन सुध्दा ६१३ कर्मचाऱ्यांपैकी फक्त २१७ पदांना परवानगी देण्यात येऊन ३९३ पदे अद्यापी रिक्त ठेवण्याची कारणे काय आहेत,

(३) अत्यंत अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे येथे असंख्य वेळा रुग्णांच्या नातेवाईकांचा उद्रेक होण्याचे घडलेले प्रकार थांबविण्याकरीता काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) सतत १५ वर्षे रुग्णालय प्रशासनाच्या मागणीकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) तसेच याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजेश टोपे, श्री. विलासराव देशमुख यांच्याकरिता : (१) हे खरे नाही,

(२) ठाणे महानगरपालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयातील कर्मचारी भरतीची बाब शासनाशी संबंधित नाही. प्रस्तुत रुग्णालयासाठी २८२ पद निर्मितीचा सुधारित प्रस्ताव ठाणे महानगरपालिकेकडून सन २००६ मध्ये प्राप्त झाला आहे, ठाणे महानगरपालिकेने महसूली उत्पन्नात वाढ करुन विहीत मर्यादेपेक्षा जास्त असलेला आस्थापना खर्च कमी करुन नंतर पद निर्मितीचा प्रस्ताव शासनास पाठवावा. अशा सूचना शासनाकडून आयुक्त, ठाणे महानगरपालिकांना देण्यात आल्या आहेत. ठाणे महानगरपालिकेने त्याबाबत अहवाल दिला नसल्याने पद निर्मितीचा प्रस्ताव मान्य करण्यात आला नाही.

(३) रुग्णांच्या नातेवाईकांचा कोणत्याही कारणास्तव उद्रेक होण्याचे प्रकार घडल्यास आवश्यक उपाययोजना ठाणे महानगरपालिकेकडून करण्यात येतात.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, ठाणे महानगरपालिकेने सर्वसामान्य जनतेकरीता छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय सुरु केले आहे. या रुग्णालयात 500 रुग्णखाटा, 14 बाहय व 16 आंतररुग्ण विभाग, शस्त्रक्रिया केंद्र आहे, अतिदक्षता विभाग, विविध आजाराचे चिकित्सा केंद्र

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.27324.....

श्री.रामनाथ मोते.....

आहे, मात्र या रुग्णालयात आवश्यक तेवढे वैद्यकीय अधिकारी व परिचारिकांची नियुक्ती होणे आवश्यक आहे. आवश्यक तेवढया प्रमाणात या रुग्णालयात नियुक्त्या न केल्यामुळे सर्वसामान्य रुग्णांना उपचार मिळण्यासाठी मोठया प्रमाणावर त्रास होत आहे. या निमित्ताने मी मंत्री महोदयांना प्रश्न विचारु इच्छितो की, वैद्यकीय अधिकारी, परिचारिका व अन्य कर्मचाऱ्यांची भरती करण्यासाठी शासनाकडे काही प्रस्ताव आला आहे काय ? या रुग्णालयात किती पदे रिक्त आहेत ? या रुग्णालयात किती अधिकारी व कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे ? उर्वरित रिक्त पदे भरण्याच्या संदर्भात शासन तातडीने म्हणजे किती दिवसात निर्णय घेणार आहे ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, ठाणे महानगरपालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात एकूण 613 पदे आहेत. या ठिकाणी 1992 मध्ये राजीव गांधी वैद्यकिय महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली आहे, रुग्णालयाच्या एम.आय.सी व डी.एम.आर. निकषानुसार 613 पदांचा प्रस्ताव ठाणे महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत मंजूर झालेला आहे व तो पुढील कार्यवाहीसाठी शासनाकडे पाठविला आहे. शासनाने 2003 साली 217 पदांना मंजुरी दिली होती. परंतु आता ठाणे महानगरपालिकेने 37 टक्केपर्यंत आस्थापना खर्च केलेला आहे. ठाणे महानगरपालिकेने महसूली उत्पन्नात वाढ करुन 35 टक्के विहीत मर्यादेपेक्षा जास्त असलेला आस्थापना खर्च कमी करुन नंतर पद निर्मितीचा प्रस्ताव शासनास पाठवावा.

यानंतर श्री.सुंबरे.....

अशुधारित प्रत / शोधनीसाठी नाही

श्री. टोपे (पुढे चालू...) ता.प्र.क्र.27324 ...

सभापती महोदय, हा जो पदे मंजूर करण्याचा प्रस्ताव शासनाकडे आला होता त्याला शासनाने असे उत्तर दिले होते की, आपण आपले उत्पन्न वाढवावे आणि यासाठीचा जो 35 टक्के हा निकष आहे तो पूर्ण करावा. जेणे करून शासनाला ही पदे मंजूर करण्यात अडचण येणार नाही. थोडक्यात सांगावयाचे तर तेथे पगारावर सर्व खर्च व्हावा अशी अपेक्षा नाही तर विकासासाठी देखील पैसा शिल्लक राहिला पाहिजे हा हेतू त्यामागे होता म्हणून तसे पत्र आपण दिले होते.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, रूग्णालय ही अत्यावश्यक सेवा आहे आणि शासनाने आता सांगितल्याप्रमाणे पदे मंजुरीच्या प्रस्तावावर, आस्थापना खर्च कमी करून नंतरच शासनाकडे प्रस्ताव पाठविला जावा असे जे उत्तर पाठविले आहे त्याप्रमाणे झाले नाही तर शासन तो प्रस्ताव मान्य करणारच नाही का ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, आजच मी या संदर्भात सविस्तर माहिती घेतली आहे. वस्तुत: हे राजीव गांधी मेडिकल कॉलेज आहे त्यामुळे तेथे ही पदे निश्चितपणे आवश्यक आहेत. मी मुद्दाम मागील 4-5 वर्षांतील महापालिकेच्या महसुली उत्पन्नाची माहिती घेतली असता तेथे हे उत्पन्न वाढले आहे असे दिसून आले आहे. परंतु त्या पद्धतीने 35 टक्क्यांपेक्षा कमी आस्थापना खर्च येत नाही. त्यामुळे आजची जी परिस्थिती तेथे आहे ती लक्षात घेता तेथे निश्चितपणे पदे भरण्याची, मंजूर होण्याची आवश्यकता आहे. शासनाचे त्याबाबत दुमत नाही. तेथे 392 पदे मंजूर होण्याची आवश्यकता आहे जेणे करून तेथे चांगल्या पद्धतीची सेवा दिली जाते आहे, तेथे जे वेगवेगळ्या फॅकल्टीचे पदव्युत्तर डॉक्टर्स आहेत, त्यांना निवासी डॉक्टर म्हणून नेमले जाते आहे. तेथील मीनाताई ठाकरे रूग्णालयातील नर्सेसही वापरल्या जातात. या सगळ्या गोष्टी असल्या तरी प्राप्त परिस्थितीमध्ये पदे मंजूर करणे आवश्यक बाब आहे. त्यामुळे मेडिकल हॉस्पिटल-कॉलेज असतील त्या ठिकाणी 35 टक्क्याचा निकष वाढवून तो 40 टक्के करण्याचा विचार शासन जरूर करील. त्याप्रमाणे हा निकष वाढविला जाईल तेव्हा अशा प्रकारची सर्व पदे जी महापालिकेने मागितली आहेत ती देण्यात अडचण येणार नाही.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, आताच माननीय राज्यमंत्र्यांनी 35 टक्के निकष वाढवून 40 टक्के करू असे सांगितले. माझा या संबंधात प्रश्न सरळ आहे. संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि एमसीआय यांच्याकडून मेडिकल कॉलेज असल्याने तेथे

..... एचएच 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सावंत (पुढे चालू....) ता.प्र.क्र.27324 ...

त्यांच्या निकषानुसार काही पदे देणे आवश्यक असते. त्याप्रमाणे तेथे किती पदांचा निकष ठेवला आहे. ज्यावेळेस आपण मेडिकल कॉलेज मान्य करतो तेव्हा तेथे संचालक, वैद्यकीय शिक्षण यांच्या निकषानुसार अमुक अमुक पदे पाहिजेत असे सांगितले जाते. सभापती महोदय, माझे काही चुकत असेल तर राज्यमंत्री महोदयांनी जरूर त्यात दुरूस्ती करावी. पण एमसीआय जेव्हा एखाद्या मेडिकल कॉलेजला मान्यता देते तेव्हादेखील तेथे किती पदे असावीत याबाबत त्यांचे निकष आहेत. आता हे 500 बेडचे हॉस्पिटल आहे हे लक्षात घेता तेथे किती पदे मान्यताप्राप्त होणे आवश्यक होते. तसेच आपण ही पदे किती दिवसात भराल ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, एमसीआय आणि डीएमइआर या दोघांच्याही मान्यतेने या हॉस्पिटलला लागणारी एकूण पदे ही 612 आहेत आणि त्यापैकी 217 पदे भरण्यात आलेली आहेत. उरलेली 392 पदे भरणे आवश्यक आहे. त्याबाबतीतील 35 टक्क्यांचा जो आपला निकष आहे तो वाढविला आणि 40 टक्के पर्यंत केला तर 392 पदांची सॅलरी जी वाढणार आहे ती चार ते साडेचार टक्के पर्यात येते आणि म्हणूनच हा निकष वाढविला तर ही सर्व पदे मंजूर करण्यात अडचण येणार नाही. तरी त्याप्रमाणे ताबडतोबीने हे करण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी या संदर्भात जो खर्चाचा मुद्दा सांगितला तो अगदी योग्य आहे. परंतु जेथे हॉस्पिटलला जोडून मेडिकल कॉलेजेक आहे, त्यांच्यासाठीच्या खाटा आहेत, तेथे सेल्फ इनकम वाढविण्याचे ठरविले तर ते ना नफा ना तोटा या पद्धतीने केल्यास होऊ शकते. आता देखील आपण जी काही फी वाढ केलेली आहे त्यातूनही हे होऊ शकते. तेव्हा त्या दृष्टीने तसे सूत्र तुम्ही शोधून काढा ....

(यानंतर श्री. सरफरे ..... आयआय 1 ...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखी नोंदी

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला मुद्दा माझ्या लक्षात आला. या संदर्भात मघाशी काही अधिकाऱ्यांबरोबर मी चर्चा केली. यामध्ये ज्या महानगरपालिका मेडिकल हॉस्पिटल किंवा कॉलेज चालवितात त्याठिकाणी 35 टक्क्याच्या नॉर्म्समध्ये आपण बदल करीत नाही. त्याठिकाणी आपण जास्तीची परवानगी दिली तर येणारे उत्पन्न हे कर्मचाऱ्यांच्या पगारावर खर्च होईल, विकास कामाकरिता पैसे शिल्लक रहाणार नाहीत. त्यामुळे 35 टक्क्याचे नॉर्म्स आपण कायम ठेवले आहेत. ज्या मेडिकल कॉलेजमध्ये जेवढे नॉर्म्स असतील तेवढी पदे निर्माण करुन त्यांना मान्यता देतो. मेडिकल सर्व्हिसेसमध्ये कुशल स्टाफसाठी 5 टक्क्याचे रिलॅक्सेशन करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासंबंधी जो प्रस्ताव आला आहे त्याला ताबडतोब मान्यता दिली जाईल. त्यामध्ये अडचण येणार नाही.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, हा प्रश्न सोडविल्याबद्दल मी माननीय मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन करतो. मी काल नागपूरच्या मेडिकल कॉलेजमध्ये गेलो होतो. त्याठिकाणी आपल्या आरोग्य खात्याचा असा कारभार आहे की, हॉस्पिटलमध्ये सर्वप्रकारची मशिनरी उपलब्ध आहेत. परंतु किडनी ट्रान्सप्लांट करण्यासाठी प्रोफेसरचे पद न भरले गेल्यामुळे किडनीचे ऑपरेशन होऊ शकत नाही. शेवटी माननीय सदस्य श्री. सागर मेघे यांच्या मदतीने जवाहरलाल नेहरु हॉस्पिटलमध्ये त्या रुग्णाचे ऑपरेशन करण्यात आले. या हॉस्पिटलमध्ये ऑपरेशन थिएटरसह सर्व यंत्रसामुग्री उपलब्ध असतांना महानगरपालिकेच्या मेडिकल हॉस्पिटलने जो दृष्टीकोन ठेवला तशाप्रकारचा दृष्टीकोन आपल्या सार्वजनिक आरोग्य विभागाने स्वीकारला पाहिजे. त्यामुळे गरीब लोकांचा फायदा होईल. तशाप्रकारच्या सूचना सार्वजनिक आरोग्य विभागाला दिल्या जातील काय?

श्री. विलासराव देशमुख : सजेशन फॉर ॲक्शन.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

भिवंडी महानगरपालिकेच्या रुग्णालयातील अपुऱ्या सुविधा

(३) * २४५३० श्री. मुझफ्फर हुसेन सय्यद , श्री. संजय दत्त , श्री.सय्यद जामा , श्री. गोविंदराव आदिक , श्री. धनाजी साठे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील भिवंडी महानगरपालिकेच्या रुग्णालयातील उपलब्ध असलेल्या सुविधा अत्यल्प असल्याने त्या वाढवून देण्याच्या दृष्टीने मा.लोकप्रतिनिधींनी दिनांक १ फेब्रुवारी, २००७ वा त्या दरम्यान मा.आरोग्यमंत्री यांना निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने सदर रुग्णालयात अपुरा असलेला स्टाफ व औषधांचा तुटवडा वाढवून देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे, श्री. विलासराव देशमुख यांच्याकरिता : (१) होय.

(२) व (३) निवेदनात नमूद केलेल्या मुद्यासंदर्भात रिक्त पदे भरणे/औषध पुरवठाबाबत लक्ष घालून आवश्यक पूर्तता करण्याच्या सूचना आयुक्त, भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका यांना देण्यात आल्या आहेत.

श्री. मुझफ्फर हुसेन : सभापती महोदय, भिवंडी महानगरपालिकेचे स्वत:चे हॉस्पिटल आहे. परंतु भिवंडी शहरामध्ये असलेला पॉवरलूम्सचा व्यवसाय आणि तेथील लोकसंख्या विचारात घेतली तर या महानगरपालिकेच्या हॉस्पिटलमध्ये अपूरा कर्मचारी वर्ग आणि अपुऱ्या सुविधा यामुळे गोरगरीब जनतेला आरोग्याच्या सुविधा मिळत नाहीत. या महानगरपालिकेच्या हॉस्पिटलमध्ये भिवंडी शहराबरोबर भिवंडी, वाडा, शहापूर व तलासरी तालुक्यातील गोरगरीब लोक उपचाराकरिता येतात. यावर्षी हॉस्पिटलमध्ये सी.टी. स्कॅन आणि एक्स-रे मशिनरी बसविण्याकरिता महानगरपालिकेने फक्त दीड कोटी रुपयांची तरतूद केली आहे. याकरिता शासनाने आपल्या अर्थसंकल्पामध्ये अधिक तरतूद वाढविण्याची आवश्यकता आहे. त्या हॉस्पिटलमध्ये ऑपरेशन थिएटर नसल्यामुळे ॲपेंडिक्सच्या पेशंटचे ऑपरेशन करता येत नाही. त्या करिता महानगरपालिकेला डायरेक्शन्स दिल्या जातील काय? १७-१८ लाख लोकांच्या आरोग्याचे प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने एक हॉस्पिटल अपूरे पडत आहे, त्याकरिता आणखी एक नवीन हॉस्पिटल उभे करणार काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, भिवंडी महानगरपालिकेमध्ये काही पदे भरली नव्हती ही वस्तुस्थिती खरी आहे. मी कालपर्यंत यासंबंधी माहिती घेतली असता, जवळ जवळ सर्व पदे भरण्यात आली आहेत. फक्त डॉक्टर्सची ७ पदे रिक्त आहेत. त्याठिकाणी ६०X४० च्या रेश्योप्रमाणे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. २४५३०....

श्री. राजेश टोपे....

नवीन योजनेच्या माध्यमातून ६२ लोकांची कॉट्रॅक्ट बेसिसवर नेमणूक केली आहे. त्यामुळे हॉस्पिटलमध्ये सध्या कोणताही तुटवडा नाही. माननीय सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन यांनी सांगितल्याप्रमाणे त्या हॉस्पिटलमध्ये जास्तीची यंत्रसामुग्री आणि जास्तीची आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी याकरिता शासनाने त्यांना डायरेक्शन द्याव्यात. महानगरपालिकेला त्यांच्या काही योजना राबविण्याकरिता शासनाकडून विशेष अनुदान दिले जाते अशा विशेष अनुदानामधून या त्रुटी दूर कराव्यात. आणि अपग्रेडेशन ऑफ हॉस्पिटल या करिता हे पैसे वापरावेत अशा प्रकारच्या सूचना दिल्या जातील. माननीय सदस्यांनी नवीन हॉस्पिटल उभारण्याची कल्पना मांडली. ग्रामीण भागातील वाडा, शहापूर, भिवंडी तालुक्यातील लोक भिवंडी शहरामध्ये असलेल्या महानगरपालिकेच्या हॉस्पिटलमध्ये उपचाराकरिता मोठया संख्येने येतात. हे सर्व आदिवासी तालुके असून तेथील गरीब लोक मोठया संख्येने त्या ठिकाणी येतात. त्यामुळे आदिवासी विकास विभाग आणि आरोग्य विभागाचा आदिवासी विभागातील काही योजनांकरिता उपलब्ध असलेला निधी व त्या अनुषंगिक सर्व गोष्टी लक्षात घेऊन नवीन हॉस्पिटल करण्याच्या दृष्टीकोनातून जरुर ही बाब तपासून त्याठिकाणी हॉस्पिटल करण्यासंबंधी विचार करण्यात येईल.

(यानंतर श्री. किल्लेदार)

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

वसई (जिल्हा ठाणे) येथील अरबी समुद्राच्या काठावर असलेल्या रानगांव व समुद्र यांच्यातील खाडीवरील मोडकळीस आलेला पूल

(4) * 27007 श्री. संजय केळकर , श्री. रामनाथ मोते , श्री. विनोद तावडे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) वसई (जिल्हा ठाणे) तालुक्याच्या पश्चिमेला अरबी समुद्राच्या काठावर असलेले रानगांव व समुद्र यांच्यातील खाडीवर सुमारे 25 वर्षापूर्वी बांधलेला पूल (ऊघाडी) मोडकळीस आला असून पूलाच्या मधोमध खड्डे पडले आहेत, हे खरे आहे काय,

(2) रानगांव खाडी पुलाच्या एका बाजूला गांव असून बंधारा नसल्याने ऊधाणाच्या वेळेस समुद्राचे पाणी शेतात घुसून शेतीचे वारंवार नुकसान होत असून बंधाऱ्या अभावी परिसरातील शेती कायमची नष्ट होण्याची शक्यता असल्याने सदर बंधाऱ्याचे व पुलाच्या डागडुजीचे काम त्वरीत सुरु करणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(3) अद्याप कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड.प्रीतमकुमार शेगावकर श्री.बाळासाहेब थोरात यांच्याकरिता : (1) होय.

(2) बांधाची स्थिती चांगली असून उघाडी नादुरूस्त झाल्याने काही भागात उधाणाचे खारेपाणी शेतात येते.

पुलाचे बांधकाम मोडकळीस आले असून त्या ठिकाणी नवीन उघाडी तथा पूल बांधण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकास शासनाकडून प्रशासकीय मान्यता मिळाली असून कामासाठीची निविदा प्रक्रिया चालू आहे. काम मे 2007 मध्ये सुरू करण्याचे नियोजन असून जून 2009 पर्यन्त काम पूर्ण होईल.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, रानगांव व समुद्र यांच्यातील खाडीवर सुमारे 25 वर्षापूर्वी बांधलेला पूल मोडकळीस आलेला आहे. त्या पुलाच्या मधोमध खड्डे पडलेले आहेत. रानगांवच्या एका बाजूला बंधारा नाही, त्यामुळे तेथील लोकांचे प्रचंड हाल होत आहेत. माझे या संबंधाने स्पेसिफिक तीन प्रश्न आहेत. एक म्हणजे किती वर्षपासून हा पूल मोडकळीस आलेला आहे. दुसरे शेतकऱ्यांच्या शेतामध्ये खारे पाणी गेल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे, त्यांना नुकसानभरपाई देणार आहात काय ? तिसरा प्रश्न असा आहे की, "कामासाठीची निविदा प्रक्रिया

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 27007....

श्री.संजय केळकर (पुढे सुरू....

चालू आहे", असे म्हटलेले आहे. प्रत्यक्षात केव्हापासून कामाला सुरुवात होणार आहे आणि त्या ठिकाणी पर्यायी व्यवस्था कोणती केलेली आहे ?

ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर : सभापती महोदय, बंधाऱ्याचे एस्टीमेट मंजूर झाले आहे. 27 मेपासून त्या ठिकाणच्या कामाला सुरुवात होणार आहे. दोन वर्षात ते काम पूर्ण होणार आहे.

श्री.संजय केळकर : आता त्या ठिकाणी पर्यायी काय व्यवस्था केलेली आहे ?

ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर : आहे त्या परिस्थितीत सध्या त्या पुलाचा वापर गावकरी करीत आहेत.

श्री.विनोद तावडे : मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे की, पूल मोडकळीस आलेला आहे, नवीन पुलाच्या कामाला शासनाने मान्यता दिलेली आहे. परंतु त्या ठिकणच्या बंधाऱ्याच्याबाबतीत आणि शेतकऱ्यांच्या शेतीचे नुकसान झालेले आहे त्या संदर्भात शासन कोणता निर्णय घेणार आहे ?

श्री.बाळासाहेब थोरात : त्या ठिकाणच्या बंधाऱ्याचे 1984 साली नुतनीकरण करण्यात आले. 24 पाईपलाईन टाकून त्यावर उघाडी बांधली आणि त्यावर पुलाचे काम केलेले आहे. पुलाचे नुकसान झाल्यामुळे रस्त्याला अडचण झालेली आहे. उघाडी काढून घ्यावी लागणार आहे आणि त्या ठिकाणी कॉंक्रीटची उघाडी करावी लागणार आहे. आता पावसाळा संपल्यानंतर कामाच्या सिझनमध्ये हे काम पूर्ण करण्यात येईल. त्या ठिकाणच्या 75 हेक्टर शेतीवर खारे पाणी गेल्यामुळे शेतीचे नुकसान झालेले आहे. परंतु नुकसानभरपाई देण्याची तरतूद नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : त्या ठिकाणची उघाडी नादरूस्त झालेली आहे, हे मान्य केलेले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतामध्ये खारे पाणी जाऊन 75 हेक्टर शेतीचे नुकसान झालेले आहे. यामध्ये शेतकऱ्यांचा काही दोष नाही. बंधारा नादुरस्त असल्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतामध्ये खारे पाणी गेल्यामुळे शेती उद्ध्वस्त झालेली आहे. या संदर्भात शासनाने नुकसानभरपाई द्यायला पाहिजे. बंधारा दुरूस्त न केल्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतामध्ये खारे पाणी घुसले असेल तर शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याबाबत शासन विचार करणार आहे काय ?

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 27007 ....

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, ती जमीन वहितीखाली आणण्याचे काम शासनाच्या बंधाऱ्यामुळे आणि उघाडीमुळे झालले आहे. शेतकरी त्याचा वापर करीत असतात. आता ते नादुरुस्त झाल्यामुळे खारे पाणी घुसले आणि त्याचा परिणाम म्हणून काही क्षेत्रामध्ये पिकाचे नुकसान झालेले आहे. परंतु त्याला नुकसानभरपाई देण्याची तरतूद नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : त्यांना मदत करण्यासंबंधी शासन फेरविचार करणार काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : याबाबतीत फेरविचार करण्यात येईल.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पवई, मुंबई येथील हिरानंदानी वसाहतीच्या शेजारील झोपड्यांना लागलेली भीषण आग

(५) * २४५६६ डॉ. दिपक सावंत , श्री. अरविंद सावंत , श्री. अनिल परब , डॉ. निलम गोऱ्हे , श्री.परशुराम उपरकर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक १७ जानेवारी, २००७ रोजी अथवा त्या सुमारास मुंबईतील पवई येथील हिरानंदानी बिल्डर्सच्या उच्च उत्पन्नातील गटासाठी असलेल्या वसाहतीसमोरील झोपडपट्टीच्या वसाहतीला रात्री अचानक आग लागली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भीषण आगीत साधारणत: किती झोपड्या जळून खाक झाल्या,

(३) असल्यास, आगीच्या कारणांची चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, चौकशीचा निष्कर्ष काय आहे ?

श्री. राजेश टोपे, श्री. विलासराव देशमुख यांच्याकरिता : (१) दि. १६/०१/२००७ रोजी आग लागली होती.

(२) मुंबई अग्निशमन दलाच्या अहवालानुसार ४६४ झोपड्या जळून खाक झाल्या.

(३) झोपडीतील चुलीच्या ज्वालांच्या बांबूच्या सहाय्याने उभारलेल्या भिंतीशी संपर्क झाल्याने त्याने पेट घेतला, असे आगीचे कारण मुंबई अग्निशमन दलाने निश्चित केले आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, 17 जानेवारी, 2007 रोजी पवई येथील हिरानंदानी बिल्डर्सच्या उच्च उत्पन्न गटासाठी असलेल्या वसाहतीसमोर असलेल्या झोपड्यांना आग लागली त्यासंबंधीचा हा प्रश्न आहे. सदर जागा हिरानंदानी बिल्डरने लीजवर एमएमआरडीएकडून घेतली होती काय ? त्यांनी इमारती बांधण्यासाठी सदर झोपडीधारकांचे पुनर्वसन करणे आवश्यक होते काय आणि त्यामधून ही योजनाबध्द आग लावली हे खरे आहे काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, ही जागा त्यांनी एमएमआरडीएकडून लीजवर घेतलेली आहे काय ? असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारला. प्राप्त माहितीनुसार ती खाजगी जमीन आहे. त्या खाजगी जमिनीवर त्या ठिकाणी बांधकाम करणाऱ्या कंत्राटदाराचे जे लेबर असतात त्यांच्या बांबू, चटया यापासून 464 झोपड्या बांधण्यात आलेल्या होत्या आणि त्या ठिकाणी लेबर राहात होते. त्या ठिकाणी चुलीतून आग लागल्यामुळे या सगळ्या झोपड्यांचे नुकसान झालेले आहे. मी सभागृहाला जादा माहिती देऊ इच्छितो की, त्या ठिकाणी जे मयत झाले आहेत त्यांना 1 लाख रुपये भरपाई देण्याबाबत विकासकाने मान्यता दिलेली आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 24566 ....

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी जो प्रश्न विचारला त्याबाबतची मूलभूत माहिती माननीय मंत्रिमहोदयांकडे नाही. त्या ठिकाणी 464 झोपड्या असल्याचे शासनाने मान्य केले आहे. या 464 झोपड्यांपैकी 1995 पूर्वीचे किती झोपडीधारक आहेत ? त्या सर्वांची नावे रेशनकार्ड आणि मतदारयादीमध्ये आहेत काय ? असल्यास त्यांचे विद्यमान पुनर्वसन कोठे केले आहे ? त्यांचे त्याच जागेवर पुनर्वसन केले जाईल काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी सुरुवातील अतिशय स्पष्ट उत्तर दिले आहे की, बांधकामासाठी लागणाऱ्या लेबरच्या या झोपड्या तात्पुरत्या स्वरुपात बांबू आणि चटयांपासून बांधलेल्या होत्या. त्यामुळे त्या झोपड्या 1995 पूर्वीच्या होत्या की, नंतरच्या होत्या हा प्रश्न उपस्थित होत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

ठाणे शहर विकास आराखड्यासाठी रु. ५.१७५ कोटी
रुपयांची तरतूद करण्याबाबत

(६) * २६२९४ डॉ. वसंत पवार , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. अरविंद सावंत , डॉ. निलम गोऱ्हे , श्री. अनिल परब , डॉ. दिपक सावंत , श्री.परशुराम उपरकर : दिनांक १३ डिसेंबर, २००६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या विसाव्या यादीतील प्रश्न क्रमांक १७५३२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहर विकास आराखड्यासाठी जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागर पुननिर्माण अभियानांतर्गत रु. २४४.०७ कोटीच्या महापालिकेने राज्य शासनाकडे सादर केलेल्या प्रकल्पास केंद्र शासनाने मान्यता दिलेली आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) उक्त प्रश्नी अद्याप मान्यता मिळालेली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे, श्री. विलासराव देशमुख यांच्याकरिता : (१) ठाणे शहर विकास आराखड्यासाठी/जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुननिर्माण अभियां अंतर्गत जुलै, २००६ पर्यंत सादर केलेले ४ प्रकल्पांपैकी एकूण ३ प्रकल्पांना केंद्र शासनाने मंजुरी दिली आहे.

(२) केंद्र शासनाने मंजूरी दिलेल्या वरील प्रकल्पांकरिता रुपये ६.९२ कोटी इतका निधी पहिला हप्ता म्हणून वितरीत केला आहे.

(३) ठाण्याच्या उर्वरित प्रकल्पांना केंद्र शासनाची मंजुरी प्राप्त होण्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने छापलेल्या उत्तरामध्ये थोडी दुरुस्ती करु इच्छितो. प्रश्न क्रमांक 1 च्या उत्तरामध्ये "3 प्रकल्पांना केंद्र शासनाने मंजुरी दिली आहे" या ऐवजी "2 प्रकल्पांना केंद्र शासनाने मंजुरी दिली आहे" असे वाचावे. तसेच प्रश्न क्रमांक 2 च्या उत्तरामध्ये "6.92 कोटी" ऐवजी "2.87 कोटी" असे वाचावे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, या दोन्ही गोष्टीतून केंद्र आणि राज्य शासनाची उदासीनता दिसून येते. ठाणे शहराचा हा विकास आराखडा कोणत्या तारखेला सादर केला ? राज्य शासनाने केंद्र शासनाने मागणी केव्हा केली ? किती रकमेची मागणी केली ? प्रत्यक्षात राज्य शासनाला एवढीच रक्कम दिली असेल तर उर्वरित रक्कम किती दिवसात मिळणार आहे ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, हा प्रश्न अतांराकित प्रश्नाच्या अनुषंगाने विचारण्यात आलेला होता. त्यामुळे मी या ठिकाणी उत्तरामध्ये जुनी माहिती दिलेली आहे.

यानंतर श्री. शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

परंतु आजची म्हणजे मार्च अखेरपर्यन्त परिस्थिती अशी आहे की, ठाण्यातून एकूण 8 प्रकल्प पाठविण्यात आले होते, त्यापैकी 4 प्रकल्पांना केन्द्र शासनाने मंजुरी दिलेली आहे. 8 प्रकल्पांची एकूण किंमत 1373 कोटी रु. आहे. मंजूर झालेल्या 4 प्रकल्पांची किंमत 303.41 कोटी रुपये आहे. केन्द्र शासनाच्या 35 टक्के हिश्याची रक्कम 106 कोटी रु. आहे. पहिला हप्ता 25 टक्के द्यावयास पाहिजे. त्याप्रमणे 9 कोटी 41 लाख रु. वितरित केलेले आहेत. उर्वरित प्रकल्प लवकरात लवकर मंजूर करण्याच्यादृष्टीने राज्य शासनाकडून प्रयत्न केले जात आहेत.

श्री. नितीन गडकरी : जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निमाण प्रकल्प योजनेंतर्गत महाराष्ट्रातील महानगरपालिकांनी सादर केलेले प्रकल्प केन्द्राकडे पाठविण्यात आले ही चांगली गोष्ट केलेली आहे. नागपूर महानगरपालिकेच्या आयुक्तांनी देखील प्रकल्प तयार करुन पाठविलेले आहेत. प्रश्न असा आहे की, या वर्षीच्या बजेटमध्ये राज्य सरकारच्या हिश्याची तरतूद दिसली नाही. 8 हजार कोटीचे प्रकल्प मंजूर झाल्यानंतर त्याबाबतीत राज्य शासनाच्या हिश्श्याची तरतूद केली नाही तर अडचण निर्माण होईल.

श्री. राजेश टोपे : यूआयडीएसएमपी आणि जेएनयूआरएम अंतर्गत जे प्रकल्प केन्द्र शासनाने मंजूर केलेले आहेत त्या प्रकल्पांना राज्य शासनाचा हिस्सा देण्याची व्यवस्था केलेली आहे. यूडी बजेट 35 कोटीचे आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

भिवंडी पाणीपुरवठा विभागातून लाखो लिटर पाण्याची झालेली चोरी

(७) * २४६६१ श्री. गोविंदराव आदिक , श्री. संजय दत्त , श्री. धनाजी साठे , श्री. रमेश नकोसे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी महापालिका क्षेत्रात विविध कारखाने, इमारत बांधकाम ठेकेदार यांच्याकरीता संबंधित अधिकारी संगनमत करुन लाखो लिटर पाण्याचा बेकायदा पुरवठा करीत असल्याची बाब दिनांक २३ जानेवारी, २००७ रोजी वा त्या सुमारास उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित अधिकारी व पाणी चोरांवर कोणती कारवाई करण्यात येत आहे,

(३) अद्याप कारवाई झाली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे, श्री. विलासराव देशमुख यांच्याकरिता : (१) हे खरे नाही,
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. नितीन गडकरी : प्रस्तुत प्रश्नामध्ये सन्माननीय सदस्य श्री. रमेश निकोसे यांचे नांव "श्री. रमेश नकोसे" असे छापलेले आहे. सन्माननीय सदस्यांच्या नावामध्ये चूक होता कामा नये.

उपसभापती : अशी चूक पुढे होणार नाही याची मी खात्री देतो.

श्री. संजय दत्त : भिवंडीमध्ये पाण्याची तीव्र टंचाई असताना झोपडपट्टीतील पाणीपट्टी न भरणा-या लोकांचे पाण्याचे कनेक्शन तोडले जाते. माझा प्रश्न असा आहे की, व-हाळा देवी को-ऑप.सोसायटी समोर पाणीचोर माफिया आणि प्रशासनातील अधिका-यांच्या संमतीने मोठा खड्डा करुन त्यातील पाणी टँकरद्वारे विकले जात आहे. यासंबंधीची तक्रार जानेवारी महिन्यामध्ये करण्यात आली होती काय ? असल्यास, संबंधितावर का कारवाई करण्यात आली नाही ?

श्री. राजेश टोपे : भिवंडी महानगरपालिकेचे पाण्याचे जे स्त्रोत आहेत त्यामध्ये व-हाळा देवी तलाव आहे. ही 1950 सालची 2 एमएलडीची जुनी योजना आहे. हा तलाव उंचावर आहे. या तलावाचे पाणी पाझरुन ते खाली असलेल्या खड्डयामध्ये जमा होते. या 2 एमएलडी पाण्याचे जेव्हा फिल्ट्रेशन केले जाते त्यावेळीही काही पाणी खालील खड्डयामध्ये साठले जाते. ज्याच्या शेतामध्ये हा खड्डा आहे तो ते पाणी टँकरने उचलून विकण्याचे काम काम करतो हे खरे आहे. त्याला वॉटर चार्जेस लावायला पाहिजेत अशा सूचना महानगरपालिकेला देण्यात आलेल्या आहेत.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

औरंगाबाद महानगरपालिकेत ३ वर्षापूर्वी झालेल्या भरतीमधील गैरव्यवहार

(८) * २७४२९ श्री. सुरेश जेथलिया : तारांकित प्रश्न क्रमांक २१५४१ ला दिनांक १३ डिसेंबर, २००६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महानगरपालिकेत ३ वर्षापूर्वी झालेल्या भरतीमधील गैरव्यवहारासंदर्भात चालू असलेली चौकशी पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, या चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, चौकशी पूर्ण झाली नसल्यास वा कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजेश टोपे, श्री. विलासराव देशमुख यांच्याकरिता : (१), (२) व (३) औरंगाबाद महानगरपालिकेकडून प्राप्त माहितीनुसार चौकशी नुकतीच पूर्ण झाली आहे. सदर चौकशीमध्ये -

(अ) नियुक्ती दिलेल्या कर्मचाऱ्यांच्या व यादीमधील नावात फरक.

(ब) गैरहजर कर्मचाऱ्यांनाही नियुक्ती, आढळून आली आहे.

वरील मुद्दयांबाबत ज्या कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीमध्ये वरीलप्रमाणे चूक आढळून आली त्यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देवून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल व जे कर्मचारी कमी करण्यात येतील, त्यांचे जागी योग्य व ज्येष्टता यादीनुसार पात्र कर्मचाऱ्यांची निवड करण्यात येईल. या प्रकरणी जबाबदार असणाऱ्या कर्मचारी/अधिकाऱ्यांविरुध्द प्रशासनामार्फत शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येत आहे.

श्री.सुरेश जेथलिया : सभापती महोदय, औरंगाबाद महानगरपालिकेकडून प्राप्त माहितीनुसार चौकशी पूर्ण झाली आहे असे उत्तरात म्हटले आहे. जवळपास 3 ते 4 वर्षे ही चौकशी सुरु होती. चौकशीत नियुक्ती दिलेल्या कर्मचाऱ्यांच्या यादीतील नावांमध्ये फरक असणे, गैरहजर कर्मचाऱ्यांना नियुक्ती देणे असे प्रकार आढळून आले आहेत. सदरहू भरती करताना महानगरपालिकेच्या सभागृहाची व आयुक्तांची परवानगी घेतली होती का? नियुक्ती दिलेल्या परंतु यादीत नसलेल्या कर्मचाऱ्यांची व यादीत असलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या किती? गैरहजर कर्मचाऱ्यांना नियुक्ती दिली असल्यास त्यांची संख्या किती? संबंधित अधिकारी हे उपआयुक्त दर्जाचे वरिष्ठ अधिकारी असूनही त्यांच्याकडून अशा गंभीर चुका होऊनही त्यांच्यावर काहीही कारवाई झालेली नाही. त्यांना ताबडतोब निलंबित केले जाईल काय?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, ही अत्यंत गंभीर बाब औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये घडलेली आहे. साधारणपणे 1124 कर्मचारी रोजंदारीवर होते. हायकोर्टाच्या निर्णयानुसार या सर्व रोजंदारी कर्मचाऱ्यांना ज्येष्ठतेनुसार नियमित सेवेत घ्यावे अशा प्रकारचे आदेश शासनाने दिले होते. हे आदेश दिल्यानंतर मोठ्या प्रमाणात अनियमितता करण्याचे काम तेथील स्थानिक प्रशासनाच्या माध्यमातून घडले आहे. त्या ठिकाणी चार मोठ्या त्रुटी घडल्या आहेत. त्यामध्ये उच्च न्यायालयाने सादर केलेल्या विविध संवर्गातील कर्मचा-यांच्या ज्येष्ठता यादीत 32 कर्मचाऱ्यांची नावे दोन ठिकाणी असणे, दोन वेगळया संवर्गात एकच नाव 32 ठिकाणी आढळून आले. एक तर 32 लोक दोन्ही संवर्गात वेतन घेत होते किंवा त्यांच्याऐवजी दुसरा कोणी काम करीत होता ही एक घटना घडली आहे. दुसरा विषय म्हणजे 63 कर्मचाऱ्यांचे वय प्रथम नियुक्तीच्या वेळी 18 वर्षापेक्षा कमी असणे हा आहे. ज्येष्ठतेची अट शासनाने घालून दिली होती. त्यामध्ये अनेक कर्मचाऱ्यांचा अंतर्भाव होत नव्हता. त्यांचा समावेश होण्याच्या दृष्टीकोनातून त्यांचे नाव वर ढकलण्यात आले. नाव वर ढकलण्यात आल्यामुळे त्यांचे वय कमी पडू शकले नाही. ही सुध्दा एक अनियमितता घडली. तिसरा मुद्दा म्हणजे 15 कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी आदेश देताना मुदतवाढ नसल्याचे दिसून येणे हा आहे. यामध्ये अट अशी होती की, जे सध्या कार्यरत आहेत त्यांनाच नियमित करावे. तरी देखील जे कार्यरत नव्हते आणि ज्यांची सेवेमध्ये मोठी गॅप होती अशा लोकांना सुध्दा कायमस्वरुपी सेवेत घेण्यात आले. शेवटचा मुद्दा म्हणजे 1124 कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी सेवेत घेण्याची सूचना शासनाने दिली होती. त्यामध्ये जवळजवळ 100 लोक नव्याने घेण्यात आले. ज्यांच्या नावापुढे फोटो पूर्वीच्या कर्मचाऱ्यांचा आणि काम करणारी व्यक्ती नवीन असणे अशी वस्तुस्थिती आहे. अत्यंत गंभीर अशी परिस्थिती आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या आयुक्तांनी उपआयुक्त श्री.फड, टॅक्स असेसर आणि कलेक्टर यांची चौकशी समिती नेमली होती. या चौकशी समितीने मागील 6-7 महिन्यात सर्व गोष्टींची तपासणी करुन 3 मार्च, 2007 रोजी अहवाल सादर केला. या अहवालाच्या अनुषंगाने आयुक्तांनी जी कारवाई करावयाची आहे ती पुढील महिनाभरात निश्चितपणे केली जाईल. अत्यंत गंभीर अशी बाब असल्यामुळे या प्रकरणात जे जे दोषी असतील, मग तत्कालीन आयुक्त श्री.जोशी असतील, उपआयुक्त श्री.शिदे, प्रशासन उपआयुक्त श्री.कांबळे आणि इतर कोणी लिपीक दोषी असतील, वॉर्ड अधिकारी दोषी असतील त्यांच्यावर योग्य ती कारवाई केली जाईल. हा विस्तृत अहवाल आहे. आज सभागृहाच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माध्यमातून कोणावर थेट कारवाई करणे चुकीचे होणार आहे. ही बाब अत्यंत गंभीर असल्याची शासनाची भावना आहे. त्यामध्ये कोणाची पाठराखण करण्याचा संबंध नाही. एम.सी.एस.आर.प्रमाणे जी सक्त कारवाई करण्याची आवश्यकता आहे, ती कारवाई केली जाईल. गरज पडली तर फौजदारी केस सुध्दा दाखल केली जाईल.

(नंतर श्री.जुन्नरे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 27429 .....

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, या प्रकरणाच्या संदर्भात शासनाने संबंधितावर कोणतीही कारवाई केलेली नाही. येथे कर्मचा-यांची संख्या कमी असल्यामुळे कार्यालय बंद पडण्याच्या मार्गावर आहे. अधिकारी आणि कर्मचा-यांची मागणी करुन सुध्दा पदे भरली जात नाहीत. शासनाने जर पदे भरली नाही तर महानगरपालिकेचे कामकाज ठप्प पडण्यास काहीच वेळ लागणार नाही. त्यामुळे पदे भरण्याच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी लक्ष घालावे तसेच रिक्त पदे किती दिवसात भरली जाणार आहेत याची माहिती द्यावी?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, या ठिकाणी जी पदे रिक्त आहेत, तसेच जी पदे भरणे आवश्यक आहे ती पदे भरण्याची कार्यवाही केली जाईल.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

रेवदंडा ता. अलिबाग (जि. रायगड) विक्रम इस्पात कंपनी अनधिकृतपणे कोळशाची आयात करीत असल्याबाबत

(९) * २४७५१ श्री. जयंत पाटील , प्रा. शरद पाटील , श्री. विनोद तावडे , श्री. नितीन गडकरी , श्री. मधुकर चव्हाण , श्री.सय्यद पाशा पटेल , श्री. मुझफ्फर हुसेन, श्री. संजय दत्त, श्री. रमेश निकोसे, श्री. धनाजी साठे, श्री. गोविंदराव आदिक, श्री. अरविंद सावंत, डॉ. दिपक सावंत, श्री. अनिल परब, श्री. परशुराम उपरकर : सन्माननीय **उपमुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साळाव-रेवदंडा (ता. अलिबाग, जि. रायगड) येथील विक्रम इस्पात जेटीवर दगडी कोळसा उतरविण्यास वाहतुकीस बंदी घालण्याबाबत तेथील स्थानिक मच्छिमारांनी आंदोलन केल्याने त्या आंदोलकांवर पोलीसांनी लाठीहल्ला करुन ११२ कोळी महिला व २२ मच्छिमारांवर दिनांक २७ डिसेंबर, २००६ रोजी वा त्या सुमारास केसेस दाखल केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच दगडी कोळसा वाहतुकीमुळे मत्स्य व्यवसाय धोक्यात येत असल्यामुळे मेरी टाईम बोर्ड, मत्स्यव्यवसाय विभाग, पर्यावरण विभाग, जिल्हाधिकारी, रायगड व मच्छिमार प्रतिनिधी यांचा अभ्यासगट गठीत करण्यात आला आहे, हे खरे काय,

(४) असल्यास, त्यात कोणता निर्णय घेतला वा मच्छिमारांचा व्यवसाय सुरक्षितपणे होण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे, श्री. आर.आर.पाटील यांच्या करिता : (१) व (२) विक्रम इस्पात लि. या कंपनीचा दगडी कोळसा जेट्टीवर उतरविण्यास बंदी करण्यासाठी दिनांक ०५/०१/२००७ रोजी मच्छिमारांनी केलेल्या आंदोलनास हिंसक वळण लागल्याने पोलिसांनी आंदोलकांवर सौम्य लाठीचार्ज केला हे खरे आहे. याप्रकरणी रेवदंडा पोलीस ठाणे येथे दाखल असलेल्या गु.नो.क्र. ३/०७ या गुन्हयात ११८ महिला आरोपींना व गु.नों.क्र. ४/०७ या गुन्हयात २२ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयांचा अधिक तपास सुरु आहे.

(३) अभ्यास गट अद्याप गठीत करण्यात आलेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मच्छिमारांच्या दृष्टीने हा प्रश्न अतिशय जिव्हाळयाचा आहे. या प्रश्नामुळे मच्छिमारांची रोजी रोटी बंद पडण्याच्या मार्गावर आहे. लोकांच्या जनक्षोभामुळे हे आंदोलन निर्माण झालेले आहे. मच्छिमारांनी आंदोलन केल्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी या ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन या ठिकाणच्या सर्व घडामोडी समजून घेतलेल्या आहेत. या आंदोलनात एकूण ११८ महिलांवर आरोप आहेत. मच्छिमारांच्या रोजीरोटीचा प्रश्न असल्यामुळे या ठिकाणचे वातावरण तापले होते व त्यामुळेच या ठिकाणी संघर्ष पेटला होता. या विषयाच्या संदर्भात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : २४७५१ .....

श्री. विनोद तावडे.....

माननीय उपमुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली १० जानेवारी, २००७ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीमध्ये यासंदर्भात अभ्यासगट निर्माण करण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले होते. आता मार्च महिना संपत आलेला असतांना सुध्दा अभ्यासगट निर्माण झालेला दिसत नाही. मेरीटाईम बोर्ड , मत्स्यव्यवसाय विभाग, पर्यावरण विभाग, जिल्हाधिकारी रायगड व मच्छिमार प्रतिनिधी यांचा अभ्यासगट तयार करण्यात आलेला आहे, त्यामुळे यासंदर्भातील अभ्यासगट कधी गठीत होईल ? धरमतरखाडी जवळ कोळसा उतरवला तर मच्छिमारांवर अन्याय होणार नाही यासाठी शासनाने काही निर्णय घेतलेला आहे काय? तसेच मच्छिमारांवर ज्या केसेस दाखल करण्यात आलेल्या आहेत त्या केसेस सहानुभुतीने मागे घेण्याच्या संदर्भात विचार करु असे म्हटले असले तरी यामध्ये एकंदर ११६ महिलांवर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. त्यामुळे या मच्छिमारांवर जे गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत ते मागे घेण्याच्या दृष्टीने शासन सहानुभुतीने विचार करणार आहे काय? तसेच या ठिकाणी कोळसा न उतरवण्याचे आदेश विभागीय अधिका-यांनी दिले आहेत ते कायम आहेत काय?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, याविषयाच्या संदर्भात समिती गठीत करण्याबाबत ९ जानेवारी , २००७ रोजी माननीय उपमुख्यमंत्र्यांनी बैठक घेतली होती. याबैठकीच्या संदर्भातील कार्यवृत्त संबंधित विभागाला पाठविलेले आहे. २३ तारखेला हे कार्यवृत्त इश्यू झालेले असल्यामुळे लवकरच यासंदर्भातील समिती गठीत केली जाणार आहे. तसेच या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी केसेस मागे घेण्याच्या संदर्भात प्रश्न विचारलेला आहे त्यामुळे मी यासंदर्भात सांगू इच्छितो की, केसेस मागे घेण्याच्या संदर्भात सहानुभुतीने लवकरच निर्णय घेण्यात येईल. तसेच पीएनपीटी येथे माल उतरला नसेल, तर तो माल गुजरात मधील कांडला बंदरावर उतरविण्यात येईल.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 24751.....

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, त्याठिकाणी आंदोलन करणाऱ्या मच्छिमारांवर लाठीमार करण्यात आला. मी स्वत: त्या ठिकाणी जाऊन आलो. तेथील अधिकाऱ्यांना भेटून त्यांच्याशी संवाद देखील साधला आहे. याठिकाणी उत्तर दिलेले आहे की, " आंदोलकांवर सौम्य लाठीमार करण्यात आला". ही निव्वळ फसवणूक आहे. मी स्वत: त्याठिकाणी जाऊन आलेलो असल्याने मी तेथील परिस्थिती पाहिलेली आहे. पोलिसांनी केलेल्या लाठीमारामध्ये अनेकजणांची डोकी फुडली, काही जणांना फ्रॅक्चर झालेले आहे. अशा लाठीमारला सौम्य लाठीमार म्हणता येणार नाही. जेट्टीवर कोळसा उतरविण्यापूर्वी या ठिकाणी कोळसा उतरविण्यास परवानगी देऊ नये अशाप्रकारचे निवेदन मच्छिमारांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे दिले होते. तसेच पोलिसांनी हे आंदोलन चिरडून टाकण्यासाठी गावात दहशत निर्माण केली होती. ही सर्व परिस्थिती लक्षात घेता माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, या महिला आंदोलकांवरील केसेस शासन मागे घेणार आहे काय ? त्याठिकाणी कोळसा उतरविण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी सूचना नसताना कोळसा उतरविण्यासाठी मंत्रालयातून जिल्हाधिकाऱ्यांना कोण सूचना देत होते ? तसेच यापुढील काळात रेवदंडा जेट्टीवर दगडी-कोळसा उतरविण्यास परवानगी दिली जाणार आहे काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या संदर्भातील उत्तर मी अगोदरच दिलेले आहे. तेथील आंदोलकांवर पोलिसांनी सौम्य लाठीचार्ज केलेला आहे.....

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

उपसभापती : माझी सर्व सन्मानीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी सौम्य शब्दात प्रश्न विचारावेत.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, आंदोलकांनी दोन पोलीस अधिकारी, 17 पोलीस कर्मचाऱ्यांना मारहाण केली. 8 वाहनांची मोडतोड केली तसेच पोलीस अधिकाऱ्यांची पिस्तुले देखील हिसकावून घेतली. एका महिला पोलीस अधिकाऱ्याला नग्न करण्याचा प्रयत्न केला. आंदोलक इतके हिंसक वळण घेत असताना पोलिसांनी कोणतीच कारवाई करायची नाही काय ? ज्या महिलांवर पोलीस केसेस दाखल करण्यात आलेल्या आहेत त्याबाबत सहानुभूतीपूर्वक विचार करण्यात येईल. श्री.अग्रवाल यांना भाडेतत्वावर जेटी वापरण्यास परवानगी देण्यात आली होती. परंतु आता तेथील लोकांचा विरोध असल्यामुळे तेथे कोळसा उतरविला जाणार नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 24751.....

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, त्याठिकाणी महिला नि:शस्त्रपणे आंदोलन करीत होत्या. पोलिसांनी केलेल्या लाठीचार्जमुळे तेथील वातावरण बिघडले. पत्रकारांवर देखील लाठीचार्ज करण्यात आला. तेथील वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी त्यांची चूक मान्य करुन संबंधितांवर योग्य ती कारवाई केली जाईल असे सांगून तेथील वातावरण थंड करण्याचा प्रयत्न केला होता. तेव्हा या प्रकरणाची चौकशी होऊन संबंधितांवर कारवाई झाली का ? नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, त्याठिकाणी जिल्हाधिकाऱ्यांनी जमावबंदीचा आदेश दिला होता. तेथे कोळसा उतरविण्यात येणार म्हणून पोलीस तैनात करावेत असे जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश होते. येथे कोळसा उतरविणार असल्यामुळे आपल्या धंद्यावर त्याचा परिणाम होणार म्हणून जवळपास दोन-तीन हजारांचा जमाव तेथे जमला. याठिकाणी जमावबंदी आहे असे वारंवार सांगूनही जमावावर कोणताही परिणाम झाला नाही. उलट जमावाने पोलिसांना मारहाण केली तसेच तेथील वाहनांची मोडतोड केली. त्यामुळे पोलिसांवर कारवाई करण्याचा प्रश्न येत नाही.

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील २००० पर्यंतच्या झोपड्यांना कायद्याने सरंक्षण मिळण्याबाबत

(१०) * २५४८७ श्री. मधुकर चव्हाण : : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २००० पर्यंतच्या झोपड्यांना कायद्याने संरक्षण देण्यासाठी कायद्यात दुरुस्ती करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे,

(२) असल्यास, १९९५ ते २००० पर्यंतच्या काळात किती झोपड्या बांधल्या गेल्या हे निश्चित करण्याकरीता शासनाने यंत्रणा उभी केली आहे काय,

(३) नसल्यास, त्याची कारणे कोणती व शासन १९९५ ते २००० पर्यंतच्या झोपड्या कोणत्या हे ओळखण्याकरीता कोणते निकष लावणार आहे ?

श्री. विलासराव देशमुख : (१) प्रस्तुत बाब न्यायप्रविष्ठ आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, योगायोगाने सभागृहामध्ये माननीय मुख्यमंत्री महोदय उपस्थित आहेत. कालच त्यांनी गृहनिर्माणसंबंधीचे धोरण जाहीर केले. शासनाने २-३ वेळा जाहीर केले की, २००० पर्यंतच्या झोपडयांना संरक्षण देऊ. परंतु याठिकाणी मी विचारलेल्या १९९५-२००० पर्यंतच्या काळात किती झोपडया बांधल्या ? या प्रश्नास शासनाने "प्रस्तुत बाब न्यायप्रविष्ठ आहे व प्रश्न उद्भवत नाही" असे उत्तर दिलेले आहे. या उत्तराचा संबंधच कुठे येतो ? आपण मुंबई शहरामध्ये गृहनिर्माणची पॉलिसी जाहीर केली. याठिकाणी एस.आर.ए. योजनेच्या माध्यमातून फार मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार झाला, त्याची दखल शासानाने घेतली. यासंदर्भातील माननीय मुख्यमंत्र्यांनी केलेली वक्तव्ये आपण आठवडयापासून वर्तमानपत्रात वाचत आहोत. त्यांनी सांगितले की, २००० पर्यंतच्या झोपडयांना मान्यता देण्यात येईल. याठिकाणी अनेक लोकांनी झोपडपट्टीमध्ये सहकारी संघटना स्थापन केल्या, सहकारी को-ऑप. सोसायटया स्थापन केल्या. एवढे सर्व जाहीर करताना, यंत्रणा उभी असल्याशिवाय जाहीर केले का ? आज मुंबई शहरामध्ये हा फार मोठा ज्वलंत प्रश्न निर्माण झालेला आहे. माझ्या माहितीप्रमाणे, जिल्हाधिकारी कार्यालयाने रेशन कार्ड, ओळख पत्र देण्यासंबंधीचे आदेशही दिले होते. त्यामुळे माझा असा प्रश्न आहे की, याठिकाणी १९९५ ते २००० पर्यंत किती झोपडया उभ्या राहिल्या ? तसेच, ही बाब न्यायप्रविष्ठ असेल तर याबाबतीत शासनाने जे ॲफेडेव्हीट सादर केले, त्याबाबत शासनाने नेमकी कोणती भूमिका सादर केली ?

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25487.....

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अतिशय सविस्तरपणाने प्रश्न मांडला आहे. परंतु हा प्रश्न मर्यादित आहे. 1995 पर्यंतचा कायदा या सदनाने मंजूर केला होता. पूर्वीच्या सर्व अनधिकृत झोपडयांना रेग्यूलर करण्याच्या दृष्टीने किंवा संरक्षण देण्याच्या दृष्टीने ते कायद्याने मान्य झाले. त्यानंतरच्या निवडणुकीच्या कालखंडामध्ये आपण आणि आम्ही दोघांनी मिळून जाहीरनाम्यामध्ये हे मान्य केले की, ...(अडथळा) सगळयाच लोकांनी....

श्री.विनोद तावडे : सगळयांनी म्हणजे कोणी ? हे रेकॉर्डवर राहू नये.

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस आणि रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडिया या पक्षाच्या जाहीरनाम्यात कबूल केले होते की, ही कट ऑफ डेट 1995-2000 पर्यंत वाढवावी. मधल्या काळात यासंबंधीचे एक प्रकरण हायकोर्टात होते. त्याबाबतीत कोर्टाने निर्णय दिला की, 1995 पुढे आपल्याला जाता येणार नाही. अशा प्रकारचा निर्णय एका दुसऱ्या केसमध्ये कोर्टाने दिलेला आहे. त्या विरोधात आम्ही सुप्रीम कोर्टात पिटीशन दाखल केले. त्यासंबंधीची 7 तारीखही होऊन गेलेली आहे. सर्वांना नोटीसा काढण्यासंबंधी सुप्रीम कोर्टाने निदेश दिलेले आहेत. यासंदर्भातील सुनावणी सुप्रीम कोर्टात चालू आहे. त्या निर्णयास अनुसरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल. याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी 1995-2000 या काळामध्ये नवीन किती झोपडया बांधल्या ? किती झोपडयांना संरक्षण दिले ? व यासंदर्भात सरकारने काही पाऊले उचलली का ? असा प्रश्न उपस्थित केला. यासंदर्भातील शासनाचे उत्तर सोपे आहे की, जोपर्यंत कोर्ट आम्हाला यासंदर्भात पुढे जाण्याचा निर्णय देत नाही किंवा 1995 च्या पुढे जाऊ नका, तोपर्यंत सर्व्हेक्षण करणे तांत्रिकदृष्टया अडचणीचे होईल. त्यामुळे सुप्रीम कोर्टाचे आदेश आल्यानंतरच याबाबतीत पुढील कार्यवाही करता येईल.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, हे प्रकरण न्यायप्रविष्ठ असेल तर याबाबतीत कोर्टाची प्रोसिजर अशी असते की, यासंबंधी कोर्ट ॲफेडेव्हीट करण्यास सांगेल. त्यानंतर आपले वकिल सरकारची भूमिका कोर्टासमोर मांडतील.

नंतर श्री.रोझेकर....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखनी नाही

ता.प्र.क्र.25487 पुढे सुरु.....

श्री.नितीन गडकरी.....

राज्य शासनाने ॲफेडेव्हिट करुन न्यायालयात जी भूमिका मांडली आहे ती प्रिंटिंग मिस्टेकच्या धोरणाशी सुसंगत आहे की विसंगत आहे ? कारण असे आहे की, प्रकरण आता न्यायप्रविष्ट असले तरी आणि नजरचुकीने प्रिंटिंग मिस्टेक झाली असली तरी मोफत वीज देऊ, कापसाला 2700 रुपये भाव देऊ, कर्जमाफी करु, असे जाहीरनाम्यामध्ये सांगण्यात आले आहे. त्यावेळी हसतमुख मुख्यमंत्री, श्री.सुशीलकुमार शिंदे हे मुख्यमंत्रीपदी होते. आता शासनाव्दारे सर्वोच्च न्यायालयात ॲफेडेव्हिट करीत असतांना कमीतकमी तुमचे धोरण काय आहे ? कोर्टाचा निर्णय झाल्यावर सर्वेक्षण करता येईल, हे आम्ही समजू शकतो. परंतु, शासन म्हणून तुमचे काय धोरण आहे ?

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, सर्वोच्च न्यायालयात एस.एल.पी.सरकारच्या वतीने दाखल करण्यात आला आहे. ॲफेडेव्हिटव्दारा सर्वोच्च न्यायालयाला अशा प्रकारची विनंती करण्यात आली आहे की, अनधिकृत झोपडपट्टयांच्या संदर्भात 1/1/1995 ही तारीख 1/1/2000 पर्यन्त वाढविण्यास परवानगी देण्यात यावी व उच्च न्यायालयाने जो निर्णय दिला आहे त्यामध्ये बदल करावा. मधल्या कालावधीमध्ये जी आश्वासने दिलेली आहेत ती आश्वासने पूर्ण करण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, या केसमध्ये कोर्ट तरी सरकारच्या मदतीला धावून आलेले आहे, असे मला वाटते. मला अशी विनंती करावयाची आहे की.....

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करतात.)

उपसभापती : सन्माननीय सदस्य, श्री.विनोद तावडे यांना मी मघाशीच सांगितले आहे की, सारखा सारखा हात वर करु नका कारण जेव्हा जनतेचे प्रश्न येतात त्यावेळी तुम्ही दोन्ही हात वर करता, हे बरोबर नाही.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, प्रश्नांसंबंधी अभ्यास असतांना हात वर करणे, हा दोष नाही.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, झोपडपट्टयांच्या संदर्भात 1/1/1995 ही कटऑफ डेट स्वीकारली त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांची भूमिका जाहीर झाली होती व त्यांनी एक स्टेटमेंट

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>ता.प्र.क्र. 25487 पुढे सुरु.....</u>

श्री.नितीन गडकरी.....

केले होते. त्या स्टेटमेंटमध्ये त्यांनी 1/1/1995 ऐवजी 1/1/2000 ही कटऑफ डेट स्वीकारण्यास अडचण व्यक्त केली होती. आता शासनाने ॲफेडेव्हिटमध्ये असे सांगितले आहे की, 1/1/2000 ही कटऑफ डेट स्वीकारावयाची आहे.. उद्या असा प्रश्न निर्माण होणार आहे की, सर्वोच न्यायालयाने शासनाची विनंती जर अमान्य केली आणि उच्च न्यायालयाचा निर्णय कायम ठेवला तर सरकारला यासंदर्भातील उपाययोजना करावी लागेल, कदाचित कायदा बदलावा लागेल. सर्वोच्च न्यायालयात शासनाची बाजू मांडणारे वकील केस हारण्याकरिता उभे आहेत की जिंकण्याकरिता उभे आहेत, ते सरकारला जास्त चांगले माहीत असेल. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय होईपर्यंत या अनधिकृत झोपडयांचे सर्वेक्षण करणे आणि नवीन झोपडया निर्माण होऊ न देणे यासंदर्भात शासनाला कार्यवाही करावी लागणार आहे. केवळ प्रकरण न्यायप्रविष्ट आहे त्यामुळे काहीच करता येणार नाही, असे म्हणणे, बरोबर होणार नाही. त्यामुळे अनधिकृत झोपडयांचे सर्वेक्षण व नवीन झोपडया निर्माण होऊ न देण्याबाबत शासन कार्यवाही करणार का ?

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, खरे म्हणजे, सरकारच्या शुद्ध हेतूबद्दल शंका घेणे, बरोबर नाही. शासनाने ही कमिटमेंट दिलेली आहे. उलट सरकार स्वत: कोर्टात गेलेले आहे आणि कोर्टाला अशी विनंती केली आहे की, सन 1/1/2000 या कट ऑफ डेटला मान्यता द्यावी. न्यायालयाने ही मुदतवाढ दिल्याबरोबर तातडीने सर्वेक्षण केले जाईल. दुसरा महत्वाचा मुद्दा असा आहे की, नंतरच्या कालावधीत सुद्धा दररोज अनेक अनधिकृत झोपडपट्टया शहरात उभ्या रहात आहेत, ही गोष्ट मी नाकारित नाही. या अनधिकृत झोपडया निष्काषित करण्याची जबाबदारी आपण मुंबई महानगरपालिकेवर सोपविलेली आहे. कायदा एवढा स्पष्ट आहे की, अनधिकृत झोपडयांना मदत करणारा वॉर्ड ऑफीसर, इतर संबंधित अधिकारी हे सर्व अनधिकृत बांधकामांना जबाबदार धरले जातात. दुर्दैवाने, या कायद्याची अंमलबजावणी प्रभावीपणे होत नाही. उलट महानगरपालिकेला सदर अनधिकृत बांधकामे निष्काषित करण्याच्या कामी पोलीस फोर्स देण्याची बाब आम्ही मान्य केली आहे. त्यामुळे महापालिकेने नवीन निर्माण होणा-या झोपडया ताबडतोबीने निष्काषित कराव्यात, अशा प्रकारच्या सूचना त्यांना देण्यात येतील.

यानंतर कुमारी जयश्री.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय,माझ्या माहितीत भर पडावी म्हणून मी माननीय मुख्यमंत्र्यांना असा प्रश्न विचारु इच्छितो की, ज्या अनधिकृत झोपडया आहेत व ज्यांना आपण एन्क्रोचमेंट म्हणतो अशा अतिक्रमण झालेल्या जागांवरील झोपडपट्टया निष्कसित करण्याकरिता आपल्या महानगरपालिकेकडे एक एन्क्रोचमेंट बोर्ड अस्तित्वात आहे, या बोर्डाचे एक स्वतंत्र खाते व कलेक्टोरेटही काढले गेले पाहिजे. कलेक्टरची ,,राज्यसरकारची , अशी जी जमीन आहे, त्याच्यावरील झोपडपट्टया निष्कसित करण्याचा अधिकार महानगरपालिकेकडे नाही.

श्री.विलासराव देशमुख : ज्या जमिनी महाराष्ट्र शासनाच्या आहेत, त्या जमिनींवरील अतिक्रमण दूर करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये एक स्वतंत्र स्क्वाड निर्माण केले गेले आहे. राज्य सरकारची जमीन आता फारशी शिल्लक राहिलेली आहे, असे काही मला वाटत नाही म्हणून जी काही थोडीफार जमीन शिल्लक राहिलेली असेल ती खाजगी,केंद्रसरकारची,बहुतांशी कॉर्पोरेशनची असणार. या सगळयाच प्रश्नांच्या संदर्भामध्ये केव्हातरी सर्वसंमतीने एखादी अशी भूमिका की, ज्याच्यामध्ये राजकारण असणार नाही घ्यावी लागणार आहे. ती भूमिका घेऊन जर आपण पुढे गेलो तर नवीन अशाप्रकारचे अतिक्रमण होणार नाही. दुसरा महत्वाचा भाग असा आहे की, जे गृहनिर्माण धोरण आम्ही तयार केलेले आहे त्यामध्ये काही लोकांच्या " मुंबईत यायचेच नाही का ? गरिबांची मुंबई आहे की नाही ? या मतप्रवाहास देखील ठोस उत्तर देणे आवश्यक असते आणि ते आपल्याला देता आले पाहिजे. नव्याने मुंबईत येणा-या लोकांकरिता आपण ॲफॉर्डेबल हाऊसिंगचे धोरण निर्माण केले पाहिजे, म्हणजे नव्याने येणारे लोक झोपडया बांधून अथवा, अनधिकृत बांधकाम करुन राहणार नाहीत. नव्याने मुंबईमध्ये येणा-या लोकांकरिता छोटी छोटी घरे बांधण्याचे नवीन धोरण या सरकारने तयार करावयास घेतलेले आहे. नवीन आलेल्या माणसाला घेता येण्यासारखे घर घेऊन त्याने त्यात राहावे, नवीन झोपडी त्यांना बांधता येणार नाही. अशा प्रकारची सर्वसंमतीने भूमिका आता घेण्याची गरज आहे.

उपसभापती : प्रश्नोत्तराचा तास आता संपलेला आहे.

RR -2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

औचित्याच्या मुद्दयांबाबत.

उपसभापती : माननीय सदस्यांचे औचित्याचे मुद्दे असतील तर ते सादर करण्यात यावेत.....

(गोंधळ)

डॉ.निलम गो-हे : एक्सप्रेस हायवेवर तीन जणांचा ॲक्सिडंट झाल्याचा गंभीर विषय आहे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, रेशनिंग दुकानामध्ये कशा प्रकारचा गहू दिला जात आहे, ते पाहा, मी नमूना देखील सोबत आणलेला आहे. हा अतिशय गंभीर विषय आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, जे ठरले आहे तसे ठरल्याप्रमाणेच होऊ द्यावे,प्रश्नोत्तराच्या तासानंतर अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चाच होऊ द्यावी.

उपसभापती : ठीक आहे, अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा सुरु करण्यात यावी, सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांनी पुरावे सादर करावे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, प्रा.फौजिया खान यांचा नंबर असतांना आपण सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांना कसे काय बोलावयाला सांगता ?

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, हा अतिशय गंभीर विषय आहे, आपण अर्थसंकल्पावरील चर्चा दोन मिनिटांनंतरही घेऊ शकतो, परंतु हा विषय अत्यंत तातडीचा आहे.

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त जर आपल्या औचित्याच्या मुद्दयाला मान्यता दिली तर सर्वांच्याच औचित्याच्या मुद्दयांना मान्यता द्यावी लागेल. सभागृहातील सन्माननीय सदस्यांचा कन्सेंट घेऊनच मी प्रश्नोत्तराच्या तासानंतर अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा सुरु करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

श्री.संजय दत्त : महोदय, मी आणलेला गव्हाचा नमूना तरी आपण घ्यावा.

उपसभापती : आपण तो नमूना माझ्याकडे पाठवून द्यावा.

(सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त वेलमध्ये येऊन धान्याचा नमूना माननीय उपसभापती यांच्याकडे सुपूर्द करतात.)

यानंतर श्री.बोरले.....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

पृ.शी.: अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा.

मु.शी.: सन 2007-08 च्या अर्थसंकल्पवार सर्वसाधारण चर्चा.

(चर्चा पुढे सुरु .....

श्री.मधुकर सरपोतदार (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, सन 2007-08 च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेला माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी सुरुवात केली. त्यानंतर अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये अन्य 2-3 सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला. अर्थसंकल्पावर जनरल चर्चा करण्यापूर्वी मला जनरल उल्लेख करावयाचा आहे. अंदाजपत्रक कोणासाठी असते ? सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांनी बजेट या शब्दाची फोड करुन D चे महत्व, U चे महत्व आणि G चे महत्व काय आहे, याचा अर्थ सांगितला. सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांनी बजेटचे कौतुक देखील केले. माझ्या समोर प्रश्न असा आहे की, माननीय अर्थमंत्र्यांनी सातत्याने यावर्षी तिसऱ्यांदा महसुली अधिक्याचा अर्थसंकल्प मांडलेला आहे. मात्र मागच्या दोन वर्षांमध्ये महसुली तूट आल्याचे स्पष्ट झालेले आहे. माननीय अर्थमंत्र्यांनी सन 2005-06 मध्ये 256 कोटी महसुली अधिक्याचा अर्थसंकल्प मांडला होता. परंतु प्रत्यक्षात 3,841 कोटी रुपयांची तूट आलेली आहे. सन 2006-07 मध्ये 305 कोटी महसुली अधिक्याचा अर्थसंकल्प मांडला होता. परंतु प्रत्यक्षात 3,192 कोटी रुपयांची तूट आलेली आहे. यावर्षी 510 कोटी रुपये महसुली अधिक्य अंदाजित केलेले असले तरी हे अधिक्य कायम राहील काय ? असा माझा प्रश्न आहे. मागच्या दोन वर्षातील महसुली अधिक्य आणि तूट याची आकडेवारी मी सभागृहाला सांगितलेली आहे.

सभापती महोदय, माननीय अर्थ राज्यमंत्र्यांनी सन 2006 च्या अर्थसंकल्पीय भाषणातील मुद्दा क्र.49 मध्ये असे नमूद केले होते की, "महाराष्ट्र हे प्रगतशील राज्य असले तरीही काही भागातील दरडोई उत्पन्न अतिशय कमी असून आरोग्य व शिक्षणासारख्या मुलभूत सोयी पुरेशा नाहीत. राज्याच्या सन 2002 च्या पहिल्या मानव विकास अहवालाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, राज्यातील आहे रे व नाही रे यांच्यात फार मोठी तफावत आहे व ती तफावत दूर करण्यासाठी मानवी विकास निर्देशांक कमी असलेल्या जिल्हयात विशेष लक्ष केंद्रीत करुन तेथे

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार .....

शिक्षण, आरोग्य व दरडोई उत्पन्नात सुधारणा करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र मानव विकास मिशनची स्थापना करण्यात येईल." पुढे असे महटलेले आहे की, "या मिशनसाठी सन 2006-07 मध्ये रुपये 50 कोटीची सुरुवातीला लाक्षणिक तरतूद करण्यात आली आहे." मागील वर्षभरात मानव विकास मिशनच्या माध्यमातून आहे रे व नाही रे यांच्यातील तफावत किती कमी झाली ? नाही रे वाल्यांच्या दरडोई उत्पन्नात किती वाढ झाली ? याची माहिती अर्थ राज्यमंत्र्यांनी सभागृहाला दिली तर बरे होईल.

सभापती महोदय, माननीय अर्थ राज्यमंत्र्यांनी यावर्षीच्या अर्थसंकल्पीय भाषणातील मुद्दा क्र.3 मध्ये असे नमूद केलेले आहे की, "स्थिर किंमतीनुसार राष्ट्रीय पातळीवर देशांतर्गत स्थूल उत्पन्न जे आधीच्या वर्षी 9 टक्के दराने वाढले होते ते सन 2006-07 मध्ये 9.2 टक्क्यांनी वाढेल अशी अपेक्षा आहे. या तुलनेत स्थिर किंमतीनुसार महाराष्ट्राचे स्थूल राज्य उत्पन्न आधीच्या वर्षीच्या 9.2 टक्के वाढीच्या तुलनेत सन 2006-07 मध्ये 9.3 टक्क्यांनी वाढण्याची अपेक्षा आहे."

यानंतर श्री.गागरे ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.भास्कर जाधव)

श्री.मधुकर सरपोतदार.....

मागील वर्षाचा अर्थसंकल्प सादर करताना याच मुद्यामध्ये ही टक्केवारी आधीच्या वर्षीच्या 8.4 टक्के वाढीच्या तुलनेत 8.6 टक्क्यांनी वाढण्याची अपेक्षा आहे, असा उल्लेख केलेला आहे. जी.डी.पी. मध्ये एक टक्का अपेक्षित वाढ केलेली आहे. राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षात "मोस्ट डायनॅमिक लिडर" अशी महाराष्ट्राच्या अर्थमंत्र्यांची प्रतिमा आहे. अशी प्रतिमा असणारे आपले अर्थमंत्री अधिक कार्यक्षम बनत आहेत, असे आपणास म्हणवयाचे आहे का ? हा माझा प्रश्न आहे. महाराष्ट्राचे अर्थमंत्री "हायली क्वॉलीफाईड" आहेत. मी विधानसभेचा सदस्य असताना ते ही 5-6 वर्ष माझ्यासोबत विधानसभेचे सदस्य होते. त्यावेळी मी त्यांचा अभ्यास केला आहे. विरोधी व सत्ताधारी पक्षात त्यांनी काम केले आहे. त्यांचे त्यावेळचे विचार व अर्थमंत्री झाल्यानंतरचे विचार यामध्ये खूप तफावत आढळून आली आहे. अर्थसंकल्पात असे आढळून आले आहे की, अर्थमंत्र्यांची मुंबई शहराविषयीची आस्था व आपुलकी दिसेनाशी झालेली आहे. कारणे शोधण्याचा प्रयत्न केला आहे पण ती कळाली नाहीत. या वर्षीच्या अर्थसंकल्पात ही कारणे कळतील ही अपेक्षा होती. मुंबईसाठी ज्या तरतुदी केलेल्या आहेत, त्या तरतुदी कायम ठेवत त्यांनी पुनरावृत्ती केलेली आहे. मुंबईकडे पूर्णपणे पाठ फिरविण्याचे काम सन्माननीय अर्थमंत्र्यांनी केलेले आहे. विधान परिषदेच्या सभागृहात अर्थराज्यमंत्री श्री.सुनील देशमुख यांनी अर्थसंकल्प मांडला आहे, अर्थसंकल्पावर उपस्थित झालेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे त्यांनाच द्यावयाची आहेत.

सभापती महोदय, महाराष्ट्राचे दरडोई उत्पन्न 37008 रुपये इतके आहे असे म्हटले आहे. मागील वर्षी दरडोई उत्पन्न 32170 रुपये इतके होते. यापैकी मुंबईचे दरडोई उत्पन्न किती आहे ? मागील वर्षी अर्थसंकल्पावर भाषण करताना हा प्रश्न मी विचारला होता पण उत्तर दिले गेले नाही. माननीय अर्थराज्यमंत्री अर्थसंकल्पावरील चर्चेस उत्तर देतील तेव्हा त्यांनी या प्रश्नाचे उत्तर दिले तर बरे होईल असे वाटते. दरडोई उत्पन्नात मुंबईचा वाटा किती आहे ? उर्वरित महाराष्ट्राचा वाटा किती आहे ? मुंबई व्यतिरिक्त बाहेरच्या जिल्हयाचे दरडोई उत्पन्न,

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ KGS/ MAP/

श्री.मधुकर सरपोतदार .....

खेडयापाडयातील शेतकऱ्यांचे दरडोई उत्पन्न वाढले आहे का ? त्यांचे उत्पन्न वाढण्यासाठी त्यांना योग्य ते मार्गदर्शन करावे अशा प्रकारची सूचना मी या अनुषंगाने करीत आहे. अपेक्षित दरडोई उत्पन्नामध्ये जी वाढ झालेली आहे, त्याचा आधार काय ? या प्रश्नाचे उत्तर आपण दिले तर मी आपला अतिशय आभारी राहील.

सभापती महोदय, अर्थसंकल्पात उल्लेख आहे की, महाराष्ट्र राज्य हे राजकोषिय दृढीकरणावरुन आता राजकोषिय स्थैर्याच्या दिशेने जात आहे. हे नमूद करीत असताना महसुली जमा व महसुली खर्च यांची रक्कम न दर्शविता केवळ टक्केवारी दर्शविली आहे. मागील दोन वर्ष अर्थसंकल्पात महसुली अधिक्य अपेक्षित असताना प्रत्यक्ष तीन हजार कोटी पेक्षा अधिक महसुली तुट आलेली आहे, याला राजकोषिय स्थैर्य म्हणावे काय हा माझा प्रश्न आहे.

सभापती महोदय, अर्थसंकल्पातील पुढचा मुद्दा असा आहे की, 2007-2008 या वर्षाच्या अर्थसंकल्पात रुपये 510.68 कोटी इतकी महसुली शिल्लक अपेक्षीत आहे असे म्हटलेले आहे. मागील दोन अनुभव विचारात घेता माननीय अर्थमंत्री या कसोटीस खरे ठरतील काय ? हा प्रश्न मी सरकारला विचारत आहे. आपण आकडेवारी दिलेली आहे, त्याच्या आधारावर मी प्रश्न विचारले आहेत. केवळ वार्षिक योजनेचे आकारमान व आकडेवारी वाढली म्हणजे राज्य प्रगती पथावर आहे असा गैरसमज जनसामान्यापर्यंत पोहचविला जात आहे.

यानंतर श्री.सुंबरे.....

अशुधारित प्रत / शुद्धीपत्र नाही

श्री. सरपोतदार .....

सभापती महोदय, पाटबंधारे क्षेत्राचे व्यवस्थापन करीत असताना पुढील वर्षात अंदाजित 2 लक्ष इतके अतिरिक्त क्षेत्र सिंचनाखाली आणण्यात येणार आहे असे म्हटले आहे. माननीय राज्यमंत्र्यांनी जरा अर्थसंकल्पातील ते वाक्य वाचून माझ्या प्रश्नाचे उत्तर द्यावे अशी माझी त्यांना विनंती आहे. हे क्षेत्र हेक्टरी आहे की एकर आहे ? आम्ही काय गृहीत धरायचे ? आपण ते जे म्हटले आहे ते जरा तपासून पहावे. मुद्दा क्र. 16 मध्ये आपण हे म्हटलेले आहे, ते तपासून पाहिल्यास मी काय म्हणतो ते आपल्या लक्षात येइल. तरी त्याबद्दल आपण खुलासा केला तर बरे होईल. ....

डॉ. सुनील देशमुख (खाली बसून..) : ते क्षेत्र 'हेक्टरी' आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : पण आपण त्याचा निश्चित असा उल्लेख त्यात केलेला नाही. आपण नंतर त्याबाबत स्पष्टपणे खुलासा करावा. त्यापुढील माझा प्रश्न त्यासंबंधातच आहे. मागील वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये देखील मुद्दा क्र.18 मध्ये आपण म्हटलेले आहे की, माननीय राज्यपालांनी दिलेल्या निदेशाच्या चौकटीत राहून, सिंचन क्षेत्रात, जलसंपदा विभागाद्वारे व पाटबंधारे महामंडळाद्वारे राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांकरिता प्रकल्पनिहाय नियतव्ययाचे वाटप करण्यात आले आहे. त्यामुळे आगामी वर्षात अतिरिक्त 2 लाख हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येईल असा अंदाज आहे. तेव्हा गेल्या वर्षीचे हे 2 लाख हेक्टर क्षेत्र आणि आता या वर्षीचे 2 लाख हेक्टर क्षेत्र असे दोन्ही वर्षांचे मिळून 4 लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे काय ? हा माझा प्रश्न आहे, त्याबाबत आपण आपल्या उत्तराच्या भाषणात खुलासा करावा ही विनंती. केवळ शाब्दिक कसरती करून, आकड्यांचे खेळ करून सदस्यांची दिशाभूल करावयाची हे कदाचित राजकारणामध्ये ठीक आहे. पण व्यवहारात ते कितपत योग्य आहे हा माझ्या समोर प्रश्न आहे. तसेच '2 लाख हेक्टर' ही संख्या कोणता आधार घेऊन आपण जाहीर केली आहे वा करीत आहात ? याचीही माहिती दिली तर बरे होईल.

सभापती महोदय, विदर्भातील 6 जिल्ह्यांमध्ये सामूहिक विवाह योजनेतून शासन या योजनेत सहभागी होणाऱ्या जोडप्यास वस्तूरूपाने 10 हजार रूपयांची मदत व या विवाहाचे आयोजन करणाऱ्या संस्थांस प्रोत्साहन म्हणून संयोजनाचा खर्च भागविण्यासाठी प्रत्येक जोडप्यामागे 1 हजार रूपयाचे अनुदान दिले जाते. या योजनेसाठी या वर्षी 5 कोटी रूपयांची तरतूद केलेली आहे. माझा या संबंधात प्रश्न असा आहे की, ही मागासवर्गीयांसाठीची योजना असल्याने या योजनेंतर्गत मागील

..... यूयू 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सरपोतदार .....

वर्षामध्ये किती सामूहिक विवाह सोहळे पार पडले आणि किती जोडप्यांना व किती संस्थांना अनुदान दिले गेलेले आहे आणि त्यासाठी एकूण किती खर्च झाला तसेच त्यासाठी जी अनुदानाची रक्कम जाहीर करता त्यातील किती रक्कम प्रत्यक्षात खर्च झाली याची माहिती या निमित्ताने आपण आपल्या उत्तराच्या भाषणातून दिल्यास मी आपला आभारी होईन.

सभापती महोदय, राष्ट्रकूल क्रीडा स्पर्धा पुणे येथील बालेवाडी मध्ये 2008 मध्ये पार पडणार आहे. परंतु या बालेवाडी क्रीडा संकुलाकडे पाहण्याचा या शासनाचा दृष्टीकोन आणि शासनाची अनास्था यामुळे त्या क्रीडा संकुलाची अवस्था आज दयनीय झालेली आहे. सभापती महोदय, बालेवाडी येथे हे क्रीडा संकूल उभारले त्यावेळेस जी चर्चा त्यासंबंधात झाली तेव्हा मी विधानसभेचा सदस्य होतो. त्या चर्चेमध्ये भाग घेताना मी तेव्हा म्हणालो होतो की, 100 कोटी रूपये खर्च करून हे मोठे क्रीडा संकूल उभे राहात आहे. परंतु हे क्रीडा संकूल उभे राहिल्यानतर त्याचा सातत्याने वापर झाला पाहिजे, सुयोग्य वापर झाला पाहिजे. विविध खेळांचे प्रकार तेथे झाले पाहिजे आणि त्या संकुलाचा उपयोग चांगल्या प्रकारे झाला पाहिजे. देशातील हे एक अग्रगण्य असे क्रीडा संकूल म्हणून ते ओळखले गेले पाहिजे. पंजाबमध्ये ज्याप्रमाणे या क्षेत्राकडे पाहिले जाते त्याप्रमाणे दृष्टीकोन ठेवून आपण पावले उचलणार आहात काय ? असा प्रश्न देखील मी त्यावेळी विचारला होता. त्यावर माझ्या स्मरणाप्रमाणे तत्कालीन राज्यमंत्री श्री.दिवेकर होते, जे आज हयात नाहीत. पण त्यांनी त्यावेळी त्यावर उत्तर दिले होते. पण आज प्रत्यक्षात या क्रीडा संकुलाचा वापर काय होतो आहे ? या क्रीडा संकुलाची आज अवस्था काय आहे ? मध्यंतरी या क्रीडा संकुलामध्ये आलेल्या खेळाडू आणि इतरांना अन्नातून विषबाधा झाल्याची बातमी आली होती. सभापती महोदय, जेथून आपण चांगले क्रीडापटू निर्माण करावयाचे, तयार करावयाचे किंवा त्या क्रीडा संकुलाचा फायदा घेणारे जे नागरिक आहेत त्यांना अन्नातून विषबाधा होते ही मोठी गंभीर अशीच घटना आहे. शासन इतकी काळजी घेणार असेल तर तेथे आपण ज्या राष्ट्रकूल क्रीडा स्पर्धा भरविणार आहोत त्यासाठी सर्व तयारी तेथे असणे आवश्यक आहे, त्या दृष्टीने तेथील संपूर्ण वातावरण मग ते मैदान असो, निवास असो वा अन्नाच्या बाबतीत असो, उत्कृष्ट असणे आवश्यक आहे. मध्यंतरी मी विधीमंडळाच्या एका समितीमार्फत तेथे भेट देऊन पाहणी करून आलो असून त्या समितीचा त्यावरील अहवाल देखील आम्ही ....

(यानंतर श्री. सरफरे ..... व्हीव्ही 1 ...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

या विधीमंडळाला सादर केला आहे त्या अहवालामध्ये आम्ही काही शिफारशी केल्या आहेत. त्या शिफारशींकडे लक्ष दिले गेले आहे की नाही? याबद्दल मी साशंक आहे. आम्ही वैधानिक समित्यांच्या माध्यमातून पहाणी करुन व अभ्यास करुन पुढील उपाय योजना करण्यासंबधी शासनाला अहवाल सादर करतो. परंतु त्यासंबंधी उपाय योजना केल्या जातात काय? याबाबत मी साशंक आहे. या समित्यांचे जे अहवाल सादर केले जातात त्या अहवालातील शिफारशींप्रमाणे अंमलबजावणी होत नाही अशाप्रकारची परिस्थिती आहे.

सभापती महोदय, मौलाना आझाद अल्पसंख्यांक महामंडळाला शासनाने 39.60 कोटी इतका निधी उपलब्ध करुन दिला आहे त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. कोणतेही महामंडळ असो, त्याला आपण निधीची उपलब्धता करुन दिल्यास ते महामंडळ सशक्त होऊ शकते. या व्यतिरिक्त अन्य महामंडळे आहेत त्यांना आपण निधी कां देत नाही? यामध्ये फक्त एकाच महामंडळाची निवड कां केली? दुसरे असे की, या देण्यात आलेल्या निधीचा किती फायदा झाला? भाग भांडवलापोटी महामंडळाला 39.60 कोटी निधी उपलब्ध करुन दिला. या महामंडळाने आतापर्यंत 23.45 कोटी इतक्या कर्जाचे वितरण केले व त्याचा लाभ 3983 लाभार्थींना दिल्याचे नमूद केले. ते लाभार्थी कोण आहेत? ज्या उद्देशाने हे मौलाना आझाद महामंडळ स्थापन केले त्या संदर्भात मी सदनामध्ये प्रश्न विचारला होता. त्यावेळी माननीय मुख्यमंत्री, माननीय गृहनिर्माण मंत्री व माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री. छगन भुजबळ सभागृहामध्ये बसले होते. त्यावेळी तिघांनी सांगितले की, हे अल्पसंख्यांक महामंडळ फक्त मुस्लिमांसाठी नाही तर त्यामध्ये इतर सर्व धर्मीय अल्पसंख्य येतात. सर्वांसाठी हे मंडळ निर्माण केले असेल तर आम्हाला आनंद आहे. परंतु मला असे विचारावयाचे आहे की, या ठिकाणी 3983 लाभार्थींनी लाभ घेतला ते लाभार्थी कोण, कोणकोणत्या प्रवर्गातून आले आहेत? याची माहिती मिळाली तर या मंहामंडळामार्फत त्या निधीचा व्यवस्थित व योग्य पध्दतीने वापर होत आहे की नाही हे समजेल. या देशामध्ये शासनाने काही लोकांना खूष करण्यासाठी, त्यांचा अनुनय करण्यासाठी जी पावले उचलली आहेत. त्यामुळे मूळ रोगाचे निदान करण्याऐवजी त्यावर मलमपट्टी करण्याचे प्रकार होत आहेत. त्यामुळे रोगी माणसाच्या समस्या वाढत चालल्या आहेत. त्यांच्या व्यथा लक्षात घेऊन त्या रोगावर उपचार करण्यासाठी रोग समूळ कसा नष्ट केला जाईल याचा विचार करण्याची आवश्यकता आहे. त्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

अनुषंगाने रोगावर उपचार केले पाहिजेत. सन 2005-06 मध्ये नागपूर येथे हज हाऊस बांधण्यासाठी भूसंपादन व बांधकाम करण्यासाठी शासनाने 2 कोटी रुपये उपलब्ध करुन दिले होते. या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये सन 2007-08 मध्ये हज हाऊसच्या झालेल्या कामाच्या प्रगतीनुसार अधिक निधी उपलब्ध करुन देण्यात येईल असे म्हटले आहे, ही चांगली गोष्ट आहे. आम्ही नागपूरला जातो त्यावेळी आम्हाला मानणारे व आमच्याबरोबर येणारे काही मुस्लिम बांधव आम्हाला नेहमी विचारतात की, "दादा आमच्या हज हाऊसचे बांधकाम पूर्ण होऊ द्या." आमचा त्याला विरोध नाही.फक्त एकच प्रश्न आहे की, ज्यावेळी आपण याबाबत विचार करता त्यावेळी इतर धर्मियांचाही विचार करणार आहात की नाही? हा माझा प्रश्न आहे. आपण नेहमी म्हणता की, "सर्वांना समान वागणूक, सर्व धर्म सम भावनेने आम्ही राज्य करतो". तसे असेल तर इतर कोणकोणत्या धर्मांसाठी आपण अशाप्रकारचे अनुदान देता. हे हज हाऊस बांधण्याकरिता एकूण किती रकमेचा प्रस्ताव होता. आणि आतापर्यंत किती कोटी रुपये खर्च करण्यात आले? हज हाऊसचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी आपण कोणती योजना तयार केली आहे? हे बांधकाम केव्हा पूर्ण होईल ? यासंबंधीची माहिती आपल्या भाषणामध्ये दिली तर मी आपला आभारी राहीन.

सभापती महोदय, केंद्रीय योजनेंतर्गत केंद्र सरकारच्या मदतीने राज्य सरकारने पोलीस दलाचे आधुनिकीकरण करण्याची योजना सन 2000-01 पासून अंमलात आणली. सन 2005-06 मध्ये या योजनेंतर्गत 777.01 कोटी रुपये खर्च झाले. सन 2006-07 या वर्षी 133.81 लाख रुपयांच्या कार्यक्रमाची अंमलबजावणी सुरु आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार (पुढे सुरू....

सन 2007-08 या वर्षाकरिता या योजनेसाठी रुपये 179.20 कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे. वैज्ञानिक प्रयोग शाळा निर्माण करण्याबाबतचा उल्लेख आहे. अशाप्रकारच्या किती वैज्ञानिक प्रयोग शाळा निर्माण झालेल्या आहेत ? त्याचा उल्लेख भाषणामध्ये करावा. वेगवेगळया कामाच्या निमित्ताने मुंबईमध्ये बाहेरचे लोक येतात. आपल्याला मात्र कोणताही रोग येथे आला तर त्याची तपासणी करण्यासाठी दिल्लीला जावे लागते. महाराष्ट्र राज्य हे प्रगत राज्य आहे अशाप्रकारे प्रत्येकवेळी सांगितले जाते. मग आपण फॉरेन्सिक लॅबमध्ये रक्ताचे नमुने तपासण्यासाठी का जातो ? हे समजत नाही. आपल्याकडे चिकन गुनिया रोग आला तर रक्ताचे नमुने तपासण्यासाठी बंगलोरला जावे लागत होते. त्या दृष्टीने आपल्याकडे कोणतीही वैज्ञानिक प्रयोगशाळा नाही. भविष्यामध्ये अशी प्रयोगशाळा उभारली जाणार आहे काय ? याबाबतची माहिती दिल्यास आभारी राहीन.

त्यानतर "औद्योगिक घटकांना मंजूर केलेली आर्थिक प्रोत्साहने अदा करण्याच्या दृष्टीने पी.एल.अे. खाते उघडण्यात येईल व त्यात सन 2007-08 मध्ये रुपये 400 कोटी एवढा निधी उपलब्ध करण्यात येईल", असे म्हटलेले आहे. या प्रोत्साहन योजनेचा कालावधी किती आहे ? कोणाकोणाला प्रोत्साहन दिले जाणार आहे ? 400 कोटी रुपयाचा निधी निर्माण केलेला आहे त्याचा विनियोग कसा केला जाणार आहे ? या संदर्भातील माहिती सदनाला दिली तर आपला ऋणी राहीन.

त्यानंतर राज्यातील विदेशी गुंतवणूकीमध्ये आपण पुढे आहोत, असे सांगितले जाते. त्या दृष्टीने राज्य प्रगतीशील आहे असे सांगितले जाते. यामध्ये संपूर्ण देशामध्ये आपल्या राज्याचा पहिला क्रमांक आहे असे प्रत्येकवेळेला सांगतले जाते. आमच्यासमोर प्रश्न आहे की, हा क्रमांक कोठून कसा आहे, याचे मोजमाप कसे केले जाते ? सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनीही आपल्या भाषणामध्ये विदेशी गुंतवणुकीमध्ये आपल्या महाराष्ट्राचा क्रमांक पहिला असल्याचे आपल्या भाषणामध्ये सांगितले, याचा मला आनद झाला. प्रश्न एवढाच आहे की, हा क्रमांक कोठून आहे, हे समजणे महत्वाचे आहे. राज्यामध्ये विदेशी गुंतवणूक झाली. यामधून जे उद्योग उभे राहिले त्यामध्ये किती लोकांना रोजगार उपलब्ध झला ? हा आमच्यासमोर प्रश्न येतो. कितीतरी कारखाने बंद झालेले आहेत. एवढे कारखाने बंद झाले, एवढे कामगार बेकार झाले,लोक उद्ध्वस्त

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार (पुढे सुरु...

झाले, याची आकडेवारी आपण द्यावी म्हणजे आम्हाला कळू शकेल. नवीन कारखान्यांनी किती कामगारांना रोजगार दिलेला आहे ? हेही स्पष्ट करावे. आज 60 गिरण्या बंद झाल्यामुळे अडीच लाख कामगार बेकार झालेले आहेत, उद्ध्वस्त झालेले आहेत. गिरण्यांच्या जागेवर मोठमोठे मॉल उभे राहिलेले आहेत, त्या ठिकाणी डान्सबार निर्माण केलेले आहेत. सन्माननीय गृहमंत्र्यांनी डान्सबारबाबत बील आणून मंजूर करून घेतले. ते बील कायदेशीर होणार नाही, असे सदस्यांनी सभागृहामध्ये सांगितले असतानादेखील ते बील पास करून घेतले. परंतु नंतर हायकोर्टामध्ये ते टिकले नाही. आता त्या बीलामध्ये नवीन तरतुदी करुन नवीन बील आणावे लागणार आहे.

सभापती महोदय, "इन्स्टीट्युट फॉर मॅनेजमेंट डेव्हलपमेंट, स्वित्झलँड या संस्थेच्या मुल्यांकन अहवालामध्ये भारताच्या व्यतिरिक्त स्थान मिळालेले महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य आहे",असे म्हटलेले आहे. संपूर्ण देशामध्ये इनस्टीटयुट फॉर मॅनेजमेंट डेव्हलपमेंट स्वित्झलँड ही मूल्यांकन करणाऱ्या संस्थेची निर्मिती कशी झाली ? त्या संस्थेचा जन्म कसा झाला ? मूल्यांकन करण्यासंबंधाने त्यांनी कोणते यार्डस्टीक वापरलेले आहेत. या संस्थेचे स्थान काय आहे ? ही संस्था कितपत विश्वासार्ह आहे ? हे सांगावे.

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार .....

त्या अहवालाची खात्री देऊन आपण अर्थसंकल्पात त्याचा उल्लेख केलेला आहे. म्हणून त्याबद्दल माहिती दिली तर बरे होईल अशी मी शासनाला विनंती करतो. महाराष्ट्राचे स्थान 42 वरुन 37 वर उंचावले आहे असाही उल्लेख या भाषणामध्ये केलेला आहे. म्हणजे महाराष्ट्राचे स्थान 3 अंकाने वर आलेले आहे. महाराष्ट्राला 42 वे स्थान कोणत्या वर्षात प्राप्त झाले होते आणि आज 37 वे स्थान कोणत्या वर्षात प्राप्त झाले ? ही जी शब्दिक कसरत केली जाते ती लोकांच्या मनावर आघात करुन आम्ही काही चांगले निर्माण करीत आहोत हे दाखवण्यासाठी केली जाते. त्याबद्दल तक्रार नाही. शेवटी शब्दांचा वापर कसा करावयाचा हा आपला प्रश्न आहे. परंतु प्रत्यक्षात वापरलेली भाषा आणि वस्तुस्थिती याचा मेळ कोठे तरी बसला पाहिजे हाच माझा विचारण्याच्या पाठीमागचा उद्देश आहे.

सभापती महोदय, वीज निर्मिती कार्यक्रम राबवत असताना गेल्या 7 वर्षात नवीन किती मेगावॅट वीज निर्माण केली ? हे सांगितले पाहिजे. विजेबद्दल न बोललेले बरे. कारण तुम्ही आम्ही सगळेच अंधारात आहोत. फक्त आम्ही मुंबईचे लोक अंधारात नाही. आम्ही चोवीस तास उजेडामध्ये आहोत. आता मुंबईच्या काही भागात म्हणजे ज्या ज्या ठिकाणी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडून वीज पुरवठा केला जातो त्या मुलूंड, भांडूप भागामध्ये विजेचा अपंडाव चालू आहे. मुलूंड नाक्यावर मी एका कार्यक्रमासाठी गेलो असताना वीज गेल्यामुळे कार्यक्रम होऊ शकला नाही. कारण त्या ठिकाणी विजेचे भारनियमन चालू होते. मुंबई शहरामध्ये लोडशेडींग येत आहे. संपूर्ण महाराष्ट्र विजेसाठी तडफडत असेल, वीज नसल्यामुळे संपूर्ण महाराष्ट्र पोळून निघत असेल, वीज नसल्यामुळे शेतकऱ्यांची शेती पिकत नसेल, वीज नसल्यामुळे लोकांना पाणी मिळत नसेल तर मुंबईमध्ये 24 तास वीज पुरवठा सुरु राहावा असे म्हणणे योग्य होणार नाही. महाराष्ट्राचे जे दु:ख असेल ते महाराष्ट्रातील सगळ्या जनतेने शेअर केले पाहिजे. महाराष्ट्र सुखात असेल तर सगळी जनता सुखात असली पाहिजे. मुंबईतील लोकांचे राहणीमान उंचावले असेल तर राज्यातील खेड्यापाड्यात राहणाऱ्या लोकांचे राहणीमान उंचावले पाहिजे. तशा प्रकारचे नियोजन आणि तशी तरतूद अर्थसंकल्पामध्ये असावयास पाहिजे. 12,500 मेगावॅट इतकी वीज निर्मिती क्षमता असणाऱ्या

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार .....

प्रस्तावित 8 खाजगी वीज निर्मिती प्रकल्पांमधून राज्यास 4 हजार मेगावॅट इतकी वीज प्राप्त होणे अपेक्षित आहे असे या माननीय अर्थमंत्र्यांनी आपल्या भाषणामध्ये म्हटले आहे. तुम्ही किती वर्षे शाब्दिक आश्वासने देणार आहात ? जे सन्माननीय सदस्य या अर्थसंकल्पाची स्तुती करतात त्यांना माझा प्रश्न आहे. या राज्यात आपल्या आघाडीचे राज्य येऊन सात वर्षे झालेली आहेत आणि आठव्या वर्षात पदार्पण केलेले आहे. इतकी वर्षे आपण राज्य करीत आहात आणि विजेसाठी एवढ्या मोठ्या प्रमाणावर खर्च करीत असताना इतक्या वर्षात किती युनिट विजेचे उत्पादन केले तसेच जी वीज निर्मिती क्षमता होती त्यामध्ये किती कमी झाली हे सांगितले पाहिजे. वीज निर्मिती क्षमता कमी होण्याची अनेक कारणे आहेत. शासनाने एक श्वेतपत्रिका जाहीर केली होती. त्यामध्ये असे सांगितले होते की, आम्हाला 18 हजार कोटी रुपये मिळाले तर संपूर्ण महाराष्ट्रातील विजेचे संकट दूर करु. त्यानंतर हजारो कोटी रुपयांची तरतूद आम्ही अर्थसंकल्पामध्ये पाहतो. आता सीमा बदलली, आकडे बदलले परंतु वीज निर्मिती झालेली नाही. युती शासनाने महाराष्ट्रामध्ये 36 हजार कोटी रुपयांचे कर्ज घेतले होते. त्यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अस्तित्वात नव्हता. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष 1999 मध्ये स्थापन झाला. या राज्यात युतीचे सरकार असताना काँग्रेस पक्षाने युती शासनावर फार मोठा हल्ला केला होता. त्यावेळी मी वर्ष-दीड वर्ष या सभागृहामध्ये होतो. त्यावेळी युती शासनावर अनेक प्रहार होत होते. त्यावेळी विरोधी पक्षात जे लोक होते ते आता सत्ताधारी बाकांवर बसले आहेत. आम्हाला जे लोक प्रश्न विचारत होते त्यांच्याबाबतीत आश्चर्य वाटते. कारण पोझीशन बदलली की, माणसाची भूमिका बदलते. या विजेचे संकट खरोखर किती भयानक आहे याची शासनाला कल्पना आहे काय ? या विजेमुळे महाराष्ट्राची कशी वाट लागत आहे याचा शासनाने अंदाज घेतला आहे काय ?

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर सरपोतदार...)

माननीय अर्थमंत्र्यांनी खूप मोठी जबाबदारी घेऊन सरकारच्या संपूर्ण धोरणाला महाराष्ट्रातील जनतेने पाठिंबा दिला असे सांगितले. या निवडणुका जिंकताना मतदारसंघातून काळाबाजार आणि भ्रष्टाचाराच्या माध्यमातून किती प्रचंड पैसा गोळा केलेला आहे याची माहिती आपण घेतली तर बरे होईल. आम्ही या संदर्भात्ील अनुभव घेतलेला आहे. मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये एका नगरसेवकाने एका प्रभागामध्ये निवडून येण्यासाठी 2 कोटी रुपये खर्च केले आहेत. मुंबईतील प्रभागातील लोकसंख्या साधारणत: 35 ते 40 हजार असते. मतदारांच्या घरामध्ये मतदाराच्या स्लिप बरोबर 500 रु.च्या नोटा पाठवल्या. मुंबईतील अशी अनेक उदाहरण मी देऊ शकेन. या वर्षी मी महाराष्ट्रामध्ये फिरलो नाही. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे महाराष्ट्रातील उदाहरणे देतील. ते संपूर्ण महाराष्ट्र फिरले. आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या कुटुंबियांचे त्यांनी सांत्वन केले. जी माणसे रोज तुम्हाला लाथा घालतात, तुमची हेळसांड करतात तिच माणसे तुम्हाला मते कशी काय देतात ? ही जादुची कांडी कशी काय फिरते ? एका ठिकाणी दारुच्या क्वार्टर दिल्या गेल्या, काही ठिकाणी 500च्या नोटा दिल्या गेल्या. ह्या गोष्टींचे वाटप करणा-या माणसांच्या नावांची यादी माझ्याकडे आहे. अशाने आपण आपली लोकशाही दृढ करतो की विकलांग करतो, हा प्रश्न आहे. निवडणुका जिंकण्याचे मार्ग अनेक आहेत. हे मार्ग योग्य असले पाहिजेत. आम्ही देखील निवडणुका हरलो आणि जिंकलोही. कारण आम्ही सतत कामे करीत राहिलो. जनतेची सेवा करुन आम्ही जिंकून आलो. आज सर्वच पक्षाची ही परिस्थिती आहे की, कदाचित आमचा पक्षही त्यामध्ये सामील असेल, ज्याचा जनतेशी कोणत्याही प्रकारे संबंध आलेला नाही अशा माणसांना उभे करुन त्यांना निवडून आणण्याचे प्रयत्न केले जातात. ज्यांना जनतेची सेवा माहीत नाही फक्त मावा माहीत आहे अशी माणसे निवडून दिली तर ती मावाच खाण्याचा सतत प्रयत्न करणार. जो इन्व्हेस्ट करतो तो रिटर्नची अपेक्षा करणारच आणि हे स्वाभाविक तत्व आहे.

सभापती महोदय, माझा वीज मंडळाच्या संदर्भात प्रश्न आहे. हे सरकार आम्हाला किती वर्षे अंधारात ठेवणार आहे ? महाराष्ट्रामध्ये 12-12- 18-18 तास भारनियमन आहे. वीज कधी येते आणि कधी जाते हे कळत नाही. वीज निर्मितीच्या संदर्भात विविध कंपन्यांशी सामंजस्य करार

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर सरपोतदार.....)

केल्याची केवळ शाब्दिक आश्वासने दिलेली आहेत. हे प्रकल्प केव्हा अस्तित्वात येणार आहेत यासंबंधीची माहिती दिली तर बरे होईल. केवळ शाब्दिक जगलरी करणे इष्ट नाही.

"न्यायालयांना मूलभूत सुविधा पुरविण्याबाबतची केंद्रपुरस्कृत योजना शासनामार्फत राबविली जाते. या योजनेमध्ये न्यायालयीन इमारती, न्यायाधिशांकरिता निवासस्थाने बांधण्यात येतात, तसेच भूसंपादनही करण्यात येते." असे अर्थसंकल्पीय भाषणामध्ये नमूद करुन पुढे असे म्हटलेले आहे की, "163 चालू कामे व 8 नवीन कामे हाती घेण्यात आली आहेत. त्यापैकी 68 कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत." ही सर्व कामे पूर्ण होण्यास किती कालावधी लागेल ? आज अस्तित्वात असलेली न्यायालये आणि तेथील फर्निचर आणि अन्य गोष्टी पाहिल्या तर फार भयानक अवस्था दिसते. देशाला स्वातंत्र्य मिळून 60 वर्षे झाली. या 60 वर्षामध्ये आपण जनतेच्या किती अपेक्षा पूर्ण करु शकलो, हे पाहण्याची नितांत आवश्यकता आहे.

सभापती महोदय, अर्थसंकल्पीय भाषणामध्ये असे म्हटलेले आहे की, "दहाव्या पंचवार्षिक योजनेत नागरी स्वास्थ्य आरोग्य केंद्र, बांद्रा, मुंबई येथील खाटांची संख्या 10 वरुन 50 पर्यन्त वाढविण्यात आली आणि एका नवीन मजल्याचे बांधकाम करण्यात आले आहे."

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / अशुद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार.....

हे आमच्या बांद्रयाचे नागरी स्वास्थ्य केंद्र फार महत्वाचे आहे. आज नागरिकांचे स्वास्थ्य बिघडलेले असते. ते सुधारावे म्हणून हे नागरी स्वास्थ्य केंद्र अस्तित्वात आले. सुरुवातीला या केंद्राची क्षमता केवळ दोन खाटांची होती. मी तेथील लोकप्रतिनिधी म्हणून निवडून आल्यानंतर हे नागरी स्वास्थ्य केंद्र सुधारावे याकरिता प्रत्येक वर्षी शासनाकडे पाठपुरावा करीत होतो. इतकेच नव्हे तर मुंबई उपनगर जिल्हा अस्तित्वात आला. संपूर्ण महाराष्ट्रात लोकसंख्येच्या मानाने मुंबई उपनगर जिल्हयासारखा मोठा जिल्हा नाही. 70 ते 75 लाख लोकसंख्या या जिल्हयाची आहे. शासनाला जास्तीत जास्त महसुली उत्पन्न या जिल्हयातून मिळते. असे असताना आपल्याला आश्चर्य वाटेल, मुंबई उपनगर जिल्हयामध्ये जनतेच्या सेवेसाठी एकही शासकीय रुग्णालय नाही. शासन म्हणेल की, महानगरपालिकेची रुग्णालये आहेत. महानगरपालिकेची रुग्णालये जरुर आहेत. परंतु लोकसंख्या लक्षात घेता अस्तित्वात असलेली रुग्णालये किती अल्पसंख्येने आहेत याचा कधी विचार करणार आहात की नाही? आरोग्य सेवा आज अपुरी पडत आहे. रोज मुंबईच्या उपनगरात माणसांचे लोंढे येऊन आदळत आहेत. जिथे मोकळया जागा मिळतात तेथे बोचके टाकून संसार मांडले जातात. मी माननीय मुख्यमंत्र्यांना प्रश्न विचारला होता, तुम्ही बाहेरुन येणाऱ्या लोकांना थांबविणार आहात की नाही? आज काय चालले आहे? तुम्ही पण आमचेच आहात ही भूमिका घेतली जात आहे. परप्रांतीय लोक मुंबई शहरात येतात. कुठेही डेरा टाकतात. वाट्टेल तशी घाण करतात. कोणीही या आणि काहीही करा. मोकळी असणारी संपूर्ण जमीन व्यापून टाका अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. जणू काही संपूर्ण जग आपलेच आहे.

सभापती महोदय, मी लोकसभेचा सदस्य असताना सभागृहात मुलायम सिंग यादव आणि लालू प्रसाद यांच्या संदर्भात घडलेला एक किस्सा सांगू इच्छितो. त्यांनी आमच्या पक्षाच्या भूमिकेबद्दल खूप टीका केली. मी लालू प्रसाद यांना प्रश्न विचारला होता. लालूजी, आपण म्हणता की, महाराष्ट्रात बिहारींना स्थान मिळत नाही. बिहारी लोक महाराष्ट्रात का येतात त्याची कारणे तुम्ही शोधली का? त्यांना मी सांगितले, माणसे भ्रष्टाचार करतात यावर माझा अविश्वास होता. आज माणसे सगळीकडे भ्रष्टाचार करीत आहेत. त्यांना कुठेही बोलता येते, कसेही वागता येते, चोरी करता येते, लुटमार करता येते. परंतु तुम्ही तर त्याच्याही पुढे गेला आहात. जनावरांसाठी जे गवत खरेदी करण्यात आले, ते गवत तुम्ही खायला लागला आहात. त्यामुळे ती

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार.....

जनावरे आणि त्या जनावरांचा सांभाळ करणारी जी माणसे आहेत ती तुमच्या बिहारमध्ये न राहता आमच्या महाराष्ट्रात येऊन तबेले काढण्याचे काम करु लागली आहेत. त्यांच्या तबेल्यांची निगराणी करण्याचे काम आमच्या महापालिकेकडे येते. ते आम्ही करीत आहोत. आता कमीत कमी आमच्याकडून त्यांच्या तबेल्यातील शेण तरी मागू नका. आम्ही तबेलेवाल्यांकडून दूध घेतो, सगळ्या आवश्यक गोष्टी आम्ही करतो. कमीत कमी आम्ही त्या माणसांना त्रास देतो असे तरी यापुढे म्हणू नका.

सभापती महोदय, घोटाळा करणे हे त्यांचे काम आहे. आज सगळ्या ठिकाणी घोटाळे सुरु आहेत. सभागृहामध्ये रोजच्या प्रश्नोत्तराच्या यादीत घोटाळा नाही असा एकही प्रश्न दिसून येत नाही. मी गेली 5 वर्षे सभागृहात पाहतो आहे. "घोटाळ्याचे सरकार" यासारखी दुसरी उपमा या सरकारला देता येणार नाही. घोटाळे निर्माण करणे हेच महाराष्ट्र सरकारचे मुख्य काम आहे.

सभापती महोदय, दहावी पंचवार्षिक योजना सुरु करण्यात आली. नवीन योजनेंतर्गत बांद्रा येथील नागरी स्वास्थ्य केंद्राची श्रेणीवाढ करण्यात आली हे मी सांगत होतो. त्याठिकाणी मुबलक जागा उपलब्ध आहे. या स्वास्थ्य केंद्राची आणखी श्रेणीवाढ केली, त्या ठिकाणी अधिक सुविधा उपलब्ध करुन दिल्या, विशेषत: आवश्यक तो कर्मचारीवर्ग, निरनिराळ्या संवर्गातील मनुष्यबळ वेळेवर उपलब्ध करुन दिला तरच त्या स्वास्थ्य केंद्राचा स्थानिक जनतेला फायदा होईल. अन्यथा फायदा होणार नाही हेच मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, सन 2006-07 मध्ये रोजगार हमी योजनेवर फेब्रुवारी, 2007 अखेर एकूण 578.91 कोटी रुपये इतका खर्च झाला. त्याद्वारे 8.27 कोटी मनुष्यदिन रोजगार निर्मिती झाल्याचे म्हटले आहे. प्रश्न असा आहे की, ही जी रोजगार निर्मिती झाली त्या रोहयोच्या कामावर नेमकी कोणत्या राज्यातील माणसे काम करीत होती?

(नंतर श्री.जुन्नरे...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ....

या योजनेत काम करणारे महाराष्ट्रातील किती लोक आहेत आणि बाहेरच्या राज्यातील किती लोक काम करतात याचा उलगडा होण्याची आवश्यकता आहे. रोजगार हमी योजनेत मोठया प्रमाणात भ्रष्टाचार वाढलेला आहे. यंत्राच्या सहाय्याने काम करुन ते काम मजुरांकडून काम केलेले आहे असे दाखवून मोठया प्रमाणात या योजनेत भ्रष्टाचार सुरु आहे. रोजगार हमी योजनेत व्यवसाय कराच्या माध्यमातून निधी जमा होत असतो. परंतु या व्यावसाय कराच्या संदर्भात कामगारांमध्ये मोठया प्रमाणात असंतोष आहे. व्यवसाय कर बंद करावा अशी कामगारांची मागणी आहे. परंतु कामगारांची व्यवसाय कर बंद करण्याच्या संदर्भातील मागणी मान्य केली जात नाही. व्यवसाय कराच्या माध्यमातून शासनाला किती निधी मिळतो आणि त्यापैकी किती निधी खर्च होतो अशा प्रकारचा प्रश्न मी मध्यंतरी उपस्थित केला होता. त्यामुळे यासंदर्भात माझी मागणी आहे की, रोजगार हमी योजनेवर महाराष्ट्रातील मजुरांना, शेतक-यांना, बेकार तरुणांना काम मिळाले पाहिजे. दिनांक 2 फेबुवारी, 2006 पासून राज्यातील 12 जिल्हयात महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना राबविण्यास सुरुवात झाली आहे त्यामुळे या योजनेवर काम करणा-या इतर राज्यातील मजुरांची संख्या किती आहे याची माहिती या सदनाला मिळण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, रस्ते विकास कार्यक्रमांतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करण्यात आलेले आहे असे अहवालात म्हटलेले आहे. पावसाळयानंतर या रस्त्यांची काय परिस्थिती होते याची माहिती माननीय सभापती महोदयांना आहे. रोजगार हमी योजनेतून तयार केलेल्या रस्त्यावर पावसाळयानंतर पायी सुध्दा चालणे अवघड बनते त्या ठिकाणी वाहन कसे चालणार? मुंबई-गोवा मार्ग, राज्यस मार्ग तेवढे चांगले आहेत. पाऊस पडला की, बाकीचे रस्ते चांगले रहात नाहीत. अंतर्गत रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था आहे.

सभापती महोदय, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत ग्रामीण स्तरावर आरोग्य कर्मचा-यांचा "आशा" हा नवीन संवर्ग स्थापन करण्यात आला आहे. आरोग्य केंद्रातील उपचार पध्दती सदोष, कालबाहय औषधे, बोगस डॉक्टर्स, उपकरणांचा अभाव दिसून येतो. यासंदर्भात मला माननीय मंत्रीमहोदयांना प्रश्न विचारावयाचा आहे की, ज्या ज्या ठिकाणी रुग्णालये आहेत, ग्रामीण रुग्णालये आहेत तेथे उपकरणांची अवस्था काय आहे? डॉक्टरांची संख्या किती आहे? आज मुंबई

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ....

आणि पुण्यासारख्या ठिकाणी बोगस डॉक्टरांची संख्या भरमसाठ आहे तर ग्रामीण भागात बोगस डॉक्टरांची संख्या किती असेल याचा विचारच केलेला बरा. त्यामुळे बोगस डॉक्टरांवर कोठे तरी अंकुश ठेवण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, जीवनदायी आरोग्य योजना राबवण्याचा निर्णय स्तुत्य आहे. परंतु अंमलबजावणीत येणारे अडथळे दूर करणे आवश्यक आहे तसेच या योजनेतील रुग्णांवर उपचार करण्यासाठी मुंबईतील जे.जे. रुग्णालयातील उपकरणे सुस्थितीत असावी याबाबत दक्षता घेणे आवश्यक आहे. रुग्णालयांच्या उपकरणाच्या संदर्भात, या ठिकाणी डॉक्टर्स कसे औषधोपचार करतात, आऊट डेटेड औषधे खरेदी करुन ती रुग्णांना कशी दिली जातात या बाबत सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत आपले विचार मांडणारच आहेत त्यामुळे यासंदर्भात काळजी घेण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, रताज्यातील वृक्षाच्छादित क्षेत्र वाढवित असतांना दुसरीकडे बेकायदा वृक्षतोड व वन क्षेत्रातील प्रचंड भ्रष्टाचार यावर आळा घालण्यासाठी कठोर उपाययोजनेची आवश्यकता आहे. संयुक्त वन व्यवस्थापन हा उपक्रम चांगला आहे पण यशस्वीतेची खात्री काय? आज मोठ मोठया शहरात रोजच्या रोज ट्रक भरुन लाकडे येत आहेत. ही लाकडे कोठून येतात, कशी येतात याचा कधी आपण विचार केलेला आहे काय? वृक्षतोड होणार नाही, जंगलाचे संवर्धन होईल याकडे शासनाने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. आज वृक्षतोडीमध्ये प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार सुरु आहे तो थांबविण्याची नितांत आवश्यकता आहे. वृक्षतोडीतील भ्रष्टाचार थांबला नाही तर एक दिवस आपल्याला जंगल कसे असते हे कळणार नाही. ठेकेदार किती लाकडे तोडतात, कसे तोडतात याकडेही बारकाईने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. आपण एका बाजूला जंगलाचे क्षेत्र वाढवित आहोत आणि दुस-या बाजूला जंगल सपाट करीत आहोत

सभापती महोदय, सन 2006 च्या जुलै-ऑगस्टमध्ये राज्यात अतिवृष्टी व धरणातील अतिरिक्त पाणी सोडल्यामुळे पूर परिस्थिती निर्माण झाली. नदीकाठावर वसलेली घरे वेळीच निष्कासित केल्यास जीवित व वित्तहानी टळेल.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार.....

महाराष्ट्र जल सुधार प्रकल्पांतर्गत 1300 पाणी वापर संस्था स्थापन झाल्या असून त्यांचे पहिल्या टप्प्यातील प्रशिक्षणही पूर्ण झाले आहे. यासाठी सन 2007-08 मध्ये 438 कोटी रुपयांचा नियतव्यय प्रस्तावित करण्यात आलेला आहे. म्हणजे भ्रष्टाचाराचे आणखी एक दालन उघडून देण्यात आले असे माझे प्रामाणिक मत आहे. 1300 पाणी वापर संस्था स्थापन झाल्या त्यासाठी कोणत्या प्रकारचे प्रशिक्षण देण्यात आले ? याची माहिती आम्हाला देण्यात यावी. ज्या पध्दतीने पाण्याचे वाटप व्हावयास पाहिजे त्या पध्दतीने वाटप झाले नाही तर लोक पाण्यासाठी मुदडे पाडतील. अगोदरच पाण्यावरुन वाद सुरु आहेत. या संदर्भातील अनेक केसेस कोर्टात पेंडींग आहेत. तेव्हा ही परिस्थिती सुधारण्यासाठी पाणी वापर संस्थेचा उपयोग होईल काय ? याचे उत्तर मंत्रिमहोदयांनी द्यावे.

सभापती महोदय, जल विद्युत प्रकल्पांतर्गत नर्मदा जलविवाद लवादानुसार सरदार सरोवर प्रकल्पातून महाराष्ट्राच्या वाट्याची 391.50 मे.वॅ.वीज महाराष्ट्राला मिळू लागली का ? नसेल तर ती केव्हा उपलब्ध होणार आहे ?

इंदिरा आवास योजने अंतर्गत बांधण्यात येणाऱ्या घरांचा दर्जा आणि आयुष्य किती आहे त्याची माहिती मिळाली पाहिजे.

भारत निर्माण ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमातंर्गत राज्य शासनाने सर्व वस्त्यां व शाळांच्या पिण्याचा पाण्याचा प्रश्न मार्च 2009 पर्यंत सोडविण्यास प्राधान्य दिले आहे. ही योजना प्राधान्याने पूर्ण करता येईल का ? सन 2006-07 मध्ये या योजनेची प्रगती किती झाली ? या निमित्ताने मला सांगावयाचे आहे की, आज महाराष्ट्रातील बऱ्याच ग्रामीण शाळांमध्ये मुलांना दोन कि.मी.वरुन पाणी आणावयास सांगितले जाते. त्यांना जमीन सारवावयास सांगितले जाते ही शोकांतिका आहे.

अनुसूचित जाती उपायोजनेतंर्गत अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकासासाठी उपयोजना राबविली जाते. या उपयोजनेसाठी सन 2005-06 साठी रु 1122 कोटी व सन 2006-07 साठी 1592 कोटी आणि सन 2007-08 या वर्षाकरिता रु, 2060 कोटी एवढा नियतव्यय उपलब्ध करुन देण्यात आला आहे. या योजनेची प्रगती किती झाली आणि त्याची फलनिष्पत्ती काय झाली याची माहिती आम्हास मिळावयास पाहिजे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार.....

आदिवासी उपयोजनेंतर्गत अनुसूचित जमाती तसेच आदिम जमातीच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकासासाठी आदिवासी उपयोजना राबविली जाते. या योजनेचा निधी संबंधितांपर्यंत पोहोचतो काय ? अनुसूचित जमातीच्या कुटुंबासाठी घरगुती गॅस पुरविण्याची योजना सुरु केली आहे. या योजनेची अंमलबजावणी कशी होते याची पाहणी झाली आहे काय ? दारिद्रय रेषेखालील कुटुंबे किती आहेत याचे अजून सर्वेक्षण झालेले नाही. दारिद्रय रेषेखालील लोकांची व्याख्या झालेली नाही हा गोंधळ असताना घरगुती गॅस पुरवठा योजना कशी राबविणार आहात याची माहिती आम्हास मिळावयास पाहिजे.

आदिवासींना दुधाळ जनावरांचा/शेळ्यांचा गट पुरविण्याची योजना सन 2006-07 ते 2009-10 या कालावधीत राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मागील वर्षी 88.50 कोटी रुपये तरतूद केली होती. सन 2007-08 करिता 90 कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित आहे. या जनावरांची देखभाल व पोषणाची व्यवस्था लाभार्थ्यांकडून केली जाणार आहे की, शासन करणार आहे याची माहिती देण्यात यावी.

तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला सक्षमीकरण कार्यक्रमांतर्गत महिलांना स्वयंसहायता बचतगटाच्या माध्यमातून सक्षम करण्यारिता हा कार्यक्रम राबविला जातो. सन 2007-08 करिता रुपये 5.43 कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित केला आहे. या निधीचा विनियोग कसा करण्यात येणार आहे ? तेजस्विनी सावंत हिने तिरंदाजमध्ये चांगले नाव कमाविले. तिला बरेच ठिकाणा फिरावे लागते. पण तिला मिळणाऱ्या निधीचा फायदा-गैरफायदा कोणकोण घेतात त्याचा शोध घेतला पाहिजे.

राज्याच्या पर्यटन धोरणांतर्गत नवे प्रकल्प सुरु करीत असताना या कामांना गती देण्याची व रस्ते, निवासस्थाने, हॉटेल्स, गाईडस् इत्यादी सुविधाची उपलब्धता प्राधान्याने होणे गरजेचे आहे.

यानंतर कु.गायकवाड.....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

14:55

श्री. मधुकर सरपोतदार ...

सभापती महोदय, बाराव्या वित्त आयोगानुसार सांस्कृतिक वारसा जतन करण्यासाठी केंद्र सरकार पुढील 4 वर्षासाठी 50 कोटी रुपये निधी देणार आहे. राज्यातील संरक्षित स्मारकांची संख्या लक्षात घेता राज्य शासनाची या संदर्भातील भूमिका काय आहे? राज्स शासनाने गेल्या 4-5 वर्षे सतत घोषणा करुन समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारण्याची घोषणा केली होती. परंतु त्यासाठी प्रत्यक्षात निधीची तरतूद केली नाही. हे स्मारक प्रत्यक्षात बांधले जाणार आहे का या विषयीची माहिती कृपया या सदनाला देण्यात यावी. मुंबई नागरी वाहतूक प्रकल्प टप्पा 1 व 2 (एमयुटीपी) जागतिक बँकेच्या सहाय्याने 4,526 कोटीचा प्रकल्प राबविला जात आहे. यापूर्वीच जाहीर झालेल्या योजनेची पुनरुक्ती कशासाठी ? या प्रकल्पाचे काम सन 2008 मध्ये पूर्ण होणे अपेक्षित आहे. याप्रकल्पामुळे प्रवासी वाहन क्षमतेत 35 टक्के वाढ होईल व मुंबईकरांचा प्रवास सुकर होण्यास मदत होईल असे म्हटले आहे. परंतु प्रकल्प पूर्ण होईपर्यंत वाहनांच्या संख्येत जी वाढ होईल त्याचा आपण विचार केलेला आहे काय ? मिठी नदी विकास हा एक महत्वाचा प्रश्न आहें. मिठी नदी विकास व संरक्षण प्रकल्प राबविण्यासाठी मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे. सध्या मिठी नदीची खोली वाढवावी की रुंदी वाढवावी या वादात हा प्रकल्प रखडला आहे. मध्यंतरीच्या काळात पुन्हा या क्षेत्रात अतिक्रमणे वाढली, बाधित कुटुंबांच्या संख्येत वाढ झाली, बांगलादेशीय नागरिकांचा या ठिकाणी अनपेक्षित समावेश झालेला आहे. मला सन्माननीय राज्य मंत्र्यांना विनंती करावयाची आहे की, मिठी नदीचे काम करताना आपण या नदीलाच मिठी मारुन बसला आहात आपण वस्तुस्थिती बधितली तर जी कामें आपण केली त्यामुळेच ही नदी भरली जाते या बाबतीत रोज तक्रारी येत आहेत. याबाबतीत शासनाचे पूर्णपणे दुर्लक्ष झालेले आहे. आपण एका बाजूला खड्डे खणता आणि दुसऱ्या बाजूला खड्डे भरण्याचे काम करता. मिठी नदीचे काम पूर्ण करावयाचे असेल तर योग्य ती नितांत काळजी घेण्याची आवश्यकता आहे. अन्यथा 26 जूलै रोजी जे संकट ओढवले होते तेच संकट पुन्हा ओढवण्याची शक्यता नाकारता येत नाही. मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्पाची सद्यस्थिती काय आहे? या प्रकल्पाची सुरवात कधी झाली याबद्यलची माहिती आपण द्यावी. आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पायाभूत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ...

सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने मुंबई शहरात नव्याने 16 उड्डाणपूल उभारण्यात येत आहेत. मुंबई शहराला आंतरराष्ट्रीय दर्जा देण्याच्या नावाखाली फक्त वृक्षतोड गतीने करण्यात आली. आमच्या भागामध्ये संपूर्ण पर्यावरणाचा विध्वंस करुन टाकला . मुंबई शहराचा विकास करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र सरकारकडे आतापर्यंत 21,400 कोटी रुपयांचे प्रकल्प सादर केलेले आहेत. यापैकी किती प्रकल्पांना मंजूरी मिळालेली आहे ? शिवडी न्हावा शेवा जलसेतु प्रकल्प BOT तत्वावर उभारला जाणार आहे मुंबई शहराच्या आंतरराष्ट्रीय दर्जात्मक विकासासाठी अर्थमंत्र्यांनी केवळ शाब्दिक कसरत केलेली आहे. महाराष्ट्रामध्ये एप्रिल 2005 पासून मुल्यवर्धित कर प्रणालीची अंमलबजावणी सुरु झालेली आहे. केंदीय मुल्यवर्धित करप्रणाली ही पेट्रोल व डिझेल करता का लागू करण्यात आली नाही हा महत्वाचा प्रश्न आहे आणि आपण त्याचा खुलासा करावा .केंद्र शासनाने या वर्षी 77 विशेष सेवा कराची अंमलबजावणी केली आहे. या 77 विशेष सेवा कोणत्या आहेत ? राज्य शासनाने या 77 विशेष सेवांवरील करातील दरवाढ कमी केलेली आहे . त्यामुळे राज्य शासनाला हा फटका सहन करावा लागणार आहे. याची शासनाला जाणीव आहे का ?

यानंतर श्री. पुरी....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी : तालिका सभापती, श्री.रामनाथ मोते)

श्री.मधुकर सरपोतदार...

सभापती महोदय, व्यवसाय कर अभय योजना लागू करीत असताना नोंदीत करदात्यांकडे कर, व्याज व दंड यांची मोठी थकबाकी असल्याचे नमूद करण्यात आले आहे. दिनांक 1 एप्रिल, 2002 पासून पुढील कालावधीसाठी देय असलेली रक्कम भरली तर त्या तारखेच्या आधीच्या कालावधीची मागणी माफ करण्यात येणार आहे. केंद्र शासनाच्या व्ही.डी.आय.एस. योजनेप्रमाणे ही योजना आहे. 100 रुपयातील 70 रुपयांचा वापर करा आणि 30 रुपये शासनाला भरा, असा याचा अर्थ आहे. विद्युत मंडळाने समयोजना काढली. पैसा बुडवा, आपण एकत्रित बसून त्या पैशांचा हिशेब करु व त्याचा वापर करु. अशाप्रकारची ही योजना असेल तर परमेश्वरच आपल्याला वाचवेल. असे असेल तर भविष्य काळात अनेक लोक आपले पैसे भरणार नाहीत. त्याचा परिणाम महाराष्ट्र शासनावरच होणार आहे, हे याठिकाणी मला अतिशय खेदाने नमूद करावेसे वाटते. अशाप्रकारचा अर्थसंकल्प आपण याठिकाणी सादर केलेला आहे. अर्थसंकल्पामध्ये अनेक त्रुटी आहेत.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी निधी वाटपाबाबत जे निर्देश दिले आहेत, त्यासंबंधी "राज्यपालांच्या आदेशामुळे राष्ट्रवादीच्या नेत्यांची पंचाईत !" या शिर्षाखाली वर्तमानपत्रामध्ये माहिती आलेली आहे. यामध्ये असे म्हटले आहे की, "राज्यपालांनी निधीवाटपाबाबत दिलेल्या आदेशात नाबार्ड, ए.आय.बी.पी. अथवा डी.पी.ए.पी. या केंद्र सरकारकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीचे आदेशानुसारच वाटप झाले पाहिजे, असे स्पष्टपणे बजावले आहे. याबाबत गेल्या वर्षी दिलेल्या आदेशात बदल होणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. यामुळेच कृष्णा खो-यातील कामे केंद्र सरकारच्या मदतीतून पूर्ण करण्याचे पश्चिम महाराष्ट्रातील राज्यकर्त्यांचे मनसुबे उधळले गेल्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले." हे सत्य आहे का ? याचा खुलासा कृपया माननीय मंत्रिमहोदयांनी करावा.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार....

सभापती महोदय, यामध्ये एकच मुद्दा लक्षात घेण्यासारखा आहे. तो म्हणजे, आपण ज्या तरतुदी करतो, त्या तरतुदींच्या अनुषंगाने प्रत्यक्षात निधी खर्च होत नाही. याची कारणे काय आहेत ? याबाबतीत वृत्तपत्रामध्ये एक टिप्पणी आलेली असून तिचा उल्लेख मी करु इच्छितो. यामध्ये असे आहे की, "नोकरशाही यंत्रणेत "टीम वर्क" महत्वाचे असते, एखादा अधिकारी वा कर्मचारी प्रामाणिक असून भागत नाहीत. जागतिकीकरणानंतर भारतीय प्रशासनात जे मुख्य बदल होत आहेत, त्यात एक म्हणजे उच्चपदस्थ अधिकाऱ्यांना शासकीय सेवेऐवजी बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या एखत्यारीत काम करण्याची लागलेली ओढ..." आपल्या मंत्रालयातील बरचे आय.ए.एस. अधिकारी राजीनामा देऊन बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये जात आहेत. ही गोष्ट काळजी करण्यासारखी आहे. यामध्ये पुढे असेही म्हटले आहे की, "खालच्या स्तरावर कर्मचाऱ्यांची भरतीच बंद आहे." आपण खालच्या स्तरावरील कर्मचाऱ्यांनी भरती केली तर आपला बराचसा कारभार सुसहय होईल, असे मला वाटते. त्यामुळे आपण सदरची भरती करावी, ही विनंती.

सभापती महोदय, पंचप्राणांचे बलिदान देऊन आपल्याला ब्रिटीशांकडून स्वातंत्र्य मिळालेले आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर नवीन राज्य व्यवस्था आली. लोकांची एवढीच अपेक्षा आहे की, याठिकाणी त्यांना अन्न, पाणी, निवारा, आरोग्य व शिक्षण या पाच गोष्टी मिळाव्यात. परंतु आज राज्यामध्ये कुपोषणामुळे भूकबळी होत आहेत, पाण्यामुळे माणसे व जनावरे तडफडून मरत आहेत. महाराष्ट्रातील जनतेला कमीत कमी पिण्यासाठी पाणी तरी उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी माननीय वित्त राज्यमंत्र्यांची आहे. त्यामुळे राज्यातील जनतेला पिण्याचे पाणी मिळण्याच्या दृष्टीने निधी उपलब्ध करुन द्यावा व महाराष्ट्रातील जी जनता पाण्यामुळे तडफडून मरत आहे, त्यांना वाचवण्याच्या प्रयत्न करावा, अशी माझी माननीय मंत्रिमहोदयांना विनंती आहे. माननीय वित्त राज्यमंत्री महोदय, आपण विदर्भातील आहात. विदर्भ हा दुर्लक्षित भाग आहे. मराठवाडा, कोकणही दुर्लक्षित भाग आहे.

नंतर श्री.रोझेकर....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखीय नोंदी

श्री.मधुकर सरपोतदार.....

सुदैवाने म्हणावे की दुर्देवाने मला माहित नाही, पण आपण अर्थ राज्यमंत्री आहात, यातील किती निधी आपण आपल्या अधिकाराचा वापर करुन विदर्भाकडे वळवून नेणार आहात, त्यांना कसा दिलासा देणार आहात, हे आपले आपण बघावयाचे आहे. सगळया जनतेला समान न्याय देणे, हे अर्थसंकल्पाचे मूळ कर्तव्य असते. त्यादृष्टीने आपण समान न्याय द्यावा, अशी आग्रहाची विनंती करुन माझे दोन शब्द पूर्ण करतो, धन्यवाद.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे. प्रथम शासनाला मी काही आकडेवारी वाचून दाखवित आहे. कारण, या चर्चेत भाग घेत असतांना सन्माननीय सदस्य, श्री.अरुण गुजराथी व सन्माननीय सदस्या, प्रा.फौजिया खान यांनी आपल्या भाषणात अर्थसंकल्प चांगला आहे, राज्य प्रगतीपथावर आहे, अशा प्रकारे अर्थसंकल्पाचे कौतुक केले आहे.

सभापती महोदय, मुळामध्ये महाराष्ट्राची लोकसंख्या 10 कोटीच्या वर गेली आहे आणि महाराष्ट्र लोकसंख्येमध्ये उत्तर प्रदेशानंतर दुस-या क्रमांकावर आहे. शहरीकरणाच्या बाबतीत महाराष्ट्राचा पहिला क्रमांक आहे. महाराष्ट्राची आर्थिक पहाणी-सन 2007-2008 या पुस्तिकेमध्ये पृष्ठ क्रमांक 13 वर 'भारताची दशवार्षिक लोकसंख्या वृद्धीकरण' या शीर्षकाखाली असे म्हटले आहे की, भारताची लोकसंख्या 21 टक्के या प्रमाणात वाढत आहे तर महाराष्ट्रामध्ये 22.73 या प्रमाणात लोकसंख्या वाढ होत आहे. हे जर लक्षात घेतले नाही तर एक दिवस महाराष्ट्राची लोकसंख्या प्रचंड प्रमाणात वाढेल. आधीच महाराष्ट्रामध्ये मोठया प्रमाणावर दारिद्रय रेषेखालील माणसे आहेत. सन्माननीय सदस्य, श्री.अरुण गुजराथी हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश अध्यक्ष आहेत. त्यांनी अर्थसंकल्पाचे वास्तव वर्णन केले असते तर अधिक बरे झाले असते. शासनाने जी आकडेवारी पुरविली आहे त्यानुसार महाराष्ट्राची लोकसंख्या ही 10 कोटी एवढी आहे. महाराष्ट्राची आर्थिक पहाणी या पुस्तिकेतील पृष्ठ क्रमांक 102 वर महाराष्ट्रामध्ये 2 कोटी 50 लाखापेक्षा जास्त लोक हे दारिद्रय रेषेखाली आहेत, असे नमूद केले आहे. म्हणजे जवळ जवळ एक चतुर्थांश लोकसंख्या ही दारिद्रय रेषेखाली आहे. सन्माननीय सदस्यांनी भाषण करतांना सांगितले की, महाराष्ट्र राज्य हे प्रगतीशील राज्य आहे, अतिशय चांगल्या प्रकारचे जीवन या राज्यातील माणसे जगत आहेत. मी काही आकडेवारी त्यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. सभापती महोदय, विजेच्या टंचाईमुळे किती प्रश्न निर्माण झाले आहेत, याचा ऊहापोह मी येथे करणार नाही, यासंदर्भात अनेक सन्माननीय सदस्य आपले म्हणणे मांडतील. विजेमुळे महाराष्ट्रातील उद्योगधंद्यांवर कोणते भीषण परिणाम झाले आहेत, हे आपल्याला माहीत आहे, महाराष्ट्राला माहीत आहे आणि सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना माहीत आहेत. त्यामुळे मी या विषयाला येथे स्पर्श करीत नाही. पण,

..3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

"नेमेची येतो पावसाळा,

हे सृष्टीचे कौतुक जाण बाळा"

अशाप्रकारे अर्थसंकल्पावर चर्चा होते. संवेदनशील सरकार असेल, करुणामय सरकार असेल तर विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी किंवा सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी जे मुद्दे मांडलेले आहेत त्यांना सरकारने उत्तरे दिली असती. सत्ताधारी पक्षाचे सन्माननीय सदस्य सोनेरी मुलामा देऊन काही मुद्दे आपल्या भाषणात मांडतात. सन्माननीय सदस्या, प्रा.फौजिया खान यांनी अतिशय चांगला 'शेर' त्यांच्या भाषणात उद्धृत केला. त्यानुसार त्यांनी सौंदर्याचे वर्णन केले, आसमंत चांगला आहे वगैरे त्यांनी सांगितले तरी त्यामध्ये काही त्रुटी आहेत, त्यामुळे सौदर्यातील त्रुटी सांगितल्या पाहिजेत तशाच अर्थसंकल्प चांगला असला तरी त्यामधील त्रुटी सांगण्याचा प्रयत्न करते, असे त्या म्हणाल्या. मला असे वाटते की, पुरवणी मागण्याच्या बाबतीत सत्ताधारी पक्षाचे सन्माननीय सदस्य, विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य अतिशय पोटतिडकीने सूचना करतात, पण माननीय मंत्र्यांच्या भाषणात त्याचा साधा उल्लेखही नसतो. त्याऐवजी प्रगती झाली म्हणून स्वत:ची पाठ थोपटून घेण्याचा प्रयत्न केला जातो.

सभापती महोदय, महाराष्ट्राची आर्थिक पहाणी या पुस्तिकेतील पृष्ठ क्रमांक 101 वर 'बंद झालेले उद्योग व बाधित कामगार' या शीर्षकाखाली जी आकडेवारी दिलेली आहे त्यानुसार या सरकारने सत्ता हाती घेतली त्यानंतर सन 2001-2002 मध्ये 5726 लघुउद्योग बंद पडले व 30764 कामगार बेकार झाले, सन 2002-2003 मध्ये 6249 लघुउद्योग बंद पडले व 28990 कामगार बेकार झाले, सन 2003-2004 मध्ये 4686 लघुउद्योग बंद पडले तर 29371 कामगार बेकार झाले, सन 2004-2005 मध्ये 2566 लघुउद्योग बंद पडले तर 12830 कामगार बेकार झाले, सन 2005-2006 मध्ये 2216 लघुउद्योग बंद पडले तर 11779 कामगार बेकार झाले, सन 2006-2007 डिसेंबरपर्यन्त 217 लघुउद्योग बंद पडले तर 1661 कामगार बेकार झाले.

यानंतर कुमारी जयश्री.....

अशुधीत प्रत / शिपुधीपाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण.....

मध्यम व मोठया उद्योगासंबंधी बोलावयाचे झाले तर सन 2001-2002 मध्ये 203 लघुउद्योग बंद पडले व 27,807 कामगार बेकार झाले.सन 2002 -2003 मध्ये 339 मध्यम उद्योग बंद पडले, 45,509 कामगार बेकार झाले. सन 2003-2004 मध्ये 213 मोठे उद्योग बंद पडले 51,804 कामगार बेकार झाले. सन 2004 -2005 मध्ये 343 मोठे उद्योग बंद पडले,33,621कामगार बेकार झाले. सन 2005-2006 मध्ये 2017 मोठे उद्योग बंद पडले,11,723 कामगार बेकार झाले. सन 2006-2007 मध्ये मोठे 05 उद्योग बंद पडले, 571 कामगार बेकार झाले. ही जर महाराष्ट्र राज्याची प्रगती असेल आणि त्याबद्दल कोणी आपली पाठ थोपटून घेत असेल तर माझे काहीही म्हणणे नाही.

महाराष्ट्रात मोठया प्रमाणात शहरीकरण होत चालले आहे. आताच 10 महानगरपालिकांच्या निवडणूका झाल्या. माझ्या अंदाजाप्रमाणे, 150 ते 200 नगरपालिका या राज्यात अस्तित्वात आहेत. हातावर पोट घेऊन,शेतीवाडी टाकून,गुरे बैले टाकून माणसे शहराकडे धाव घेतात आणि शहरांमध्ये मिळेल तिथे राहतात, मिळेल ते खातात आणि दारिद्र्यात खितपत जीवन जगतात आणि दिवस काढतात. अशा परिस्थितीत जर राज्याचे शहरीकरण होत असले तर ते राज्य आर्थिकदृष्टया प्रगतीपथावर आहे, असे म्हणता येणार नाही. आज कोकणामध्ये हजारो हेक्टर जमीन ओस पडलेली आहे, त्यात कोणीही मशागत करीत नाही कारण शेती हा व्यवसाय परवडेनासा झालेला आहे. शेतजमीन सोडून ते शहरांमध्ये नोकरी शोधण्याकरिता धाव घेतात. शासन अशी काही योजना का नाही आखत की, गावातील माणूस गावातच राहिला पाहिजे कारण शहरात उद्योग नाहीत, ते जर शहरांमध्ये आले तर अनेक गंभीर प्रश्न निर्माण होतात. उदा. लॉ ॲण्ड ऑर्डर,हाऊसिंग,ड्रेनेज. गलिच्छ वस्त्या निर्माण होऊन गलिच्छपणा वाढतो. या सदनाचा अधिक वेळ न घेता काही बाबी मी आपल्या समोर वाचून दाखविणार आहे. नगरविकास खात्याने जी अनेक छोटी छोटी नगरे आहेत, नगरपालिका,नगरपरिषदा आहेत, त्यांच्या डेव्हलपमेंटसाठी किती पैसा ठेवलेला आहे ? 2087 कोटी रुपये, एवढया अल्प रकमेमध्ये काय शक्य होणार आहे ? आज या राज्यामध्ये नागपूर शहर सोडले तर इतर कोणत्याही शहरामध्ये नीट सांडपाण्याची,ड्रेनेजची,मल नि:सारणाची,पिण्याच्या पाण्याची खेळाची व्यवस्था नाही, त्यामुळे रोगराई वाढलेली आहे. मैदाने नाहीत, कार पार्किंग नाही. शाळांना तुम्ही परवानगी देता आणि शाळेतील

3F -2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण.....

मुलांसाठी खेळण्याकरिता मैदाने नाहीत,बाजारहाटाची व्यवस्था नाही,व्यवस्थित वाहतूकीची व्यवस्था नाही. हातावर पोट घेऊन जर गावाकडून लोक शहरांमध्ये येणार असतील तर पुढील 25 वर्ष या राज्यामध्ये आणखी किती शहरीकरण होईल ? शहरीकरणामध्ये आपल्या राज्याचा संपूर्ण देशामध्ये पहिला नंबर आहे. शहरीकरणासाठी नेहरु योजनेसारख्या चांगल्या योजनेचा काहीही फायदा होणार नाही कारण नेहरु योजनेतील ज्या अटी ठेवलेल्या आहेत, त्याही तुम्ही पाळणार नाहीत अशा प्रकारे जर शहरीकरण होत असेल तर 2087 कोटी रुपये फक्त शहरांसाठी ठेवले आहेत,त्यामध्ये शहरांची कुठल्या प्रकारची प्रगती शासन करणार आहे ? लहान व मध्यम शहरे यांच्यासाठी 6कोटी 40 लाख रुपये ठेवलेले आहेत. तुम्ही जनतेकडून मते घेता, आताच सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांनी उल्लेख केल्याप्रमाणे " तुम्ही दारुच्या बाटल्या पाजून मते घेता तुम्हाला जेव्हा जनतेने मते दिली, तुम्ही त्यांचा अपमान करता, आम्ही जनतेचा अपमान करीत नाही. मतदार राजावर आमचा विश्वास आहे. या मतदार राजाने प्रत्येकाला आपला इंगा दाखविला आहे. 1971 साली काँग्रेस शासनाला इंगा दाखविला. 1981 मध्ये आम्ही चुकलो आम्हालाही इंगा दाखविला परंतु जेव्हा भ्रष्टाचाराचा कळस झाला तेव्हा युतीच्या हातात सत्ता आली. जनतेची अगतिकता,गरज,दैन्य,दारिद्रय जर तुम्ही त्या ठिकाणी विकत घेतलीत तर तुम्हाला त्या ठिकाणी मते मिळतील. जनतेने या ठिकाणी आम्हाला मॅण्डेट दिलेले आहे.

यानंतर श्री.बोरले.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण .....

जिल्हापरिषदा आमच्या ताब्यात आहेत. एक नंबरला आमचा पक्ष आहे. आम्ही जनतेला दोष देत नाही. कारण माणूस पहिल्यांदा स्वत:च्या पोटाची सोय बघतो आणि त्यानंतर सर्व जग बघत असतो. निवडणुकीच्या वेळी तुम्ही त्या माणसाची तात्पुरती गरज भागविता म्हणून तो तुम्हाला मत देतो. ही त्याची चूक नाही तर सत्ता प्राप्त करण्यासाठी त्याच्या परिस्थितीचा गैरफायदा घेणारे तुम्ही महापापी आहात. त्याला दोन घास सुखाचे मिळावेत, त्याला प्यायला पाणी मिळावे, वाहतुकीची व्यवस्था व्हावी, त्याच्या मुलांच्या शाळेची व्यवस्था व्हावी, आरोग्याची व्यवस्था व्हावी याची व्यवस्था शासन बघत नाही. यासाठी केवळ 6 कोटी रुपये तरतूद केलेली आहे. शहरांची प्रगती शासन कशा प्रकारे करणार आहे, हे माननीय मंत्री महोदयांनी उत्तराच्या भाषणामध्ये सांगितले तर फार बरे होईल. मी सकाळी उल्लेख केला, त्याची पुनरावृत्ती मी पुन्हा करणार नाही. मुंबईच्या जनतेने तुम्हाला मतदान केले नाही म्हणून तुम्ही मुंबईवर सूड घेतलेला आहे. बृहन्मुंबई शहराचे सौदर्यीकरण करणासाठी महानगरपालिकेला देण्यात येणारे अनुदान फक्त 20 लाख रुपये एवढे आहे. 1 कोटी 25 लाख लोकसंख्या असणा-या शहराचे एकूण सौदर्यीकरण करण्यासाठी फक्त 20 लाख रुपयेच दिलेले आहेत.

सभापती महोदय, नगर विकास विभागाचे पुस्तक आम्हाला मिळालेले आहे. त्यातील पृष्ठ क्र.फ 55 वर मुंबई नागरी पुरवठा पायाभूत सुविधा प्रकल्प 06-07 मध्ये एक रुपया सुध्दा तरतूद केलेली नाही. मी मागच्या वर्षासंदर्भात बोलत आहे. मी काही उदाहरणे देत आहे. विक्रांत युद्ध नौकेचे संग्रहालयात रुपांतर करण्यासाठी एकाही पैशाची तरतूद केलेली नाही. विकास योजना राबविण्यासाठी अनुदान एकाही पैशाची तरतूद नाही. मुंबईतील रुग्णालयांचे आधुनिकीकरण करण्यासाठी बृहन्मुंबई महानगर पालिकेला एका रुपयाची देखील तरतूद केलेली नाही. बृहन्मुंबईला स्मशान भूमिचा विकास करण्यासाठी एका रुपयाचीही तरतूद करण्यात आलेली नाही. मुंबई नागरी परिवहन प्रकल्पासाठी एकाही पैशाची तरतूद केलेली नाही. सन 2005-06, 2006-07 आणि 2007-08 या मागच्या 3 वर्षात मुंबई शहरासाठी शासनाने एकाही पैशाची तरतूद केलेली नाही. श्री.चंद्रशेखर यांच्या नेतृत्वाखाली मुंबई महानगरपालिकेचे सर्व अधिकार संकुचित करुन स्थानिक स्वराज्य संस्थांचे अधिकार संकुचित करुन त्यांना तुम्ही अधिकार दिले. ते पैसे तुम्ही

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण .....

दिलेले नाहीत. काही पैसे केंद्र शासनाच्या माध्यमातून आणि काही पैसे विविध करांच्या माध्यमातून त्यांनी उभारलेले आहेत. तुम्ही मुंबई शहराला सापत्नभावाची वागणूक दिलेली आहे, त्याचा मी तीव्र शब्दामध्ये निषेध करतो.

सभापती महोदय, गृहनिर्माण विभागाने राज्याच्या गृहनिर्माण धोरणाचे प्रारुप दिनांक 1 नोव्हेंबर, 2007 रोजी जाहीर केलेले आहे. राज्याच्या गृहनिर्माण धोरणाचे प्रारुप प्रत्येक वेळी बदलत असते. सकाळी माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर देऊन आमचे तोंड बंद केले. शिवसेना, भारतीय जनता पार्टीचे असे मत आहे की, 1995 ची सीमा रेषा पाळली गेली पाहिजे. सवंग लोकप्रियतेसाठी आणि सत्तेचा मुकुट आपल्या डोक्यावर कायम रहावा यासाठी तुम्ही वेगवेगळ्या मार्गाने लोकांना घरांचे आमिष दाखविता, त्याचा एक दिवस उद्रेक होईल. मुंबई शहर ज्वालामुखीच्या तोंडावर उभे आहे. शासनाने गृहनिर्माण धोरण जाहीर केले त्यामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी आपले मनोगत लिहिलेले आहे. त्यातील दोन-तीन वाक्ये मी वाचून दाखवितो. "राष्ट्रीय नागरी गृहनिर्माण आणि निवारा धोरण 2005 मध्ये सर्वांसाठी निवारा वगैरे वगैरे. सध्या गृहनिर्माण क्षेत्रामध्ये सदनिकांकरिता मोठया प्रमाणावर मागणी आहे. त्याच बरोबर कमी दराने व्याज देखील उपलब्ध आहे, अशी परिस्थिती असतांना सुद्धा आर्थिक दृष्टया दुर्बल घटक, अल्प उत्पन्न घटक, मध्यम उत्पन्न गटातील लोकांना परवडणा-या दरात सदनिका देणे हे स्वप्नच राहिले आहे." हे महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी लिखित स्वरुपात मान्य केले आहे. हे स्वप्नच राहिलेले आहे. एस.आर.ए. योजनेमध्ये तुम्ही बिल्डरांच्या हातात मुंबई दिलेली आहे. 30-30, 40-40 लाख रुपयांची सुपारी एक बिल्डर दुस-या बिल्डरला मारण्यासाठी देतो. हे कशासाठी ? हे सर्व गरिबांच्या कल्याणासाठी नाही. निवडणुकीच्या कालखंडात सत्ता मिळविण्यासाठी त्यांच्याकडून तुम्ही कोटयावधी रुपये घेता आणि त्याच्या मोबदल्यात धनिकांच्या हातामध्ये तुम्ही मुंबई शहर दिलेले आहे. सभापती महोदय, स्वस्त दरात मोठया प्रमाणावर सदनिका उपलब्ध करण्यासाठी शासनाने धोरण तयार केलेले आहे. काय झाले एस.आर.ए. योजनेचे ? शिवसेना नेते श्री.सुभाष देसाई यांनी खालच्या सभागृहामध्ये भाषण करतांना एस.आर.ए. योजनेसंदर्भात उल्लेख केला.

यानंतर श्री.गागरे .....

अशोधित प्रत / अशोधित नाही

श्री.मधुकर चव्हाण .....

इतकी भ्रष्टाचाराने बरबटलेली एसआरए योजना आहे. 100 झोपडया असतील तर त्या 200 दाखवायच्या. योग्य मार्गाने आयुष्यामध्ये पैसा प्राप्त करावा, यात गैर काही नाही. "पुरुषस्य: अर्थस्य: दास:" असे महाभारतात म्हटलेले आहे. याचा अर्थ असा की, कष्ट करुन आपले अंगभूत गुण दाखवून, प्रामाणिकपणे माणसाने प्रगती करण्यास काहीही हरकत नाही. परंतु आपण याचा अर्थ वेगळा घेत आहात. म्हणून मला असे वाटते की, याठिकाणी या शहरामध्ये ज्या झपाटयाने नागरीकरण करत आहात व एसआरए योनजेमध्ये जो भ्रष्टाचार चालला आहे, त्याची जबाबदारी कोणावर आहे ? माननीय मुख्यमंत्र्यांनी सकाळी प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले की, आम्ही ॲफेडेव्हीट करणार आहोत. 2000 पर्यंतच्या झोपडयांना मान्यता द्यावी, याबाबतीत आपण ॲफेडेव्हीट करणार आहात का ? किती झोपडया आहेत त्या ? याबाबत आपण सांगितले की, आताच कसे कळणार. हे कोर्ट मॅटर आहे. फक्त 1995 पर्यंतच्या झोपडयाबाबत मुंबई हायकोर्टाने विरोध केला, त्याबाबत आपण ॲफेडेव्हीट व शपथपत्र सादर केले आहे. जनतेच्या कल्याणासाठी शासन एखादे धोरण हाती घेऊ शकते. यातील प्रामणिकपणाबद्दल आम्ही शंका घेऊ शकत नाही. परंतु आपण त्याठिकाणी पाहणी तरी करावयास पाहिजे. आज मुंबई शहरातील मानखुर्द येथे आपण जाऊन पाहिले तर त्या ठिकाणी ज्या जमिनी शासनाने ॲक्वायर केल्या आहेत. त्यामुळे त्या ठिकाणी एकही खाडी शिल्लक राहिलेली नाही. तसे पाहता आज मुंबई शहरात एकही खाडी शिल्लक राहिलेली नाही. याबाबत आपण कठोर धोरण स्वीकारणार आहात की नाही ? परप्रांतीयांबद्दल आम्ही बोललो तर आपण लगेच देशाच्या घटनेकडे बोट दाखवता. परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी घटना लिहिल्यानंतर पुढील भविष्यात, 50 वर्षांमध्ये राज्यकर्ते सत्ता प्राप्त करण्यासाठी त्याचा दुरुपयोग करुन घेतील, हे त्यांना स्वप्न पडलेले नव्हते. एका उदात्त हेतूने त्यांनी घटनेत काही गोष्टी लिहिल्या की, भारत एकसंघ राहावा, देशाचे नागरिकत्व सर्वांना राहावे, सगळा देश म्हणजे एक मन आहे, एकजण आहे. या भावनेने भारतातील कुठल्याही माणसाला कुठेही जाता येते. परंतु कायदे धाब्यावर बसवून कोठेही राहता येते ? सभागृहात सकाळच्या सत्रात सांगण्यात आले की, मुंबई महानगपालिकेची ती जबाबदारी आहे. पण मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, मुंबई

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण.....

महानगरपालिकेच्या जमिनीवर फक्त 1/5 अनधिकृत झोपडया आहेत, जास्त नाहीत. त्या कलेक्टरच्या जमिनीवर आहेत, बीपीटीच्या जमिनीवर आहेत, सेंट्रल गव्हर्नमेंटच्या जमिनीवर आहेत, स्टेट गर्व्हन्मेंटच्या जमिनीवर आहेत, खाजगी जमिनदारांच्या जमिनीवर आहेत. गेल्या अनेक वर्षापासून आपण मुंबईतील जनतेशी खेळ खेळत आहात. बॅ. रजनी पटेल हया मुंबई काँग्रेसच्या अध्यक्ष होत्या, त्या काळापासून निवडणूक आली की लगेच आपण पुढील पाच वर्षे जाहीर करत होता की, आम्ही पुढील पाच वर्षामध्ये झोपडपट्टयांना मान्यता देऊ. परंतु त्यांना सुविधा कोण देणार, पाणी कोण देणार, त्यांच्यासाठी चांगल्या घरांची योजना कोण राबविणार ? म्हणून मला असे वाटते की, या सर्व गोष्टींचा गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे. आता आपण काही योजना जाहीर केल्या. 37 कलमाच्या आधारे मुंबई शहरामध्ये 2.5 की 4 एफएसआय मिळतो. हल्ली मुंबई शहरामध्ये एक नवीन टूम निघाली आहे. सभापती महोदय, मी याठिकाणी भाषिक अभिनिवेशातून बोलत नाही. परंतु मराठी माणूस म्हणून नक्की बोलेन. याबाबत मी लालबागचे उदाहरण देईन. त्याठिकाणी पुनर्विकासाची इमारत बांधतात व बाजूला टोलेजंग इमारत बांधतात व त्याठिकाणी लिहिण्यात येते की, या ठिकाणी "फक्त जैनांना प्रवेश". मराठी माणसांना प्रवेश नाही. असे बोर्ड त्या ठिकाणी लिहिलेले आहेत. डॉ.आंबेडकर रोड वरील सिनेमा टॉकीजसमोर, व्होल्टास कंपनी आहे, बावला वाडी आहे, त्याठिकाणी लोकांचे पुनर्वसन केले. त्या ठिकाणी आपण टोलेजंग इमारत बांधली. त्यांना मी सांगितले की, माझ्या मित्राला जागा राहण्यासाठी द्या. त्यावेळी त्यांनी सांगितले की, आम्ही जागा देणार नाही, ही फक्त जैन समाजासाठी आहे. टी.बी. कदम मार्ग, सिनेमा टॉकीज मागे पुनर्वसनाची इमारत बांधली त्याठिकाणीही जैनांनाच प्रवेश. त्यानंतर पेरुकंप, लालबाग मार्केटच्यासमोरच्या काही ठिकाणीही फक्त जैनांनाच प्रवेश. मग, येथील मराठी माणूस आपण उद्ध्वस्त करणार का ? त्यांच्यावर आपण कायदेशीर कारवाई करणार आहात का ? आमच्या माणसांनी त्यांच्या घरात फक्त भांडी घासायची का ? रखवालदार रहायचे का ? झाडू मारायचा, पोछा मारायचा का ? कशासाठी ? 225 चौ.फूटाची जागा घे आणि फूट असे म्हणायचे का ? त्यामुळे या ठिकाणी आपण कुठल्याही प्रकारचे बंधने घालत नाहीत. याबाबत

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण.....

माझी मागणी आहे की, नवीन गृहनिर्माण धोरणामध्ये 15 टक्के घरे फक्त 300-350 चौरस फुटाची बांधावित. जी जमीन मिळेल त्या जमिनीमध्ये 60 टक्के घरे मध्यमवर्गीयांना परवडतील अशीच बांधावित, अशी अट आपण घालावी तरच आमचा मराठी माणूस त्याठिकाणी 1 बीएचकेचे घर तरी घेऊ शकेल.

नंतर श्री.सुंबरे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण .....

आता तुमचे नियमदेखील बदलत नाही. पूर्वी कार्पेट एरिया असायचा, नंतर तो बिल्टअप एरिया म्हणून गृहीत धरला जाऊ लागला, त्यानंतर काही वर्षापूर्वी तो सुपर बिल्टअप एरिया, त्यानंतर सुपर-सुपर बिल्टअप एरिया म्हटला जाऊ लागला. म्हणजे आता 900 चौ.फूट क्षेत्रफळाची सदनिका असेल तर प्रत्यक्षात ती सदनिका 500 चौ.फूट इतकीच असते. म्हणून आपण त्या ठिकाणी अतिशय काळजीपूर्वक धोरण आखावे. आता आपल्या नवीन गृहनिर्माण धोरणामध्ये आपण कार्पेट एरिया असला पाहिजे असे सांगितले आहे, पण तो नेमका या सगळ्याचे वाटोळे करणार आहे. सभापती महोदय, नशिबाने सध्या गृहनिर्माण विभागाला श्री.स्वाधीन क्षत्रिय हे एक अतिशय चांगले सचिव लाभले आहेत. स्वत:ला कामात इन्व्हॉल्व करून घेणारा असा हा माणूस आहे. तेव्हा शासनाने आपले निश्चित असे गृहनिर्माणाचे धोरण ठरविले पाहिजे, स्वीकारले पाहिजे. त्या ठिकाणी आपण धारावीची योजना जाहीर केली. पण त्यानंतर आपण नवीन गृहनिर्माण धोरण जाहीर केले. त्यानंतर आता धारावीच्या त्या योजनेत 10 हजार घरे बांधण्याची जी योजना आपण जाहीर केली होती तिचे काय होणार आहे. या मुंबई शहरामध्ये घरे बांधत असताना, त्यासाठीच्या योजना आखत असताना नवीन योजनेमध्ये तुम्ही 4 एफएसआय दिलेला आहे. खरे तर आपण या संदर्भात सुखटणकर समिती नेमली होती. त्यांच्या शिफारशीनुसार ज्यांचे पुनर्वसन करावयाचे त्यांचे पुनर्वसन करताना ते विकासाच्या आड येणार म्हणून त्यांनाच केवळ 4 एफएसआय द्यायचा असे ठरविले गेले. सभापती महोदय, मुंबई शहर हे एक बेट आहे, या मुंबईतील मराठी माणूस उद्ध्वस्त होणार नाही या दृष्टीने मुंबईमध्ये गृहनिर्माणाच्या योजना आखणे अत्यंत आवश्यक आहे. त्याचा आपण विचार करावा एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, आता यानंतर मी शेवटचा मुद्दा मांडून माझे भाषण संपविणार आहे. वस्त्रोद्योगाच्या बाबतीत तीन तेरा वाजविण्याचेच जणू सरकारने ठरविले आहे. या क्षेत्रातील कामगारांना, पर्यायाने मराठी माणसाला देशोधडीला लावले आहे. या विषयीचक एक अतिशय सुंदर असे व्यंगचित्र आलेले आहे, त्या व्यंगचित्रामध्ये असे दाखविले आहे की, सरकार कात्रीला किंवा सुऱ्याला धार लावत आहे आणि गिरणी मालकांच्या हातामध्ये तो सुरू देत आहे आणि गिरणी कामगारांची संघटना जी आरएमएमएस आहे, खरे तर जी.डी.आंबेकरांनी एका अतिशय चांगल्या भावनेने, यशवंतराव चव्हाणांच्या आणि अन्य नेत्यांच्या नेतृत्त्वाखाली गिरणी कामगारांच्या

..... 3आय 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण .....

कल्याणासाठी ही संघटना उभी केली होती आणि तिच्यामार्फत गिरणी कामगारांना भत्ते व अनेक सवलती देखील मिळवून दिल्या. कॉ. डांगे यांनी देखील चांगल्या प्रकारे कामगार चळवळ चालविली होती. तर अशी जी आरएमएमएस आहे, जी गिरणी कामगारांच्या कल्याणासाठी म्हणून काम करते ती गिरणी कामगाराचे डोके घट्ट पकडून ठेवते आहे आणि गिरणी मालक त्या सुऱ्याचा वापर त्या गिरणी कामगारावर करणार आहे. असे हे व्यंगचित्र आहे. या कामगार क्षेत्रातील आणखी एक नेते स्व. दत्ता सामंत यांच्याबद्दल आदर ठेवून मी सांगतो की, त्यांचा संप तर अजूनही संपलेला नाही. असो. पण अडीच लाख गिरणी कामगार उद्ध्वस्त होतील वा झाले असे सांगितले आहे. पण प्रत्यक्षात असे झाले आहे की, त्या गिरण्यांना इतर माल पुरविणारे जे उद्योग होते त्यातील 7 लाख 67 हजार लोक या गिरण्या बंद झाल्यामुळे बेकार झाले आहेत. सभापती महोदय, मी केवळ येथे काही परिच्छेद वाचून दखवून माझे भाषण संपविणार आहे. आपण या नियमावलीतील 58 वे कलम बदलले. त्यामध्ये देखील आपण मखलाशी अशी केली की, 23 मार्च 2001 रोजी महाराष्ट्र शासनाने हे विकास नियम केले. त्यात त्यांनी काय केले ? त्या मूळ विकास नियमांतील शब्दप्रयोग काढून त्या ऐवजी आपल्या राज्य सरकारने कशी मखलाशी केली आणि ही मुंबई बिल्डरांच्या हातामध्ये कशी दिली ते यातून दिसून येते. .....

(यानंतर श्री. सरफरे ..... 3जे 1 ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण...

बिल्डरकडून दिल्लीला पैसा पुरविला जातो असे म्हटले तर तुमच्यासारख्या संवेदनशील माणसाला वाईट वाटेल. तुमच्या हेतूविषयी शंका घ्यावयाची नाही. परंतु "मोकळया जागेसाठी उर्वरित एफ.एस.आय." असा शब्दप्रयोग केला आहे. गिरणी मालकांनी काय केले? समजा हे करण्यापेक्षा आपली सर्व मशिनरी घेतली आणि त्याठिकाणी बांधकाम आहे असे दाखविले व फक्त बाहेर कॉरीडॉर असेल तेवढाच एफ.एस.आय. असेल तेवढी जमीन मोजून त्यामधून 1.33 टक्के जमीन म्हाडाला व 1.33 टक्के जमीन महानगरपालिकेला देऊन बांधकाम सुरु केले तर... हा कायदा आपण कां बदलला? आमच्या राज्यात हा कायदा जरुर बदलला होता आणि गिरणी कामगारांच्या हिताचा निर्णय त्या काळात घेतला होता. सभापती महोदय, एप्रिल 1986 मध्ये...

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. गावच्या पाटलाची सर्व पाटीलकी गेली, तरी गेली 50 वर्षे काय केले म्हणून ते युती शासनाचा रेफरन्स देत आहेत. प्रश्न असा आहे की, 40 लाख झोपडपट्टीधारकांना मोफत घरे देण्याची योजना त्यांनी केली त्यावेळी पहिल्या मंत्र्यांना काही करता येत नाही म्हणून त्याठिकाणी श्री. सुरेश जैन यांना आणले. आणि कामे करण्याची वेळ आली त्यावेळी त्यांना जागा दिली व घरे बांधण्याकरिता पैसे दिले तरी सुध्दा ते घरे बांधू शकले नाहीत ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही.

श्री. मधुकर चव्हाण : तसे नाही. आम्ही मानखूर्दला 10 हजार घरे बांधली त्यांचे उद्घाटन तुम्ही केले. माननीय बाळासाहेब ठाकरे यांनी मोफत घरांची योजना केली. सभापती महोदय, आज गिरणी कामगारांची काय स्थिती आहे? हे गिरणी कामगार कसे देशोधडीला लावले गेले आहेत. आज मुकेश मिल बंद आहे, हिंदुस्थान मिलचे उत्पादन 2001 मध्ये मालकाने थांबविले. त्यामधील 2400 कामगार बेकार झाले. त्यांना आजपर्यंत एकही पैसा मिळालेला नाही. मफतलाल युनिट नं.1 व युनिट नं.2 बंद आहेत. मफतलाल युनिटमधील किती जमीन मिळणार आहे? त्याठिकाणी 58,197 चौरस मीटरवर बांधकाम करण्यासाठी परवानगी दिली आहे. न्यू ग्रेट ईस्टर्न मिल बंद पडली त्यामधील 1200 कामगार बेकार झाले, सिंम्प्लेक्स मिलमधील कामगारांना एकही पैसा मिळाला नाही, ब्रॅडबरी मिल बंद पडली त्यामधील कामगारांना एकही पैसा मिळाला नाही, खटाव मिलमधील कामगारांना एकही पैसा मिळाला नाही, स्वान मिल, कुर्ला ही मिल 20 फेब्रुवारी 1992 ला बंद पडली, त्या मिलमधील 4 हजार कामगारांना एकही पैसा मिळाला नाही, शिवडी येथील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण...

स्वान मिलची 48 हजार 926 चौरस मीटर जागा बांधकामासाठी मिळणार आहे. नवीन विकास नियमावलीप्रमाणे 48 हजार चौरस मीटरपैकी मुंबई महानगरपालिकेला फक्त 7134 चौरस मीटर जागा मिळणार आहे. हिंदुस्थान मिलचा प्रोसेस हाऊन 1 जानेवारी 2002 पासून बंद आहे, त्यामुळे तेथील 700 कामगार बेकार आहेत. पिरामल मिलच्या जमिनीपैकी 3749 चौ. मीटर जमीन शासनाला मिळणार आहे. परंतु 1991 च्या विकास नियमावलीप्रमाणे महानगरपालिकेला 11600 चौरस मीटर आणि म्हाडाला 11600 चौरस मीटर जागा उपलब्ध झाली पाहिजे. परंतु तुम्ही नियम 58 मध्ये बदल करण्यासाठी दोन-तीन वर्षे टाईमपास करीत होतो असे सांगितले. ज्याठिकाणी सन 2001-02 मध्ये मुंबई महानगरपालिकेला 11600 चौरस मीटर जागा मिळावयास पाहिजे त्याठिकाणी 5533 चौरस मीटर जागा मिळाली आहे.

सभापती महोदय, या मिल्सच्या जागेवर जे टोलेजंग टॉवर उभे रहाणार आहेत त्या टॉवर्सना आपण पाणी कोठून देणार आहात? त्यांना नागरी सुखसोयी कोठून देणार आहात? त्यांना मुंबई महानगरपालिकेच्या डोक्यावर आणून बसविणार आहात. शेवटी याठिकाणी आपल्या माध्यमातून माझी शासनाला विनंती आहे.

(यानंतर श्री. किल्ले्दार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विधानसभा सभागृहातील सन्माननीय सदस्य श्री.सुभाष देसाई यांनी एस.आर.ए.च्या संबंधाने मुद्दे मांडून त्यामध्ये किती भ्रष्टाचार झालेला आहे, हे सांगितलेले आहे. महाराष्ट्र हे प्रगत राज्य असल्याचा टेंभा मिरविला जातो. महाराष्ट्रामध्ये मोठ्याप्रमाणात शहरीकरण होत आहे. दुसरी गोष्ट अशी की, या मुंबई शहरामध्ये विकासक हे टोलेजंग इमारती बांधत आहेत. त्या इमारतीखाली त्यांनी बोर्ड लावलेला असतो, की ही इमारत जैन समाजाच्या लोकांसाठी आहे. भारतीय जनता पक्ष हा जैन समाजाच्या आणि उत्तर प्रदेश लोकांच्या विरोधात नाही. परंतु जैन समाजाच्या लोकांनाच या इमारतीमध्ये जागा मिळेल, असे जे बोर्डवर लिहिलेले असते ते बरोबर नाही. मध्यंतरी मुंबई शहरामध्ये या संदर्भाने आंदोलने झाली.

सभापती महोदय, शेवटी मी मुंबईमध्ये स्थलांतर होऊन आलेल्या लोकांच्या संदर्भातील तक्ता वाचून दाखविणार आहे. मुंबईमध्ये लोक रोजगारासाठी येतात. मुंबईमध्ये 13 लाख लोक परप्रांतातून आलेले आहेत. कुटुंबासह स्थलांतरित होऊन आलेले 8 लाख 5 हजार लोक आहेत. जन्मानंतर स्थलांतरित झालेले 2 लाख 15 हजार लोक आलेले आहेत आणि शिक्षणासाठी 74 हजार लोक मुंबईमध्ये आलेले आहेत. मुंबईमध्ये स्थलांतर होऊन येतात, त्याचे कारण मुंबईशहरामध्ये रोजगार मिळतो, घर मिळते, मुंबई शहरामध्ये रहाण्यासाठी झोपडी मिळते. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी अत्यंत धोकादायक वाक्य वापरलेले आहे की, मुंबईमध्ये कोणीही येऊ शकते, कोणीही यावे. मुंबईमध्ये उद्योग मिळतो. किती कारखाने बंद आहेत, हे येथे सांगितले. या मुंबई शहरामध्ये मराठी माणूस स्वाभिमानाने जगायचा असेल तर नवीन गृहनिर्माण धोरण राबविले पाहिजे. त्यांना परवडतील अशी 15 टक्के नाही तर 60 टक्के घरे ही 350 ते 450 चौ.फुटाची बाधली पाहिजेत, तसे कंपल्शन केले पाहिजे. म्हणजे येथील शिक्षक, क्लार्क, पोस्टमन, पोलीस यांना घरे मिळू शकतील. आज पोलीस, कर्मचारी सेवानिवृत्त झाला तर तो मुंबईमध्ये घर घेऊ शकत नाही. केंद्र सरकारचा किंवा राज्य सरकारचा कर्मचारी सेवानिवृत्त झाला तर 25,30,40 लाखाचा फ्लॅट घेऊ शकत नाही. महाराष्ट्रातील सामान्य माणूस केंद्रबिंदू मानून नवीन गृहनिर्माण धोरण आखले पाहिजे, एवढेच या निमित्ताने सांगून आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून, माझे दोन शब्द संपवितो. जयहिंद, जय महाराष्ट्र.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ KTG/

श्री.दिलीपराव सोनवणे (नासिक विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन 2007-2008 या अर्थसंकल्पामध्ये या वर्षामधील महसूल जमा रक्कम आणि महसूल खर्चात काटकसर या संबंधाने सांगितलले आहे. यामुळे कर्जाच्या परतफेडीचे नियोजन चांगले होऊ शकेल. या वर्षाची अपेक्षित शिल्लक 510 कोटी 68 लाख एवढी दिसून येते. ही अपेक्षित शिल्लक पहाता,मागील दोन वर्षाच्या अर्थसंकल्पाचा विचार करता, जे काही नैसर्गिक आपत्ती आणि मानव निर्मित आपत्तीमुळे नुकसान झाले, त्यामुळे मागच्या अर्थसंकल्पामध्ये अपेक्षित शिल्लक न रहाता प्रत्यक्षात तोटा झाला. परंतु आता मात्र कर्जाच्या परतफेडीचे नियोजन आखण्यात आलेले आहे, हे अतिशय स्तुत्य आहे,असे मला वाटते. ग्रंथालय आणि वाचनालयासाठी जिल्हा नियोजन व विकास मंडळामध्ये अधिकाधिक तरतूद करावी, अशी सूचना करू इच्छितो. शेतकऱ्यांच्या संदर्भात या ठिकाणी योजना आखलेल्या आहेत, त्या अतिशय स्तुत्य आहेत. सिंचनाच्या संदर्भात अधिक तरतूद असावी, असे मला वाटते.

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीपराव सोनवणे .....

सिचनाची व्यवस्था, पाण्याची व्यवस्था करुन दिली तर शेतकऱ्यांच्या उत्पन्नामध्ये निश्चितपणे वाढ होईल. म्हणून पाटबंधाऱ्याच्या संदर्भात जर अधिक तरतूद असेल तर निश्चितपणे ही गोष्ट चांगल्या प्रकारे करता येईल. आपदग्रस्त शेतकऱ्यांच्या संदर्भात आपण काही मदत देतो. अतिवृष्टी असेल, महापूर असेल या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे आणि फळबागांचे अतिशय नुकसान झाले. हे नुकसान होत असताना आपण अनुदानाच्या रुपाने या ठिकाणी जे काही अनुदान मिळते त्यामध्ये काही ठिकाणी अनुदान उपलब्ध झाले नाही. अनुदान उपलब्ध न झाल्यामुळे ज्या शेतकऱ्यांना मदत देऊ शकलो नाही त्या शेतकऱ्यांना शासनाने त्वरित मदत उपलब्ध करुन दिली तर त्या शेतकऱ्यांना दिलासा मिळेल. शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या अनुषंगाने शासन जी तरतूद करते त्यामध्ये जमीन सुधारणा असेल, चांगल्या बी-बियांणाचा पुरवठा करणे व त्याची उपलब्धता करणे, पीक संरक्षण, शेतीची सुधारित अवजारे देणे, बोअरवेलचे पाईप देणे, शेतकऱ्यांना जोडधंदा उपलब्ध करुन देणे, शेतकऱ्यांना 6 टक्के दराने कर्ज उपलब्ध करुन देणे, पीक विमा योजना तसेच ठिबक व तुषार सिंचन योजना याबाबतीत जास्ती जास्त निधीची उपलब्धता झाली तर निश्चितपणे शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण कमी होईल असा मला विश्वास वाटतो. केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्य शासनाने फलोत्पादन योजना राबवली आणि त्यासाठी तरतूद उपलब्ध करुन दिली तर निश्चितपणे त्याचा शेतकऱ्यांना फायदा होईल.

सभापती महोदय, शिक्षणाच्या संदर्भामध्ये सर्व शिक्षा अभियान राबवत असताना त्यामध्ये काही जिल्हे मागासलेले राहिलेले दिसतात. हे अभियान राबवत असताना हे जिल्हे मागास का राहिले याची कारणमीमांसा केली पाहिजे आणि त्या अभियानाची कडक अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. ग्रामीण पाणीपुरवठा योजनेच्या संदर्भात सांगावयाचे म्हणजे पाण्याची व्यवस्था होणे आवश्यक आहे आणि त्याबाबतीत केंद्र शासनाच्या मदतीने जी काही निधीची उपलब्धता होते त्यामध्ये भारत निर्माण ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रमाच्या माध्यमातून प्रत्येक प्राथमिक आणि माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी पाणीपुरवठ्याची व्यवस्था व्हावी यासाठी त्वरित निधी उपलब्ध करुन द्यावी. त्यामुळे निश्चितपणे शाळेतील विद्यार्थ्यांच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न सुटू शकेल.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीपराव सोनवणे .....

सभापती महोदय, या ठिकाणी शालेय शिक्षणासाठी 599.87 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. यासंदर्भात आणखी जास्त तरतूद होणे आवश्यक आहे. कारण गेल्या तीन वर्षापासून वेतनेतर अनुदानाच्या संदर्भात तरतूद केलेली नाही. 2003-04 ते 2006-07 या कालावधीमध्ये यासाठी तरतूद केलेली नाही. त्यामुळे ही तरतूद होणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे आदिवासी उपयोजना क्षेत्रातील ज्या शाळा अनुदानास पात्र ठरलेल्या आहेत त्यांना अनुदान मिळालेले नाही. त्याबाबतची तरतूद अर्थसंकल्पात होणे आवश्यक आहे. मागील सात महिन्याच्या थकित वेतनाच्या संदर्भात व्यवस्था केल्याचे दिसत नाही. ती व्यवस्था सुध्दा होणे आवश्यक आहे. मागील 4 वर्षापासून 300 वर्ग तुकड्या निकषपात्र ठरल्या परंतु अजूनही त्यासंदर्भातील यादी जाहीर झालेली नाही. ती यादी जाहीर होणे आवश्यक आहे तसेच त्यासंदर्भात अनुदानाची व्यवस्था होणे आवश्यक आहे. आदिवासी आश्रमशाळेत तीन तीन महिने पगार होत नाहीत. तेथील शिक्षकांना वेतनाच्या संदर्भात फार मानसिक वेदना होतात. त्यासंदर्भात तरतूद होणे आवश्यक आहे. यासाठी ग्रँटच्या संदर्भात 11 महिन्यांची तरतूद करावी अशी मी आपल्यामार्फत शासनाला विनंती करतो. अनुदानास पात्र असलेल्या शाळांची यादी शासनाने जाहीर केलेली नाही तसेच अनुदानाची तरतूद देखील केलेली नाही. ती यादी जुलै, 2007 पूर्वी जाहीर करावी अशी मी या ठिकाणी विनंतीवजा सूचना करु इच्छितो.

सभापती महोदय, संगणकाच्या संदर्भात सांगावयाचे म्हणजे नवीन स्पर्धेच्या युगामध्ये संगणक शिक्षक या पदास मान्यता दिली पाहिजे. त्यांच्या वेतनश्रेणीबाबत देखील निर्णय होणे आवश्यक आहे असे मला वाटते. स्थानिक विकास निधीतून आपण अनुदानित शाळांना संगणक देतो परंतु विना अनुदानित शाळांना संगणक दिले जात नाहीत. ज्या मान्यताप्राप्त विना अनुदानित शाळा आहेत, ज्या ठिकाणी खरोखरच संगणकाची गरज आहे त्या विना अनुदानित शाळांना सगणक देण्याच्या बाबतीत निर्णय व्हावा असे मला वाटते.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिलीपराव सोनवणे....

विनाअनुदान शाळेतील मुले देखील त्याच कॅटेगरीतील मुले असतात म्हणून त्या शाळांना देखील संगणक देण्याच्या बाबतीत सापत्नभाव असता काम नये. म्हणून त्यासाठी देखील तरतूद करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, विजेची उपलब्धता आणि मागणी यामध्ये खूप मोठी तफावत आहे. आपल्या राज्यात 5500 मेगावॅट विजेची कमतरता आहे. आपण जे काही वीज प्रकल्प उभे करीत आहोत ते ताबडतोबीने उभे होण्याची आवश्यकता आहे. हे काम जास्त गतीने केले तर ग्रामीण भागातील शेतक-याला आपण निश्चितच दिलासा देऊ शकू. विजेविना ग्रामीण भागातील शेतकरी आज संकटात सापडलेला आहे. पाणी असून देखील तो शेतीला पाणी देऊ शकत नाही. विजेच्या भारनियमनामुळे विद्यार्थ्यांचे देखील फार मोठे नुकसान होत आहे. तेव्हा नवीन वीज प्रकल्प गतीने उभे करण्याचे काम होईल अशी अपेक्षा मी या निमित्ताने व्यक्त करतो. वीज निर्मितीच्या क्षेत्रामध्ये राज्य शासनाकडून होत असलेले प्रयत्न स्तुत्य आहेत. परंतु हे प्रयत्न अस्तित्वात येण्याची गरज आहे. त्यासाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन प्रकल्प त्वरित पूर्ण केले पाहिजेत.

सभापती महोदय, ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाना इंदिरा आवास योजनेंतर्गत घरकुले दिली जातात. या योजनेंतर्गत जे गरजू आणि बेघर लोक आहेत त्यांना जास्तीत जास्त घरकुले मिळण्यासाठी जास्तीत जास्त निधी या योजनेसाठी उपलब्ध करुन द्यावा अशी माझी शासनाला सूचना आहे.

राज्यामध्ये रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून रोजगार निर्मितीचे चांगले प्रयत्न सुरु आहेत. बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने या योजनेची प्रभावी अंमलबजावणी केली पाहिजे. आदिवासींसाठी अनेक योजना राबविण्याचा स्तुत्य निर्णय शासनाने घेतलेला आहे. अनुसूचित जातीसाठी दुधाळ जनावरे तसेच शेळया पुरविणे, गॅस पुरविणे, पिण्याच्या पाण्याच्या योजना असे उपक्रम शासनाने मोठ्या प्रमाणावर हाती घेतले तर अनुसूचित जातीच्या लोकांचा विकास करण्याचे श्रेय शासनाला मिळेल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिलीपराव सोनवणे..)

सभापती महोदय, जीवनदायी आरोग्य योजनेंतर्गत दारिद्र्य रेषेखालील लोकांना हृदयविकार, मूत्रपिंडरोपण, मेंदू व मज्जासंस्थाच्या गंभीर विकारावरील उपचाराकरिता प्रतिरुग्ण 70,000 रु. इतके अर्थसहाय्य देण्यात येत होते. या विकारांमध्ये कर्करोग या आजाराचा समावेश करण्यात आला असून अर्थसहाय्याची मर्यादा रुपये दीड लाखापर्यन्त वाढविण्यात आली आहे. या योजनेचा लाभ फक्त बीपीएल कार्डधारक रुग्णासच मिळतो. यासंदर्भात मला असे सांगावेसे वाटते की, काही वेळा रुग्णाकडे बीपीएल कार्ड असतेच असे नाही. परंतु तो रुग्ण गरीब असतो. अशा गरजू आणि गरीब रुग्णाला त्याच्याकडे बीपीएलचे कार्ड नसले तरी, या योजनेचा लाभ दिला पाहिजे. जीवनदायी योजनेमध्ये एडस् या रोगाचा देखील अंतर्भाव करुन एडस्च्या रुग्णाला आधार द्यावा अशी मी या निमित्ताने विनंती करतो. महसुली खर्चात काटकसर करण्याचा अतिशय चांगला कार्यक्रम या अर्थसंकल्पामध्ये घेतलेला आहे. यामुळे कर्जफेड होऊ शकेल अशी खात्री वाटते.

सभापती महोदय, मागील आठवड्यामध्ये विधानसभेमध्ये स्थानिक विकास कार्यक्रमाच्या संदर्भात प्रश्न उपस्थित झाला होता. स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत लोकप्रतिनिधींना आपापल्या मतदारसंघामध्ये अधिकाधिक विकास कामे करता यावीत यासाठी हा निधी 2 कोटी रुपये करण्याचा शासन विचार करील अशी अपेक्षा मी या निमित्ताने व्यक्त करतो. शासनाने हा चांगला अर्थसंकल्प सादर केलेला आहे. या अर्थसंकल्पाला मी शुभेच्छा देतो आणि माझे भाषण संपवितो.

--

...नंतर श्री. भोगले...

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन 2007-08 च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेत भाग घेण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय अर्थराज्यमंत्र्यांनी जो अर्थसंकल्प सभागृहात सादर केला तो ऐकताना सुध्दा निरस वाटले. वर्तमानपत्रातून या संदर्भातील बातम्या वाचल्या तेव्हा कळले की, विधानसभेत अर्थसंकल्प सादर करताना शेरोशायरी झाली. विधानपरिषदेत शेर नव्हता आणि शायरीही नव्हती. सर्व काही निरस होते. दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रे उघडली आणि अर्थसंकल्पाच्या संदर्भातील सर्व वर्तमानपत्रांचे अग्रलेखाचे मथळे वाचल्यानंतर या अर्थसंकल्पामध्ये काय शिल्लक आहे हे कळून आले. मी निव्वळ मथळे वाचून दाखवितो. "अपेक्षाभंग, अगदीच मिळमिळीत" असा मथळा लोकमत वृत्तपत्राच्या अग्रलेखाचा होता. "विडी आणि काडी" हा मथळा सामना वृत्तपत्राच्या अग्रलेखाचा होता. "अर्थहीन अर्थसंकल्प" हा मथळा वृत्तमानस या वृत्तपत्राच्या अग्रलेखाचा होता आणि महाराष्ट्र टाईम्स या वृत्तपत्रातील अग्रलेखाचा मथळा "बजेटचा हत्ती" असा होता. महाराष्ट्र टाईम्सने अग्रलेखात हत्तीची गोष्ट सांगून प्रत्येकाला तो कसा दिसतो हेही सांगितले होते. "अपेक्षांना हरताळ" असा मथळा लोकसत्ता या वृत्तपत्राच्या अग्रलेखाचा होता. "न्यायाकडून पायाकडे, चिदंबरी ठसा" असे सगळयांनी म्हटले. सगळयांना थोडेथोडे तिळगूळ वाटण्यात आले. एकानेही चांगला अर्थसंकल्प असे म्हटलेले नाही. अर्थसंकल्पाबद्दल कसा भ्रमनिरास थोरामोठ्यांचा झाला हे सुरुवातीलाच मी सांगू इच्छितो. मग सर्वसामान्यांचे काय होईल? नोबेल पुरस्कार विजेते डॉ.अमर्त्य सेन यांनी मानवी विकासाच्या टप्प्यातील महत्वाचा बिंदू म्हणजे शिक्षण आणि आरोग्य असे म्हटले आहे. मागील 9 वर्षे अर्थसंकल्प सादर करुनही आपण शिक्षण, आरोग्य, पिण्याचे पाणी, सिंचन या बाबी सतत पराभूत मनोवृत्तीने सादर करीत आला आहात.

सभापती महोदय, मला आठवते, आमचे शिवशाहीचे सरकार होते त्या काळात आम्ही जेव्हा सत्तेवर आलो तेव्हा राज्याचे एकूण कर्ज 14 हजार कोटी रुपयांचे होते. आम्ही सत्तेवरुन पायउतार झालो तेव्हा राज्यावरील कर्ज 38 हजार कोटी रुपयांचे होते. युती सरकार कसे कुचकामी होते, आम्हाला अर्थव्यवस्था कशी कळत नव्हती हे सांगण्यासाठी सत्तेवर येताच माननीय अर्थमंत्र्यांनी श्वेतपत्रिका काढली होती. सन्माननीय अर्थमंत्री श्री.जयंत पाटील आज श्वेतपत्रिका विसरले असावेत. श्वेतपत्रिकेच्या माध्यमातून त्यांनी युती सरकारची भरपूर खिल्ली उडविली होती.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत.....

आज 38 हजार कोटी रुपयांचे कर्ज 1.35 लाख कोटी रुपयांवर जाऊन पोहोचले असून अल्पकाळात ते 1.44 लाख कोटी रुपयांवर जाणार आहे. मला खेद होतो तो एकाच बाबीचा, ती बाब म्हणजे 38 हजार कोटी रुपयांचे कर्ज युती सरकारने उभे केले तेव्हा निश्चितपणे किती प्रगती केली हे आम्हाला सांगता येत होते. युती सरकारच्या काळात सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी हे सार्वजनिक बांधकाम मंत्री होते. आम्ही त्यांना गौरवाने "रोडकरी" म्हणत होतो. मुंबई-पुणे एक्स्प्रेस रस्ता, मुंबई शहरातील उड्डाणपूल युती सरकारच्या काळात त्यांनी प्राथम्याने उभारले. जनतेच्या सोयीसाठी आम्ही कर्ज काढले, पण ते कर्ज घेऊन आम्ही प्रकल्प उभे केले.

(नंतर श्री.जुन्नरे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत...

किंबहुना कर्ज घेतांना सुध्दा सरकारचे पैसे कसे वाचतील हे आम्ही पहात होतो. माननीय गडकरी साहेबांनी ही सर्व कामे करतांना सरकारचे मोठया प्रमाणात पैसे वाचवलेले आहेत. मुंबई-पुणे रस्त्याच्या संदर्भात रिलायन्स कंपनीने 3300 कोटी रुपयांचा प्रस्ताव दिला होता परंतु हे काम 1700 कोटी रुपयांमध्ये माननीय गडकरी साहेबांनी पूर्ण करुन दाखवलेले आहे. शासनाचे पैसे कसे वाचतील हेच युती शासनाचे धोरण होते. शासनाचे पैसे वाचले पाहिजेत ही भूमिका घेऊनच आम्ही उभे राहिलो होतो. युती शासनाने जे 55 उड्डाण पूल बांधले होते त्याची चेष्टा त्यावेळी आताच्या माननीय माननीय अर्थमंत्र्यांनी केली होती. परंतु आता आपण 64 उड्डाण पूल बांधले आहेत त्याचे काय? यासंदर्भात माननीय जयंत पाटील साहेबांनी एक श्वेत पत्रिका देखील काढली होती. युतीच्या काळात माननीय विखे-पाटील साहेब आमच्याकडे होते परंतु आता ते काँग्रेसमध्ये गेल्या बरोबर पावन झालेले आहेत. मुळा-प्रवराला त्यावेळेस मदत केली होती त्यावेळेस आपण आगपाखड केली होती, टीका केली होती. तोटयात असलेल्या संस्थेच्या संचालक मंडळामध्ये अहमहमिका चालते हे अनाकलनीय आहे. आपल्याला चांगले माहिती आहे. परंतु आता मुळा-प्रवरा इलेक्ट्रिक सोसायटीत 900 कोटी रुपयांचा तोटा आहे परंतु याबाबतीत आपण आता काहीही बोलत नाही. युती शासनाच्या वेळेस आपण ज्या श्वेत पत्रिका काढल्या होत्या त्या आम्ही वाचलेल्या आहेत परंतु त्यावेळी तुम्ही काय काय बोलला होता हे आपल्या आता लक्षात येईल, यावयास पाहिजे. आपण त्यावेळेस जे काही बोलला होता त्यासंदर्भात आपण प्रत्यक्षात काहीही करीत नाहीत.

सभापती महोदय, केंद्र सरकार कडून महाराष्ट्र राज्याला जो निधी मिळत असतो त्या निधीचा वापर सुध्दा होत नाही. आजच्या टाईम्स ऑफ इंडियात बातमी आलेली आहे की, केंद्र सरकारचे पंतप्रधान योजनेचे 1400 कोटी रुपये पडून आहेत. केंद्रसरकारने महाराष्ट्र राज्यासाठी सन 2006-2007 मध्ये जो निधी मंजूर केला होता त्यातील किती निधी प्रत्यक्षात खर्च झालेला आहे याची माहिती देण्याची आवश्यकता आहे. आपल्या माहिती संचालनालयाने मागील वर्षी एक पैसा देखील खर्च केलेला नाही. लोकांच्या शंकेचे निराकरण करणे, सर्वसामान्य जनतेला माहिती देणे, सरकारच्या योजनांची माहिती जनतेला देणे हे माहिती संचालनालयाचे काम आहे परंतु या माहिती संचालनालयाने एक पैसा देखील जनतेसाठी खर्च केला नाही. सरकारच्या ज्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत...

काही योजना आहेत त्या झिरपत खालपर्यंत गेल्या पाहिजेत परंतु तसेच माहिती संचालनालयाने केलेले नाही. मागील वर्षी बजेटमध्ये ज्या तरतुदी केल्या होत्या त्या जर आपण पाहिल्या तर आपल्याला आश्चर्य वाटेल. कृषी खात्यासाठी 253.56 लाखांची तरतूद करण्यात आली होती परंतु या विभागाने खर्च मात्र 134.8 लक्ष रुपये करण्यात आलेला आहे. पर्यावरण विभागासाठी बजेटमध्ये 5 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती परंतु एक पैसा देखील या विभागाने खर्च केलेला नाही. वन विभागासाठी 57.94 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती परंतु या विभागाने 27.67 कोटी रुपये खर्च केलेले आहेत. सार्वजनिक आरोग्य विभागासाठी 819. 97 कोटी रुपयांची तरतूद केली होती परंतु प्रत्यक्षात 617.19 कोटी रुपयेच खर्च झालेले आहेत. सर्वात महत्वाचे म्हणजे या शासनाने प्राथमिक शाळेतील मुलांना बाहेर काढण्याचाच कार्यक्रम आखलेला आहे. आज सुध्दा विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण 50 ते 55 टक्के आहे. सन 2004-2005 मध्ये अर्थमंत्र्यांनी वसती शाळा शिक्षकांना वाढीव मानधन देण्याचे जाहीर केले होते, सन 2005-2006 मध्ये उच्च प्राथमिक स्तरावरील अनुसूचित जाती जमातींच्या मुला-मुलींची होणारी गळती रोखण्यासाठी व त्यांना शालान्त परीक्षेला बसता यावे यासाठी मुक्त शाळा योजना जाहीर केली होती. या योजनेत गणित व इंग्रजी ऐवजी व्यावसायिक शिक्षण देण्याचे मान्य केले होते. सन 2006-2007 मध्ये निवासी शाळा योजना जाहीर केली होती. या सर्व योजनेपैकी आपण नक्की काय काय केलेले आहे याची माहिती सदनाला मिळण्याची आवश्यकता आहे. सन 2004 पासून ते 2007 पर्यंत आपण ज्या घोषणा केल्या होत्या त्या घोषणा पैकी आपण किती घोषणा प्रत्यक्षात अंमलात आणल्या याची माहिती देण्याची आवश्यकता आहे. निवासी शाळेतील शिक्षकांचे मानधन वाढले गेले नाही, विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण देखील कमी झाले नाही अशी परिस्थिती आहे. सभापती महोदय, विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण हा माझा जिव्हाळयाचा प्रश्न आहे. मी स्वत: गरिबीत दिवस काढून शिक्षण घेतलेले आहे. आम्ही ज्यावेळेस मुंबई महानगर पालिकेच्या शाळेत जात होतो त्यावेळेस सुध्दा आम्हाला महानगर पालिकेच्या शाळेचा अभिमान होता.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री. अजित.....

श्री.अरविंद सावंत.....

महानगरपालिकेच्या शाळेत सातवीपर्यंत शिकविले जात होते. सातवीची परीक्षा पास झाल्यानंतर आम्हाला पुढील शिक्षणासाठी हायस्कूलमध्ये प्रवेश घ्यावा लागत असे. महानगरपालिकेतून आलेली मुले ही टारगट, अभ्यासामध्ये कमी हुशार असतात या नजरेने आमच्याकडे पाहिले जायचे. परंतु परीक्षेच्यावेळी आम्ही हायस्कूलमधील विद्यार्थ्यांच्या पुढे जायचो. महानगरपालिकेतील शाळांतील शिक्षणाचा दर्जा इतका चांगला आहे याचे हायस्कूलमधील शिक्षकांना आश्चर्य वाटायचे. परंतु तशी परिस्थिती आज राहिलेली नाही. आज खाजगीकरणामुळे महानगरपलिकेतील शाळांतील शिक्षणाचा दर्जा खालावलेला आहे. एक प्रकारची विषमता निर्माण झालेली आहे. या गोष्टींचा आपण सर्वांनी मिळून विचार करण्याची गरज आहे. फक्त टीका करावयाची म्हणून मी हे बोलत नाही. आज आदिवासींची मुले आदिवासी आश्रमशाळेत जातात, सर्वसामान्यांची मुले जिल्हापरिषदेच्या शाळेत जातात, शहरातील गरिबांची मुले महानगरपालिकेच्या शाळेत जातात तर थोडीफार उच्च मध्यमवर्गीयाची मुले इंटरनॅशनल स्कूलमध्ये जातात, पवार इंटरनॅशनल स्कूल, सिंहगड इंटरनॅशनल स्कूलमध्ये जातात. रेसिडेन्शीअल स्कूलमध्ये जातात. मुले त्याठिकाणी शिक्षण घेतात म्हणून मला चीड नाही. पण जी विषमता निर्माण होत आहे ती आपण लक्षात घेतली पाहिजे.

सभापती महोदय, आजही ग्रामीण भागातील शाळेत मुलांच्या गळतीचे प्रमाण 50 टक्के आहे तर मुलींच्या गळतीचे प्रमाणे 55 टक्के आहे. माझ्याकडे आकडेवारी आहे. पण ती वाचून दाखविण्यामध्ये मला रस नाही. वार्षिक पाहणी अहवालामध्ये ही टक्केवारी दिलेली आहे. अशाप्रकारच्या गळतीमुळे काल मार्क्स निर्माण होतील. आज घराघरात मीडिया पोहोचलेला आहे. समोर जे भौतिक सुख दिसते ते मिळविण्याचा मुलांचा प्रयत्न असतो. हे भौतिक सुख मिळविण्यासाठी शहरातीतल मुले गँगस्टर होतात तर खेड्यातील मुले दगड उचलतात.

सभापती महोदय, मला कधी कधी आश्चर्य वाटते की, याठिकाणी शिक्षक प्रतिनिधी शिक्षकांना पगार मिळत नाही, त्यांना प्रमोशन मिळत नाही यासाठी प्रश्न उपस्थित करतात. परंतु शिक्षकांनी आजपर्यंत किती मुलांना चांगल्याप्रकारे शिक्षित केले याची माहिती कधी देताना त्यांना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत.....

पाहिले नाही. माननीय प्रा. पुरके यांनी कोणत्या परिस्थितीमध्ये शिक्षण घेतले याची मला माहिती आहे. आजही काही ठिकाणी एकाच खोलीमध्ये अनेक वर्ग घेतले जातात. अनेक ठिकाणी एक शिक्षकी शाळा आहेत. तर दुसरीकडे मुंबई-पुणे हाय-वे रोडला सिंहगड इंटरनॅशनल स्कूल सारखी इन्स्टिटयूट आहे. वन विभागाच्या जमिनीवर ही इन्स्टिटयूट उभी आहे. या इन्स्टीटयुला ग्रामपंचायतीने विरोध केला म्हणून वन विभागाने त्यांच्यावर केस दाखल केली. कोणत्या सम्राटाच्या नावावर ही इन्स्टीटयूट आहे ? कायदा न जुमानता वन विभागाच्या जमिनीवर ही इन्स्टिटयूट उभी आहे. सर्व नवलेची नवलाई आहे. सभापती महोदय, दोन दिवसांपूर्वी सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी शासनाच्या काही विद्यापीठांमध्ये मान्यता प्राप्त नसलेले कोर्सेस शिकविले जातात या विषयासंबंधीची लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. मी निमित्ताने सांगू इच्छितो की, श्री.नारखेडे नावाच्या एका व्यक्तीने एम.आय.डी.सी.च्या प्लॉटवर कॉलेज सुरु केले. ही बाब अखिल भारतीय विद्यार्थी सेनेनेही निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यास पकडले. त्यास अटक झाल्यानंतर त्याच्या छातीत दुखू लागले. त्याला त्या प्लॉटवर कॉलेज उभारुन ते रेग्युलराईज करायचे होते.

यानंतर कु.गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत .....

पुणे जिल्हयामध्ये बऱ्याच बोगस संस्था चालू आहेत. इंजिनिअरिंगचे बोगस कोर्सेस, बोगस इन्स्टिटयूट सुरु आहेत परंतु याकडे सरकारचे लक्ष नाही. पूर्वी आपण पुण्याला विद्येचे माहेर घर असे म्हणत होतो. परंतु आता पुण्यामध्ये असंख्य बोगस इंन्स्टिटयूट सुरु आहेत. आपल्याकडे पिंपरी चिंचवड आणि पुण्यापर्यंत अनेक बोगस इंन्स्टिटयूट सुरु आहेत. पुण्यामध्ये सिंहगडच्या पायथ्याखाली जो तमाशा झाला त्याला हीच मुले जबाबदार आहेत असे म्हटल्यास वावगे होणार नाही. मला असे म्हणावयाचे आहे की, या महाराष्ट्रामध्ये एका बाजूला हजारो शेतकरी मरत आहेत, दुसऱ्या बाजूला गिरणी कामगार अस्वस्थ आहेत. लाखो गिरणी कामगार उद्ध्वस्त होत आहेत. इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी आपण जिल्हा स्तरावर, तालुका स्तरावर राबविण्यास सरुवात केली आहे. परंतु आपण सामान्य माणसासाठी, बेरोजगारासाठी काय केलेले आहे ? शेवटी हे सरकार बेरोजगारांसाठी काय करते आहे ? यास एक दुसरी बाजू देखील आहे आणि ती अत्यंत स्वागतार्ह आहे. पूर्वी आय.टी म्हणजे इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी असा अर्थ होता , परंतु आता आय.टी म्हणजे इंडियन टॅलेंट असे आपण म्हणतो. या इंडियन टॅलेंटला जगभर मान्यता आहे. आमच्या पुण्यामधील हिंजवडी भागात संस्कृतिचा ऱ्हास होतो आहे. हिंजवडी भागात आयटी पार्क सुरु झालेला आहे. परंतु त्या ठिकाणी स्थानिक लोकांना म्हणजे पुणे जिल्हयातील तरुणांना नोकऱ्या मिळालेल्या नाहीत. त्या ठिकाणी बंगाल ,कर्नाटक या राज्यातून असंख्य तरुण आलेले आहेत. येथील बरीचशी मुले ही बाहेरच्या राज्यातून आलेली आहेत. त्या मुलांना या राज्यातील संस्कृतीशी काहीही मिळते जुळते घ्यावयाचे नाही,त्यांना या राज्याशी काहीही देणे घेणे नाही. तेव्हा स्थानिक तरुणांना रोजगार कसा मिळेल या दृष्टीने आपण लक्ष देणे आवश्यक आहे. सभापती महोदय, मला येथे कम्पलसरी एम्प्लॉयमेंट ॲक्ट या कायद्याच्या बाबतीत बोलावयाचे आहे. या कायद्यानुसार , विशेष म्हणजे तृतीय व चतुर्थ श्रेणी कामगारांची नोकर भरती करण्यासाठी एक्पलॉयमेंट एक्चेंजकडे असलेल्या नोंदणीकृत लोकांना कॉल देण्यात येतात. परंतु आय.टी सेक्टरमधील इंटरव्हयू हे पुष्कळदा ऑनलाईनच घेतले जातात. त्यामुळे या राज्यातील भूमीपूत्र नोकरीपासून वंचित राहात आहेत. या भूमीपुत्रांना संरक्षण देण्यासाठी आपण काय करणार आहात ?

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत .....

कर्नाटकच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी तर तंबी दिली होती की, बंगलोर हे आय.टी चे मार्केट आहे. साऱ्या क्षेत्रात बंगलोर पुढे आहे. त्यांनी असे सांगितले की, माझ्या आय.टी सेक्टरमध्ये कानडी लोकांना प्राधान्य मिळाले पाहिजे. त्यांचे हे वक्तव्य वर्तमानपत्रात देखील प्रसिध्द झालेले आहे. सभापती महोदय, आपल्या राज्यातील मुख्यमंत्र्यांना अशा प्रकारचे धाडस होत नाही. आमच्या सरकारकडून या भूमिपुत्रांना जमीन दिली पाहिजे. त्यांना आवश्यक त्या सगळया सुखसोयी दिल्या तरच महाराष्ट्रातील तरुणांना नोकऱ्या मिळतील . सरकार तरुणांना नोक-या मिळण्याच्या बाबतीत दुर्लक्ष करीत आहे. ही अतिशय खेदाची गोष्ट आहे.

यानंतर श्री. पुरी .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत .....

याबाबतीत तातडीने पाऊले उचलण्याची गरज आहे. कर्नाटकचे मुख्यमंत्री ज्याप्रमाणे सांगतात, त्याप्रमाणे आपले मुख्यमंत्री का सांगत नाहीत ? खासकरुन आयटी क्षेत्रातील नोकरीच्या संदर्भात, मुंबईमध्ये 22 ते 26 लाख नोकऱ्या उपलब्ध आहेत, असे कळते. परंतु एका बाजूला घरांचा, झोपडयांचा प्रश्न आहे तर दुसऱ्या बाजूला एवढया प्रमाणात नोकऱ्या उपलब्ध होत आहेत. आज पुण्यामध्येही फ्लॅट सिस्टीम येत आहे. आयटी क्षेत्रामध्ये मोठा पगार मिळत आहे. साध्या कॉल सेंटमध्येही 10-12 हजार रुपये महिन्यांस पगार मिळतो. त्यामुळे कॉल सेंटरर्समध्येच प्रेमविवाह होतात, दोघांचे मिळून 30-35 हजार रुपये महिन्यास मिळतात मग, ते तेथेच फ्लॅट खरेदी करुन राहतात. ज्याप्रमाणे आज पुण्यामध्ये घडत आहे, ते मुंबईमध्येही घडेल व मराठीचा नोकरीतील टक्का कमी होईल. त्यामुळे याबाबतीत शासनाने तातडीने पाऊले उचलण्याची आवश्यकता आहे. आपण याठिकाणी मराठी माणसांना नोकरी दिली नाही तर आम्ही सोयी सुविधा देणार नाही, असे आपण ठणकाऊन सांगितले पाहिजे. अशाप्रकारे एका बाजूला नोकऱ्या उपलब्ध होत असताना आपण दुसऱ्या बाजूला एम्प्लॉयमेंट एक्चेंजचा ॲक्ट बासनात गुंडाळून ठेवत आहात, हे योग्य नाही. यावर्षीच्या अर्थसंकल्पाबाबत मघाशी कोणीतरी म्हटले की, हा अर्थसंकल्प म्हणजे "चिदंबरी ठसा" आहे. ग्रामीण भाषेत सांगायचे तर, "केंद्राचा लेंगा, जयंतरावांची नाडी, महाग झाली नाही म्हणून ओढा विडी." या अर्थसंकल्पाचे समर्थन मी करणार नाही. हा अर्थसंकल्प कुठल्याही प्रकारची प्रगती साधणारा नाही, असेच मी म्हणेन. अर्थसंकल्पावर माझे विचार मांडताना मी ज्या सूचना केलेल्या आहेत, त्यांचा शासनाने विचार करावा, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, शेवटचा मुद्दा मी मांडतो. गिरणी कामगारांबाबतीत जी व्याख्या दिलेली आहे, त्यासंबंधी मी बोलणार आहे. परवा, गिरणी कामगारांसंबंधीची लक्षवेधी सूचना चर्चेसाठी आली होती. त्यावेळी माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, आम्ही व्होकेशनल ट्रेनिंग सुरु करु. आपण गिरणी कामगारांना कसल्या नोकऱ्या उपलब्ध करुन देणार आहात ? नगरविकास विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवांनी दिनांक 13 मार्च,2007 रोजी जे परिपत्रक काढले, ते मी आपल्याला वाचून दाखवतो. यामध्ये असे म्हटले आहे की, " It was however experienced that the Resolution failed to achieve the desired results." It is further stated that: " Setting up of a Monitoring Committee under the Chairmanship of a

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत .....

retired High Court Judge to oversee implementation of the package of measures recommended by the BIFR, schemes approved by Government for modification or shifting of cotton textile mills sanctioned by the Municipal Commissioner." " Earmarking 50% of land from MHADA's share for mill workers housing." नोकरीच्या संदर्भात त्यांनी जे म्हटले आहे ते अतिशय चिड आणणारे आहे. त्याबाबतीत असे म्हटले आहे की," Accordingly, the said Regulation 58 has been implemented to a large extent except alternative employment and training for skill up-gradation. It is observed that, due to lack of relevant skill, it is not possible for the mill workers to get employment in the sectors which are being set up on mill lands. Also it is unlikely the mill workers' family members will get admission in the renowned vocational training school due to their economic condition and social background." ते आर्थिकदृष्टया मागासलेले आहेत. त्यांची अवस्था फारच वाईट असल्यामुळे त्यांना प्रशिक्षण देता येणार नाही. आज त्यांना प्रशिक्षण नाही म्हणून नोकऱ्या मिळत नाहीत. अशाप्रकारचे परिपत्रक माननीय रामानंद तिवारी यांनी काढलेले आहे. Sir, it is a Government Regulation issued by the Government of Maharashtra, Urban Development Department, No. TPB.430-7/317/CR-46/07, Mantralaya, Mumbai 400 032, dated 13th March, 2007.

नंतर श्री.रोझेकर....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखी नोंद

श्री.अरविंद सावंत.....

अर्थसंकल्पामध्ये गिरणी कामगारांच्या मुलांना व्होकेशनल ट्रेनिंग देण्याचे तुम्ही मान्य करता, इमारत उभारु, असेही म्हणता. परंतु, इमारत उभारण्यासाठी नव्या पैशाची तरतूद अर्थसंकल्पात करीत नाही. आमची मागणी आहे की, गिरणी कामगारांचे पुनर्वसन करावयाचे असेल तर त्यांच्या मुलांना व्होकेशनल ट्रेनिंग देण्याची गरज आहे. परंतु, हे तुम्ही नाकबूल करता. जर गिरणी कामगारांच्या मुलांना ट्रेनिंग दिले नाही तर त्यांना जॉब मिळणार नाही. त्यामुळे शासनाने हे ट्रेनिंग मोफत दिले पाहिजे. तुम्ही हे मान्य करता की, त्यांची आर्थिक परिस्थिती चांगली नाही आणि पुन्हा त्यासाठी कोणतीही तरतूद अर्थसंकल्पामध्ये करीत नाही. हे सर्व खेदजनक आहे, चीड आणणारे आहे, अवमानकारक आहे. गिरणी कामगारांच्या संदर्भात कोणतीही तरतूद केलेली नसल्यामुळे खेद प्रकट करुन मी माझे भाषण पूर्ण करतो. मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आभार व्यक्त करतो आणि थांबतो.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी (नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदय, 'ना अर्थ आहे, ना संकल्प आहे' असा हा अर्थसंकल्प माननीय अर्थमंत्र्यांनी आपल्यासमोर सादर केला आहे. मी गेल्या दोन-तीन वर्षातील अर्थसंकल्पाची भाषणे वाचल्यानंतर असे लक्षात येते की, त्या भाषणांतील शीर्षके तशीच ठेवून व आकडयांमध्ये बदल करुन या वर्षीचे अर्थसंकल्पाचे भाषण माननीय अर्थमंत्र्यांनी वाचले आहे. रिकाम्या जागा भरा, अशा पद्धतीने अर्थसंकल्पाचे भाषण झाले आहे. एका कविने एक सुंदर कविता केली आहे, ती या प्रसंगी वाचून दाखवितो व आपल्यामार्फत माननीय अर्थमंत्र्यांना भेट देतो.

अंधाराचं रामायण घडवलं, आश्वासन हवेत उडवलं, खोटी आशा दावणार हो हे
प्रकाशाचं जग अढवलं, राज्य अंधारात बुडवलं, आता काय दिवे लावणार हो हे
वीज फुकट देण्याची मारे आश्वासने देऊन
गेले तुमचा आमचा भरोसा अन् मतं घेऊन
नंतर म्हणले ते फक्त निवडणुकीपुरतं असतं
उगं, काय भांडायचं येवढं तेवढं ध्यानात ठेवून
दिला शब्द विसरुन जाऊन पाच सालांनी दारात येऊन नवं सपान दावणार हो हे
प्रकाशाचं जग अढवलं, राज्य अंधारात बुडवलं, आता काय दिवे लावणार हो हे
बोलून भुलवला अख्खा गांव
साधला गेला यांचा डाव
सत्तेची फक्त यांना हाव
नंतर फुटला खरा भाव
छपाईत चूक झाल्याचाच आणला साळसूद भाव
आपला नांव प्रभा हाये हे बी विसरायचं व्हंय राव
प्रकाशाचं जग अढवलं, राज्य अंधारात बुडवलं, आता काय दिवे लावणार हो हे
राज्यात अंधार लागलाय भरु
आंव करु त्यांव करु
जाहीरनाम्या पुरतं लिव्हणार हो हे

..3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.....

प्रकाशाचं जग अढवलं, राज्य अंधारात बुडवलं, आता काय दिवे लावणार हो हे

ईद्यार्थ्यांचे अभ्यास बुडले

शेतकरी बंधू फासावर चढले,

प्रगतीचे व्यवहार झाले ठप्प

शेतीऐवजी डोळे भिजले

ईकासाचे तीनतेरा वाजले तरी समद्यांनी बसायचं व्हंय गप्प

प्रकाशाचं जग अढवलं, राज्य अंधारात बुडवलं, आता काय दिवे लावणार हो हे

आश्वासनं तोंड भरुन

तोंड देखल्या घोषणा करुन

नंतर झुलवत ठेवणार हो हे

प्रकाशाचं जग अढवलं, राज्य अंधारात बुडवलं, आता काय दिवे लावणार हो हे

यानंतर कुमारी जयश्री.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.....

ही कविता मी लिहिलेली नाही, परंतु ज्याने कोणी ही कविता लिहिलेली आहे, फारच सुंदर कविता आहे यामध्ये फार चांगले वर्णन केलेले आहे. ही कविता एका उत्तम कवीने लिहिलेली आहे. त्याचे नाव जाहीर करावयाचे की नाही ? याचा मी विचार करीत आहे.

श्री.दिवाकर रावते : सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी साहेब आपण कवीचे नाव जाहीर करावे.

श्री.नितीन गडकरी : श्री.हृषिकेश परांजपे, सदर गृहस्थ हे पुण्यात राहतात. अर्थसंकल्प सादर होण्याच्या दिवशी मी टी.व्ही.वर बोलण्याकरिता व्यासपीठावर गेलो असता मी पाहिले की, अर्थसंकल्प सादर करणारे आपले माननीय अर्थ राज्यमंत्री डॉ.सुनील देशमुख यांचा सूट चांगला होता, डिझाईन चांगले होते, ते सोडल्यास बाकी काहीच सांगण्यासारखे नव्हते. मी आणि सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील आम्ही दूरदर्शनवर बोलण्याकरिता गेलो असता आम्ही पाहिले की, काही आमदार धापा टाकत टाकत येत होते. मी विचारले की, हे आमदार असे धावत धावत कुठे चालले आहेत ? तर मला उत्तर मिळाले की, तेथे अर्थसंकल्पाच्या बॅग मिळत होत्या, म्हणून ते धावत धावत जात आहेत. माझी माननीय अर्थ मंत्र्यांना विनंती आहे की, आपण ज्या बॅगा आम्हाला दिलेल्या आहेत, त्याऐवजी आम्हाला तुम्ही कंदील भेट म्हणून द्यावयाला पाहिजे होते. कारण लोड शेडींगमध्ये कार्यक्रम होतात,सभेमध्ये एकदम लाईट जातात. अत्यंत पुरोगामी,प्रगतीशील,समृध्द,संपन्न राज्याचे तुम्ही जे काही प्रमुख आहात त्या नात्याने तुम्ही आम्हाला एक कंदील भेट द्यावा. माननीय पूरके साहेब, आपल्या भागात 16 - 16 तास लोड-शेडींग होते, अमरावती जिल्हयामध्ये देखील 16 तास लोड - शेडींग होते, अशा वेळी तुमची आमची फजिती होते. सभेत लोड शेडींग असतांना प्रचाराला गेलो की, मला आता एक वाईट सवय जडलेली आहे ती अशी की, एखाद्या गायकाला जसे तबला,पेटी,व्हायोलिन,गिटार वाजत नाही तोपर्यंत त्याला गाण्यास स्फूर्ती मिळत नाही तसेच, माईकसमोर उभे राहिल्यावर जोपर्यंत माननीय विलासरावजी देशमुख यांचा ऑर्केस्ट्रा माझ्या कानावर येत नाही, तोपर्यंत माझ्या तोंडून शब्दच फुटत नाही. अशा या माननीय मुख्यमंत्र्यांच्या ऑर्केस्ट्राशी मी रुळलो आहे. तेव्हा तुम्ही आम्हाला एक टॉर्च व कंदील भेट म्हणून द्यावा.

श्री.दिवाकर रावते : मेणबत्ती पण चालेल.

श्री.अरविंद सावंत : मेणबत्ती नको कारण मेण हातावर पडेल. 3T - 2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुनील देशमुख : कंदील दिला तर रॉकेल कुठून आणणार ?

श्रीमती सुधा जोशी : बरोबर आहे, कंदील दिला तर रॉकेल कुठून आणणार ?

श्री.नितीन गडकरी : सन्माननीय मंत्री महोदय जी गोष्ट बोलले ती खरी गोष्ट आहे. कंदील मिळाला तर रॉकेल कुठून आणणार ? सन्माननीय सदस्या श्रीमती सुधाताईंनी देखील सदर गोष्टीशी सहमती दर्शविली आहे. त्या माझ्या ज्येष्ठ भगिनी आहेत. "अंधेरी रातमे दिया मेरे हातमे " असा प्रकारे आम्हा सगळयांना आपण कंदील भेट म्हणून द्यावा, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महाराज महाराष्ट्र राज्य कर्जबाजारी आहे. ज्यावेळी युतीचे सरकार गेल्यानंतर महाराष्ट्राचे अर्थमंत्री श्री.जयंत पाटील झाले, तेव्हा त्यांनी पहिले काम काय केले ? नागपूरच्या अधिवेशनामध्ये श्वेत - पत्रिका काढल्या.

यानंतर श्री.बोरले.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी .....

युतीच्या सरकारने महाराष्ट्राचे दिवाळे काढले असा प्रचार अर्थमंत्र्यांनी श्वेतपत्रिका काढून केला. युती शासनाने सत्ता सोडली तेव्हा महाराष्ट्रावर 39 हजार कोटी रुपयांचे कर्ज होते. ज्यावेळी युती शासन सत्तेमध्ये आले त्यावेळी राज्यावर 22 हजार कोटी रुपयांचे कर्ज होते. म्हणजे याचा अर्थ असा आहे की, युती शासनाने साडे सतराशे कोटी रुपयांचे कर्ज महाराष्ट्रावर वाढविले. माझे मित्र श्री.अरविंद सावंत यांनी सांगितले की, आम्ही उड्डाण पूल आणि रस्त्यांकरिता कर्ज काढले. मी आपल्याला सांगू इच्छितो की, आमच्या सरकारने आम्ही उड्डाण पूल आणि रस्त्यांकरिता कर्ज काढले नाही. एम.एस.आर.डी.सी. चे बाँड काढून आम्ही कर्ज काढले. मला सांगण्यास आनंद होतो की, टोलच्यामाध्यमातून पैसे गोळा करुन हे कर्ज परत केले. आता हे कर्ज फिटलेले आहे. आम्ही सत्ता सोडली तेव्हा राज्यावरत 39 हजार कोटी रुपयांचे कर्ज होते. आज तुमच्या काळामध्ये राज्यावर 1 लाख 44 हजार कोटींच्यावर कर्ज आहे. सभापती महोदय, माननीय अर्थमंत्र्यांनी कर्जाच्या आकडेवारी संदर्भात जे भाषण केले ते दिशाभूल करणारे आहे. सन 2000-01 मध्ये राज्यावर 50,314 कोटी रुपये कर्ज होते. ते राज्याच्या स्थूल उत्पन्नाच्या 20.1 टक्के होते. सन 2001-02 मध्ये राज्यावर 59,870 कोटी रुपये कर्ज होते. ते राज्याच्या स्थूल उत्पन्नाच्या 22.1 टक्के होते. सन 2002-03 मध्ये राज्यावर 68,971 कोटी रुपये कर्ज होते. ते राज्याच्या स्थूल उत्पन्नाच्या 23 टक्के होते. सन 2003-04 मध्ये राज्यावर 97,673 कोटी रुपये कर्ज होते. ते राज्याच्या स्थूल उत्पन्नाच्या 28.9 टक्के होते. सन 2005-06 मध्ये राज्यावर 1 लाख 25 हजार 373 कोटी रुपयांचे कर्ज होते. ते राज्याच्या स्थूल उत्पन्नाच्या 29.9 टक्के होते. सन 2006-07 मध्ये राज्यावर 1 लाख 34 हजार 969 कोटी रुपये कर्ज होते. ते राज्याच्या स्थूल उत्पन्नाच्या 26.7 टक्के इतके होते. आज राज्यावरील कर्ज 1 लाख 44 हजार कोटी रुपये झालेले आहे. म्हणजे कर्जामध्ये 10 हजार कोटी रुपयांची वाढ झालेली आहे. महाराष्ट्र राज्यावर आज 1 लाख 44 हजार कोटी रुपये कर्ज आहे. म्हणजे स्थूल उत्पन्नाच्या जवळ जवळ 29 ते 30 टक्के कर्ज महाराष्ट्र राज्यावर आहे. सभापती महोदय, शिक्षकांच्या व्यवसायातून तुम्ही निवृत्ती घेतलेली आहे. तुम्हाला आता पेन्शन मिळत असेल. मी आपल्या माहितीसाठी सांगतो की, महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक माणसाच्या डोक्यावर 7,548 रुपये कर्जाचा बोजा आहे. एका वर्षात राज्यावरील

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी .....

कर्ज 9,931 कोटी रुपयांनी वाढलेले आहे. ही कर्जाची रक्कम कोठे खर्च केली ? कोणत्या योजनांवर खर्च केली ? राज्यावरील कर्ज का वाढले ? युती शासनाने 17.50 कोटी रुपयांनी कर्ज वाढविले. युती शासनाने राज्य कर्जबाजारी केले, राज्याचे दिवाळे काढले अशी श्वेतपत्रिका काढली गेली. आम्ही राज्यावर 17.50 कोटी रुपयांचे कर्ज केले, हे आम्हाला मान्य आहे. तुम्ही किती दिवे लावले ? शासनाने या पैशांचे काय केले ? याबाबतची श्वेतपत्रिका शासन का काढत नाही. महाराष्ट्रातील जनतेला शासन यासंदर्भातील माहिती का देत नाहीत ? फक्त सुंदर डिझाईनचा कोट घालून, खिशाला गुलाबाचे फुल लावून, गुलाबाच्या फुलाचे काटे खिशात लपवून खोटी आश्वासने दिली जातात. डॉ.बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराज यांची नावे घेऊन तुमचे लक्ष्मी दर्शन सुरु आहे. ही गांधीगिरी सुरु आहे काय ?

यानंतर श्री.गागरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी .....

सभापती महोदय, प्रत्येक नागरिकावर 14 हजार रुपयापेक्षा जास्त कर्जाचा बोजा आहे. सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी म्हणाले की, कर्जाच्या बोजाबाबत चिंता करण्याचे कारण नाही. मला हे माहिती नाही की त्यांनी कोणत्या आधारावर हे विधान केले आहे.

सभापती महोदय, 2006-2007 च्या अर्थसंकल्पात 510 कोटी रुपयांची महसूली शिल्लक दाखविण्यात आलेली आहे. दिनांक 21.3.2007 रोजी महाराष्ट्र सरकारने लोकसत्ता दैनिकात एक जाहिरात दिलेली आहे. 7,37,603 कोटी रुपये किंमतीचे 10 वर्ष मुदतीचे "डेटेड सिक्युरीटीज बॉंड" लिलावासाठी बाजारात आणले आहे. रिझर्व बँकेने याकरिता परवानगी दिलेली आहे. महाराष्ट्राचा अर्थसंकल्प सादर करण्याच्या एक दिवस आधी ही जाहिरात वर्तमानपत्रात छापली होती. प्रत्येक कर्जरोख्याची किंमत 10 हजार रुपये आहे, या बॉंडचा फोर्ट येथे लिलावसुध्दा करण्यात आला. कर्ज काढून दिवाळी साजरी करण्यात येत आहे. सेंट्रल किटी फंडमधून किती रक्कम मिळाली आहे, याची माहिती मिळाली नाही. माननीय अर्थमंत्री सांगत आहेत की, शिलकीचा अर्थसंकल्प आहे. सरकार कर्ज घेऊन शिलकीचा अर्थसंकल्प सादर करीत आहे. शिलकीचा अर्थसंकल्प सादर करावयाचा आणि दुसरीकडे कर्जरोखे काढून पैसे आणावयाचे. या वर्षी 8479 कोटी रुपये शिल्लक राहतील, 890.33 कोटी एवढी तूट राहील, असे सांगितले आहे, कशासाठी तुम्ही खोटी आश्वासने देत आहात. राज्याच्या स्थूल उत्पन्नात 9.3 टक्क्यांची वाढ अपेक्षित असल्याचे दर्शवितानाच 2007-08 मध्ये महसूली जमेत 13.33 टक्के वाढ अपेक्षित असल्याचे अर्थसंकल्पात सांगितले आहे.

सभापती महोदय, सात वर्षात अर्थसंकल्प मांडताना जेवढी आकडेवारी सांगितली आहे, त्यापैकी एक तरी आकडा खरा ठरला आहे का ? माननीय अर्थमंत्री सभागृहात व बाहेर जे आकडे व अंदाज सांगतात त्यापैकी एकतरी आकडा व अंदाज खरा ठरला आहे काय ? ही माहिती सांगण्याचे मी त्यांना जाहीर आव्हान देत आहे. याबाबत मी सांगू इच्छितो की, शासन जनतेची दिशाभूल करीत आहे.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.....

सभापती महोदय, प्रत्येक वर्षी अर्थसंकल्प मांडताना राज्याचा आर्थिक पाया मजबूत करण्याचा आपण प्रयत्न केला आहे, असे माननीय अर्थमंत्री सांगत आले आहेत, हे सांगताना त्यांना नेहमी आनंद होतो. मंत्रालयावर किती वेळा जप्ती आलेली आहे हे सांगावे, मात्र मंत्रालयावरील जप्ती ते थांबवू शकलेले नाहीत. राज्यावरील कर्जाचा बोजा ते कमी करु शकले नाहीत, महाराष्ट्र हे एक कर्जबाजारी राज्य झाले आहे, ही सत्य परिस्थिती आहे. महाराष्ट्राचे वाटोळे केले जात आहे. देशात महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर होता, तो आता सहा क्रमांकावर गेलेला आहे, महाराष्ट्रात 16-18 तास लोडशेडींग केले जात आहे. उद्योगधंदे महाराष्ट्राबाहेर चालले आहेत. बेरोजगारांची संख्या वाढली आहे. 3000 पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. महाराष्ट्रात उद्योगधंदे वाढावेत यासाठी त्यांना आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध होत नाहीत.

सभापती महोदय, अर्थसंकल्पात 2000-01 ते 2006-07 या विविध आर्थिक योजनेची आकडेवारी व आकारमान सांगितले जात आहे, त्याचा वस्तुस्थितीचा काहीही संबंध नाही. त्याबाबत प्रत्यक्ष झालेला खर्च मी सांगत आहे. 2000-2001 मध्ये 12330 कोटीच्या वार्षिक योजनेवर 11601.45 कोटी प्रत्यक्ष खर्च झालेला आहे. 2001-02 मधील 11720 कोटीच्या वार्षिक योजनेवर 10,009.80 कोटी प्रत्यक्ष खर्च झाला आहे. 2002-03 मधील 11,135.37 कोटीच्या वार्षिक योजनेवर 7538.66 कोटी प्रत्यक्ष खर्च झालेला आहे. 2004-05 मधील 19,983.30 कोटीच्या वार्षिक योजनेवरील प्रत्यक्ष खर्चाचे आकडे माझ्याकडे उपलब्ध नाहीत. 2005-06, 2007-08 मध्ये प्रत्यक्ष खर्चाचे आकडेही माझ्याकडे नाहीत. 2006-07 च्या 14,829 कोटीच्या वार्षिक योजनेवर 12,777.42 कोटी प्रत्यक्ष खर्च झालेला आहे.

यानंतर श्री.सुंबरे.....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपी नोंद

श्री. गडकरी .....

तुम्ही येथे मोठमोठी स्वप्ने रंगविता, घोषणा करता. पण प्रत्यक्षात मात्र काहीच केलेले नाही. याचा अर्थ तुम्ही जवळपास 2 हजार कोटी रूपयांची बजेटमधील कामे विकास योजनांतून करूच शकला नाहीत. मागील वर्षीच्या तुमच्या वार्षिक योजनेतील 14,829 पैकी जवळपास आजवर 17-18 टक्के कामेच तुमची झालेली नाहीत. मग कशाला खोट्या घोषणा करता ? तुमचा परफॉर्मन्स काय आहे ते तुम्हीच पहा. तुम्ही इन्फ्रास्ट्रक्चरवर फार प्राधान्य दिले. पण प्रत्यक्षात ते बाजूलाच राहते. माझ्याकडे तुमच्या बांधकाम मंत्र्यांचे, नामदार श्री.छगन भुजबळ यांचे एक स्टेटमेंट आहे. ते म्हणाले की, माझ याकडे 400 कोटी दिले आहेत. पण मी त्यातून खड्डे देखील बुजवू शकत नाही, मग रस्ते बांधणे दूरच राहिले. ही आपल्या बांधकाम मंत्र्यांची प्रतिक्रिया आहे. तुमच्या गृहमंत्र्यांनी काय सांगितले आहे ? नक्षलग्रस्त भागामध्ये उपाययोजना करताना पूरक योजना करता येत नाही याबद्दल खंत वाटते असे ते म्हणाले आहेत. म्हणजे काही लोक बोलतात, काही मनात ठेवतात इतकेच. रस्त्यांना पडलेले खड्डे देखील आपण आपल्या बजेटमधील तरतुदीतून करू शकणार नाही अशी आज आपली स्थिती आहे. सभापती महोदय, युती सरकारच्या काळातील विकास खर्च आणि विकासेतर खर्च तसेच आघाडी सरकारच्या काळातील विकास खर्च आणि विकासेतर खर्च यांची आकडेवारी माझ याकडे आहे. ती मी आपल्याला येथे या निमित्ताने सांगू इच्छितो. युती काळामध्ये आमचा विकासेतर खर्च सांगावयाचा तर पहिल्या वर्षी 24 टक्के, नंतरच्या वर्षी 27.42 टक्के, त्यानंतरच्या वर्षी 32.22 टक्के असा विकासेतर खर्च होता आणि आघाडी सरकारच्या काळामध्ये 2000-01 मध्ये 45.11, 2001-02 57.10, 2002-03 मध्ये 54.40, 2003-04 मध्ये 89.02, 2004-05 मध्ये 89 आणि 2005-06 मध्ये 80.08 टक्के आणि 2006-07 मध्ये 80.08 टक्के इतका विकासेतर खर्च आहे. म्हणजेच तुमचे 80 टक्के बजेट हे विकासेतर खर्चामध्ये जाणार आहे आणि मग उरले किती ? तर अवघे 20 टक्के. अंधेरी रात मे दिया तेरे हात मे अशी अवस्था आहे. सभापती महोदय, या शासनाने मध्यंतरी घोषणा केली होती की, मुंबईच्या समुद्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा मोठ्ठा पुतळा बसविणार. पण पुढे या बाबत काय झाले ? काहीही नाही. राज्यातील सहा जिल्ह्यांमध्ये सामूहिक विवाह योजना तुम्ही हाती घेतली. चांगली गोष्ट आहे. मी तिचे स्वागत करतो.

..... 3डब्ल्यू 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गडकरी .....

सभापती महोदय, गृहनिर्माणासाठी 21 कोटी रूपये खर्च आपण करीत आहात. पण तो खर्च न करता देखील 500 कोटींची घरे आपण बांधू शकता. आपण केवळ जागा घ्या, आणि त्यावर घरे बांधण्यासाठी हौसिंग लोन घ्या. ज्यांना आपण ही घरे देणार त्यांच्या घरभाड्यातून त्याचे पैसे परत करा. त्यासाठी आपल्या मूळ बजेटमधील पैसे कशासाठी तुम्ही खर्च करता ? आपल्याला 'To save money is to earn money' हे माहीत आहे ना ? या गृह निर्माणासाठी टर्म की बेसिसवर हुडको कडून पैसे घ्या, तुमचा पैसा त्यासाठी कशासाठी खर्च करता ? त्यासाठी ती जागा मॉर्गेज करा. चांगल्या मोठ्या कंपनीला हे काम द्या. घरे बांधा. आपण आपल्या बजेटमधील पैसे तेथेच खर्च करा की, जेथे तुम्हाला अन्य मार्गाने पैसा उपलब्ध होऊ शकत नाही. परंतु आपण तसे काही करीतच नाही, त्यामुळे तुमचे धोरण काय आहे हे कळत नाही. तेव्हा यासाठी तुमचे स्वत:चे पैसे खर्च न करता बाहेरचे पैसे उपलब्ध होतील त्यातून आपण हा खर्च का करीत नाही ?

सभापती महोदय, वीज निर्मितीसाठी आपण काही कंपन्यांबरोबर सामंजस्य करार केले आहेत. मी तर म्हणेन की, तुम्ही कशासाठी जनतेला मूर्ख बनवित आहात ? तुम्ही विजेसाठी 8 कंपन्यांशी करार केला आहे, ते सारे माझ्याकडे आहे. याबाबत नेमकी काय परिस्थिती आहे ?

(सभापतीस्थानी - तालिका सभापती श्री. अरविंद सावंत)

त्या कंपन्यांची नावे माझ्याकडे आहेत. राष्ट्रीय वितरण कार्यक्रमाला आलेल्या देशाच्या पंतप्रधान श्री.मनमोहन सिंग यांनी महाराष्ट्रातील लोडशेडींगवर गंभीर चिंता व्यक्त करून म्हटले आहे की, ऐन परीक्षेच्या काळात इतक्या मोठ्या प्रमाणात लोड शेडींग महाराष्ट्रात होत आहे ही बाब अत्यंत चिंताजनक असून राज्य सरकारने याबाबत आत्मचिंतन करावे असा उपरोधिक सल्लाही दिला आहे. याचा अर्थ राज्यातील राज्य सरकार याला जबाबदार असल्याचे त्यांनी लक्षात आणून दिले आहे. ..

(यानंतर श्री. सरफरे ..... 3 एक्स 1 ...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

सभापती महोदय, मी मघाशी सांगत होतो की, याठिकाणी ज्या आठ कंपन्यांबरोबर करार झाला त्यामध्ये रिलायन्स आणि टाटाला एकच जागा दिली. त्यासाठी फायनान्शिअल क्लोजर नाही, फॉरेस्ट एन्व्हायरलमेंट क्लिअरन्स नाही, पॉवर पर्चेस ॲग्रिमेंट नाही आणि लँड ॲक्विझिशन नाही. वीजेचे प्रकल्प कोठून आणणार? महाराष्ट्राची चेष्टा करीत आहात काय? यावर्षी एन्रॉनची वीज मिळणार म्हणून आपण घोषणा केली. केव्हा येणार आहे वीज? आपण घोषणा केली की, एप्रिल मध्ये वीज येणार आहे, ऑक्टोबरमध्ये वीज येणार आहे. आपण महाराष्ट्रातील जनतेची कशासाठी दिशाभूल करीत आहात? राज्यात 5 हजार मेगावॅट वीजेची टंचाई आहे. सहयाद्रीवर 13 हजार कोटींचा करार केल्याचे म्हटले, त्याची चर्चा झाली. माननीय ऊर्जामंत्री श्री.दिलीप वळसे पाटील यांनी सभागृहामध्ये निवेदन केले की, "मला सभागृहाला सांगावयास अतिशय आनंद होत आहे की, महाराष्ट्र सरकारने 13 हजार कोटींच्या वीज प्रकल्पाच्या इरादा पत्रावर सही केली आहे". कशाचे इरादा पत्र? ते कचऱ्याच्या टोपलीत फेका. तुम्ही आम्हाला मूर्ख बनविता? त्या इरादा पत्राची पुंगळी करा... केंद्राची लुंगी आणि महाराष्ट्राची पुंगी... आम्हाला कशासाठी मूर्ख बनविता? याठिकाणी माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते म्हणाले. ते या सरकारला चार वेळा सल्ला कशासाठी देतात? आपण असे करु नका. राज्य कोणत्याही पक्षाचे असो, जर वीज नसेल तर हे राज्य मागे जाईल, शेतकरी आत्महत्त्या करतील, विद्यार्थ्यांचे भविष्य उद्ध्वस्त होईल, उद्योग राज्याबाहेर जातील. यामधील खरी मेख अशी आहे की, या सरकारने माननीय मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांच्या आदेशाने राज्याचे वीज मंडळाचे तत्कालीन अध्यक्ष श्री. विनय बन्सल यांनी मुंबई हायकोर्टामध्ये ॲफिडेव्हिट केले. माझे जर यामध्ये चुकत असेल तर मी सभागृहाची माफी मागीन. महाराष्ट्रामध्ये वीज सरप्लस आहे अशाप्रकारचे ॲफिडेव्हिट त्यांनी केले. भविष्य काळासाठी जेवढी वीज लागेल तेवढी भरपूर वीज आपल्याकडे आहे, राज्यात वीज टंचाई नाही. अशाप्रकारचे खोटे ॲफिडेव्हिट या सरकारने मुंबई हायकोर्टामध्ये केले. मला आठवते की, भद्रावती येथील प्रकल्पासाठी इस्पातबरोबर करार करण्यात आला, तो नंतर रद्द करण्यात आला. तुम्ही त्या काळात परळी, खापरखेडा, चंद्रपूर, भुसावळ, नाशिक येथील एक्सटेंशन प्रकल्प मंजूर केले. तेव्हापासून आपण पुन्हा पुन्हा सांगत आहात की, आम्ही प्रगतीपथावर आहोत. महाराष्ट्राला सरप्लस वीज मिळणार आहे. आमच्या मुलांची नावे कशासाठी घेता? तुमची किती मुले आहेत ते सांगा? गेल्या सात वर्षामध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

महाराष्ट्रामध्ये तुम्ही किती प्रकल्प उभे केले? किती प्रकल्पांचे भूमिपूजन केले, किती प्रकल्पांचे काम सुरु केले? किती प्रकल्पांचे पॉवर प्रोजेक्ट ॲग्रिमेंट केले? आपणाकडून महाराष्ट्राची दिशाभूल होत आहे. बिहार राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी बोलाविल्यामुळे मी बिहारला गेलो होतो. त्यांनी सांगितले की, आमच्या राज्यात 9 तास लोड शेडींग आहे, उत्तर प्रदेशामध्ये 8 तास लोड शेडींग आहे, आमच्या महाराष्ट्रामध्ये 16 तास लोड शेडींग आहे. आणि हे सुंदर सरकार वरुन असे सांगते की, एवढा अंधार असला तरी लोक आम्हाला मते देतात की नाही? तुम्ही अजून लोड शेडींग वाढवा, शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या वाढवा, जनतेला खड्डयामध्ये घाला, तरुणांचे रोजगार हिसकावून घ्या. तुमच्याकडे नाशिकचे सिक्युरिटी प्रेस आहे. खोटया नोटा छापण्याचा कारखाना राष्ट्रवादी कॉंग्रेसने केला. तुमच्या कऱ्हाड, सांगली येथे मोठया प्रमाणावर खोटया नोटा मिळाल्या. त्यामध्ये तुमच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसचा कार्यकर्ता पकडला गेला होता. याबाबतची माहिती माननीय उप मुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील यांना असेल...

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी (पुढे सुरू..

लोड शेडींग असले तरी हे 5 हजार रुपये घ्या आणि मत द्या, असा प्रकार केलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी साहेब आपण उपस्थित झाला, बरे झाले. आपलीच मी वाट पहात होतो. 3 हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. निवडणुकीमध्ये मतदारांना लक्ष्मीदर्शन दिलेले आहे. आपली काय फिलॉसॉफी आहे, ? हे समजत नाही.

श्री.गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की,परवा जिल्हापरिषद, पंचायत समितीच्या निवडणुकांमध्ये जे एकूण राज्यामध्ये मतदान झाले ते मतदान सर्व पक्षांच्या तुलनेमध्ये अडीच टक्के मते ही राष्ट्रवादी पक्षाला जास्त मिळालेली आहेत. 102 पंचायत समित्यांमध्ये राष्ट्रवादी पक्ष निवडून आलेला आहे.

श्री.नितीन गडकरी : 18 तास लोड शेडींग होते, तरी देखील लोक तुम्हाला निवडून देतात, हे नाकारत नाही. परंतु एवढ्या प्रतिकूल परिस्थित लोक मत देतात याचाच अर्थ अंधारामध्ये लक्ष्मी दर्शन केले जाते. "अंधारातले लक्ष्मी दर्शन" असे एक नाटक लिहिले पाहिजे. त्याचे दिग्दर्शक हे गुरुनाथ कुलकर्णी करतील. "अंधेरी रात मे दिया तेरे हात मे", अशी परिस्थिती आहे. मी एकच गोष्ट सांगतो की, टेंडर काढून पावर प्रोजेक्ट करता येणार नाही. त्या ठिकाणी बसलेले अधिकारी सांगतात की, एन्रॉन प्रकल्पाचे टेंडर काढल्याशिवाय प्रोजेक्ट सुरू करणार नाही. सभापती महोदय, राज्य चालविण्यासाठी हिंमत लागते. पावर प्रोजेक्टसाठी टेंडर काढता येत नाही. मंत्री महोदयांनी निर्णय केला पाहिजे की, कॅबीनेट सब कमिटी तयार करून अधिकाऱ्यांनी घेतलेला निर्णय ओव्हर रूल केला पाहिजे. एखाद्याने 4 हजार कोटी रुपयाचा प्रोजेक्ट घेतला आणि आपण त्याच्याकडून वीज घेत नाही, असे म्हटले तर त्यांनी काय करायचे ? टेंडर काढून पावर प्रोजेक्ट करायचे म्हटले तर ते येऊ शकत नाहीत. सन्माननीय श्री.पवार साहेबांनाही ते मान्य आहे. पर मे.वॅट कॅपिटल इन्व्हेस्टमेंट किती करणार आहोत आणि त्याचे रिटर्न किती मिळणार आहेत ? हे एकदा पक्के केले पाहिजे. मग 2 रुपये 40 पैसे, 2 रुपये 60 पैशांनी वीज देऊ शकतील. त्यामध्ये ज्यांचा कमी दर असेल त्यांना आपण काम देऊ शकू, हा मार्ग निघू शकेल. वीज मंत्री महोदय यामध्ये चांगले काम करतील असे वाटले होते. परंतु त्यांच्या डोक्यातून टेंडरचे भूत काही उतरले नाही. सात वर्षामध्ये विजेची निर्मिती काही झाली नाही. आज 5000 मे.वॅ.विजेची टंचाई आहे. दरवर्षी 10 टक्क्यांनी विजेची मागणी वाढत आहे. आम्ही विजेचे प्रकल्प

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

श्री.नितीन गडकरी (पुढे सुरु...

सुरू केले. आमचे प्रकप आपण पूर्ण केले. 2008 साली 6700 मे.वॅ. विजेची टंचाई होईल. मग आपण कोठून वीज एक्सपोर्ट करणार आहोत ? सन्माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख अमेरिकेला उद्योगपतींना महाराष्ट्रामध्ये आणण्यासाठी गेले होते. सन्माननीय मंत्री श्री.पतंगराव कदम हे कुलपती आहेत, ते ज्येष्ठ आहेत. ते सुध्दा उद्योगपतींना महाराष्ट्रात आणण्यासाठी अमेरिकेला गेले होते. सन्माननीय श्री. विलासराव देशमुख यांनी 950 कोटी रुपयाची गुंतवणूक आणली. तसेच सन्माननीय उद्योग मंत्री श्री.अशोक चव्हाण हे देखील गुंतवणूक आणण्यासाठी अमेरिकेला जाऊन आले. परंतु ज्या राज्यामध्ये वीज नाही. त्या राज्यात 500 कोटीची गुंतवणूक करण्यास उद्योगपतींना कुत्रे चावले आहे काय ? आपण त्यांना वीज देऊ शकत नाही तर ते उद्योग कसे आणणार ? ते उद्योग येऊ शकत नाहीत. मुंबईतील एसईझेड बाबतीत सांगतो. परंतु एसईझेड यवतमाळ, वर्धा, अकोला, चंद्रपूर, गडचिरोली, सिंधुदूर्ग तसेच मागासलेल्या भागामध्ये निर्माण होणार नाहीत. त्यामुळे त्या ठिकाणी उद्योग येणार नाहीत. ज्या सवलती मागासलेल्या भागात मिळावयास पाहिजे...

यानंतर श्री.बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

त्या सवलती मुंबईपासून 200 किलोमीटरच्या आत मिळणार असतील तर मुंबईतील उद्योगपती स्वत:ची गुंतवणूक घेऊन महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात विकास करण्यासाठी कधीही जाऊ शकणार नाहीत. ज्या ठिकाणी विकास झाला आहे त्याच ठिकाणी विकास आणि ज्या ठिकाणी उद्योग आहे त्याच ठिकाणी उद्योग येतील अशी परिस्थिती होईल. ज्या ठिकाणी उद्योग आहे त्याच ठिकाणी एस.ई.झेड. हे काय सुरु आहे ? महाराष्ट्रातील मागासलेल्या माणसांच्या व्यथा तुम्ही कधी समजून घेणार की नाही ? वीज चंद्रपूर, कोराडी, खापरखेडा या ठिकाणी तयार होते परंतु तेथील आजूबाजूच्या गावांमध्ये लोड शेडींग आहे. जर आमच्या भागात उद्योग येणार नसतील, जर आमच्या जिल्ह्यातील तरुणांना रोजगार मिळणार नसेल, जर राज्याचा समतोल विकास होणार नसेल तर या राज्याचे आम्ही काय करावयाचे हे आपण आम्हाला सांगावे. आज शेतकरी आत्महत्या करीत आहेत. मी खरी गोष्ट सांगतो. मी डेअरी सुरु केली. साडेबारा हजार लीटर दूध रोज विकतो. आम्हाला दीड हजार लीटर डिझेल लागते. त्यामुळे डेअरीमध्ये तोटा झाला. आम्ही हरभरा, चणा हे पीक लावले परंतु 18 तास लोड शेडींग आहे. या ठिकाणी माननीय मंत्रिमहोदय श्री. पुरके साहेब उपस्थित आहेत त्यांनी सांगावे. माझे चुकत असेल तर मी माफी मागतो. आपल्या भागामध्ये हिवाळी गहू लावला तसेच रब्बीच्या पिकांची काय स्थिती आहे हे आपण सांगावे. विहिरीवर कर्ज आहे. पंपावर कर्ज आहे. व्याजाचा मीटर चालू आहे परंतु विजेचा मीटर बंद आहे. त्या ठिकाणी गव्हाचे पीक बरोबर नाही. शेतकऱ्यांना ऊस लावावयास सांगितला तर लोकांनी विचारले की, वीज कोठून देणार ते आधी सांगावे. मी त्यांना सांगितले की, मी काही करु शकत नाही. डिझेलच्या भावामुळे डिझेल परवडत नाही. जर आम्ही विजेपेक्षा डिझेलवर काम चालविले तर विजेपेक्षा डिझेलचा खर्च चारपट जास्त वाढतो. आम्ही काय करावयाचे ? शेतकरी कसा जिवंत राहणार ? शेतकरी आत्महत्या करणार नाही तर काय करणार ? त्यांनी जर एक एकराचे ओलीत केले तर त्याचे उत्पन्न अडीचपट वाढते. या ठिकाणी चंद्रपूर जिल्ह्यातील सन्माननीय सदस्य उपस्थित आहेत त्यांनी सांगावे. चंद्रपूर, भंडारा, गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये तलाव आहेत. त्या ठिकाणी पाणी आहे परंतु ते पाणी उचलण्यासाठी वीज नाही. ही आमची शोकांतिका आहे. त्यामुळे आज शेतकऱ्यांना आत्महत्येशिवाय दुसरा कोणताही पर्याय राहिलेला नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ....

सभापती महोदय, या अर्थसंकल्पामध्ये मुंबईच्या विकासाच्या गप्पा मारलेल्या आहेत. मुंबईचे शांघाय करण्याची योजना आली होती. मागच्या वेळी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये मुंबईच्या विकासाची योजना सादर झाली होती. मी सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांना सांगू इच्छितो की, मुंबईचे शांघाय करावयाचे तर सोडाच पण मुंबईचे व्हेनिस मात्र जरुर केलेले आहे. नॅशनल अर्बन रिन्युअल मिशन अंतर्गत माननीय केंद्रिय वित्तमंत्री श्री. चिदंबरम साहेबांनी 8 हजार कोटी रुपये वेगळे ठेवले होते आणि त्यातील अडीच हजार कोटी रुपये मुंबईच्या विकासाकरिता देण्यात येतील असे त्यांनी सांगितले होते. नॅशनल अर्बन रिन्युअल मिशनच्या या अडीच हजार कोटी रुपयांपैकी आपल्याला एक रुपया तरी मिळालेला आहे काय ? आपल्याला काहीही मिळालेले नाही. राज्यात अतिवृष्टी झाली, पूर आले त्यावेळी मुंबईकरिता साडेअकरा हजार कोटीचे प्रकल्प पाठविले. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांना सांगू इच्छितो की, ज्यावेळी पाऊस कमी झाला आणि पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी अडचणीत आले, गुरांच्या छावण्या काढल्या त्यावेळी तत्कालीन पंतप्रधान श्री. अटलबिहारी वाजपेयी यांनी 1250 कोटी रुपयांची मदत केली. त्यावेळी समोरच्या बाकांवरील लोक पोपटपंची करत फिरत होते की, श्री. अटलबिहारी वाजपेयी यांनी पश्चिम महाराष्ट्राला मदत केली नाही. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी, मुंबईचे 12 हजार कोटी रुपयांचे प्रस्ताव आणि महाराष्ट्राकरिता 13 हजार कोटी रुपयांचे प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठवले त्यातील आपल्याला किती पैसे मिळाले ? हे सांगण्याची आपली हिंमत आहे काय ? या ठिकाणी केंद्र सरकार तुमचे आहे. केंद्रिय कृषी मंत्री तुमचे आहेत. माननीय पंतप्रधान तुमचे आहेत. दिल्लीत या राज्याचे 7-7 मंत्री आहेत. माननीय श्री. शरद पवार साहेबांना जागतिक क्रिकेटचे अध्यक्ष व्हावयाचे आहे. त्यांनी ते जरुर व्हावे. आता आपल्या क्रिकेटचा बोऱ्या वाजला आहे. जहाँ जहाँ पैर पडे संत के, वहाँ वहाँ हुआ बंटाधार अशी परिस्थिती आहे. या ठिकाणी शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. श्री. शरद पवार साहेब क्रिकेटमध्ये गेले आणि आपले क्रिकेट लंबे झाले. खरे म्हणजे श्री. शरद पवार साहेबांनी कृषी मंत्री होण्याऐवजी क्रीडा मंत्री व्हावयास पाहिजे होते. श्री. मार्टीन यांचे म्हणणे बरोबर आहे. त्यांनी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

सांगितले की, विदर्भात जा. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांकडे जा. हे सांगण्यासाठी त्यांनी यांना तिकडे ढकलले होते. मला मिडियाच्या बाबतीत आश्चर्य वाटते. टी. व्ही. चालू केला तर तीन-तीन तास क्रिकेटवरच कार्यक्रम चालू असतो. मुंबईच्या वर्तमानपत्रांमध्ये सुध्दा तसेच पाहतो. आमच्या विषयांशी त्यांना काही घेणे-देणे नाही. वर्तमानपत्राच्या पहिल्या पानावर क्रिकेटबाबतच छापलेले असते. सेहवाग राहणार की जाणार ? तेंडूलकरचे काय झाले ? याबाबतच बातम्या दिलेल्या असतात. मी स्वत: क्रिकेट खेळलो आहे. मी रणजी ट्रॉफीच्या ट्रायलपर्यंत गेलो होतो. शालेय पातळीवर मी क्रिकेट खेळलो आहे. या ठिकाणी शेतकरी आत्महत्या करीत आहेत परंतु सरकार गंभीर नाही.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. नितीन गडकरी...

काल मी जे बोललो ते माननीय मुख्यमंत्र्यांना लागले आणि ते लातूरला गेले. ऑक्टोबरमध्ये ऊसाचा सिझन सुरु होतो. डॉ. पतंगराव कदम हे सहकार मंत्री आहेत. तुम्हाला तो कारखाना दोन महिने आधी मिळाला असता. तो कारखाना तुम्ही ऑक्टोबर महिन्यामध्ये सुरु केला. 1 लाख 80 टन ऊसाचे क्रशिंग व्हायला पाहिजे होते. हे क्रशिंग केले असते तर शेतक-यांनी आत्महत्या कशाला केल्या असत्या ? तुमच्याकडे सरप्लस ऊस असताना तो कारखाना तुम्हाला उशिरा मिळाला. परिणामी चार शेतक-यांनी आत्महत्या केली. या शेतक-यांनी आत्महत्या केल्यानंतर तुम्ही त्या ठिकाणी धाव घेतली. राज्यातील शेतकरी आत्महत्या करीत असताना, राज्यामध्ये सरप्लस ऊस असताना आपण बाहेरच्या राज्यातून ऊस आणता हे योग्य आहे काय ? ज्या भागामध्ये भा.ज.प.चा प्रभाव आहे, विरोधी पक्ष आहे त्या भागातील ऊस घ्यावयाचा नाही हे कोणते राजकारण आहे ? माझी माननीय केन्द्रीय कृषी मंत्री श्री. शरद पवार यांना विनंती आहे. त्यांनी क्रिकेट कंट्रोल बोर्डाचा राजीनामा द्यावा आणि सगळे लक्ष महाराष्ट्रातील शेतक-याच्या विकासावर केन्द्रीत करावे. राज्यातील साखर कारखानदारी, ऊस उत्पादक शेतकरी, कापूस उत्पादक शेतकरी, सोयाबीन उत्पादक शेतकरी याना दिलासा देण्याचे प्रयत्न करावेत. माननीय अर्थमंत्र्यांनी सांगितले की, बजेट वाढले. कशाचे बजेट वाढले ? ऊसाच्या संदर्भात बजेट वाढले की कापसाच्या संदर्भात ते वाढले ? जे काही बजेट वाढले त्यासंबंधीचे आकडे द्यावयास पाहिजेत. जो पर्यन्त तळागाळातील शेवटच्या माणसापर्यन्त पैसे मिळणार नाहीत तोपर्यन्त आपल्या बजेटचा काहीही उपयोग होणार नाही. माननीय पंतप्रधानांनी पॅकेज जाहीर केल्यानंतर राज्यातील शेतक-यांच्या आत्महत्येचे प्रमाण तीन पटीने वाढले. सरकारने सुप्रीम कोर्टात ॲफिडेव्हिट केले. सरकार तुमचे, कृषी मंत्री तुमचे, पंतप्रधान तुमचे, पीएमओ पॅकेजचे मॉनिटरींग करणार, अशी या पॅकेजच्या संदर्भात स्थिती आहे. 3750 कोटीचे पॅकेज जाहीर करण्यात आले. केन्द्रीय इण्टेलिजन्सच्या अधिका-यांनी मंत्रालयामध्ये येऊन पॅकेजच्या अंमलबजावणी संदर्भात सरकारला विचारणा केली. सभापती महोदय, महाराष्ट्रातील शेतकरी आज चिंतेच आहे. त्याला कोणीही वाली नाही. या बजेटमध्ये कमीत कमी शेतक-यांना दिलासा देण्यासारखे काही तरी असेल असे वाटत होते. परंतु तसे काहीच नाही.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. नितीन गडकरी...)

सभापती महोदय, गिरणी कामगारांची आज काय स्थिती आहे ? 61 गिरण्यांमध्ये अडीच लाख कामगार होते. 7 शासकीय गिरण्यांमध्ये 8 हजार कामगार होते. 23 मार्च 2001 रोजी डीसी रुल 1991च्या नियम 58(6)(बी)मध्ये दुरुस्ती करुन गिरणी मालकांना जमिनी विकण्यास परवानगी दिली. गिरणी कामगारांना रोजगार आणि निवारा देण्याच्या संदर्भात उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती श्री.बी.व्ही.चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली समिती निर्माण करण्यात आली. गेल्या 6 वर्षामध्ये या समितीने कोणतेही धोरणात्मक कार्य केलेले नाही. 375 कामगार अकाली मृत्यू पावले. हायकोर्टामध्ये जनहित याचिका क्रमांक 134/2006 दाखल करण्यात आली. याचिकाकर्त्याने गिरणी मालकांना जमिनी विकण्यास परवानगी का दिली, अशी विचारणा केली.. .मी मधल्या काळात मुंबईतील फिनिक्स मिल जवळील "आवाज" या टीव्ही चॅनलच्या कार्यालयात इंटरव्ह्यू देण्यासाठी गेलो होतो. त्याठिकाणी सगळीकडे मॉल्स उभे आहेत. 12 मजल्याचे कार पार्किंग आहे. श्रीमंतांची मुले त्याठिकाणी वातानुकुलित गाड्यांमधून बोलिंग खेळण्यासाठी येतात.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.....

हजारो कामगारांच्या पोटावर लाथ मारणारे हेच पुरोगामी, प्रगतीशील, डावे तुम्हीच का?

ॲड.गुरुनाथ कुळकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी हे अगदी तावातावाने बोलत आहेत. युती सरकारच्या काळात सुध्दा कामगारांचा, मिल कामगारांचा प्रश्न निर्माण झालेला होता. त्यावेळी 2.55 लाख गिरणी कामगार होते हे सर्वांना माहित आहे. जनतेने तुम्हाला संधी दिली होती ना? साडेचार वर्षे सत्ता तुमच्याकडे होती. या मिल कामगारांचा प्रश्न आज निर्माण झालेला नाही. युती सरकारच्या काळात सुध्दा मिल्स बंद पडलेल्या होत्या. 2.55 मिल कामगार बेकार झाले होते. तुम्ही सत्तेवर असताना काय दिवे लावले?

श्री.नितीन गडकरी : माझे मित्र सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुळकर्णी यांनी व्हॅलिड प्रश्न उपस्थित केला आहे. न्या.चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली आम्ही समिती नियुक्त केली होती. त्या समितीच्या टर्म्स ॲण्ड रेफरन्समध्ये सरकारकडून ही कमिटमेंट दिलेली होती की, गिरणी कामगारांची घरे बांधायची आणि त्यांच्या मुलांना रोजगार द्यायचा. 1/3, 1/3, 1/3 या प्रमाणात जमिनीचा विकास करावयाचा होता. त्यानंतर वस्त्रौद्योग मंत्री बदलले. तुमच्या पक्षाचे सरकार सत्तेवर आले. सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुळकर्णी यांनी ऐकून घ्यावे. त्यानंतर लक्ष्मीदर्शन झ ाले. नियम बदलले. कोणी बदलले नियम? का नियम बदलले? आहे का सांगायची हिंमत? त्या नियमात सुधारणा का झाली? ती सुधारणा केल्यानंतर आता 6 वर्षे झाली. तुमचे राज्य आहे. आता सरकार काय सांगते? 50 हजार कामगार असले तरी आम्ही 8 हजार घरे बांधू आणि लॉटरी पध्दतीने ती वाटप करु. बांगलादेशी आणि पाकिस्तानी नागरिकांसाठी घरे दिली जातात. झोपडपट्टीमध्ये, रस्त्यावरील फुटपाथवर राहणाऱ्या नागरिकांसाठी घरे आहेत. मुंबईच्या विकासामध्ये ज्यांनी हातभार लावला त्या कापड गिरण्यांमध्ये काम करणाऱ्या कामगारांसाठी सरकारजवळ घरे नाहीत. तुमच्याकडे जागा नाही? 225 चौ.फूटाचे घर बांधण्यासाठी किती खर्च येणार आहे? साधा प्रश्न आहे. जास्तीत जास्त 12 लाख चौ.फूट एरिया आहे. काय केले तुम्ही? आम्ही काय दिवे लावले असे विचारता ना? तुम्ही किती दिवे लावले? आम्ही प्रयत्न केला म्हणून आज हायकोर्टात केस सुरु आहे. हायकोर्टाने शासनाकडून ॲफिडेव्हीट मागितले आहे. देता का ॲफिडेव्हीट? हायकोर्टासमोर 50 हजार कामगारांसाठी घरे बांधून द्यायचे ॲफिडेव्हीट देता का? तुम्ही ॲफिडेव्हीट काय करता? मिल कामगारांची मुले तंत्रशिक्षण घेण्याच्या लायकीची नाहीत.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.....

त्यांना कॉम्प्युटर शिकविता येत नाही. त्यांना आम्ही रोजगार देऊ शकत नाही. वाचायचे आहे ॲफिडेव्हीट? माझ्याकडे प्रत उपलब्ध आहे. कामगारांच्या मुलांना शासन का प्रशिक्षण देऊ शकत नाही? कोणत्या आधारावर ॲफिडेव्हीट केले? कोणत्या आधारावर ॲफिडेव्हीट सबमिट केले? सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुळकर्णी यांनी विचारलेला प्रश्न योग्य होता, लॉजिकल होता. तुमच्या दिव्याखाली अंधार आहे हे तुम्हाला माहिती होते. या मिल मालकांच्या लक्ष्मीदर्शनाचा कार्यक्रम ज्यांनी कोणी केला त्याची तुम्हाला कल्पना नाही. तुम्हाला त्याची वाफ देखील कुठे गेली हे माहिती नाही. कोणामुळे घडले? कोणाच्या पेट्या भरल्या? तो इतिहास आहे. कधीकाळी त्याची चौकशी केली का? मी शासनाला आवाहन देत आहे. मुंबईच्या एसआरए आणि मिल लॅण्डची सी.बी.आय.कडून चौकशी करा. हिंमत असेल तर सत्य बाहेर येऊ द्या. तुमचे खरे की आमचे खरे हे कळू द्या. भ्रष्टाचार कोणी केला? कामगारांच्या पोटावर लाथ कोणी मारली? त्यांच्या तरुण मुलींना रात्री जाऊन डान्सबारमध्ये नोकरी करावी लागली. कळू द्या पाप कोणाचे आहे? युती सरकारने रोजगार आणि घरांची कमिटमेंट दिली होती. 40 लाख घरांच्या योजनेमध्ये माझ्या अंदाजाप्रमाणे आजपर्यंत 2.5 लाखापेक्षा जास्त घरे बांधली गेली आहेत. तुमची हिंमत आहे का? मी दरवेळी सांगतो, मी 8 हजार कोटी रुपयांची कामे केली. है कोई माई का लाल? करा चौकशी.

(नंतर श्री.जुन्नरे...

अशुधारित प्रत / अशुद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ....

एमएसआरडीसीच्या संदर्भात माननीय भुजबळसाहेबांवर मी त्यावेळी आरोप केले होते. मी मर्द असल्यामुळे, मी भ्रष्टाचार केला नसल्यामुळेच मी त्यांच्यावर आरोप केले होते. आम्ही ज्यावेळेस बीओटी तत्वावर पुलांची कामे केली तेव्हा माननीय जयंत पाटील साहेब म्हणत होते की, "तुम्ही सर्व राज्य बीओटी तत्वावर चालविण्यासाठी का देत नाहीत"? परंतु आता याच शासनाने बीओटी तत्वावर 64 पूल बांधले आहेत त्याचे काय? त्यावेळेस माननीय श्री. जयंत पाटील आणि माननीय श्री. आर.आर.पाटील आम्हाला बोलत होते की, "नको तेथे पूल, नाका तेथे पूल" तुम्ही बांधलेले आहेत. सभापती महोदय, आम्ही पुलांच्या बांधकामास सुरुवात केली, पूल बांधले परंतु तुम्ही आमच्या पुलांची उद्घाटने केलेली आहेत. म्हणजे लग्न आम्ही केलं, पोरं आम्हाला झाली आणि तुम्ही त्याचे बारसे आणि लाडू वाटण्याचे काम केले असे थोडक्यात म्हणता येईल. या शासनाने जे बजेट जाहीर केलेले आहे ते अतिशय बोगस आहे, होपलेस आहे. परंतु बजेट सादर करतांना एक गोष्ट मात्र चांगली झाली की, बजेट सादर करतांना माननीय वित्त मंत्र्यांचा चेहरा, माननीय राज्यमंत्र्यांचा चेहरा, दोघांचेही चेहरे गुटगुटीत, वर उत्तम डिझाईनचा कोट आणि त्यावर गुलाबाचे फूल असे लावून बजेट सादर करण्यात आले. असे असतांनाही जनतेला बजेट आवडले नाही. आज शेतकरी आत्महत्या करीत आहे, संपूर्ण राज्य उद्ध्वस्त झालेले आहे, शिक्षण उध्वस्त झालेले आहे, कामगार उद्ध्वस्त झालेले आहेत. आज विना अनुदान हे शिक्षण विभागाचे धोरण झालेले आहे. आज इंटरनॅशनल स्कूल मोठया प्रमाणात उघडत आहेत. या इंटरनॅशनल स्कूल मोठया प्रमाणात पालकांकडून फी उकळत आहेत. या स्कूल प्रत्येक विद्यार्थ्यांमागे 20-20 हजार रुपये फी वसूल करीत आहेत. आज संपूर्ण राज्यभर इंग्रजी मेडीयमच्या शाळा मोठया प्रमाणात उघडत आहेत. हे सरकार नेहमी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, शाहू महाराजांचे नाव घेत असते परंतु प्रत्यक्षात मात्र उलटेच करीत असते. आपण सगळया प्रकारचे उद्योग केले परंतु एक गोष्ट करण्यात आपण यशस्वी झालात आणि ती गोष्ट म्हणजे निवडणुकीत दलीत-मुस्लीम लोकांची मते मिळविण्यात आपण यशस्वी झालेला आहात. आपण जातीय वाद आणि सांप्रदायिकतेचे बीज पसरवण्याचे काम केलेले आहे. सभापती महोदय, मी पाटबंधारे विभागाच्या संदर्भात एक गोष्ट सांगतो की, या राज्याचे महामहिम राज्यपाल महोदयांनी माननीय पंतप्रधांना पत्र पाठवून अशी

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ....

तक्रार केली की, हे राज्यशासन घटनेच्या 371(2) (8) या कलमांचे उल्लंघन करीत आहे. घटनात्मक निर्देशांचे पालन करणे ही महाराष्ट्र शासनाची घटनात्मक जबाबदारी आहे. हे सरकार सगळे आदेश भंग करीत आहे म्हणून माननीय राज्यपाल महोदयांनी आपल्या माननीय पंतप्रधांना पत्र लिहून तक्रार केलेली आहे. मी जे काही बोलतो आहे ते चुकीचे आहे असे जर आपल्याला वाटत असेल तर आपण त्याला आव्हान द्यावे. परंतु आपल्याला माहिती आहे की, यासंदर्भात आपल्या माननीय राज्यपाल महोदयांनी माननीय पंतप्रधांनाना पत्र लिहून तक्रार केलेली आहे. जसा गारुडी खेळ करतो तसे हे सरकार करीत आहे. गारुडी जसा डमरु वाजवितो तसा डमरु हे सरकार वाजवित आहे. त्यामुळे माझी सभागृहातील सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, डमरु वाजविण्याचे काम आपण बंद करा, टाळया वाजविण्याचे काम बंद करा. महाराष्ट्राचे जे मूलभूत प्रश्न आहेत त्या प्रश्नाकडे लक्ष द्या. क्रिकेट प्रेम कमी करा, क्रिकेटचा राजीनामा द्या, आत्महत्या करणा-या शेतक-यांच्या घरी जा.

यानंतर श्री. अजित.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.....

शेतकऱ्यांना चार टक्के दराने कर्ज द्या. वाटल्यास त्यांची कर्जे माफ करा, लोडशेडींग रद्द करा. तरुणांना रोजगार द्या, वीज निर्मिती प्रकल्पाकरिता युध्दपातळीवर काम करा पण असे काही घडत नाही. मी याठिकाणी एकच गोष्ट सांगतो की, मराठी माणसाचा झेंडा संपूर्ण देशभर फडकला पाहिजे. तो तुम्ही तुमच्या हाताने लावला तरी आम्हाला आनंद आहे. विरोधी पक्षाचे सदस्य म्हणून देखील आम्ही तुमचे स्वागत करु. परंतु या सरकारचा मागील सात वर्षांचा कालावधी असाच फुकट गेला. या काळात कोणतीही चांगली कार्यवाही झालेली दिसत नाही. यामुळे फार मोठे नुकसान झालेले आहे. यावेळी माननीय वित्तमंत्र्यांनी मांडलेला अर्थसंल्प हा ना अर्थ ना संकल्प असा आहे. दिल्लीची लुंगी आणि जयंतरावांची पुंगी. हा अर्थसंकल्प गारुडीच्या पुंगीसारखा आहे वाजवा रे वाजवा आणि पळा रे पळा, या शिवाय दुसरे काही नाही.

सभापती महोदय, शेवटचे एकच सांगतो की, या सभागृहात राष्ट्रवादी काँग्रेसचे आणि काँग्रसे पक्षाचे काही स्वाभिमानी सदस्य आहेत. मी आता ज्या भावना व्यक्त केल्या त्या त्यांच्या मनाला पटलेल्या आहेत. माझे मित्र लर्नेड ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांना सुध्दा माझे विचार पटलेले आहेत. परंतु त्याची अवस्था "सहनही होत नाही आणि सांगताही येत नाही" अशी झालेली आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांना देखील माझे म्हणणे पटलेले आहे. माननीय वित्त राज्यमंत्री डॉ.सुनील देशमुख तर माझे कॉलेजपासूनचे मित्र आहेत. त्यांना देखील माझे विचार पटलेले आहेत. त्यांच्या बाबतीत सांगावयाचे झाले तर त्यांच्यावर फक्त उत्तरे देण्याची पाळी येते. त्यांच्याकडे कोणत्याही फाईल्स पाठविल्या जात नाहीत. काय ही दादागिरी आहे ? जर ते मंत्री पदावरुन दूर झाले आणि त्यांनी पुस्तक लिहायचे ठरविले तर ते चांगले 100 पानी पुस्तक लिहू शकतील आणि त्याच्या लाखो प्रती संपतील व तो एक इतिहास होऊ शकेल. मी मूळ मुद्यावर येतो. सभापती महोदय, राज्य प्रगतीपथावर नेणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना वाचविण्यासाठी, गिरणी कामगारांना वाचविण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, काँग्रेसच्या नेते आणि माझे मित्र लर्नेड ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांच्या डोळ्यात अंजन घालून परमेश्वराने त्यांना सुबुध्दी द्यावी अशी प्रार्थना करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, माझे मित्र लर्नेड नॉन प्रॅक्टीसिंग ॲडव्हाकेट श्री.नितीन गडकरी यांनी आता अर्थसंकल्पावर त्यांचे प्रभावी विचार मांडले. त्यांनी सांगितलेल्या काही गोष्टी मी मान्य करतो. सभापती महोदय, युतीचे सरकार जाऊन आघाडीचे सरकार कसे आले याची पार्श्वभूमी त्यांना सुध्दा माहीत आहे. परंतु मी थोडक्यात पुन्हा उजळणी करुन देतो. सन 1995 ते 1999 या काळात युतीचे सरकार होते. त्या काळात युती सरकारने काही कार्यक्रम राबविले किंवा राबविण्याचा प्रयत्न केला. त्यावेळेचे तत्कालीन वित्तमंत्री श्री.महादेव शिवणकर यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले होते की, तिजोरीमध्ये खडखडाट आहे. नियोजनबाह्य खर्च मोठ्या प्रमाणावर केला जात आहे व तो आणखी करण्यासाठी माझ्याकडे पैसा नाही.

यानंतर कु.गायकवाड.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी .....

सरकारला 5 वर्षाचा सुध्दा कालावधी पूर्ण करता आला नाही. फक्त साडेचार वर्षाचा कालावधी युती सरकारने पूर्ण केला होता. त्यावेळी एकंदरीत 7500 कोटी रुपयांच्या योजनेचे भूमिपूजन करुन नारळ फोडून कामाला सुरुवात देखील केली होती. कोकणामध्ये अनेक पुलांचे भूमीपूजन झाले , नारळ फोडण्यात आले. उद्या आमचे सरकार येईल या पार्श्वभूमीवर नारळ फोडून काम सुरु झाले होते. युती सरकारमधील मंत्र्यांचा परफॉर्मन्स आपण लक्षात घेतला तर आपल्या लक्षात येईल की, श्री. नितीन गडकरी यांनी उत्कृष्ट काम केलेले आहे. त्यांच्या काही संकल्पना अतिशय चांगल्या आहेत. त्यांनी शासनाच्या पैशाचा वापर न करता BOT तत्वावर प्रकल्प राबविण्याची जी संकल्पना आणली ती अतिशय चांगली आहे. पुणे - मुंबई एक्सप्रेस हायवे तयार करण्यासाठी 22500 कोटी रुपये खर्च करण्यात आला. ज्यावेळी युतीचे सरकार होते त्यावेळी राज्यावर 15 हजार कोटी रुपयांचे कर्ज होते. त्यावेळी साधारण 38 हजार ते 48 हजार कोटीचे बॉंड सरकारने काढले होते. माननीय उद्योगपती श्री. अजित गुलाबचंद यांनी असे सांगितले होते की, या संपूर्ण युती शासनामध्ये एक मंत्री असे आहेत की, ज्यांच्याकडे काहीतरी विचार आहेत, काही संकल्पना आहेत. त्यांना या राज्यामध्ये काही तरी निर्माण करावयाचे आहे. अशा पध्दतीने 55 ब्रीज तयार करण्याची त्यांची संकल्पना आहे असो, नागपूरमधील ब्रिज तयार करण्याची संकल्पना असो, किंवा पुणे एक्सप्रेस हाय वे तयार करण्याची संकल्पना असो या सर्व संकल्पना अतिशय उत्कृष्ट आहेत व त्या पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाचा पैसा न धेता अन्य मार्गाने बॉंड काढून ती कामे पूर्ण करण्यात आली. अशा कामांची वाहवा करणारे लोक महाराष्ट्रामध्ये आहेत. परंतु सभापती महोदय, मी आपणाला सांगू इच्छितो की, ज्या वेळी 1999 मध्ये आघाडीचे शासन सत्तेवर आले त्यावेळी या राज्याचे महसुली उत्पन्न फक्त 22.5 ते 23 हजार कोटी रुपये इतके होते. आणि खर्च मात्र या महसुली उत्पन्नापेक्षा जास्त होता. आणि म्हणूनच नागपूरच्या अधिवेशनामध्ये प्रथमच श्वेतपत्रिका सादर करावी लागली होती. योजनाबाहय खर्च कसा झालेला आहे तो खर्च लोकांच्या समोर मांडावा लागतो, व हातात घेतलेली कामे पूर्ण करावयाची असतील तर त्या ठिकाणी कर्ज हे घ्यावेच लागते. अन्यथा राज्याचे नुकसान होईल. अशी भूमिका अर्थमंत्र्यांनी 1999 मध्ये नागपूरच्या अधिवेशनात मांडली होती.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी .....

आज आपण बघितले तर आपल्याला असे दिसून येईल की, पूर्वी जे 22.5-23 हजार कोटी रुपयांचे महसुली उत्पन्न होते, ते 2007-08 या वर्षामध्ये जवळजवळ 68 हजार कोटी रुपये इतके झालेले आहे. पूर्वी 1 कोटी 34 लाख रुपयांचे कर्ज होते त्यावेळच्या परिस्थितीनुरुप ते कर्ज परतफेड करणे राज्याला मुश्किल वाटत होते. या राज्यावर एवढे जबरदस्त कर्ज आहे व ते आपण कसे फेडू शकू या विवंचनेत राज्य सापडले होते. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी सांगितले होते की, कलम 271(2)(8) अंतर्गत जी घटनात्मक जबाबदारी आहे त्या संदर्भात माननीय राज्यपालांनी राज्य शासनास जरुर ते निदेश दिलेले आहेत. रस्त्यांच्या संदर्भात, पाटबंधाऱ्यांच्या संदर्भात किंवा अन्य बाबींच्या अनुशेषासंदर्भातही माननीय राज्यपालांनी वेळोवेळी निदेश दिलेले आहेत.

यानंतर श्री. पुरी.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी...

परंतु नैसर्गिक आपत्ती आल्यामुळे राज्य सरकारवर जबाबदारी आली. त्यामुळे माननीय राज्यपालांचे निर्देश असतानाही अंमलबजावणी करता आलेली नाही. मागील अर्थसंकल्पिय अधिवेशने पाहिली तर, अर्थसंकल्पावर फक्त 1-2 दिवसच चर्चा होत नव्हती. जोपर्यंत माननीय राज्यपालांच्या निर्देशांचे पत्रक सभागृहाला उपलब्ध करुन दिले जात नव्हते, तोपर्यंत....

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. दरवर्षी अर्थसंकल्पिय चर्चेच्या अगोदर अनुपालन अहवाल आणि माननीय राज्यपालांचे निर्देश दिले जायचे.

तालिका सभापती : अनुपालन अहवाल मिळालेला आहे.

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी अनुशेष भरुन काढण्याच्या दृष्टीने जे निर्देश दिलेले आहेत, त्यासंबंधीची तरतूद या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये करण्यात आलेली आहे. त्यामुळे याबाबतीत मी माननीय राज्यपालांचे व राज्य शासनाचेही अभिनंदन करतो. आज मराठवाडयाचा, विदर्भाचा, उर्वरित महाराष्ट्राचा अनुशेष शिल्लक आहे. परंतु कोकण विभागाचा अनुशेष किती शिल्लक आहे ? याची माहिती माननीय मंत्रिमहोदयांनी द्यावी. ....(अडथळा) महसूल मंत्री हे शासनाचे प्रतिनिधी म्हणून आहेत, ते म्हणजे, कोकण नव्हे. सभापती महोदय, कोकणातील पाटबंधारे विभागाचा अनुशेष जवळपास 1200 कोटी रुपयांचा आहे. परंतु त्याठिकाणच्या मोठे, मध्यम व लहान प्रकल्पांची कामे निधीअभावी होऊ शकत नाहीत, अशी आजची परिस्थिती आहे. अपुऱ्या निधीमुळे त्याठिकाणची कामे होऊ शकत नाहीत, ही आमची वेदना आहे. अर्थसंकल्पिय अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला कोकण विभागातील लोकप्रतिनिधींची बैठक माननीय वित्त मंत्र्यांकडे झाली. त्यावेळी कोकणातील निरनिराळया प्रश्नांची माहिती त्यांना आम्ही दिली. परंतु दुर्दैवाने या अर्थसंकल्पामध्ये कोकणासाठी काहीच तरतूद दिसून येत नाही. मी या अर्थसंकल्पावर खूश नाही. एकंदरितच राज्याच्या दृष्टीने यावर्षीचा अर्थसंकल्प जरी चांगला असला तरी कोकणासाठी या अर्थसंकल्पामध्ये काही भरीव अशी तरतूद केलेली आहे, असे मानणारा मी नाही. कोकणातील पाटबंधाऱ्यांचे प्रकल्प पूर्ण होण्याच्या दृष्टीने आपण भरीव अशी तरतूद उपलब्ध करुन द्यावी, अशी मी या निमित्ताने विनंती करतो.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी...

सभापती महोदय, ज्याप्रमाणे कोकणची रेल्वे ही कोकणवासियांचे स्वप्न होते, त्याचप्रमाणे कोकणामध्ये सागरी महामार्ग व्हावा असे कोकणवासियांचे स्वप्न आहे. याठिकाणी मी माननीय नितीनजी गडकरी यांचे अभिनंदन करतो. त्यांनी त्यांच्या कार्यकाळात पहिल्या अडीच वर्षामध्ये त्यासाठी निधीची व्यवस्था करुन नंतरच्या अडीच वर्षामध्ये एक्सप्रेस हायवे तयार केला. त्यासाठी जवळपास 2200 ते 2300 कोटी रुपये खर्च केले. सन 19980 मध्ये ज्यावेळी माननीय श्री.ए.आर.अंतुले साहेब मुख्यमंत्री होते त्यावेळी त्यांनी सागरी महामार्गाची संकल्पना मांडली होती. त्यावेळी सागरी महामार्गाच्या कामाची सुरुवात झाली. आज या गोष्टीस जवळपास 27 वर्षे झाली. त्याठिकाणी नॅशनल हायवे पॅरलल आहे. परंतु याठिकाणी आपण नुसती आरडाओरड करत असताना, आपण यासाठी काय दिले ?

नंतर श्री.रोझेकर...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी.....

आज माझ्या माहितीप्रमाणे कोकणातील 4/5 पुलांचे काम राहिले आहे. जी पुलांची कामे झालेली आहेत त्या कामांची उद्घाटने युती शासनाने केली होती, मी त्या उद्घाटन समारंभांना उपस्थित होतो, परंतु, निधीची उपलब्धता न केल्यामुळे ही कामे नंतर आघाडीच्या शासनाने पूर्ण केली.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, असत्य माहिती रेकॉर्डवर येऊ नये म्हणून मला असा खुलासा करावयाचा आहे की, लोकसत्ता वर्तमानपत्राचे तत्कालीन संपादक, श्री.माधव गडकरी यांनी या प्रश्नाची कल्पना मला दिली होती. त्यानंतर कोकणात 22 पुलांची कामे आम्ही सुरु केली, त्यापैकी 17 कामे पूर्ण झाली. आता केवळ रेवस ते करंजा आणि इतर तीन पुलांची कामे राहिली आहेत. आमचे सरकार गेले त्यावेळी 5/6 पुलांचे भूमिपुजन झाले होते, ही कामे नंतरच्या सरकारने केली. त्यामुळे युतीच्या कार्यकाळात व मी बांधकाम मंत्री असतांना या 17 पुलांची कामे पूर्ण झालेली आहेत तेव्हा सन्माननीय सदस्यांनी कृपा करुन अशाप्रकारे दोष देऊ नये, एवढेच सांगतो.

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, आज जवळ जवळ 78 किलोमीटर एवढा रस्ता करावयाचा बाकी आहे. यावरील 3/4 पुलांचे काम झाले तर रेवस पासून रेड्डीपर्यन्त पर्यायी रस्ता उपलब्ध होईल आणि त्यायोगे संपूर्ण कोकण पट्टयातील पर्यटनाची दालने राज्यासाठी, देशासाठी नव्हे तर जगासाठी खूली होतील. सन्माननीय अर्थमंत्री या ठिकाणी उपस्थित नाहीत. आपल्या माध्यमातून मी त्यांना विचारु इच्छितो की, यासाठी त्यांनी तरतूद का केली नाही ? पर्यटन वाढविण्यासाठी कोकण पॅकेजअंतर्गत जी तरतूद केली होती ती कामे पूर्ण झाली का ? गाळ काढण्यासाठी 10 कोटी रुपयांची तरतूद कोकण पॅकेज अंतर्गत केलेली असतांना त्यातील एक पैसा देखील खर्च करण्यात आला नाही. कोकण पॅकेजअंतर्गत सिंधुदूर्ग जिल्हयासाठी 30 कोटी रुपये प्राप्त झाले आहेत. त्यातील निम्मी रक्कम तशीच पडून आहे. यासंबंधीचे उत्तरही आम्हाला मिळत नाही. कोकण किनारपट्टीचा विकास करण्यासाठी भारत सरकारने 250 कोटी रुपये देण्याचे मान्य केले आहे. दरवर्षी साडेबासष्ट कोटी रुपये केंद्र सरकार राज्य सरकारला देणार आहे. परंतु, केंद्राकडून प्राप्त झालेला निधी खर्च होत नाही. केंद्र सरकारकडून प्राप्त होणारा हा निधी वापरण्यासाठी शासनाकडे कोणती एजन्सी आहे, कोणती मशिनरी आहे, याचे स्पष्टीकरण

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी.....

अर्थमंत्र्यांनी दिले पाहिजे. मी जरुर ट्रेझरी बेंचवरील आमदार आहे, परंतु, आमच्या भागाच्या विकासाच्या संदर्भात, त्या भागातील वेदना, दु:ख, त्यांचे अधिकार, हक्क सभागृहात मांडण्याचा अधिकार आम्हाला प्राप्त होतो.

सभापती महोदय, कोकणातील पाटबंधारे प्रकल्पांचाही प्रश्न आहे. सन्माननीय नेते, कै.वसंतराव नाईक, सन्माननीय नेते, कै.वसंत दादा पाटील हे राज्याचे मुख्यमंत्री होते, त्यांचे आपण सर्वांनी आभार मानले पाहिजे, अभिनंदन केले पाहिजे. सन्माननीय कै.नाईक मुख्यमंत्री असतांना स.गो.बर्वे हे कोकण विभागाचे आयुक्त होते. त्यांनी श्री.बर्वे यांच्या अध्यक्षतेखाली एका अभ्यास गटाची नियुक्ती केली. राज्याच्या निरनिराळया भागात पाटबंधारे प्रकल्पांअतर्गत सिंचनाची सुविधा उपलब्ध करुन देत असतांना कोकण विभागात अशी सुविधा निर्माण करता येऊ शकते का, यासाठी ही समिती नियुक्त करण्यात आली होती. कोकणातील जमिनींमध्ये पाणी ॲबसॉब करुन घेण्याची क्षमता नाही, त्यामुळे कोकणात प्रकल्प उभे राहू शकत नाहीत, अशाप्रकारचा अहवाल या समितीने शासनाला सादर केला होता. पुढे कै.वसंत दादा पाटील हे मुख्यमंत्री असतांना त्यांनी दांडेकर समिती नियुक्त केली. या समितीने आपल्या अहवालान्वये शासनाला सांगितले की, कोकणात सिंचन प्रकल्प उभे राहू शकतात. त्यावेळी प्रथमत: कोकणातील माणसाला हे समजले की, त्यांच्या भागातही धरणे होऊ शकतात, लघुपाटबंधारे प्रकल्प होऊ शकतात. मुंबईकराना पाणी पुरवठा करणारी सर्व धरणे ही ठाणे किंवा रायगड जिल्हयामध्ये आहेत, काही नाशिक जिल्हयामध्ये आहेत.

यानंतर कुमारी जयश्री.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी.....

ठाणे जिल्हयातील ग्रामीण भागातून सर्व जण शेतीकरिता पाणी आपल्या भागात आणतात. ते पाणी तेथील शेतक-यांना मिळू शकत नाही, ही सुध्दा वस्तुस्थिती आहे. कोकणामध्ये जो इरिगेशनचा बॅकलॉग आहे, तो शासन कशा पध्दतीने ठरलेल्या वेळेमध्ये पूर्ण करणार आहे ? कोकणामधील सिंचन व्यवस्था कशा प्रकारे वाढविली जाणार आहे ? कोकणामध्ये जर वनसंज्ञा बघितली तर कोकणामध्ये हापूस आंबा,काजू,फणस,केळी यांच्या बागा आहेत. वनसंज्ञेच्या नावाखाली किती शेतक-यांच्या जमिनी दडपण्याचा प्रयत्न शासन करणार आहे ? वनसंज्ञेखाली 1997 साली राज्यामधून 62.50 हजार हेक्टर जमीन सरकारने आपल्या ताब्यात घेतली, त्यातील 42.50 हजार हेक्टर जमीन एकटया सिंधुदूर्ग जिल्हयातून ताब्यात घेण्यात आलेली आहे. वनखात्याचा प्रश्न मी या ठिकाणी पोटतिडकीने मांडत असतांना तो कसा सुटेल, हे राज्यसरकाला सांगावे लागेल.

शेवटचा मुद्दा मी या ठिकाणी मांडणार आहे त्याचा उल्लेख यापूर्वी माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी केलेला आहे. युती शासनाच्या साडेचार वर्षाच्या काळामध्ये एक मेगावॅट वीजही युती शासन निर्माण करु शकले नाही. त्यानंतर पाच वर्ष एन्रॉनचे भूत या राज्यावर बसलेले होते. जर कोर्ट,कचे-या यासारख्या विविध विवादांमध्ये, आर्बिटरी प्रोसिडींगमध्ये आपण त्यासंदर्भात आलो नसतो तर या राज्याला 67 हजार कोटी रुपये एन्रॉन या प्रकल्पाला द्यावे लागले असते, ते जर दिले असते तर या राज्याची अर्थव्यवस्था संपूर्णपणे उद्धवस्त झाली असती,नाफत्याबाबत तर काही बोलावयाची आवश्यकता नाही कारण सर्व ठिकाणी मुबलक गॅस उपलब्ध करुन देण्याचा भारत सरकारने निर्णय घेतलेला आहे. या राज्याचे ऊर्जामंत्री त्या ठिकाणी काम करीत आहेत.

श्री.विनोद तावडे : उरण येथे गॅस मिळत नाही, अशा प्रकारची बोंब होत आहे.

श्री.नितीन गडकरी : सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांचा काय संबंध ? सन्माननीय सदस्य जर आज ऊर्जामंत्री असते तर महाराष्ट्र अंधारात बुडालाच नसता.

श्री.विनोद तावडे : श्री.मुरली देवरा, हे केंद्रामध्ये पेट्रोलियम मंत्री म्हणून आहेत, ते या राज्यातीलच आहेत.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : उरणच्या गॅसचा प्रश्न सुध्दा लवकरात लवकर दूर केला जाईल. दोन वर्षामध्ये साडे 2100 हजार मेगावॅट वीज निर्माण करण्यासाठी राज्यशासन

4H - 2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी.....

पारस,परळी,घाटघर या प्रकल्पांतर्गत प्रयत्न करीत आहे. राज्यशासन जर हातावर हात धरु बसले असते तर या वर्षी 1232 कोटी रुपयांची तरतूद यासंदर्भात करण्यात आली नसती. महाराष्ट्रातील जनतेचा लोकशाही आघाडी सरकारवर विश्वास आहे. लोड - शेडींग हे संकट म्हणून जरी मान्य केले तरी या राज्यातील जनतेचा लोकशाही आघाडीवर विश्वास आहे कारण या राज्यामध्ये आता ज्या नगरपरिषदेच्या,जिल्हापरिषदेच्या,महानगरपालिकेच्या निवडणूका झाल्या त्यामध्ये जनतेने राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस ला भरभरुन मते दिली. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन पक्षांचे 80 टक्के उमेदवार आणि शिवसेना , बी.जे.पी. या दोन पक्षाचे 20 टक्के उमेदवार निवडून आलेले आहेत. लोकांनी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसला कौल दिलेला आहे. त्यांचे मी या ठिकाणी अभिनंदन करतो व हा अर्थसंकल्प सामान्य जनतेला दिलासा देणारा आहे म्हणून या अर्थसंकल्पाचे मी स्वागत करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

यानंतर श्री.बोरले.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (मुंबई पदवीधर) : सभापती महोदय, एकंदरीत अर्थसंकल्पाचे वर्णन करावयाचे झाले तर मला असे वाटते की, एखादा टी.बी.चा पेशंट असतो त्याला कितीही टॉनिक, औषधे दिली तरी त्याच्या प्रकृतीमध्ये सुधारणा होत नाही. अशीच चलन व्यवस्थेची अवस्था झालेली आहे. डॉटस् ट्रिटमेंट शासनाकडे उपलब्ध नाही. या अर्थसंकल्पातील धग संपलेली आहे. देशाची आर्थिक राजधानी मुंबई आहे. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असून सुध्दा मुंबई शहरासाठी एक रुपया सुध्दा दिलेला नाही, ही दुर्दैवाची गोष्ट आहे. मुंबई शहरातून जवळ जवळ 70 हजार कोटी रुपये कराच्या माध्यमातून केंद्र शासनाला महसूल मिळतो. त्याच्या बदल्यात मुंबई शहरासाठी शासनाने काय दिले ? केंद्र शासनाकडून मुंबई शहराच्या विकासासाठी इतके कोटी रुपये मिळणार आहेत, एम.यू.टी.पी.साठी इतके कोटी रुपये मिळणार आहेत, पूरग्रस्तांसाठी इतके कोटी रुपये मिळणार आहेत अशा प्रकारची आश्वासने शासनाने दिली. परंतु प्रत्यक्षात किती पैसे आले ? यासंदर्भातील ताळेबंद उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे. अर्थसंकल्पामध्ये मुंबईची एक प्रकारे कुचेष्ठाच केलेली आहे. माननीय अर्थमंत्र्यांनी त्यांच्या भाषणामध्ये असे सांगितले की, राज्यात अतिवृष्टी, महापूरासारखी आपत्ती आली असली तरी राज्याच्या महसुलात 13 टक्क्यांनी वाढ झालेली आहे. ही 13 टक्के वाढ कदाचित दारुच्या उत्पादनातून झालेली असावी, असे मला वाटते. केंद्र शासनाने दिनांक 15 जून, 2006 पासून पेट्रोल, डिझेलच्या दरामध्ये कपात केली. सर्वसाधारणपणे 5 रुपये 9 पैशांनी पेट्रोलचे आणि 5 रुपयांनी डिझेलचे दर कमी केले. परंतु वाहतूक व्यवस्थेमध्ये काही फरक पडलेला नाही. वाहतूक व्यवस्थेचा दर कायम आहे. या दर कपातीचा फायदा कोणाला झाला ? ज्यांच्याकडे कार आहे, महागडया गाडया आहेत, त्यांना याचा दर कपातीचा फयदा झालेला आहे. मुंबईतील टॅक्सी सी.एन.जी. वर चालतात. टॅक्सी सी.एन.जी. वर चालविल्यामुळे टॅक्सीच्या भाडयामध्ये फरक पडलेला नाही.

सभापती महोदय, राज्यातील विविध घटकांवर सेल्स टॅक्स लावण्यात आला. राज्यामध्ये 77 घटकांवर सेल्स टॅक्स लावला जाणार आहे, अशी मला माहिती मिळालेली आहे. राज्यात 44 घटकांवर सेल्स टॅक्स लावण्यात आलेला आहे. त्यामध्ये अजून 33 घटकांची वाढ होणार आहे. राज्यामध्ये प्रोफेशनल टॅक्सच्या संदर्भात नाराजी निर्माण झालेली आहे. चार्टर्ड अकाऊंटंट, डॉक्टर यांच्यावर प्रोफेशनल टॅक्स लावला जाणार आहे. त्यामुळे शासनाला उच्च, मध्यमवर्गीयांच्या आंदोलनाला सामोरे जावे लागणार आहे, असे चित्र मला दिसत आहे.

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत .....

सभापती महोदय, शासनाने पिवळया रंगाच्या पुस्तकामध्ये शासकीय खर्चाचे विवरण दिलेले आहे. निवृत्ती वेतनात प्रचंड वाढ झालेली आहे. खरे म्हणजे बरेच अधिकारी/कर्मचारी व्ही.आर.एस. घेत आहेत. माननीय अर्थ राज्यमंत्री डॉक्टर आहेत. व्ही.आर.एस.च्या माध्यमातून सामाजिक प्रश्न उभा राहू शकतो. पिवळया रंगाच्या पुस्तकातील पृष्ठ क्र.31, नमुना 5 (ख) मध्ये यासंदर्भात माहिती देण्यात आलेली आहे.

यानंतर श्री.गागरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जळगावमध्ये 43, रायगडमध्येही अर्भक मृत्यू झालेले आहेत. त्यानंतर यवतमाळमध्ये 47, गोंदियामध्ये 44, नागपूरमध्ये 36 झालेले आहेत आणि आपण म्हणता आहात की, आम्ही अर्भक-मृत्यूदरावर नियंत्रण मिळविले आहे. तुमची यामध्ये सरासरी 36 असली तरी प्रत्यक्षात हा मृत्यूदर 44 आहे. पुणे, नांदेड या ठिकाणी हा दर निश्चितपणे कमी झालेला आहे, पण त्याचे कारण म्हणजे ती मोठी शहरे आहेत. सभापती महोदय, आपण पाडा स्वयंसेविकांना मानधन देण्याची तरतूद केलेली आहे. आपल्याकडे यासाठी प्राप्त अनुदान 3373.52 इतके आहे. त्यापैकी आपण पाडा स्वयंसेविकांना किती दिले ? तर केवळ 80.73. म्हणजे किती टक्के झाले ? तर केवळ 30 टक्केच आपण दिलेले आहे. सभापती महोदय, भरारी पथकांना आपण 389.67 द्यायला पाहिजे होते पण तेही केवळ 42 टक्केच दिलेले आहे. 858.79 द्यायला पाहिजे असता केवळ 69.33 टक्के दिलेले आहे. ही आकडेवारी मी माझ्या पदरची सांगत नाही तर आपल्याच प्रकाशनातून दिलेली आकडेवारी मी सांगतो आहे. सभापती महोदय, मातृत्त्व अनुदान योजनेतील आपले लाभार्थी किती आहेत तर केवळ 1.2 लाख म्हणजे 1 लाख 20 हजार. अशा प्रकारे मी येथे सर्व आकडेवारी दिली तर असे दिसून येते की, ही अतिशय वाईट परिस्थिती आहे. त्यावरून असे समजून येते की, जे पैसे आपले येत आहेत ते बरोबर खर्च होत नाहीत. म्हणूनच मी मघाशी सांगितले की, प्राप्त अनुदान जे आहे, नियतव्ययापैकी 34 टक्के खर्च कमी केलेला आहे.

सभापती महोदय, आपल्या बजेटमध्ये वैद्यकीय कॉलेज आणि उपकरणांसाठी तरतूद केलेली आहे. मी आपल्यामार्फत माननीय अर्थ राज्यमंत्र्यांच्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, आपण करोडो-लाखो रूपये सीइटी आणि अन्य परीक्षा फीच्या माध्यमातून गोळा करतो. एमबीबीएसला जवळपास 60 हजार विद्यार्थी बसतात. त्यासाठी 500 रूपये ब्रोशर आणि परीक्षा फीचे जे पैसे येतात ते कोठे जातात ? ग्रँट मेडिकल कॉलेजच्या जिमखाना पॅवेलियनचे मैदान आहे त्याचे एक दिवसाचे भाडे 2 लाख रूपये आहे. हे भाड्याचे पैसे आपल्या ताळेबंदामध्ये आल्याचे कोठेही दिसत नाहीत. मग हे पैसे कोठे जातात ? तेथे मोठमोठे लग्न समारंभ होतात, त्याचे कंत्राटदार भरपूर पैसे त्यातून कमावून घेतात. ते पैसे कोठे जातात ? आज तुम्हाला कॅथलॅब, एमआरआय, सिटीस्कॅन इत्यादी मशिनरीसाठी पैसे नाहीत. हा फार मोठा भ्रष्टाचार आहे. ग्रँट मेडिकल कॉलेज जिमखान्यावर एक माणूस बसलेला असतो, तो तेथील सारे बुकींगची व्यवस्था पाहतो. आपल्या

..... 4के 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सावंत .....

मेडिकल एज्युकेशन वा आरोग्य विभागाच्या सचिवांना देखील मी याबाबत विचारले असता त्यांना हे पैसे कोठे जातात, कोठे जमा होतात याची माहिती नसल्याचे मला समजून आले. तसेच आपण पोस्ट ग्रॅज्युएटस् कडूनही फी म्हणून भरपूर पैसे घेता. त्यातून जो पैसा जमा होतात त्याचा हिशोब कोणाकडेही नाही. या पैशातून प्रत्येक डीनला आपत्तीकालीन खर्च करण्यास परवानगी असते. परंतु आपण कोठल्याही कुटीर रूग्णालयामध्ये जा, त्यांच्याकडे पैसेच नसतात. हे पैसे त्या हॉस्पिटल्सना मिळणे आवश्यक आहे. खाजगी महाविद्यालयांबाबत तर बोलूच नका. महाराष्ट्रात आज 12 खाजगी महाविद्यालये आहेत. त्यातील काही वर्षानंतर स्वतंत्र होणार. सगळ्यांचीच डीम-युनिवर्सिटी होणार आहेत. आपली प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि आपली कुटीर रूग्णालये मग सांभाळणार कोण ? आपल्या एमबीबीएसची प्रवेश मर्यादा किती आहे ? तर केवळ 1 हजार. ...

(यानंतर श्री. सरफरे ..... 4एल 1 ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत..

सभापती महोदय, तेथील विद्यार्थी प्रवेश संख्या 1170 आहे. अभिमत विद्यापीठाची प्रवेश संख्या 460 आहे. अशाप्रकारे दरवर्षी 1500 डॉक्टर्स शिक्षण घेऊन बाहेर जाणार आहेत. आज हजारो लोकांना वैद्यकीय उपचार मिळत नाहीत. डॉक्टर्सची पदे रिक्त असल्यामुळे आपली प्राथमिक आरोग्य केंद्रे सुरु होत नाहीत. ही केंद्रे आपण केव्हा सुरु करणार आहात? आज आपण चार ते साडे चार लाख रुपये फी सांगितली आहे. फी वाढ केल्याबद्दल विद्यार्थ्यांनी आंदोलन सुरु केले आहे.

सभापती महोदय, आपल्या माहितीकरिता सांगतो की, जे.जे. हॉस्पिटलचे एकच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आहे. त्याठिकाणी मंजूर खाटांची संख्या 2845 आहे. आणि दरवर्षी 14 लाख 43 हजार 203 पेशंट उपचार घेतात. त्यामध्ये सेंट जॉर्जेस हॉस्पिटल, कामा हॉस्पिटल, जी.टी. हॉस्पिटलमधील रुग्णांचा समावेश आहे. त्याशिवाय 2 हजार रुग्णांचे एक्स-रे घेतले जातात, 80 हजार रुग्णांचे ई.सी.जी. घेतले जातात. या हॉस्पिटल्समध्ये इतक्या कमी प्रमाणामध्ये रुग्णांचे एक्स-रे घेतले जात असतात. आणि बाकीच्या रुग्णांचे एक्स-रे घेण्याकरिता त्यांना झंकारियाकडे पाठविले जाते. आज महाराष्ट्रामध्ये एक्स-रे फिल्मचा तुटवडा आहे. एक्स-रे फिल्मचा तुटवडा असतांना या करिता जो रेट कॉंट्रॅक्ट करण्यात आला होता त्याचे रिन्युअल गेल्या पाच वर्षामध्ये करण्यात आले नाही. आपण रेट कॉंट्रॅक्ट कां रीन्यू करीत नाही? याचे कारण तुम्हाला पाहिजे त्या भावाने एक्स-रे फिल्म विकत घेण्याची मुभा असली पाहिजे म्हणून आपण हा रेट कॉंट्रॅक्ट रीन्यू करीत नाही असा माझा आरोप आहे. आपण त्या त्या हॉस्पिटल्सच्या डीनना ज्या भावामध्ये एक्स-रे फिल्म मिळतात त्या भावामध्ये घेण्याकरिता सांगितले असतांना त्या फिल्म कां घेतल्या जात नाहीत? याचे कारण कोडॅक आणि ओप्रा या एक्स-रे फिल्म बनविणाऱ्या कंपन्यांबरोबर तुम्ही ॲप्रोच झालेले आहात. त्यामुळे डेप्युटी डायरेक्टर मेडिकल एज्युकेशन यांना लाखो रुपयांचे कॉंट्रॅक्ट फायनल करावयाचे नाही असा आरोप आहे. सभापती महोदय, सन 2006-07 मध्ये अंदाजपत्रकानुसार 9 लाख लोकांनी जे.जे. हॉस्पिटलमध्ये औषधे घेतली. त्यावरील खर्च 10 कोटी 49 लक्ष 82 हजार रुपये झाला आहे.आपण प्रत्येक रुग्णांवर किती खर्च करीत आहोत? जेवण आणि औषधाव्यतिरिक्त प्रत्येक रुग्णांवर 115 रुपये खर्च करीत आहोत. अशाप्रकारे आपण 35 कोटी रुपये खर्च करीत आहोत. म्हणजे प्रत्येक पेशंटमागे 135 रुपये खर्च करीत आहोत. यामध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत..

जेवणाचा सरासरी खर्च 20 रुपये आहेत. अशाप्रकारे 115+20 मिळून 135 रुपये इतका प्रत्येक रुग्णांवरील खर्च आहे. असे असतांना प्रत्येक रुग्णाचा दरडोई खर्च 502 रुपये कसा काय झाला? ही आकडेवारी आपण दिलेल्या पुस्तकातील आहे. सभापती महोदय, कामा रुग्णालयातील प्रत्येक पेशंटच्या मागील दरडोई खर्च सर्वात जास्त आहे. त्याठिक्राणी 1130 रुपये प्रति पेशंट प्रति दिवसाचा खर्च आहे. यवतमाळ जिल्हयामध्ये तर कळस आहे. त्याठिकाणी 2120 रुपये प्रति पेशंट प्रति दिवसाचा खर्च आहे. धुळे जिल्हयामध्ये जनरल हॉस्पिटलमधील रुग्णांचा प्रति पेशंट प्रति दिवसाचा खर्च 2112 इतका आहे, नागपूरमध्ये 1587 आहे. या इतक्या खर्चामध्ये आपण त्यांना काय देता? 115+20 असे मिळून 135 रुपये जेवण व औषधासाठी खर्च झाला तर इतर खर्च कसला? डॉक्टर्सची अनेक पदे रिक्त आहेत. त्यामुळे वेतनावरील खर्च कमी झालेला आहे. अनेक गोष्टी उपलब्ध नाहीत त्यामुळे त्यावरील खर्च कमी झाला आहे. तर मग हा खर्च कसला आहे? वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याकरिता 7 कोटींची मागणी करण्यात आली. आदिवासी विकास विभागाच्या सरबताच्या 12 कोटींच्या रकमेचा अजून हिशेब मिळाला नाही. हे सरबत कोण प्यायले? त्याची लक्षवेधी सूचना राखून ठेवली असली तरी दोन दिवसापासून सभागृहापुढे निवेदन येत नाही. संबंधित मंत्रिमहोदय सुध्दा सभागृहामध्ये आले नाहीत. अशाप्रकारे या ठिकाणी अधिकचा खर्च करण्यात आलेला आहे.

(यांनतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (पुढे सुरु....

सभापती महोदय, मुंबईमध्ये जे.जे. हॉस्पिटल, सेंट जॉर्ज हास्पिटल आणि कामा ॲन्ड अलबेसमध्ये डॉक्टरांची नवीन पदे भरली जात नाहीत. आपण आपल्या भाषणामध्ये मघाशी सांगितले की, डिप्लोमा कोर्सेस, पदवी, पदविका शिकविण्यासाठी टिचर्स नाहीत. त्यामुळे सगळ अन रिकग्नाईज कोर्सेस आहेत. काही प्रमाणात असे म्हटले की, एमबीबीएस आणि बोगस पदवी आणि पदव्युत्तर पदविका कोर्सेस आपण चालवितो. सुपर स्पेशॅलिटी हॉस्पिटलसाठी तर आपल्याकडे माणसेच नाहीत. आपल्याकडे एमसीएच आणि डीएम कार्डिओलॉजि आणि डीएम न्युरॉलॉजीसाठी माणसेच नाहीत. सायन हॉस्पिटलमधील कोर्स देखील बंद झालेला आहे.

सभापती महोदय, आपण जे.जे. हॉस्पिटलमधील उपकरणासाठी 10 कोटी 37 लाख रुपये राखून ठेवलेले आहेत. सेंट जॉर्ज हॉस्पिटलमधील उपकरण खरेदी करण्यासाठी 31 कोटी 38 लाख रुपये राखून ठेवलेले आहेत. कामा हॉस्पिटलमध्ये उपकरणासाठी 55 लाख रुपये राखून ठेवलेले आहेत. माझी अशी माहिती आहे की, आताच कॅथ लॅबसाठी सभागृहात लक्षवेधी सूचनेच्यामाध्यमातून बरीच चर्चा केलेली आहे. माझी अशी माहिती आहे की, कॅथ लॅब ही साधारणपणे साडेसात कोटी रुपयामध्ये तयार करणार आहोत. पण या कॅथ लॅबच्या सगळ्या एक्सेसरीज धरून तेवढा खर्च येत नाही. माझ्याकडे या संबंधातील सगळी कागदपत्रे आहेत. सिमेन्स कंपनीचे कोटेशन आहे. ही कॅथ लॅब 3 कोटी 80 लाख आणि अधिक 25 लाखाच्या इतर ॲक्सेसरीज अशी मिळून जवळजवळ सव्वा चार कोटीमध्ये तयार होते. हे त्यांचे कोटेशन आहे. पाहिजे असेल तर ते मंत्रीमहोदयांकडे पाठवितो. परंतु आपण मात्र 7 कोटी कॅथ लॅबसाठी खर्च करतो आहोत. हा खर्च शासाठी करतो आहोत ? प्रायव्हेट माणूस जर सिमेंन्सची कॅथ लॅब वापरतो तर आपल्याला वापरण्यामध्ये काय अडचण आहे ? आपल्यापेक्षा प्राव्हेटमधील रिझर्ल्ट नेहमी चांगले असतात. मंत्री महोदय आपण डॉक्टर आहात. याबाबत आपणही सांगू शकल. पण तसे करणार नाही. सगळ्यांना दहा टक्के, पंधरा टक्के, पंचवीस टक्के पैसे घ्यायचे असतात. पेशंट मेला तरी चालेल. त्यांना गुराचा टेंट लावला तरी चालेल, परंतु डॉक्टर बन्सलची चौकशी होणार नाही. अशा अनेक गोष्टी आहेत. तरी देखील आमचे जे.जे. सर्वोत्तम हॉस्पिटल आहे. आपण कामा अलबेस हॉस्पिटलमध्ये 55 कोटी रुपये राखून ठेवून काय करणार आहात ? याचे उत्तर द्यावे. कोणती आपण इक्वीपमेंट घेणार आहात ? त्या ठिकाणी सिटी स्कॅनचे मशीन घेणार आहे, की एमआरआयचे मशीन घेणार आहात ? सीटी स्कॅन आणि एमआरआय मशिन्सची किंमत तरी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (पुढे सुरु...

किती आहे ? अगदी तुम्ही 3.5 डेस्लाचे मशीन घेतले तरी 7 कोटीला एमआरआय येतो. अगदी 64 स्लाईजचा स्कॅन घेतला तरी तो दोन अडीच कोटी रुपयाला येतो. सन्माननीय सदस्य डॉ.वसंत पवार साहेब सुध्दा येथे आहेत, बरे झाले. त्यांना याची कल्पना आहे. तुम्ही हे पैसे काय करणार आहात ? आज आपल्याकडे इतके पैसे असतील तर आपण लोकांसाठी ही मशिन्स का घेत नाही ? तुम्ही सामान्य माणसाला प्रायव्हेट लोकांकडे पाठविता आणि कट प्रॅक्टीस सुरु करता ? असा माझा सवाल आहे. . सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्याच्या संबधाने मला तर काही बोलायचेच नाही. कारण आरोग्य खाते आणि वैद्यकीय शिक्षण विभाग म्हणजे भ्रष्टाचाराच्याबाबतीत मिनी देणगी आहे, असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. सभापती महोदय, आज डॉक्टरांची परिस्थिती काय आहे ? त्यांना आज रहायला क्वाटर्स उपलब्ध नाहीत. पेरीफेरीसाठी आर.एम.ओ.डॉक्टर्स आहेत, त्यांना रहायला जागा नाही. त्यांची सार्वजनिक बांधकाम विभाग दखल घेत नाही. आदिवासी विभाग दखल घेत नाही. ते डॉक्टर्स अक्षरश: गळक्या घरामध्ये रहातात. त्यांच्याकडून 24 तास सेवेची अपेक्षा आपण करतो. तो डॉक्टरही माणूस आहे, तो शिकलेला आहे, त्यालाही वाटते की, माझा मुलगा चांगल्या शाळेत जावा, त्याचे काय चुकीचे आहे ? म्हणून लोक टिकू शकत नाहीत. त्या ठिकाणी जर इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलप केले तर त्यांना सोईचे होईल. प्रत्येकाला वाटते की, माझा मुलगा चांगल्या शाळेमध्ये जावा, माझ्या पत्नीला सिनेमाला घेऊन जावे, म्हणून तेथे थिअेटर असावे. त्यामध्ये त्यांचे काय चुकीचे आहे ? माणसाला या अपेक्षा असतात. निदान त्यांना रहाण्यासाठी जे घर देता ते चांगले द्यावे, मेस मधील जेवण देता, ते तरी चांगले द्यावे, पौष्टीक द्यावे, नाही तर डॉक्टरांचेच कुपोषण व्हायचे.

यानंतर श्री.बरवड.....

अशुद्धीत प्रत / परिशुद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ....

सभापती महोदय, आज आपल्याकडे साधारणपणे 10 हजार राजपत्रित वर्ग 2 चे डॉक्टर्स हे अस्थायी स्वरुपात आहेत. ज्यांची 13-13 वर्षे, 14-14 वर्षे सेवा झालेली आहे, जे दोन दोन मुलांचे बाप झालेले आहेत ते अस्थायी आहेत तरीही सेवा देत आहेत. एम.पी.एस.सी. झाल्याशिवाय त्यांना कायम सेवेत घेता येत नाही. अभ्यास सोडल्यानंतर 14 वर्षानंतर त्यांनी परीक्षा द्यावी अशी अपेक्षा आपण कशी काय करता ? याबाबत सुप्रीम कोर्टाचा जो निर्णय आहे त्याप्रमाणे ज्यांची दहा वर्षे डॉक्टर म्हणून आरोग्य केंद्रावर सेवा झाली असेल त्यांना कायम करावे असा निर्णय आहे. त्याप्रमाणे आपण कार्यवाही केली तर दीड ते दोन हजार डॉक्टर्स स्थायी स्वरुपात रूपांतरित होतील. आपण कायद्यावर बोट ठेऊन, डॉक्टरांच्या खांद्यावर बंदूक ठेऊन त्यांच्याकडून सेवेची अपेक्षा करावयाची ही अतिशय वाईट गोष्ट आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाबाबत माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणात असे म्हटले आहे की, आदिवासी क्षेत्रात लोहाच्या कमतरतेमुळे झालेल्या रक्तक्षयाला प्रतिबंध करण्यासाठी जंतनाशक गोळ्या देण्याचा कार्यक्रम राबविण्यात आला. हा कार्यक्रम संपूर्ण राज्यात प्रत्येक वर्षी राबविण्याचे शासनाने ठरविले आहे. आपण अलबेंडाझॉल सिरपची किंमत पाहिली तर आपण जे सिरप खरेदी केले त्याची किंमत सहा रुपयाने जास्त आहे. आपण चौकशी करावी. माझे म्हणणे चुकीचे असेल तर मी रेकॉर्डवरील माझे स्टेटमेंट मागे घेईन. इ.एस.आय.एस. च्या रेट कॉन्ट्रॅक्टच्या दरापेक्षा आपण 6 रुपये जास्त देतो. जर इ.एस.आय.एस.ला 4 रुपयाचे अलबेंडाझॉल सिरप मिळत असेल तर ते आपण 10 रुपयाने कोणासाठी विकत घेत आहात आणि का घेत आहात ? जर आपल्यासाठी ते सिरप उपलब्ध असेल तर आपण ते का घेत नाही ? आपल्याकडे ओ.आर.एस.चा मोठा इश्यू झाला. ओ.आर.एस. म्हणजे ओरल रिहायड्रेशन सोल्यूशन. आपल्याकडे महाराष्ट्र अँटिबायोटिक्स प्रायव्हेट लिमिटेड (एमएपीएल) नावाची महाराष्ट्र शासनाची कंपनी होती. आपला असा नियम आहे की, ती कंपनी जर स्वत: उत्पादन करीत असेल आणि लोन लायसन्सवर देत नसेल तर त्या कंपनीकडून औषध खरेदी करावी. पण डब्ल्यू.एच.ओ.ने जे एक सर्क्युलर काढले होते त्यानुसार ती सर्व ऑर्डर स्क्रॅब केली. आपण ज्या कंपनीकडे ऑर्डर केली त्यांची ऑर्डर स्क्रॅब केली. 31 तारखेला सकाळी ऑर्डर दिली आणि संध्याकाळी ऑर्डर स्क्रॅब

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत .....

केली. डब्ल्यू.एच.ओ.च्या सर्क्युलरप्रमाणे 0.25 टक्के सोडियम सायट्रेट कमी होते. ऑब्सेंसिटी कमी करण्यासाठी लहान मुलांकरिता ते आवश्यक आहे. शासनाने हाफकीन तसेच अजंठा फार्मा वगैरे कंपन्यांना बाजूला ठेऊन कर्नाटक अँटिबायोटिक्स प्रायव्हेट लिमिटेड (केएपीएल) या कंपनीला ऑर्डर दिली. आपण त्या कंपनीला 4 रुपये 89 पैसे जास्तीच्या दराने ऑर्डर दिली. याप्रमाणे एक कोटी ओ.आर.एस.चे पाऊचेस घेतले. केएपीएल ही 50 कोटी रुपयांचा बिझनेस करणारी कंपनी आहे. त्या 50 कोटी रुपयांपैकी 30 कोटी रुपयांचा बिझनेस आपले लोक त्यांना देतात. कर्नाटक राज्य त्या कंपनीला काही बिझनेस देत नाही पण आपले लोक त्या कंपनीला 30 कोटीचा बिझनेस देतात. हे ओ.आर.एस.सुध्दा ती कंपनी स्वत: तयार करीत नाही तर अंकलेश्वर नावाची त्यांची सिस्टर कन्सर्न कंपनी आहे त्यांच्याकडून ते ओ.आर.एस. खरेदी करतात. चिकुन गुनियाचा प्रश्न या सभागृहामध्ये आला होता. मी त्याबाबत जास्त बोलू इच्छित नाही. सार्वजनिक आरोग्य विभाग माल्ट खरेदी करणार आहे. साल्कोफेराल माल्ट खरेदी करणार आहे. हे माल्ट कोण वापरतो ? साल्को फेराल माल्ट, प्रोटीन सिरप विकत घेत आहेत. हे 6 कोटी रुपयांचे माल्ट आपण कोणाला देणार आहात ? त्यामध्ये कॉस्कोपीन कफ सिरप हे आऊट डेटेड प्रॉडक्ट आहे. कॉस्कोपीन कफ सिरप काही कोटीचे खरेदी करणार आहात.

यानंतर श्री. शिगम .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. दीपक सावंत....)

कोणासाठी हे करता ? Whom the Govt. wants to favour and why? At what cost? At the cost of patients? यामध्ये प्रचंड गोंधळ आहे. मला आता त्या कंपनीचे नाव माहीत नाही. परंतु त्या एकाच कपंनीला, एकाच डिस्ट्रीब्यूटरला 60 ते 80 कोटी रुपयाची ऑर्डर दिली जाते. कुपोषणाने मुले मरत असताना माल्ट आणि प्रोटीन सिरप कशासाठी घेत आहात ? आपल्याकडे हॉफकिन संस्था असताना केअेपीएल कंपनीला 6 कोटीच्या औषधांची ऑर्डर दिली जाते, ही खरोखर अतिशय वेदना देणारी बाब आहे.

सभापती महोदय, शिक्षणाच्या संदर्भात बोलायचे झाले तर आपण विद्यार्थ्यांसाठी अपघात योजना सुरु केलेली आहे. या योजनेसाठी ओरिएण्टल इन्स्युरन्स कंपनी आणि न्यू इंडिया ॲश्युरन्स कंपनीला अडीच कोटी रुपये दिले आहेत. विद्यार्थ्याचे अपघातात निधन झाले तर 30 हजार रु,. अवयव निकामी झाला तर 20 हजार रुपये, शस्त्रक्रियेसाठी 10 हजार रु., पुस्तक हरवले तर 350 रु., सायकल चोरी झाली तर 1500 रु., चष्मा फुटला तर 750 रु. अशा प्रकारे मदत दिली जाते. ही योजना किती लोकांना माहीत आहे ? या योजनेचे लाभार्थी किती आहेत ? या संबंधीचा सर्व्हे वृत्तपत्रातून प्रसिध्द करण्यात आला होता. त्यामध्ये या योजनेचा लाभ कोणालाही मिळालेला नसल्याचे सांगण्यात आलेले आहे. मग ही योजना या दोन इन्शुरन्स कंपन्यांसाठी सुरु केलेली आहे काय ? सभापती महोदय, आदिवासी भागातील 12वी कनिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेतील विद्यार्थ्याची संख्या 2 लाख, वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांची संख्या 3 लाख आणि 86442 विद्यार्थी हे विज्ञान शाखेत शिक्षण घेत आहेत. ही सर्व आदिवासी मुले आहेत. आदिवासी भागामध्ये 35 कनिष्ठ महाविद्यालये आहेत. 12वी पास झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या 72,524 इतकी आहे. या मुलांसाठी 43.64 कोटी रुपये अनुदान दिले जाते. हे अनुदान कोठे जाते हा खरा प्रश्न आहे.

सभापती महोदय, खावटी कर्जाच्या संदर्भात मी शासनाला सूचना करु इच्छितो. आदिवासी लोकांना हे खावटी कर्ज घेण्यासाठी 100 रुपये भरुन तालुक्याच्या ठिकाणी बँकेत खाते उघडावे लागते. खरे म्हणजे या आदिवासी लोकांकडे गाडीसाठी पैसे नसतात. ते तालुक्याच्या ठिकाणी जाऊन 100 रु. भरुन बँक खाते कसे काय उघडणार ? या खावटी कर्जामध्ये आदिवासीला 70 टक्के धान्य मिळते आणि 30 टक्के रक्कम मिळते. या खावटी कर्जाच्या बाबतीत शासनाने

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. दीपक सावंत...)

रिलॅक्सेशन करावे अशी मी या निमित्ताने शासनाला सूचना करतो. सभापती महोदय, मी माझ्या भाषणामध्ये आरोग्य विषयाच्या संदर्भातील अनेक प्रश्न मांडलेले आहेत. त्या सर्व प्रश्नांना मंत्री महोदय उत्तर देतील अशी अपेक्षा व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो.

...नंतर श्री. भोगले.

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी (नामनियुक्त) : माननीय सभापती महोदय, माननीय वित्तमंत्र्यांनी सन 2007-08 या वर्षाकरिता सादर केलेल्या अर्थसंकल्पाचे मी स्वागत करते.

सभापती महोदय, राज्याच्या कठीण आर्थिक परिस्थितीमधून त्यांनी मार्ग काढला आहे. प्रशासनिक खर्चावर कडक निर्बंध ठेवायला सरकारचा दृढनिश्चय कारणीभूत झालेला आहे. त्यामुळे योजनांतर्गत महसुली खर्चात विलक्षण घट दिसून येते. जरी बाह्यकर्जे हा चिंतेचा विषय असल्याचे माननीय अर्थमंत्र्यांनी नमूद केलेले असले तरी त्याच्या टक्केवारीत घट झालेली आहे आणि हा जो ट्रेंड आहे तो खूपच आशादायक आहे असे म्हणायला काहीही हरकत नाही. आणखी एक आर्थिक परिस्थिती सुधारण्याचे द्योतक म्हणजे योजनांतर्गत खर्चात वाढ हे आहे. ही खर्चाची टक्केवारी वाढत चालली आहे. गेल्या दोन-तीन वर्षात त्यात लक्षणीय वाढ होऊन ही टक्केवारी 22.32 टक्के झालेली आहे आणि पुढील तीन वर्षात ती 25.25 टक्के होण्याची अपेक्षा आहे.

सभापती महोदय, सन 2006-07 या वर्षामध्ये नैसर्गिक आपत्तीशी झगडण्यामध्ये सुमारे 3500 कोटी रुपये अतिरिक्त खर्चाचा बोजा सरकारवर पडला. त्यामुळे महसुली तूट सुमारे 3200 कोटी रुपयांची झाली असा अंदाज आहे. नाही तर सुमारे 300 कोटी रुपये महसुली अधिक्य अपेक्षित होते.

सभापती महोदय, मला याठिकाणी विशेष उल्लेख करावासा वाटतो. तो हा की, शासनाच्या विविध विभागांनी विशेषत: शिक्षण, आरोग्य, कृषि इत्यादी विभागांनी त्यांना दिलेल्या बजेट तरतुदींचा वापर न केल्याच्या विपर्यस्त अशा बातम्या अधुनमधून वृत्तपत्रातून येतात. त्यांचे स्वरुप असे असते की, जणू सरकारची ही खाती काहीही कामच करीत नाहीत. याबाबत माझी अशी सूचना आहे की, दर तीन-चार महिन्यांनी अर्थखात्याने या विषयावर एखादे निवेदन प्रसिध्दीला देऊन सत्य परिस्थिती मांडावी आणि एखाद्या खात्याच्या खर्चात अंदाजपत्रकाच्या संदर्भात विलक्षण फरक आढळला तर त्याची योग्य कारणमिमांसा द्यावी. म्हणजे सामान्य लोकांमध्ये हल्ली पोहोचणारे चुकीचे जे संदेश आहेत ते रोखता येतील.

सभापती महोदय, स्वयंसहाय्यिता बचत गट सक्षम करण्यासाठी तेजस्विनी कार्यक्रम राबविण्याचा शासनाचा निर्धार अतिशय चांगला आहे आणि त्यासाठी रु.5.43 कोटीचा निधी प्रस्तावित करण्यात आला आहे. यात भरीव वाढ करावी अशी मी अर्थमंत्र्यांना खास विनंती करते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी.....

सभापती महोदय, जेंडर सेन्सिटिव्ह बजेटसाठी प्रत्येक विभागामध्ये वुमन डेव्हलपमेंट सेल असावा. त्या त्या विभागाने कशा प्रकारचे मंत्रालय महिलांना आवश्यक आहे याचा अभ्यास करावा. वुमन कॉम्पोनन्ट प्लॅन प्रत्येक मंत्रालयाने अंगिकारावा अशी मी आपल्या माध्यमातून सरकारला विनंती करते. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाच्या माध्यमातून महिला, बालक आणि इतर दुर्लक्षित घटकांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे हे अतिशय स्तुत्य आहे असे म्हणावे लागेल.

सभापती महोदय, मला सांगण्यास विशेष आनंद वाटतो की, मुंबईच्या पायाभूत सुधारणेबाबत अर्थसंकल्पात व्यवस्थित तपशीलवार माहिती देण्यात आली आहे. प्रत्येक प्रकल्पाबाबत झालेल्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला आहे आणि त्यासाठी लागणाऱ्या आर्थिक व्यवस्थेचे समालोचनही करण्यात आले आहे. या योजना पूर्ण झाल्यावर मुंबईचे जीवन नक्की सुसह्य होईल याची मला खात्री आहे.

सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा मोठया चिंतेचा आणि काळजीचा विषय आहे.

(नंतर श्री.जुन्नरे.....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी .....

याबाबतीत तातडीचे व दीर्घगामी उपाय योजण्याची आवश्यकता आहे. केंद्र व राज्य सरकार या दोघांनीही या बाबत तातडीची पावले उचलावीत अशी विनंती आहे.

सभापती महोदय, विदर्भासाठी आत्महत्या प्रश्न सर्वात बिकट झाला आहे. विदर्भासाठी खास पॅकेज शासनाने लागू केलेले आहे. तसेच विदर्भातील शेतक-यांच्या संदर्भात अर्थसंकल्पात योग्य ती तरतूद सुध्दा केलेली आहे.

पोलीस दलाची कार्यक्षमता वाढवण्यासाठी केलेल्या प्रयत्नाबद्दल बोलतांना मला एक गोष्ट सुचवावीशी वाटते की, प्रत्येक पोलीस स्टेशनला इंटरनॅशनल स्टँडर्ड ऑर्गनायजेशन दर्जाचे आय.एस.ओ. प्रमाणपत्र मिळवण्यासाठी प्रयत्न करण्यांची सक्ती करण्यात यावी. उत्कृष्ट क्वालीटी कंट्रोल अशा बाहय संस्थेमार्फत चांगला राहू शकतो. जुहू पोलीस स्टेशनला हा दर्जा मिळाला याबद्दल मी जुहू पोलीस स्टेशनच्या प्रमुखांचे व तेथील सर्व कर्मचा-यांचे अभिनंदन करते.

सभापती महोदय, बंदर विकास कार्यक्रमाबद्दल होणारी प्रगती अत्यंत धिम्या गतीने चालली आहे. शेजारील राज्यांमध्ये ज्या घडक गतीने बंदरांचा विकास होतो त्या हिशोबात आपले राज्य फारच मागे आहे. महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड हे कासवाच्या गतीने तरी चालते की नाही याची शंका यावी अशी स्थिती आहे. बंदर विकास व समुद्र मार्गाची प्रवासी वाहतूक ही गेल्या 10 वर्षात आहे तेथेच आहे. अधूनमधून योजनांची घोषणा व एखाद्या खाजगी कंपनीबरोबर सामंजस्य कराराच्या वाटाघाटी येवढीच बातमी येते. साधी वरसोवा-नरीमन पॉईंट प्रवासी सागरी वाहतूक हा विषय घोषणांपलिकडे गेलेला नाही. जुहू ला Sun-n-Sand जवळ बांधण्यासाठी जागा रिझर्व्ह केलेल्या नोटीस बोर्ड वरील रंगही आता उडून जाऊ लागला आहे. याकडे संबंधित मंत्र्यांनी खास लक्ष द्यावे. बंदर विकास हा कोकण विकासासाठी महत्वाचा व आग्रहाचा विषय आहे. व त्याबाबत तातडीच्या घडक उपायांची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, औद्योगिक प्रगतीबाबत सरकारची कामगिरी प्रशंसनीय आहे. पण त्याच वेळी ऊर्जा क्षेत्रामतील मागणी व पुरवठा यातील तफावत हा चिंतेचा विषय आहे. अर्थसंकल्पात त्याबाबत उचलण्यात येणा-या पावलांचे विवेचन आहे पण तरी देखील एकूण राज्याला व विशेषतः:

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी .....

मुंबईला भार नियमानाच्या कचाटयातून वाचवण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा करणे अत्यावश्यक आहे व हे काम अग्रक्रमानें सरकारने करणे आवश्यक आहे. मुंबईला जर आंतरराष्ट्रीय व्यापार केंद्र बनावायचे असेल तर एक दिवस जरी भार नियमन करावे लागले तर जगभर चुकीचा मेसेज जाईल व आपली नाचक्की होईल. याचा विचार करुन हे कसे टाळता येईल हे पहावे.

सभापती महोदय, अर्थसंकल्पाच्याद्वारे सरकारने आपण केलेल्या प्रगतीचे, पुढे करावयाच्या कार्याचे व राज्याच्या आर्थिक व्यवस्थेचे सम्यक दर्शन घडविले आहे. त्यामुळे माननीय अर्थमंत्री व आपल्या सदनात अर्थसकंल्प मांडणारे माननीय अर्थ राज्य मंत्री या दोघांचेही मी अभिनंदन करते. परंत एकदा अर्थसंकल्पाचे स्वागत करते. धन्यवाद.

जय हिंद, जय महाराष्ट्र.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा) : सभापती महोदय, सन 2007-2008 च्या अर्थसंकल्पावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, अर्थसंकल्पावर अनेक सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या भाषणात सविस्तर चर्चा केलेली आहे. त्यामुळे मी मुद्यांचे रिपिटेशन करणार नाही. फक्त काही मुद्दे सरकारच्या निदर्शनास आणून देणार आहे.

सन 2007-2008 चा अर्थसंकल्प पाहिल्यानंतर माननीय वित्तमंत्री आणि माननीय वित्त राज्यमंत्री हे दोघेही अर्थसंकल्प मांडून कंटाळलेले आहेत असे वाटते. आता तरी यातून आमची सुटका करा अशी त्यांची मन:स्थिती झालेली आहे असे अर्थसंकल्प वाचल्यावर वाटते. राज्याचा जीडीपी रेट 9.3 टक्क्यांवर गेला आहे आणि केंद्राचा जीडीपी 9.2 टक्क्यांवर आहे. म्हणजे केंद्र शासनाच्या तुलनेत महाराष्ट्र राज्याचा जीडीपी चांगला आहे असे माननीय वित्त मंत्री सांगतील. पण मी त्यांना सांगू इच्छितो की, हा जीडीपीचा वेग समाधानकारक मानला तरी त्या समाधानाच्या आधारावर जी नवीन विचारांची दृष्टी ठेवावयास पाहिजे होती किंवा काही महत्वकांक्षी योजनांची घोषणा व्हावयास पाहिजे होती ती व्हीजन या अर्थसंकल्पामध्ये दिसून आली नाही. सभापती महोदय, राज्याचे औद्योगिक धोरण घोषित झाले. राज्याचे गृहनिर्माण धोरण घोषित झाले पण यासंबंधीचे एकही वाक्य अर्थसंकल्पामध्ये नाही. जेव्हा सरकार एखादे धोरण घोषित करते तेव्हा त्यासंबंधीच्या पूरक गोष्टी बजेटमध्ये असतात. परंतु अशा काही बाबी अर्थसंकल्पामध्ये आम्हाला आढळून आल्या नाहीत. आज महाराष्ट्रामध्ये एसईझेडचा प्रश्न पेटलेला आहे. पण त्यासंबंधीचे एक वाक्यही अर्थसंकल्पामध्ये नाही. इतकी मोठी योजना आहे पण त्यासंबंधीचे काही धोरण मांडण्याची गरज शासनाला वाटली नाही. ही केंद्र सरकारची योजना आहे ना, मग त्यांनाच यामध्ये लक्ष घालू द्या, अशी भूमिका योग्य नाही. सभापती महोदय, मी आपणास एक उदाहरण सांगतो. ठाणे जिल्ह्यातील वाडा येथे एसईझेड अंतर्गत स्टील इंडस्ट्री येत आहे. या स्टील इंडस्ट्रीला पाणी मोठ्या प्रमाणावर लागते. मुळात कोकाकोला कंपनीला पाणी देताना तेथील लोकांचे पाणी काढून ते देण्यात दमछाक होत असताना या इंडस्ट्रीला पाणी कोठून देणार ? त्याठिकाणी एसईझेड मान्य झाल्यानंतर तेथे पायाभूत सुविधा पुरविण्याची व्यवस्था झाली पाहिजे. त्यादृष्टीने विचार व्हावयास

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

पाहिजे. पण तसा विचार येथे झालेला दिसत नाही. इंडस्ट्रीचा जीडीपी रेट 60 टक्के आहे. यामध्ये सरकारचे कर्तृत्व किती आहे ते माहीत नाही. तेव्हा या क्षेत्राला अधिकाधिक संधी कशी मिळेल, या क्षेत्राला कल्पकता देऊन ती डेव्हलप कशी करता येईल याचा विचार अर्थसंकल्पामध्ये झालेला दिसत नाही. याच्या उलट "आम्ही तांदूळ, गहू, नारळ, मिरची इत्यादी वस्तुंवरील व्हॅट सहा महिने पुढे ढकलला" असे सांगण्यात आलेले आहे. याचा अर्थ असा की, सहा महिन्यानंतर या वस्तुंच्या किंमतीमध्ये वाढ होणार आहे हे त्यांनी आधीच सांगितलेले आहे. नवव्या पंचवार्षिक योजनेचा नियतव्यय 45 हजार 125 कोटी इतका होता. मागील वर्षात तो 44 हजार 456 कोटी होता. सन 2006-07 मध्ये 66 हजार 662 कोटीवर गेला. यामध्ये 18 हजार 907 कोटी रुपये हे बॉंड, रोखे वगैरेवरील होते. याचा अर्थ 66 हजार कोटी रुपयांतून 18 हजार 907 कोटी रुपये काढले तर दहावी पंचवार्षिक योजना 47745 कोटींची असेल. शासनाने 18 कोटी रुपये वाढवून दाखविले. दहाव्या पंचवार्षिक योजनेमध्ये आतापर्यंत तीन वर्षात 27 हजार कोटी इतका खर्च झालेला आहे. तर उर्वरित दोन वषात 20 हजार इतका खर्च होणार आहेत.

यानंतर कु.गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ...

आपली 9वी पंचवार्षिक योजना 47 हजार कोटीची होती आणि 10वी पंचवार्षिक योजना देखील 47 हजार कोटीची आहे. याचा अर्थ आपल्या राज्याचा विकास झालेला नाही म्हणजे जे नवव्या पंचवार्षिक योजनेमध्ये आहे तेच दहाव्या पंचवार्षिक योजनेमध्ये आहे. हे या आकडेवारीवरुन सिध्द होत आहे. शिक्षणावर 2548 कोटी रुपयांचा नियतव्यय होता त्यातील 4 वर्षात केवळ 550 कोटी रुपये खर्च केला गेला. पुढच्या दोन वर्षातील सगळी तरतूद आपण लक्षात घेतली तरीही जवळजवळ 1500 कोटी रुपयेच शिक्षणावर खर्च झालेला आहे तसेच पाणीपुरवठयावर सुमारे 2 हजार कोटी रुपये तरतुद असताना देखील खर्च झालेला नाही. असे एकूण 3.5 ते 4 हजार कोटी रुपये हे पाटबंधारे विभागाकडे शिल्लक आहेत. ही रक्कम उर्जा विभागाकडे वळवली असती तर आम्ही समजू शकलो असतो. मानव विकासाशी संबंधित शिक्षण, आरोग्य पाणीपुरवठा या संदर्भात 8 हजार कोटी खर्च होणे आवश्यक होते मात्र प्रत्यक्षात हा खर्च 4 हजार कोटी रुपये इतकाच खर्च झालेला आहे. हा खर्च 5 टक्के व्हावयास पाहिजे होता परंतु तो 2.5 टक्के सुध्दा झालेला नाही. मानव विकास आयोगाला मागच्या वर्षी 50 कोटी रुपये देऊन त्याचे आपण काय भलं केलेलं आहे ते माननीय अर्थ मंत्र्यांना माहित आहे. सभापती महोदय, या राज्याच्या उत्पन्नाचा विचार केला तर मुंबईमधून साधारणपणे 29 टक्के उत्पन्न मिळते, ठाणे जिल्हयामधून 10 टक्के उत्पन्न मिळते आणि पुणे जिल्हयामधून 9 टक्के उत्पन्न मिळते. मुंबई, ठाणे आणि पुणे या तिनही जिल्हांचे उत्पन्न हे राज्याच्या एकूण उत्पन्नाच्या 44 टक्के होते आणि उर्वरित 31 जिल्हांचे उत्पन्न हे एकूण उत्पन्नाच्या 56 टक्के एवढे होते. मला या ठिकाणी सर्व राज्यांच्या समतोल विकासासंदर्भात प्रश्न उपस्थित करावयाचा आहे म्हणून मी ही आकडेवारी येथे स्पष्ट केलेली आहे. रायगड जिल्हयाचे उत्पन्न 3.22 कोटी, नाशिक जिल्हयाचे उत्पन्न 4.48 कोटी, कोल्हापूर जिल्हयाचे उत्पन्न 3.50, कोटी औरंगाबाद जिल्हयाचे उत्पन्न 2.5 कोटी, सोलापूर जिल्हयाचे उत्पन्न 2.9 कोटी आणि नागपूर जिल्हयाचे उत्पन्न 5.5 कोटी इतके धरले तर या सहा जिल्हयाचे 22 टक्के उत्पन्न व 9 जिल्हयांचे उत्पन्न हे 66 टकके होते आणि 23 जिल्हे मात्र 34 टक्के उत्पन्न करतात हा राज्याच्या उत्पन्नामधील असमतोल आहे. आपण

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ...

जेव्हा समतोल विकासाची भाषा करता तेव्हा त्या मध्ये हा विचार कुठे आहे ? याचे उत्तर राज्य सरकारने दिले पाहिजे आणि आपले राज्य कशामुळे मागे पडत आहे, याचा देखील विचार करण्याची गरज आहे. माननीय अर्थ मंत्र्यांनी आपल्या भाषणात महाराष्ट्राला ही रक्कम कशी मिळवता येईल याची चर्चा केली होती. फिक्कीने केलेल्या सर्वेक्षणानुसार महाराष्ट्रामधील गुंतवणुक गेल्या 5-6 वर्षामध्ये विकास दर 6 टक्कयावरुन 2.5 टक्के इतका धसरला आहे. 1996 ते 2002 मध्ये औद्योगिक 6 टक्के होता , तो आता 2.1 इतका झालेला आहे. असा फिक्कीचा याबाबतीतील अभ्यास आणि सर्वेक्षण आहे. महाराष्ट्राने सेवा क्षेत्रामध्ये यापूर्वी विकास दर 8 टक्के करुन दाखविला होता परंतु या बाबतीत आता महाराष्ट्राचा पाचवा क्रमांक आहे. आंध्र प्रदेश, तामिळनाडू, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगाल ही राज्ये महाराष्ट्राच्या पुढे आहेत. सेवा उद्योग मुंबई व पुण्यामध्ये असताना आणि आय. टी. सेक्टरमध्ये पुढे असताना देखील आपण पुढे जाऊ शकत नाही, ही गोष्ट भूषणावह नाही.

यानंतर श्री. पुरी .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

त्याची वास्तवता आपल्यासमोर दिसेल. नवीन व्यवसाय सुरु करण्यासाठी सर्व परवानग्या देण्यासाठी विविध राज्यामध्ये किती दिवस लागतात याचा अभ्यास फिक्कीने केला आहे. कर्नाटक राज्यात परवानग्या देण्यासाठी 57 दिवस लागतात, तामिळनाडू राज्यास 58 दिवस लागतात, उत्तर प्रदेश राज्यास 61 दिवस लागतात, आंध्रप्रदेश राज्यास 68 दिवस लागतात, पश्चिम बंगाल राज्यास 83 व महाराष्ट्र राज्यास याबाबतीत 89 दिवस लागतात. आपण एक खिडकी योजना किंवा इतर सगळे काही करुनही नवीन व्यवसाय सुरु करण्याच्या दृष्टीने परवानग्या देण्यासाठी आपल्या राज्यास 89 दिवस लागतात. उद्योगधंद्यासाठी मालमत्तेची करारपत्रके किती होतात, याची टक्केवारी पुढीलप्रमाणे आहे. याबाबतीत राज्याची टक्केवारी 11.2 इतकी असून तीच आंध्रप्रदेश राज्याची केवळ 2.1 टक्क्यांची आहे. त्यामुळेच विशेषत: उद्योगधंदे पुढे का जात आहेत, हे त्यावरुन लक्षात येते. महाराष्ट्रातील नोंदणीकृत लघू उद्योगांची नोंदणी 55 टक्के आहे. तीच तुलना गुजरात राज्याच्या बाबतीत केली तर ती 91 टक्क्यांच्या वर आहे. त्यामुळे उद्योगाला चालना देत असताना आपल्याकडील रोजगार वाढणार आहे. बजेटमध्ये बोईंग, जनरल मोटर्स, ट्रॉल्स व्हॅगन या कंपन्यांची नावे आली. परंतु या ऑटोमोबाईल युनिट आहेत. त्यामुळे प्रत्यक्षात किती जणांना रोजगार मिळेल ? शेकडयापेक्षाही कमी लोकांना रोजगार मिळणार आहे. सर्व ऑटोमोबाईल युनिटमध्ये गुंतवणूक जास्त वाढली असली तरी त्यातील रोजगाराची संख्या हजाराच्या वर जाणार नाही. असे असताना आमचे उद्योग क्षेत्र प्रगत आहे, असे म्हणणे कितपत योग्य होणार आहे? आपल्याला खरेच रोजगार वाढवायचा असेल तर जे स्मॉल स्केल उद्योग बंद पडलेले आहेत, त्यांना पुनर्जीवित करावे. एका सेमिनारमध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, आम्ही ऑक्ट्रॉय ॲबॉलिश करु. आज हे उद्योग मल्टिपल टॅक्सेसच्या दबावाखाली जात आहेत. त्यामुळे आपल्या राज्यामध्ये रोजगार वाढवायचे असतील तर या स्मॉल स्केल इंडस्ट्रीजना मल्टिपल टॅक्समधून वाचवणार आहात का ? ते आपण सांगावे.

सभापती महोदय, माननीय वित्त राज्यमंत्री महोदयांनी गेल्यावर्षी सरप्लस बजेट मांडले. परंतु त्यामध्ये नंतर 890 कोटी रुपयांपर्यंत तूट आली. यावेळी ती आपण 2906 कोटी दाखवली आहे. आपण राज्यातील जनतेला खोटे चित्र का दाखवत आहात ? आपल्यासमोर आता कुठलीही निवडणूक नाही. मग, आपण राज्यातील जनतेला खोटी आश्वासने का देत आहात ? राज्यातील

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

जनतेसमोर आपण सत्य परिस्थिती का विशद करीत नाहीत ? आपण महाराष्ट्राची वार्षिक योजना जाहीर केली. ती योजना आपण 20200 कोटी रुपयांची केली. त्यामध्ये 10 टक्के नियतव्यय पाटबंधारे विभागासाठी किंवा वीज विकासासाठी ठेवला. परंतु प्रत्यक्षात त्यावर 4 हजार कोटी रुपयेच खर्च झाले. आपल्या महाराष्ट्राची वार्षिक योजना ही केवळ देखावा असते. मागच्या वर्षीही आपण 16 हजार कोटी रुपयांची वार्षिक योजना दाखवली परंतु प्रत्यक्षात फक्त 8 हजार कोटी रुपयेच खर्च झाले. मागील वर्षी सामाजिक विभागासाठी मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी 1717 कोटी रुपयांची तरतूद केली होती. चार वर्षात याबाबतीतील खर्च 2200 कोटी रुपये दाखवला. तसेच, सन 2007-2008 मध्ये मागासवर्गीयांसाठी 2076 कोटी रुपये खर्च दाखवलेला आहे. यामध्ये आता 600 कोटी रुपये खर्च केले. या विभागासाठी आपण 2000 कोटी रुपये तरतूद दाखवता व तो पैसा नंतर आपण पाटबंधारे विभागाकडे वळवता, हा कोणता न्याय आहे व नंतर सामाजिक समतेला गती देणारा अर्थसंकल्प आहे असे म्हणायचे, हे योग्य आहे का ?

नंतर श्री.रोझेकर....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

सामाजिक समतेला गती देणारा अर्थसंकल्प असे म्हणून 2076 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. पण चार-पाच महिन्यांनंतर पुरवणी मागण्या येऊ लागल्या की, सामाजिक समतोल बासनात गुंडाळून ठेवण्यात येतो. या पद्धतीने या राज्याचा अर्थसंकल्प मांडला जातो.

सभापती महोदय, संक्षिप्त अर्थसंकल्पात एकूण महसूली खर्च 80 पैसे आणि भांडवली खर्च 31 पैसे दाखविला आहे. 15 पैसे व्याजासाठी राखून ठेवण्यात आले आहेत, वेतनावर 29 पैसे खर्च आहे. म्हणजे अर्थसंकल्पामध्ये व्याज व वेतन यावरील खर्चाचा वाटा 44 टक्के आहे. हा अर्थसंकल्प मांडत असतांना वेगवेगळया खात्यांमध्ये जो गोंधळ झाला, ज्याचा उल्लेख माननीय सदस्य, डॉ.दीपक सावंत व माननीय सदस्य, श्री.मधुकर चव्हाण यांनी केला आहे. त्यावर सरकारचा अंकुश आहे, असे दिसत नाही. विविध वर्तमानपत्रे, इलेक्ट्रॉनिक मिडिया, सभागृहातील सन्माननीय सदस्य आरोग्य खात्याच्या भ्रष्टाचाराबाबतची प्रकरणे सातत्याने मांडत असतात. परंतु, संबंधित मंत्री त्याला थातूरमातूर उत्तर देतात. कॉटन गॉजमधील भ्रष्टाचाराची चौकशी करण्यासाठी अय्यर समितीची नियुक्ती करण्यात आली होती. नियमबाहय पद्धतीने खरेदी करण्यात आली, जास्त दराने खरेदी केली, अशा प्रकारचे निष्कर्ष समितीने काढले, आपला अहवाल शासनाला सादर केला, पण शासनाने हा अहवाल स्वीकारला नाही. करोडो रुपयांचा भ्रष्टाचार या प्रकरणी झालेला आहे. आरोग्य खात्यातील भ्रष्टाचार म्हणजे छोटे तेलगी कांड आहे, असे सन्माननीय सदस्य, डॉ.दीपक सावंत म्हणतात, ते खरे आहे. त्यामुळे शासन या भ्रष्टाचाराची निवृत्त न्यायाधिशामार्फत चौकशी करणार आहे का, किंवा सन्माननीय सदस्यांची समिती नियुक्त करणार आहे का ? या खात्यातील भ्रष्टाचार जर शासनाने थांबविला तर आरोग्य खात्याला वेगळा निधी देण्याची गरज लागणार नाही, या खात्याला दिलेल्या निधीतूनच संपूर्ण राज्याला आरोग्य सुविधा आपण देऊ शकतो. या खात्यामध्ये 750 हून अधिक पदे रिक्त आहेत. ही पदे भरण्यासाठी प्राधान्य देणार आहे, असे शासनातर्फे सांगण्यात येते. परंतु, त्याबाबतीतही काही कार्यवाही होतांना दिसत नाही. शासकीय रुग्णालयातील डॉक्टरांना खाजगी दवाखान्यात प्रॅक्टिस करण्यास परवानगी देण्याबाबत अभ्यास करण्यासाठी डॉ.सापटणेकर यांची एक समिती नियुक्त करण्यात आली होती. या समितीने इनहाऊस प्रॅक्टिस करण्याबाबतचा अहवाल शासनाला सादर

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

केला होता, पण याही बाबतीत शासनाने निर्णय घेतला नाही. अशा प्रकारचा निर्णय आपण घेऊ शकलो नाही तर चांगल्या डॉक्टरांचा उपयोग आपण आपल्या रुग्णालयात करुन घेऊ शकणार नाही, ही वस्तुस्थिती आहे.

सभापती महोदय, प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेचे स्वागत सत्ताधारी पक्षाने बाके वाजवून केले. पण वस्तुस्थिती अशी आहे की, गेल्या पाच वर्षात या योजनेवर चार फेजवर 686 कोटी रुपये खर्च करण्यात आले तर एका वर्षात 1100 कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत. असे कोणते टॉनिक या सरकारने घेतले आहे की, पाच वर्षात जेवढा पैसा खर्च करु शकलो नाही त्याच्या दुप्पट निधी एका वर्षात खर्च करणार आहोत. कशाच्या आधारे एवढी कामे होऊ शकणार आहेत ? मुळात केंद्राकडून हा निधी मिळविण्यामध्ये आपल्या राज्याचा क्रमांक दहावा आहे. कामे अतिशय दुर्गम ठिकाणी आहेत, वाहने उपलब्ध नाहीत, कर्मचारी त्या ठिकाणी काम करण्यास जात नाहीत, कामांमध्ये दिरंगाई होत आहे, कामांची तपासणी होत नाही. ऑडिटरने लिखित स्वरुपात हे दिलेले आहे की, जिल्हा परिषद रचनेच्या आधारे ही योजना राबविता येणार नाही. बाकीच्या राज्यांनी या योजनेसाठी स्पेशल टास्क फोर्स निर्माण केला आहे व केंद्राकडून पैसा मिळवला. परंतु, आपल्या राज्यसरकारकडे इच्छाशक्ती नाही, पदे निर्माण केलेली नाहीत, जिल्हा परिषदेच्या स्वत:च्या बोज्यामध्ये आणखी या कामाची भर टाकण्यात आली आहे व त्यामुळे कामे होऊ शकली नाहीत. परिणामी केंद्राकडून जेवढा निधी राज्याला प्राप्त व्हावयाचा होता, तेवढा झाला नाही, हे या योजनेचे दुर्दैव आहे. राज्य सरकारने या योजनेची घोषणा करतांना आपली पाठ थोपटवून घेतली, परंतु या योजनेचे खरे वास्तव बाहेर आले तर या योजनेत केवढा फोलपणा आहे, हे आपल्या ध्यानात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य, श्री.नितीन गडकरी, सन्माननीय सदस्य, श्री.मधुकर चव्हाण यांनी आपल्या भाषणात एस.आर.ए.योजनेचा उल्लेख केला. ही अतिशय चांगली योजना आहे. या योजनेमध्ये गरीब माणसाला घर मिळण्याची जी तरतूद आहे त्यामुळे अनेक गरीबांचे कल्याण होणार आहे

यानंतर कुमारी जयश्री.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

या योजनेत अंडरवर्ल्डचा पैसा येतो, म्हणून आपण चिंतीत आहोत, चतुर्वेदी बिल्डरचे जे प्रकरण घडलेले आहे, ते आपल्या सर्वांना माहितच आहे, समोरच्या बिल्डरला मदत करावयाला म्हणून वरिष्ठ पोलिस अधिका-यांनी हे कुंभांड रचलेले आहे. हे सर्व मी अतिशय जबाबदारीने बोलत आहे. सदर प्रकरणामध्ये वाडकर नावाच्या माणसाला पाच दिवस आधी दुस-या पोलीस स्टेशनमध्ये पकडण्यात आले होते, त्यावेळी त्याच्या बायकोने "हयुमन राईट कमिशनला " पत्र लिहिले होते, यातील दुसरा आरोपी कुरेशी याला चार दिवस आधी पकडले होते,त्याने माननीय राज्यपालांना पत्र लिहिले होते, या दोघांची केस साईल नावाच्या इन्काऊंटर फेम अधिका-याकडे देण्यात आली होती, तेव्हा या अधिका-याने असे सांगितले की, या केसमध्ये श्री.कुरेशी व श्री.वाडकर यांना गोवण्यात आलेले आहे. याचा अर्थ असा होतो की, ही माणसे एका कुविख्यात गुंड अमर नाईकचे चालक होते, म्हणून त्यांना हरप्रकारे मदत करण्याची भूमिका पोलिसांनी घेतलेली होती. आतापर्यंत डान्सबार, एस.आर.ए. व डेफिशियट बजेटमध्ये शासकीय अधिकारी व राजकीय नेत्यांचे पैसे होते, हे आपण ऐकत होतो पण अशा प्रकारे पोलिसांचाही सहभाग या सर्वांमध्ये सुरु झाला तर मुंबईमध्ये हाहाकार माजेल आणि पोलीस अधिका-यांमध्ये गँगवॉर चालू होईल.

इंजिनियरिंग व मेडिकल फी वाढीसंबंधी सन्माननीय सदस्य डॉ.सावंत हे नेहमीच हिरीरीने व प्रेमाने प्रश्न मांडतात. मेडीकल आणि इंजिनियरिंग कॉलेजच्या फीवाढीच्या संदर्भात जी काही समिती आहे त्या शिक्षण शुल्क समितीला कुठल्याही प्रकारची सुविधा राज्य सरकार देत नाही. या शिक्षण शुल्क समितीकरिता 17 कर्मचारी मंजूर असूनही त्यांना ते उपलब्ध होत नाहीत, ज्यावेळी या समितीकडे एखाद्या कॉलेजने आमच्या कॉलेजचा अमुक खर्च आहे, आम्हाला अमुक फी घेतली पाहिजे, असे जर म्हटले तर आणि तशी कागदपत्रे दाखल केली तर त्यांनी दिलेली सर्व कागदपत्रे खरी आहेत की, खोटी आहेत हे कोठे पडताळून पाहिले जाते ? ते म्हणतात की, ही कागदपत्रे खरी की खोटी हे तपासावयाला आमच्याकडे माणसे नाहीत, त्यामुळे मेडीकल व इंजिनियरिंग कॉलेजेसचे फीवाढीच्या संदर्भातील आलेले प्रस्ताव हे शिक्षण संस्थाचालकांनी सबमिट केलेल्या कागदपत्रांच्या आधारेच मान्य केले जातात. कागदपत्रांची सत्यता पडताळण्याकरिता समितीकडे आवश्यक ती व्यवस्था किंवा यंत्रणाही नाही,

4V -2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

त्यामुळे ते कागदपत्रांची सत्यता पडताळू शकत नाहीत. आम्हाला फायदा होत नाही, आम्ही तोटयात चाललो आहोत, आम्हाला फी वाढवून द्या, असे म्हणणा-या शिक्षण संस्था चालकांवर इन्कम टॅक्सची धाड पडली की, त्यांच्याकडे सापडलेले पैसे त्यांनी कोठून आणले ? असे विचारल्यास संस्था चालक म्हणतात की, हा तर आमचा प्रॉफिट होत आहे. आतापर्यंत हा आम्ही तिजोरीत व लॉकरमध्ये ठेवला होता एका बाजूला आमची संस्था तोटयात चालू आहे, म्हणून आम्हाला फी वाढीसाठी मान्यता द्या असे संस्थाचालकांकडून सांगितले जाते आणि दुस-या बाजूला इन्कम टॅक्सची धाड पडल्यानंतर वरील प्रकारचे ॲफिडेव्हिट कोर्टामध्ये सादर केले जाते, सिध्दार्थ कॉलेज,विश्वकर्मा इन्स्टिटयूट,एम.आय.टी.वगैरे अनेक शिक्षण संस्था अशा प्रकारच्या आहेत. इन्कम टॅक्सने धाड टाकल्यानंतर शिक्षण संस्थाचालक जे म्हणतात ते खरे की, कोर्टामधील सादर केलेले ॲफिडेव्हिट खरे ? यातील वास्तव तपासले गेले पाहिजे, याच्यानंतर शासनाने या वाढीसंबंधी विचारणा केल्याचे दिसत नाही. शासनाने या विषयाबद्दल जेन्युईनली विचार करावा, असे मी या निमित्ताने सांगू इच्छितो. अर्थसंकल्पामध्ये या शिक्षण शुल्क समितीच्या सुविधांकरिता काही तरतूद केल्याचे दिसून येत नाही. श्री.जयंत पाटील व डॉ.सुनील देशमुख हे अर्थ खात्याला कंटाळलेले आहेत, असे दिसून येते. कारण त्यांनी कोणत्याही प्रकारे डोके न वापरता हा अर्थसंकल्प तयार केलेला आहे. अर्थसंकल्प आला की, पाटया टाकून आपले सोपस्कार पार पाडावयाचे, कोटावर फुल लावून फोटो काढावयाचे. या व्यतिरिक्त या अर्थसंकल्पामध्ये दुर्दैवाने काहीही नाही. अर्थसंकल्प सादर करतांना या राज्याचा जी.डी.पी. 9.3 टक्के इतका आहे, असे शासन अभिमानाने सांगते व समाधान व्यक्त करते परंतु हे सांगतांना जी दूरदृष्टी व व्हिजन असावयाला पाहिजे, ती त्यांच्या मन:स्थितीमध्ये दिसून येत नाही. हे वास्तव शासनाच्या निदर्शनास आणून मी माझे दोन शब्द संपवितो.

यानंतर श्री.बोरले.....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : आपल्याला सभागृहाची वेळ वाढवावी लागेल काय ?

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, मला असे वाटते की, आपल्याला सभागृहाची वेळ वाढवावी लागेल.

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन 2007-08 चा अर्थसंकल्प माननीय अर्थ राज्यमंत्र्यांनी सभागृहाला सादर केलेला आहे. त्या अर्थसंकल्पाला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. आपला देश पश्चिम आशियातील राष्ट्रांपैकी एक प्रगतिशील व महत्वाचा देश आहे आणि या देशातील महाराष्ट्र हे सर्वात प्रगतिशील आणि महत्वाचे राज्य आहे. माननीय अर्थ राज्यमंत्र्यांनी जो अर्थसंकल्प सादर केला त्याचे स्वागत करणे व समर्थन करणे मी माझे कर्तव्य समजतो.

सभापती महोदय, हा अर्थसंकल्प सामान्य गरीब शेतकरी व शेतमजुरांच्या दैनंदिन जीवनाशी निगडीत आहे. राज्यातील 15 लाख आपदग्रस्त शेतक-यांना 473.47 लाख रुपयांची मदत देण्याची तरतूद करणारा हा अर्थसंकल्प म्हणजे या शासनाच्या धोरणाचा आरसाच आहे.

सभापती महोदय, राज्य शासनाने अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या तळागाळातील वर्गांच्या कल्याणाला अग्रक्रम दिला जाईल, अशी घोषणा केली होती. अनुसूचित जाती या घटकातील लोकांच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक कल्याणासाठी विशेष घटक योजनेखाली 2,060 कोटी रुपयांची आणि आदिवासी विकासासाठी 1,798 कोटी रुपयांची तरतूद करण्याचे शासनाने आश्वासन दिले होते. यासाठी शासनाने तरतूद प्राप्त करुन न दिल्यामुळे शासनाची आश्वासने व घोषणा पोकळ व फसव्या असतात, हे सिद्ध झालेले आहे. राज्य शासन अनेक कल्याणकारी योजना राबवित असते. परंतु त्या योजना तळागाळातील जनतेपर्यंत पोहचतात की नाही याकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, शासनाच्या अर्थसंकल्पातून विकासाची गती, मनुष्यबळ संवर्धन, गरिबी कमी करणे, गरीब आणि उपेक्षितांसाठी सुरक्षा उपलब्ध करुन देणे इत्यादींवर फार मोठा परिणाम अपेक्षित असतो. तसेच या अर्थसंकल्पात काय समाविष्ट करण्यात आले आणि काय वगळण्यात आले आहे या गोष्टी सामान्य जनतेच्या दृष्टीने अत्यंत जिव्हाळयाच्या असतात. या राज्याच्या अर्थव्यवस्थेच्या इतिहासात प्रथमच विकासाचा दर 9 टक्क्यापेक्षा जास्त राहिला असून तो चालू वर्षात त्याहीपेक्षा वरच्या पातळीवर टिकून राहील, हा आशावाद अभिनंदनीय आहे.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे .....

सभापती महोदय, सामाजिक न्याय व मनुष्यबळ संवर्धनासाठी विनाअनुदानित शिक्षण संस्थांमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी समाजाच्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी केलेली 33.39 कोटी रुपयांची तरतूद आणि प्राथमिक व माध्यमिक शालेय स्तरावरील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ केल्याबद्दल मी माननीय अर्थमंत्र्यांना धन्यवाद देतो. परंतु त्याच बरोबर सहशिक्षकांच्या पाल्यांना सुद्धा ही योजना लागू असली पाहिजे, असे मला वाटते.

सभापती महोदय, मागच्या 25 वर्षापूर्वी शासनाने ई.बी.सी. योजना लागू केली. 25 वर्षानंतर देखील ई.बी.सी. योजनेमध्ये जुनेच दर लागू आहेत. ई.बी.सी. योजनेच्या दरामध्ये आमुलाग्र बदल करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, दूरदर्शीपणाने कारभार करणारे शासन आपला खर्च उत्पन्नाच्या मर्यादेत बसविण्याबाबत नेहमीच जागरुक असते. माननीय अर्थमंत्र्यांनी वेतन व निवृत्तीवेतनावरील खर्च कमी करुन राज्याच्या महसुली जमेत 13.33 टक्क्यांनी वाढ करण्याचा निर्धार केला आहे. ही बाब राज्याच्या आर्थिक सुस्थिरतेसाठी फलदायी ठरणार असली तरी सुद्धा शिक्षण सेवक, शिक्षकेतर कर्मचारी आकृतीबंध, आय.टी.आय. निदेशक कर्मचारी आकृतीबंध तयार केला आहे. शिक्षक आमदार म्हणून मला सूचना करावयाची आहे की, शासनाने पुढच्या काळामध्ये नोकर कपात करण्याचा निर्णय घेतलेला आहे. शासनाने नवीन नोकर भरती केली नाही तरी चालेल. परंतु नोकर कपात करु नये, अशी माझी शासनाला विनंती आहे.

यानंतर श्री.गागरे .....

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे .....

सभापती महोदय, राज्यातील अल्पसंख्यांक वर्गाला मुख्य प्रवाहात सामावून घेण्यासाठी आणि त्यांना सन्मानाने जीवन जगता यावे यासाठी अर्थसंकल्पात सामाजिक सुरक्षेच्या तरतूदी असणे आवश्यक आहे. मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळास भाग भांडवलासाठी 1 कोटी 54 लाख रुपयांचा निधी आणि नागपूरच्या हज हाऊसच्या बांधकामासाठी निधीची तरतूद करुन राज्यातील अल्पसंख्यांक वर्गात विश्वास व आपुलकी निर्माण करण्याचे कार्य या अर्थसंकल्पाने केले आहे. आर्थिक विकास महामंडळाकडून लाभार्थींना कर्ज वाटप होते, परंतु त्याची वसूली किती होते ? हे पाहण्याची वेळ आलेली आहे.

सभापती महोदय, राज्यातील 43 टक्के लोक शहरात तर 57 टक्के लोक ग्रामीण भागात राहतात. शहरीकरणाचा वेग वाढला आहे, यामुळे शहरे बकाल तर खेडी ओस पडत आहेत. नजीकच्या भविष्यकाळात शहरी व ग्रामीण जनतेचे प्रमाण समान होण्याची शक्यता आहे. भविष्याचा वेध घेऊन नगर विकास विभागाच्या योजनांसाठी 2203 कोटी रुपये आणि ग्रामीण भागातील पाणी पुरवठा व इंदिरा आवास योजनेसाठी एकूण 993 कोटी रुपयांची तरतूद करुन शहरे व ग्रामीण भाग यांच्या संतुलित विकासास चालना देण्याचा प्रयत्न सन्माननीय अर्थमंत्र्यांनी केला आहे म्हणून मी या बाबींचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, पाटंबंधारे, विद्युत निर्मिती, वैद्यकीय शिक्षण, रस्ते विकास, पर्यटन वगैरे खात्यांबाबत अनेक चांगल्या बाबी या अर्थसंकल्पात प्रस्तावित करण्यात आल्या आहेत. तथापि मी मराठवाडा शिक्षक मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व करतो. माझ्या पदरी मात्र निराशाच आली आहे. या अर्थसंकल्पात विदर्भातील सहा जिल्हयांसाठी विशेष पॅकेज जाहीर करण्यात आले आहे. भारत सरकारच्या केंद्रीय नियोजन आयोगाच्या मताप्रमाणे विदर्भातील या सहा जिल्हयांपेक्षा मराठवाडयातील जनतेचे दरडोई उत्पन्न कमी आहे. तसेच दारिद्रय रेषेखालील जनतेचे प्रमाणही जास्त आहे. परंतु मराठवाडयाला मात्र असे पॅकेज देण्यात आलेले नाही. मराठवाडा ही संतांची भूमी आहे म्हणून आमच्याकडे सहनशीलता आहे. या सहनशीलतेमुळे आमच्याकडे शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण कमी आहे. विशेषत: मराठवाडयातील लातूर, उस्मानाबाद व बीड जिल्हयातील

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे .....

शेतकरी, शेतमजूर पाठीवर संसार घेऊन महाराष्ट्रात नोव्हेंबर ते मे महिन्यात उन्हात ऊस तोडण्याचे काम करीत असतात. या शेतकऱ्यांना शासनाच्या मदतीची खरी आवश्यकता आहे. म्हणून अशा प्रकारचे पॅकेज मराठवाडयातील किमान या तीन जिल्हयांना देण्यात यावे, अशी मी आग्रहाची मागणी करीत आहे.

सभापती महोदय, शालेय शिक्षण व उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात आपल्या राजकीय सोयीसाठी शासनाने कायम विनाअनुदानाचे तत्व स्वीकारले आहे. कार्यकर्त्यांना शिक्षण संस्था मिळाल्या, पण त्या ठिकाणी काम करणारा शिक्षक व प्राध्यापक आज उपाशीपोटी काम करतो आहे, तो आज पगारापासून वंचित व उपाशी आहे, तो विद्यार्थ्यांचे भवितव्य काय घडविणार ? म्हणून कायम विनाअनुदानित विद्यालये व महाविद्यालये यांना किमान आपल्या निकषाप्रमाणे टप्प्याटप्प्याने अनुदान द्यावे आणि तशी तरतूद अर्थसंकल्पात करावी अशी माझी मागणी आहे. सन 2000 पासून अनुदानास पात्र असणाऱ्या माध्यमिक शाळा व महाविद्यालयातील 1100 वर्ग तुकडयांना अनुदान देण्यासाठी तरतूद होणे गरजेचे आहे, यातही मराठवाडयातील 685 तुकडया आहेत. शाळांना 12 टक्के वेतनेत्तर अनुदान वेळेवर मिळाले पाहिजे. वेतनेत्तर अनुदानासाठी 2003-04 नंतर तरतूद केलेली नाही, ही तरतूद केली पाहिजे. तसेच स्थानिक ठिकाणी उद्योग सुरु करताना भूमिपुत्रांना तेथे नोकऱ्या दिल्या पाहिजेत, अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, चांगल्याला चांगले म्हणणे आणि चुकीच्या बाबींना चूक म्हणणे हा आमच्या शिक्षकांचा गुणधर्म आहे. सामान्य जनतेवर करांचा बोजा न टाकता राज्याच्या विकासास चालना देणारा हा अर्थसंकल्प आहे म्हणून मी अर्थमंत्री महोदयांचे अभिनंदन करतो तर शालेय शिक्षण व उच्च शिक्षण क्षेत्रातील शिक्षकांच्या समस्यांकडे दुर्लक्ष करणारा हा अर्थसंकल्प आहे म्हणून मी नाराजी व्यक्त करतो. आपण मला बोलण्यास संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो व माझे भाषण संपवितो.

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखीसाठी नाही

नंतर श्री.सुंबरे

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, अर्थसंकल्पाबाबत समाजामध्ये खूप वेगवेगळ्या धारणा आहेत. त्यामध्ये अर्थसंकल्प एक तर खूप गूढ, वैचारिक, जणू काही पूर्वीच्या काळामध्ये ठराविक लोकांना विचारांचा आणि बुद्धीचा वारसा आहे वा होता असे मानले जात असे. अशा पद्धतीने अर्थसंकल्पाभोवती जणू काही चिरेबंदी वाडा उभा केला गेला असे मला वाटते. मला नेहमीच असे वाटते की, डिमिस्टिफिकेशन ऑफ द बजेट, म्हणजे ज्याला आपण मराठीत साधे, सरळ आणि सोप्या पद्धतीने अर्थसंकल्प मांडला जाणे आणि तो समजावून घेतला जाणे आणि त्यातून सामान्य माणसाच्या जीवनावर काय परिणाम होतो आहे हे पाहून त्याबाबत अतिशय आवश्यक अशी पावले उचलणे गरजेचे आहे असे मला वाटते. खरे तर महाराष्ट्रात प्रत्येक गावचे लोक स्वत:चे बजेट समजून घेत असतात. प्रत्येक जिल्हा नियोजन मंडळामध्ये त्या त्या जिल्ह्याची चर्चा होत असते त्यावेळेस ज्यांचे शिक्षण कमी आहे असे लोक देखील कशा तऱ्हेने आपल्या तालुक्याचा विकास झाला पाहिजे हे त्यांच्या व्यावहारिक ज्ञानातून फार चांगल्या प्रकारे मांडत असतात. त्याचबरोबर आर्थिक निधी कमी असतानाही प्रशासनिक सुधारणा करून आपण कशा प्रकारे स्वत:ची प्रगती करून घेऊ शकतो याच्या बद्दलची अनेक उदाहरणे महाराष्ट्रात आहेत, भारतात आहेत आणि जगामध्ये देखील सर्वत्र आहेत. सभापती महोदय, एका बाजूला बजेटच्या संदर्भात आपण अमुक अमुक एवढी तरतूद केली आणि त्यामुळे एवढा विकास झाला असा दावा करीत असलो तरी देखील आता सध्याची भारताची जगामध्ये जी एकूण स्थिती आहे त्यातून एक चित्र स्पष्ट दिसते आहे आणि ज्याची चर्चा आणि वाहवा संपूर्ण जगामध्ये होते आहे आणि ती म्हणजे 2020 साली जास्तीत जास्त काम करणाऱ्यांपैकी जी तरूण माणसे आहेत, आपण ज्यांना श्रममूल्य आहे असे म्हणतो अशी माणसे आणि बुद्धीची समज आहे अशी माणसे कोठे असतील तर ती लोकसंख्या भारतात असणार आहे. आज देखील या लोकांनी परदेशामध्ये, इतर विकसित देशांमध्ये संगणकाच्या किंवा वैद्यकीय क्षेत्रात असेल, त्याबद्दल गेल्या 10-12 वर्षात जी नेत्रदीपक भरारी मारली आहे त्याचे प्रतिबिंब, त्याचा कोठे तरी आमचा धागादोरा, त्याच्याशी आमचे कोठे तरी नाते आहे आणि महाराष्ट्राच्या विकासामध्ये याबद्दल आम्ही त्याची काय दखल घेतो, आमचा त्यांच्याबद्दल काय दृष्टीकोन आहे, त्यासाठी म्हणून 2010 सालामध्ये जात असताना आम्ही कसे असणार आहोत ? 2020 मध्ये कसे असणार आहोत ? याचा काहीही धागाबांधा, काहीही सांधेजोड या संपूर्ण जागतिक प्रक्रियेची, ज्याची संपूर्ण जगाच्या अर्थकारणात चर्चा होते आहे की, भारत

..... 4वाय 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आणि चीन यांच्यामध्ये जी संपूर्ण स्पर्धा आहे आणि त्यातच महाराष्ट्र हे अतिशय वेगाने शहरीकरण होणारे राज्य आहे, औद्योगीकरणासाठी म्हणून खूप मोठा विकास होईल अशा पद्धतीचे मुंबई हे अर्थसत्ता असणारे केंद्र आणि म्हणून न्यूयॉर्क, सिंगापूरच्या बरोबर मुंबईच्या स्टॉक एक्स्चेंजचा उल्लेख येतो याचा कोठेही समज या अर्थसंकल्पामध्ये प्रतिबिंबित होताना दिसत नाही ही अतिशय मोठी खेदाची गोष्ट आहे. आपण जणू काही पूर्वीचा 'टाईम मशीन' नावाचा जो एक चित्रपट होता. त्या चित्रपटामध्ये एक माणूस 100 वर्षापूर्वी त्या टाईम मशीनमध्ये जाऊन बसतो. नंतर त्या चित्रपटात असे दाखविले आहे की, जेव्हा तो 100 वर्षांनी त्या मशीनमधून बाहेर येतो तेव्हा त्याचे मन 100 वर्षापूर्वीचेच असते मात्र जग 100 वर्षांनी पुढे गेलेले, बदललेले असते. तसे गेल्या 10 वर्षात, महाराष्ट्रात, भारतामध्ये ज्या प्रकारची प्रगती, जगामध्ये आपल्या लोकांमुळे म्हणजे भारतीय लोकांमुळे झालेली आहे आणि त्याचे आमच्याशी काही नाते आहे याचे कोठल्याही प्रकारचे प्रतिबिंब पडलेले दिसत नाही ही अतिशय खेदाची गोष्ट आहे. म्हणून मला या निमित्ताने जो पहिला प्रश्न उपस्थित करताना मला असे विचारावयाचे आहे की, आपल्याकडे वेगवेगळ्या निधीची जी तरतूद केलेली असते, खास करून 10 व्या पंचवार्षिक योजनेमध्ये ज्या विषयांसाठी ज्या तरतुदी केलेल्या होत्या त्यापैकी काही तरतुदींवर आपण पुरेसा खर्चच करू शकलेलो नाही. यासाठी म्हणून 'समर्थन' नावाची जी एक संस्था आहे, जी सातत्याने अर्थसंकल्प अध्ययन केंद्राचा एक भाग म्हणून गेली काही वर्षे अनेक आमदारांमार्फत, मुख्यमंत्र्यांमार्फत, विरोधी पक्षनेत्यांमार्फत स्वत:चे म्हणणे मांडत असतात. सभापती महोदय, आपण सिविल सोसायटी म्हणजे एक लोकशाही पद्धतीची आमची व्यवस्था आहे असे म्हणतो तेव्हा मला असे विचारावयाचे आहे की, 'समर्थन' या संस्थेने जवळपास 25 पेक्षाही अधिक आक्षेप अर्थसंकल्पाच्या संदर्भात आपल्या टिपणामध्ये मांडलेले आहेत आणि दुर्दैवाची गोष्ट अशी आहे की, काही अपरिहार्य कारणासाठी सभागृहातून बाहेर जाण्यासाठी माननीय अर्थ राज्यमंत्र्यांना नेमका हाच मुहूर्त सापडला आहे. त्यामध्ये त्यांना अशा पद्धतीने जे लोक त्यांची काही निरीक्षणे मांडतात.... त्यात त्यांनी म्हटलेले आहे आणि तसे स्पष्ट दिसते देखील., आपले जे पिंक बुक आहे त्यातील माहितीवरून स्पष्ट दिसते आहे की, कृषी आणि संलग्न सेवांसाठी आपण ज्याला मंजुरी घेतली होती त्यापैकी 54 टक्केच निधी खर्च झालेला आणि तर दुसरीकडे विज्ञान, तंत्रज्ञान, पर्यावरण यासाठी 55.25 कोटीची तरतूद होती. परंतु 2002 ते 2005

..... 4वाय 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

या वर्षामध्ये मात्र आपण 5 कोटी 59 लाख, नंतर तर अजून कमी, 3 कोटी 69 लाख अशा पद्धतीने ज्याला अगदी किरकोळ म्हणता येईल अशा प्रकारे खर्च केलेला आहे. तसेच शिक्षण आणि पाणीपुरवठा यामध्ये देखील आपण कमी खर्चाला मंजूर केली असताना देखील तो संपूर्ण निधी खर्च करू शकलेलो नाही. यासारखे जवळपास 5 मुद्दे 'समर्थन' या संस्थेने त्यांच्या टिपणामध्ये मांडलेले आहेत. त्यामध्येच मागासवर्गीयांचे कल्याण आणि आरोग्य यामध्ये मात्र जास्त निधी मंजूर करून घेतला, त्यात मात्र 57 टक्के आणि 34 टक्के निधी खर्च झालेला आहे. दुसरा जो मुद्दा सातत्याने समाजामध्ये सर्वत्र चर्चिला जात होता आणि अनेक सन्माननीय सदस्यांनी गेल्या अधिवेशनामध्ये देखील तो येथे मांडला होता की, मूळ मागणी पेक्षा पुरवणी मागण्यांची संख्या आणि निधी जास्त कसा काय असू शकतो ? ....

(यानंतर श्री. सरफरे ..... 4झेड 1

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे...

प्रत्येक वेळी पुरवणी मागणी आणि मूळची मागणी यांचा समन्वय ठेवला जातो की नाही? या संदर्भात शासनाने कुठेही स्पष्टीकरण दिले नाही. त्याची दखल कोणत्याही पध्दतीने घेतली नाही. त्याचबरोबर आकस्मिकता निधीच्या संदर्भात मुद्दा देखील उपस्थित होतो. त्यामध्ये ज्याकरिता आकस्मिकता निधीची आवश्यकता नाही असे विषय या निधीमध्ये घेतले गेले आहेत. खुद्द महालेखापरीक्षक असे म्हणतात की, 10 प्रकरणांमध्ये 45 कोटी 61 लाख एवढया निधीच्या बाबतीत शासनाला अंदाज करणे शक्य होते तरी सुध्दा शासनाने केले नाही. आणि सर्व आकस्किमक निधी मंजूर करुन घेंतला. याखेरीज 22 प्रकरणांमध्ये पैसा खर्च न झाल्यामुळे बचत झाली होती. ती 277.32 लाख एवढी बचत प्रत्यार्पित केली नाही. उलट 41 प्रकरणामध्ये 2442 कोटी 1 लाख एवढी झालेली बचत प्रत्यार्पित केली. केंद्र सरकारच्या दहाव्या प्लॅनच्या आकस्मिकता निधीमधील एवढया गंभीर स्वरुपाच्या निरीक्षणाचा उल्लेख समर्थन या संस्थेने स्वत:च्या टिप्पणीमध्ये केला आहे. त्याचबरोबर विशेष गंभीर बाब अशी की, 49 प्रकरणांमध्ये आर्थिक वर्ष संपण्यापूर्वी 5043 कोटी 99 लाख एवढा निधी 2 दिवस अगोदर प्रत्यार्पित केला. त्यामुळे ज्याठिकाणी आपल्याला अधिक खर्च करता आला असता त्याठिकाणी खर्च होऊ शकला नाही. एका बाजूला निधी उपलब्ध नाही म्हणून लोक विकासापासून वंचित रहातात असे सांगितले जाते. आणि दुसऱ्या बाजूला अशापध्दतीने निधी प्रत्यार्पित केला जातो ही अतिशय चिंताजनक बाब आहे. यामधील काही मुद्दयांपैकी 9 प्रकरणांमध्ये मूळ तरतूद नसतांना 211.82 लाख खर्चाचे निरीक्षण नोंदविले नाही म्हणून प्रश्न उपस्थित होतो. आपण विज्ञान क्षेत्र किंवा सेवा क्षेत्रामध्ये अशी आर्थिक लांडगे तोड केली तर त्याठिकाणी तंत्रज्ञान आणि विज्ञानाचा किती प्रमाणात उदय होऊ शकेल, ते सक्षम होऊ शकेल? शिक्षण, पाणीपुरवठा याचबरोबर कला संस्कृती याकरिता कमी निधी मिळाला आहे. याचे कारण त्यामध्ये राजकीय अनास्था, अकार्यक्षमता, बेफिकीरी दिसते. या कारणांमुळे जास्तीत जास्त खर्च झाला तरी त्या ठिकाणी झालेला खर्च योग्य आहे की नाही याचे असेसमेंट, मूल्यमापन होणे अत्यावश्यक आहे. मला आपल्याला मुद्दाम सांगावेसे वाटते की, समाजातील काही समाज घटक वेगवेगळया प्रकारे विकासापासून वंचित राहिले आहेत.. आम्ही ऊस तोड कामगारांसंबंधी अनेक वेळा सभागृहात लक्षवेधी सूचना मांडून चर्चा घडवून आणली. अशावेळी ऊस तोडणी कामगारांच्या संदर्भात, त्यांना सामाजिक न्याय देण्याच्या संदर्भात केलेली तरतूद पाहिली तर ती कमी झाल्याचे दिसून येते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे....

महिला व बाल कल्याण विभागाच्या समुपदेशन केंद्रासाठी तरतूद केली आहे. त्यामध्ये यावर्षी प्रत्यक्षात कमी खर्च झाल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे प्रकल्पग्रस्तांचे वेगवेगळे प्रश्न आहेत त्यांच्याकरिता धोरण आखण्याची आवश्यकता आहे. त्याकरिता निधी कसा वापरला जातो यासंबंधीचा मुद्दा मला उपस्थित करावासा वाटतो.

सभापती महोदय, महाराष्ट्राची आर्थिक पहाणी अहवालाच्या संदर्भात सांगू इच्छिते की, लोक आज रोजगार मागत फिरत आहेत. अर्ध वेळ काम केल्याशिवाय पोट भरु शकत नाहीत अशा मुलांची महाराष्ट्रामध्ये मोठी संख्या आहे. त्यामध्ये महिला मजुरांची संख्या मोठी आहे. त्याशिवाय असंघटीत क्षेत्रातील मजूर आहेत, ऊस तोडणी कामगार आहेत, खाण कामगार आहेत, वन कामगार आहेत, मोलकरणी आहेत अशा सर्व असंघटीत कामगारांसाठी त्यांच्या सामाजिक सुरक्षिततेसाठी आपण कोणतीही तरतूद केल्याचे चित्र या अर्थसंकल्पामध्ये स्पष्ट होत नाही. आज महाराष्ट्रासमोर मोठे आव्हान आहे. धारातीर्थी पडलेले अनेक सैनिक महाराष्ट्रामध्ये आहेत, नक्षलवाद्यांच्या हल्ल्यामध्ये ठार झालेले पोलीस आहेत, आत्महत्त्या केलेले शेतकरी आहेत, बॉम्बस्फोटामध्ये मृत्यू पावलेली माणसे आहेत, नैसर्गिक आपत्तीमध्ये मृत्युमुखी पडलेल्या लोकांची अनेक कुटुंबे महाराष्ट्रामध्ये आहेत. या कुटुंबियांना वेळोवेळी आर्थिक मदत देण्यात आली. परंतु ही आर्थिक मदत त्यांना मिळाल्यानंतर त्या कुटुंबियांचे पुढे काय होते? त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी खर्च केला जातो कां? तरुण मुलाच्या मृत्यूनंतर त्याच्या आई-वडिलांकडे, त्याच्या पत्नीकडे कोण लक्ष देते? अशाप्रकारे एखाद्या कुटुंबामधील स्त्री विधवा राहिली तर तिला शासन कोणत्या प्रकारचा आधार देते. या संदर्भात दीर्घकालीन आवश्यक असे पुनर्वसन धोरण ठरविले पाहिजे. नाही तर आपण त्यांना अनुकंपा तत्वावर नोकरी देण्याचे आश्वासन देतो. आम्ही तुम्हाला नोकरीला लावू असे हजारो लोकांना सांगितले जाते. परंतु असे दिसते की, काम करुन देण्यासाठी त्यांच्याकडे पैसे मागितले जातात.

(यानंतर श्री. किल्लेदार)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे .....

असे नाही तर कामे करून देण्यासाठी पैसे ओरबाडले जातात. म्हणून ओरबाडणाऱ्यांचे सांस्कृतिक साम्राज्य, ओरबाडणाऱ्यांचे आर्थिक साम्राज्य आपल्याला सेवा आणि योजना अशा प्रत्येक ठिकाणी घडलेले दिसून येते.

सभापती महोदय, महिला बाल कल्याण विभाग, सामाजिक न्याय विभाग, आदिवासी विकास विभाग यांच्यासाठी 2001 पासून सातत्याने भांडतो की, स्त्री केंद्रित आर्थिक नियोजनाची आवश्यकता आहे. 2001 मध्ये महाराष्ट्र शासनाने महिलांसाठी जे आर्थिक धोरण जाहीर केले त्यामध्ये स्त्री केंद्रित आर्थिक नियोजनाचा उल्लेख करण्यात आला होता. परंतु या संदर्भात आम्ही वारंवार मागणी करून देखील लक्ष दिले जात नाही. आमच्या मागणीकडे लक्ष दिले जात नाही हे मी समजू शकते. परंतु केंद्रामध्ये अर्थमंत्र्यांनी गेल्या दोन वर्षापासून जेंडर रिस्पॉन्सीव्ह बजेटिंग ही संकल्पना स्वीकारली आहे. आपल्या राज्याचे जसे अर्थसंकल्पाचे भाषण येते त्याप्रमाणे केंद्राच्या भाषणामध्ये त्याबाबत उल्लेख केलेला आहे. त्या दृष्टीने त्यांनी अकरा डिपार्टमेंट आयडेंटीफाय केलेली आहेत. या सदर्भातील देखील एक टिप्पण आणि समर्थन या संस्थेचे टिप्पण ही दोन्ही टिप्पणे सभागृहाच्या पटलावर मी ठेवणार आहे. त्याच्या तपशिलाच्या बाबतीत आम्हाला असे वाटते की, शासनाने समर्थनने उपस्थित केलेले आक्षेप आणि या जेंडर रिस्पॉन्सीव्ह बजेटच्या संकल्पनेबद्दल शासनाला नक्की काय म्हणायचे आहे ? याबद्दल काही ना काही प्रतिक्रिया मिळावी अशी आमची अपेक्षा आहे. या खेरीज महिलांच्या विषयाकडे वळले तर मुलींच्या संख्येबाबत असे चित्र दिसते की, भारतात सरासरी एक हजार मुलांच्या तुलनेमध्ये मुलींची संख्या 933 आहे. महाराष्ट्रामध्ये ही संख्या 922 वर आलेली आहे. आपली धोरणे अशा प्रकारची आहेत की, ज्यामुळे त्याची परिणामकारकता शिल्लक राहिलेली दिसून येत नाही. या सगळ्या व्यापक मुद्यांबरोबर पाच-सहा लहान मुद्दे असे आहेत की, ज्याबद्दल शासनाने स्वत:च्या भूमिकांमध्ये नक्कीच विचार केला पाहिजे. एक मुद्दा एमएमआरडीएच्या संबंधात उपस्थित करायचा आहे. ही जी काही प्राधिकरणे किंवा महामंडळे शासनाने उभी केलेली आहेत त्यामध्ये खरोखरच लोकांचा किती सहभाग असतो, किती लोकांचे म्हणणे ऐकून घेतले जाते ? केव्हा तरी महापौरांना बोलवायचे

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे .....

आणि बैठकीसाठी ते एकटेच येतात. बाकीचे जे लोक आहेत त्यासाठी आमदार, खासदार यांच्या म्हणण्याच्या संदर्भात सातत्याने संवादाची प्रक्रिया असायला पाहिजे परंतु ते घडत नाही. मुंबईमध्ये एमएमआरडीए तयार करण्यात आले. एमएमआरडीए आणि मुंबई महानगरपालिका यांच्यामध्ये विसंवाद आहे. त्या ठिकाणी आपल्याला राजकीय स्वरूपच प्राप्त होताना दिसून येते. पुणे, पिपरी-चिंचवड आणि त्याच्या आसपासची तीस-चाळीस गावे आहेत त्यांच्यासाठी इतक्या वर्षामध्ये पीएमआरडीए का तयार करण्यात आले नाही ? हा देखील प्रश्न उपस्थित करायला पाहिजे. आपण जेव्हा याची कारणे शोधायला लागतो, त्यावेळेला अशी शंका येते की, लोक नियुक्त प्रतिनिधींमधून अशा प्राधिकरणामध्ये प्रतिनिधी घेतले पाहिजेत. परंतु तसे प्रतिनिधी घेतले तर ते सोईचे, गैरसोईचे होईल की काय ? पुणे शहर आणि पिंपरी-चिंचवडच्या आसपासची वाहतुकीची आणि विकासाची परिस्थिती पाहिली तर त्या ठिकाणी संपूर्ण बेचक्यामध्ये सापडल्याप्रमाणे वाहतुकीची कोंडी झालेली आहे. अपघातामध्ये प्रथम क्रमांकाचे चे शहर होईल की काय अशी भीषण परिस्थिती पुणे शहरामध्ये तयार झालेली आहे. म्हणून एमएमआरडीए सारखीच पीएमआरडीए तयार केले पाहिजे. सर्व महामंडळे आणि प्राधिकरणांच्या कार्यपध्दतीमध्ये सुधारणा अपेक्षित होती, त्याचे कोठेही प्रतिबिब कार्यपध्दतीमध्ये आम्हाला दिसत नाही.

जिल्हा नियोजन आराखडा 700 कोटीवरून एक हजार कोटीपर्यन्त नेणार अशा पध्दतीने उल्लेख करण्यात आलेला आहे. या संदर्भातील अंमलबजावणीची यंत्रणा काय आहे ? जिल्हा नियोजन मंडळाच्या नियमित बैठका किती होतात ? नियमित बैठका झाल्यानंतर आपल्याला त्याचा पाठपुरावा किती प्रमाणात झालेला दिसतो ? जिल्हा नियोजन मंडळाच्या आराखड्याच्या संदर्भामध्ये चटावरील श्राध्द उरकले जावे तशा पध्दतीने अर्धा ते पाऊण तासामध्ये जिल्हा नियोजन मंडळाच्या बैठका उरकल्या जातात. आपल्या काही तीन-चार योजना मान्य करून घ्यायच्या, आपले तीन-चार कार्यक्रम मंजूर करून घ्यायचे आणि ज्या मतदार संघामध्ये आमदार पावरफूल आहेत ते वेगवेगळ्या योजना आपल्या भागासाठी मंजूर करुन घेतात. अन्य तालुक्यातील आमदार भांडू शकत

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखापाठी नाही

SKK/ SBT/ KTG/

डॉ. नीलम गोऱ्हे .....

नाहीत, म्हणणे मांडू शकत नाहीत त्यामुळे मग जिल्हा नियोजन मंडळाच्या बैठकीत अशा उपेक्षित घटकांना वावच राहात नाही ही वस्तुस्थिती आहे. म्हणून जिल्हा नियोजन आराखड्यामध्ये असा देखील विचार करावा लागणार आहे की, जिल्ह्यामध्ये देखील कोणत्या भागामध्ये अनुशेष आहे ? जसा आपण विदर्भ, मराठवाडा, कोकणाच्या अनुशेषाचा विचार करतो तसा विचार यामध्येही करावयास पाहिजे. उदाहरण द्यायचे झाले तर पुणे जिल्ह्यामधील वेल्हा, मुळशी हे तालुके अनुशेषग्रस्त आहेत. पुणे जिल्ह्यातील वेल्हा तालुक्यात जास्तीत जास्त अनुशेष आहे. अशा जिह्यामध्ये देखील जिल्ह्याचे नियोजन होत असताना जे तालुके आणि गावे अविकसित राहिलेले आहेत त्यांच्यासाठी विशेष प्रयत्न केले गेले पाहिजेत, असे मला खास करून सांगावेसे वाटते.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ....

महिला आय.ए.एस. अधिकाऱ्यांच्या संदर्भात गेले काही दिवस सातत्याने चर्चा होत आहे. आपण असे म्हणतो की, महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य आहे, राज्यामध्ये महिला बचत गट तयार केले आहेत, वेगवेगळ्या प्रकारे स्त्रियांना प्राधान्य देण्याचा प्रयत्न करीत असतो. पुरुष आणि महिला आय.ए.एस. अधिकारी या दोघांनाही कार्यक्षमतेचा निकष असतो. ज्या महिला आय.ए.एस.अधिकारी चांगले काम करीत असतील त्यांना चांगल्या प्रकारचे प्रमोशन देऊन, त्यांना चांगल्या प्रकारच्या जबाबदाऱ्या देऊन आपण कोठेही बायस नाही हे सिध्द करुन देण्याची जबाबदारी महाराष्ट्र शासनावर आहे हे मला मुद्दाम सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, शिक्षणाच्या संदर्भात सारखी चर्चा होते. आपण आरोग्य शिक्षणासाठी तरतूद केलेली आहे. या जुलैपासून लैगिक शिक्षणाचा समावेश सिलॅबसमध्ये केला जाणार आहे. त्याचे सिलॅबल पाहिले तर एक्स्पर्ट असो किंवा पालक असो ते सांगू शकतील की, यामुळे गावामध्ये आणि शाळांमध्ये भयानक अशी परिस्थिती तयार होणार आहे. त्यातून काय काय अत्याचार होतील आणि संपूर्ण शाळा कॉलेजेसमध्ये कोणत्या प्रकारचे वातावरण पसरणार आहे हे पाहता याबाबत पुनर्विचार केला पाहिजे. तामिळनाडू सरकारने केंद्र सरकारकडून आलेले सिलॅबस नाकारलेले आहे. यासंदर्भात राज्य शासनाने पुनर्विचार करावा असे मला खास करुन सांगावेसे वाटते. या अर्थसंकल्पाने असंघटित क्षेत्रातील लोकांची निराशा केलेलीच आहे त्याचबरोबर शहरीकरणाच्या संदर्भात ज्याप्रकारे तेथील प्रश्नांची उत्तरे किंवा त्यासंदर्भातील जी भूमिका समोर यावयास पाहिजे होती ती आलेली नाही. जेंडर रिस्पॉन्सीव बजेटींग म्हणजे काय याबद्दल माननीय अर्थ राज्यमंत्री प्रश्न विचारतात. मी सांगेन की, संयुक्त राष्ट्रसंघ महिला विभाग यांच्याबरोबर, प्लानिंग कमिशनबरोबर आम्ही काम करीत आहोत. त्यामध्ये 80 महिला संस्थांचा समावेश आहे. या दोघांनी केलेल्या टिप्पण्या "साप्ताहिक सकाळ"मध्ये प्रसिध्द झालेल्या आहेत. ते मी पटलावर ठेवते. आमची अशी अपेक्षा राहील की, त्यासंबंधी शासनाकडून ठोस उपाययोजना आज ना उद्या त्यांच्या संपूर्ण कामामध्ये दिसेल. एवढे बोलून मी माझे भाषण संपविते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

श्री. श्रीकांत जोशी (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, खरे म्हणजे या अर्थसंकल्पामधून ज्या दोन अपेक्षा होत्या त्या दोन्ही अपेक्षांवर खूप पाणी पडलेले आहे. यातील सगळ्यात महत्वाची बाब म्हणजे या पुस्तकामध्ये महाराष्ट्र राज्यातील बेरोजगारीसंबंधीचे अत्यंत दुर्दैवी चित्र दिलेले आहे. सन 2004 मध्ये या राज्याच्या बेरोजगारांची संख्या 39 लाख 17 हजार 208 इतकी होती. त्यामध्ये ग्रॅज्युएट बेरोजगारांची संख्या जवळपास 4 लाख 45 हजार 975 असून पोस्ट ग्रॅज्युएट बेरोजगारांची संख्या 34 हजार आहे. यामध्ये अभियांत्रिकी पदवीधारक तरुणांची संख्या 61 हजार आहे. 10 कोटी लोकसंख्या असलेल्या महाराष्ट्रामध्ये 1 कोटी बेरोजगार निर्माण करण्याचे काम या शासनाने केलेले आहे. यातून एस.एस.सी.पेक्षा जास्त शिकलेल्या लोकांची अशी आकडेवारी आपल्या डोळ्यासमोर येत आहे. याचे कारण असे की, महाराष्ट्र शासनाने अर्थसंकल्पातून ज्या दिशा द्यावयास पाहिजे होत्या त्या दिल्या नाहीत. मला माननीय अर्थमंत्र्यांना दोन तीन प्रश्न विचारावयाचे आहे. आपला जी.डी.पी. वाढत आहे असे आपण म्हणतो. परंतु आपल्यापेक्षा निम्मी लोकसंख्या असलेले गुजरात राज्य कॉटनच्या बाबतीत, ऑईल सीडच्या बाबतीत, पल्सेसच्या बाबतीत आपल्यापुढे का आहे ? पर हेक्टर ॲग्रीकल्चरल जी.डी.पी. महाराष्ट्रापेक्षा गुजरातचा दुप्पट का झाला ? त्या ठिकाणी लोड शेडींग का नाही ? याचा विचार केला तर मी ज्या मूलभूत सूचना करणार आहे त्या शासनाने लक्षात घ्याव्यात. त्या सूचना लक्षात घेतल्या तर आपण खऱ्या अर्थाने अपेक्षा पूर्ण केलेल्या नाहीत हे लक्षात येईल. कालपरवा मला रिलायन्सचे मोठे मार्केटिंग सेंटर्स स्थापन करणारे दोन अधिकारी भेटले होते. ते साधारणत: प्रत्येक तालुक्यात आपले मार्केटिंग सेंटर्स आणि परचेसिंग सेंटर्स मराठवाड्यातील ग्रामीण भागात स्थापन करणार आहेत. आपण आठवडी बाजाराची परिस्थिती पाहिली तर त्या ठिकाणी एक ते सव्वा कोटी रुपयांची उलाढाल होत असते. त्या ठिकाणी आपण रुरल ग्रोथ सेंटर म्हणता येईल असे कोणत्याही प्रकारचे इन्फ्रॉस्ट्रक्चर उभे करु शकलो नाही. मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील 60 ते 70 टक्के कापूस प्रोसेसिंगसाठी गुजरातमध्ये जातो. आपण प्रोसेसिंग करु शकत नाही. त्याचे व्हॅल्यू ॲडिशन करु शकत नाही. आपण एम्प्लॉयमेंट जनरेट करु शकत नाही. त्यामुळे आपला जी.डी.पी. कमी झाला ही वस्तुस्थिती आहे.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. श्रीकांत जोशी...)

मोटार टॅक्स, स्टॅम्प ड्युटी, सेल्स टॅक्स यामध्ये वाढ होत असताना जी.डी.पी. देखील वाढला पाहिजे. यानुषंगाने कोणताही धोरणात्मक निर्णय शासनाने घेतलेला नाही. मुंबईचा डेव्हलपमेंट प्लॅन 40 हजार कोटीचा केला जाते. मुंबईची लोकसंख्या 1 कोटी आहे. मग ग्रामीण भागाची लोकसंख्या साडेचार कोटी असताना ग्रामीण भागासाठी 160 हजार कोटीचा प्लॅन राज्य शासन करणार आहे काय ? आपल्या राज्यामध्ये दोन हजार जिल्हा परिषद सर्कल्स आहेत. ज्या ज्या ठिकाणी मोठे आठवडी बाजार भरतात त्याठिकाणी पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी 5-5 कोटी रुपये खर्च केले तरी किमान 1 लाख लोकांना काम मिळू शकेल एवढे पोटॅन्शियल आहे. गुजरात राज्याने या गोष्टी केलेल्या आहेत. सभापती महोदय, विदर्भ आणि मराठवाड्यातील मागासलेपणा हा सरकार निर्मित आहे, तो मानव निर्मित नाही. जिंतूर येथे 16 क्लासेस आणि 8 क्लास रुमचे पॉलिटेक्निक कॉलेज आहे. एक बॅच सुटल्यानंतर दुसरी बॅच घेतली जाते ही पॉलिटेक्निकच्या बाबतीत दुर्दैवाची बाब आहे असे म्हणावे लागेल. आपल्या राज्यात पॉलिटेक्निक कॉलेजेसची गरज आहे. या कॉलेजेसमध्ये निदान जेवढ्या बॅच आहेत तेवढे तरी क्लॉसरुम असायला पाहिजे. तेथे संगणक आणि अन्य इन्फ्रास्ट्रक्चर दिले पाहिजे. राज्यातील मेडिकल कॉलेजेस मधील नर्सिंग कॉलेजेस कमी कमी होत आहेत. नर्सिंग कॉलेजमधील 500 विद्यार्थीनींची संख्या आता 100 वर आलेली आहे. नर्सिंग कॉलेजमधील नर्सेसना जेवणासाठी फक्त 110 रु. भत्ता दिला जातो. माननीय राष्ट्रपतींनी नर्सिंग शिक्षणाकडे विशेष लक्ष देण्याची सूचना केलेली आहे. अमेरिकेमध्ये 1 लाख नर्सेसची रिक्वायरमेंट आहे. असे असताना आपल्याकडील नर्सिंग कॉलेजेस बंद कशी होतील याचा प्रयत्न होतोय ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रासाठी 0.1 म्हणजे फक्त 16 कोटीची तरतूद आहे. 21वे शतक हे इरा ऑफ टेक्नॉलाजीचे आहे असे आपण म्हणतो. असे असताना टेक्नॉलॉजीकडे राज्य शासन पाहिजे त्या प्रमाणात लक्ष देत नाही. मी या निमित्ताने या सदनाला सांगू इच्छितो की, महाराष्ट्राच्या अर्थकारणाची वेगळी श्वेतपत्रिका या शासनाने काढली पाहिजे. राज्याचे एकूण उत्पन्न अंदाजित करणे ही कल्पनाच मुळात चुकीची आहे. या बाबतीत ज्याच्या भरपूर अभ्यास आहे अशा लोकांचा सल्ला घ्यावयास पाहिजे. मी या निमित्ताने एवढेच सांगू इच्छितो की, मराठवाड्याच्या ग्रामीण भागाचा विकास केल्या शिवाय, तेथील बेरोजगारीचा प्रश्न

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. श्रीकांत जोशी...)

सुटणार नाही. सभापती महोदय, मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानून माझे भाषण संपवितो.

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश निकोसे (नामनियुक्त) : सभापती महोदय, अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे. माननीय वित्त मंत्र्यांनी अर्थ संकल्प सादर करताना केलेल्या भाषणात राज्याचा आर्थिक विकास किती वेगाने होत आहे याची बरीच आकडेवारी दिली आहे. राज्याचे स्थूल उत्पन्न राष्ट्रीय पातळीपेक्षा अधिक आहे. राज्याचे दरडोई उत्पन्नही देशाच्या दरडोई उत्पन्नापेक्षा किती अधिक आहे. महसुली जमेतील वाढ महसूल खर्चातील वाढीच्या तुलनेत जास्त असल्याने महसुली तूट नियंत्रणात येत आहे, ही आणि अशी किती तरी माहिती माननीय वित्त मंत्र्यांनी आपल्या भाषणात दिली आहे. मात्र या विकासाचा लाभ समाजातील तळागाळातील घटकांपर्यन्त पोहोचता का, हे पाहणेही तितकेचे महत्वाचे आहे. राज्यातील 2.5 कोटी पेक्षा अधिक जनता दारिद्र्य रेषेखालील जीवन जगत आहे. 40 टक्क्याहून अधिक आदिवासी कुटुंबे भूमिहीन आहेत. 76 टक्के आदिवासी महिला तर 90 टक्के कातकरी महिला साक्षर नाहीत. राज्यात 7 लाखाहून अधिक बालकामगार आहेत. 15 टक्के प्राथमिक शाळांमध्ये एकच शिक्षक आहे. शाळेत दाखल झालेल्यापैकी अनुसूचित जातीच्या 41 टक्के मुली तर अनुसूचित जमातीच्या 23 टक्के मुली इयत्ता दहावीच्या वर्गापर्यन्त पोहोचू शकत नाहीत. राज्यातील 42 टक्के ग्रामीण महिला साक्षर नाहीत. राज्याचे स्त्री-पुरुष प्रमाण -912, हे राष्ट्रीय-927 प्रमाणापेक्षा किती तरी कमी आहे.

....नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश निकोसे.....

सभापती महोदय, मी महत्वाचे दोन-चार मुद्दे मांडणार आहे. त्याच त्याच मुद्यांची पुनरुक्ती करण्यामध्ये वेळ घालविणे योग्य नाही असे मला वाटते. फार महत्वाचा मुद्दा म्हणजे सन 2002 साली माननीय अर्थमंत्री महोदयांनी 10 कोटी रुपये चैत्यभूमीच्या विकासासाठी दिले. तेथील बांधकामाला सुरुवात झाली व त्यानंतर ते काम थांबले आहे. मी आपल्या माध्यमातून शासनाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, ताजमहाल पाहिल्यानंतर पाश्चिमात्य पर्यटकांनी म्हणावे, तुमच्या देशात आणखी काय पाहण्यासारखे आहे?तेव्हा ताजमहाल पाहिल्यानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या चैत्यभूमीचे स्मारक पाहण्यासाठी मुंबईला जा असे सांगता आले पाहिजे. जगातील श्रेष्ठ आणि ज्येष्ठ असे स्मारक झाले पाहिजे. मी महाराष्ट्र शासनाला विनंती करतो की, केंद्र सरकारकडून मदत घ्यावी आणि देशातील सर्व राज्यातील कारभार हा भारतीय घटनेप्रमाणे चालतो म्हणून सर्व राज्यांना विनंती करुन त्यांच्याकडून या स्मारकाच्या विकासासाठी आर्थिक मदत घ्यावी आणि भव्य व दिव्य स्मारक उभारावे.

सभापती महोदय, मागील अर्थसंकल्पाच्या वेळी अर्थमंत्र्यांच्या मी निदर्शनास आणून दिले होते. त्यांनी मला आश्वासन दिले होते. श्री.ना.रा.शेंडे, भंडाऱ्याचे थोर साहित्यिक होऊन गेले. ते दलित समाजाचे होते. विदर्भ साहित्य संघाचे ते पूर्वाध्यक्ष होते. विदर्भात सावरगाव डुगरी येथे जे साहित्य सम्मेलन झाले, त्या सम्मेलनाला स्व.यशवंतराव चव्हाण आल्यानंतर ते म्हणाले होते, दलित समाजामध्ये साहित्यिक झाला असेल तर तो ना.रा.शेंडे, असा त्यांचा गौरव झाला होता. त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे 30x50 फुटाचे घर गणेशपूर, भंडारा येथे आहे. त्यात श्री शेषाचे मंदिर त्यांनी स्थापन केले. माणसाच्या मृत्यूनंतर दफन केल्यानंतर तो संपून जातो. परंतु शेष उरते ते जे चांगले असते, असा त्यांचा गौरव केला जातो. त्यांची अशी ख्याती होती की, ते जिवंत असेपर्यंत 25 वर्षापर्यंत त्यांनी साहित्य सम्मेलने ग्रामीण भागात भरविली. त्यांचे घर जमीनदोस्त झाले असून त्यांच्या तीनही मुलांचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे त्यांचे पडीक घर व देऊळ याचे स्मारक बांधण्यासाठी मी महाराष्ट्र शासनाकडे 20 लाख रुपयांची मागणी केली होती. ही रक्कम फार मोठी नाही. 30x50 फुटाचा प्लॉट आहे. त्याचे स्मारक बनवावे. कै.ना.रा.शेंडे म्हणजे वि.स.खांडेकर, ना.सी.फडके, मामासाहेब वरेरकर, ग.त्र्यं.माडखोलकर, प्र.के.अत्रे समकालीन साहित्यिक होते. त्यांनी 50 पेक्षा जास्त पुस्तके लिहिली आहेत. काजळी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश निकोसे.....

रात्र, डोंगरमाथ्यावरील दिवा, विलासनी, अंजूषा, अतिंद्रिय विश्व, गाडगेबाबा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, साने गुरुजी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत चोखामेळा अशा प्रकारची 50 पुस्तके लिहिली. या दलित साहित्यिकाने कदाचित मृत्यूपूर्वी स्वप्न पाहिले असेल, माझ्या मृत्यूनंतर काय?. म्हणूनच वैनगंगेच्या काठावर मृत्यूपूर्वी त्यांनी स्मृती बांधून ठेवली आहे. भंडाऱ्याचे नगराध्यक्ष असतील, जिल्हाधिकारी असतील, माझी अर्थमंत्र्यांना विनंती आहे की, त्यांनी या स्मारकासंबंधी निर्णय करावा. यासाठी 20 लाख रुपयांची मदत केली तर पडीक घर स्मारक म्हणून उभे राहील.

सभापती महोदय, अलिकडे कायम विनाअनुदान तत्वावर शाळा चालविल्या जात आहेत. परंतु खेडापाडयामध्ये गरीब लोक राहतात, त्यांची मुले शाळेमध्ये जातात. शहरातील शाळांमध्ये कॉम्प्युटर युग सुरु झालेले आहे. वयाच्या 10-15 वर्षानंतर शहरातील मुले कॉम्प्युटर शिकून तयार होतील. आज इंग्रजी माध्यमाच्या शाळा धडाक्याने सुरु आहेत. परंतु खेडयातील मुलांना, झोपडपट्टीतील मुलांना प्राथमिक शाळांमध्ये शिक्षण घेत असताना इंग्रजी भाषेचा गंध नाही. अशा प्राथमिक शाळा नगरपालिका, जिल्हा परिषदांकडून चालविल्या जातात. या बाबीकडे शासनाने लक्ष देण्याची गरज आहे.

(नंतर श्री.जुन्नरे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश निकोसे ....

सभापती महोदय, आता मी गृहनिर्माण विभागासंबंधी विचार मांडणार आहे. एम्प्रेस मिलची जागा राज बिल्डरने 45 कोटी रुपयांना मागितली होती. परंतु आम्ही यासंदर्भात विरोध केला, कोर्टात केस दाखल केली व ती जागा नंतर शासनाने 25 कोटी रुपयांमध्ये विकत घेतली. शासनाने ही जागा विकत घेऊन 5 वर्षे होऊन गेली, या जागेच्या संदर्भात नकाशे तयार करावयास पाहिजे होते, कलेक्टरांची त्यासंदर्भात मंजूरी घ्यावयास पाहिजे होती परंतु तसे थोड्या फार प्रमाणात करण्यात आले आहे. या ठिकाणी ज्या प्रमाणात घरे बांघावयास पाहिजे होती त्या प्रमाणात घरे बांधण्यात आली नाहीत. या ठिकाणी फार कमी प्रमाणात घरे बांधली गेली आहेत. या संदर्भात आम्ही श्री. लोहकरे यांच्या विरुध्द माननीय मुख्यमंत्र्यांकडे तक्रार केली होती परंतु यासंदर्भात अद्यापपावेतो कोणतीही चौकशी झालेली नाही. म्हाडाने एम्प्रेस मिलच्या जागेवर प्लॉट तयार केले असते तर डबल किमत मिळाली असती.

सभापती महोदय, या ठिकाणी विजेच्या संदर्भात सन्माननीय विरोधी पक्ष नेते तसेच माननीय गडकरी साहेबांनी विस्तृतपणे चर्चा केलेली असल्यामुळे मी या मुद्यावर माझे विचार व्यक्त करणार नाही. परंतु विजेची बाब ही अत्यंत गंभीर बाब आहे. त्यामुळे विजेच्या संदर्भात फार तातडीने कार्यवाही करण्याची गरज आहे. कालच्या वर्तमानपत्रात छापून आले होते की, "दाभोळ वीज कंपनी मधून आपल्याला एक दीड महिन्यात वीज मिळणार आहे" हे वाचून समाधान वाटले परंतु आता पुन्हा छापून आले आहे की, "दाभोळ वीज कंपनीतील वीज लांबणीवर पडलेली आहे. एक वर्षानंतर या ठिकाणची वीज मिळणार आहे."

सभापती महोदय, शेतक-यांना जोडधंदा मिळावा यासाठी शासनाने शेळी-मेंढी योजनेसाठी तरतूद केलेली आहे परंतु शेतक-यांना चांगल्या प्रकारच्या गायी मिळाव्यात, संकरीत गायी-म्हशी मिळाव्यात यासाठी तरतूद करणे आवश्यक आहे, यामध्ये काही तरी सुधारणा करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, सन 2004 साली अनुसूचित जाती व बौध्दांसाठी आश्रमशाळा काढण्यासाठी जाहिरात दिली होती यासाठी फॉर्म सुध्दा मागविण्यात आले परंतु 2004 मध्ये ते फॉर्म रद्द करुन शासनाने जाहीर केले की शासन या आश्रमशाळा चालवील, पण हया आश्रमशाळा शासनाने चालविण्यासाठी कोणतेही पाऊल उचलले नाही त्यामुळे याकडे शासनाने पुन्हा लक्ष देण्याची आवश्यकता आहे. 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश निकोसे ....

सभापती महोदय, शासन फार चांगल्या योजना राबवीत असते. घरे बांधण्यापासून ते सिंचनापर्यंतच्या सर्व योजना करीत असते. शासनाने कितीही चांगल्या योजना आणल्या तरी त्या योजना राबविण्याची जबाबदारी प्रधान सचिवांची, सचिवांची, उप सचिवांची, कलेक्टराची, कमिशनरांची, तहसिलदारांची अवर सचिवांची, एसडीओंची, कक्ष अधिका-यांची असते. प्रत्येक मंत्रीमहोदय, खूप काम करीत असतात. 15-16 तास ते काम करीत असतात. आम्ही रात्री 10-11 वाजता फोन जरी केला तरी माननीय मंत्रीमहोदय फोन अटेन्ड करतात. परंतु हे शासकीय अधिकारी साडेपाच वाजले की, घरी जातात. त्यांना योजनेशी आणि जनतेशी काहीही देणे घेणे नसते. आम्ही ज्यावेळेस मंत्रालयात योजना पाठवितो त्यावेळेस मंत्रालयातील अधिकारी लक्ष घालीत नाहीत, योग्य तो शेरा लिहित नाहीत. योग्य तो शेरा नसल्यामुळे माननीय मुख्यमंत्री किंवा माननीय मंत्रीमहोदय त्यावर पॉझीटीव्ह सही करीत नाही, सही करण्याला विलंब लागल्यामुळे योजना तशीच धूळ घात पडते. झारीतील शुक्राचार्यामुळे योजना वेळेवर मार्गी लागत नाहीत. म्हणून माझी विनंती आहे की, मंत्रालयातील सेक्रेटरी, प्रधान सचिवांनी यासंदर्भात लक्ष घालण्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्रातील अधिकारी आणि कर्मचा-यांना जनतेची कामे करण्याच्या संदर्भात ट्रेनिंग देण्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्र हे पुरागामी राज्य आहे, आपल्या देशात लोकशाही आहे, समाजवाद आहे, हे राज्य गरीबांचे आहे, गरीबांसाठी आम्हाला झगडावे लागते. हीच गरीब जनता आम्हाला रांगा लावून मत देत असते परंतु श्रीमंत लोक ए.सी. मध्ये बसून टी.व्ही. लावून बसतात. त्यामुळे आम्हाला गरीब जनतेची कामे करणे आवश्यक आहे. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

.....2

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : माननीय सभापती महोदय, सन 2007-2008 च्या अर्थसंकल्पावर मी माझे विचार मांडण्यासाठी उभा आहे. संपूर्ण अर्थसंकल्पाचे वाचन केल्यानंतर जे मुद्दे लक्षात येतात त्यात सर्वात महत्वाचा मुद्दा हा आहे की, शासनाने डिसेंबर, 2006 च्या नागपूर हिवाळी अधिवेशनात,

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते.....

कायम विनाअनुदानित शाळांना अनुदान देण्याचे तत्वत: मान्य केले होते. तसेच सन 2000 आणि त्यानंतरच्या कायम विनाअनुदानित शाळांना टप्प्या-टप्प्याने अनुदान द्यावे अशा प्रकारचे आश्वासन देऊनही त्याबाबत अर्थसंकल्पामध्ये कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही. आदिवासी भागातील ज्या विनाअनुदानित शाळा आहेत त्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक जनजाती कल्याण समितीची बैठक झाली होती. त्या बैठकीत ठरल्यानुसार या शाळांसाठी तरतूद होणे अपेक्षित असताना त्यासंदर्भात कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही.

सभापती महोदय, आज शिक्षण क्षेत्रामध्ये फार मोठ्या प्रमाणावर अधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत. काही ठिकाणी तर 30-35 मंजूर पदांपैकी निम्मी पदे रिक्त आहेत. संपूर्ण महाराष्ट्राचा विचार करता शिक्षणक्षेत्रातील सर्व रिक्त पदे तातडीने भरणे आवश्यक आहे. ही रिक्त पदे भरण्यासाठी अर्थसंकल्पामध्ये कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही.

आदिवासी भागाचा विचार केला तर आदिवासी भागातील सर्वसामान्य लोकांना चांगले जीवन जगता यावे यासाठी आदिवासी विभागाकडून वेगवेगळ्या प्रकारच्या अनेक चांगल्या योजना राबविल्या जाणे आवश्यक आहे. त्यासाठी आदिवासी विभागास फार मोठ्या प्रमाणावर अनुदान मिळत आहे. परंतु या योजनांची खरोखर अंमलबजावणी होते किंवा कसे हा महत्वाचा मुद्दा आहे. आदिवासी आश्रमशाळेतील मुले असतील वा वसतिगृहातील मुले असतील त्यांना खऱ्या अर्थाने फायदा व्हावयाचा असेल, त्यांचे सक्षमीकरण व्हावयाचे असेल तर चांगल्या योजना राबविणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, मी येथे नेहमीच सांगत आलो आहे की, शिक्षण क्षेत्रातील सर्व कार्यालयांचे संगणीकरण होणे आवश्यक आहे. इतर कार्यालयांचे- विभागांचे संगणकीकरण झालेले आहे. तेव्हा शिक्षणक्षेत्रातील सर्व कार्यालयांचे संगणीकरण होणे गरजेचे असताना यासाठी कोणत्याही प्रकारची तरतूद अर्थसंकल्पामध्ये करण्यात आलेली नाही.

सभापती महोदय, अनेक शाळा अनुदानास पात्र आहेत. तसेच अनेक शैक्षणिक संस्थांतील तुकड्या अनुदानास पात्र झाल्या आहेत पण त्यासाठी अर्थसंकल्पामध्ये तरतूद करण्यात आलेली नाही. त्याचप्रमाणे शैक्षणिक संस्थांना वेतनेतर अनुदान देण्यासाठी अर्थसंकल्पामध्ये तरतूद करण्यात आलेली नाही.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते.....

सभापती महोदय, अपंगांच्या भरतीचा प्रश्न आहे. अपंगांच्या भरतीसाठी पुरेशा प्रमाणात निधी उपलब्ध असूनही ही पदे भरण्यात आलेली नाहीत. अपंगाची 17हजार पदे वेळेवर न भरल्यामुळे ती भरली गेली नाहीत अशी वर्तमानपत्रात बातमी होती.

सभापती महोदय, आरोग्य विभागाच्या बाबतीत बोलावयाचे झाले तर येथे वेगवेगळ्या आयुधांच्या माध्यमातून त्यावर चर्चा होते. सर्वसामान्य रुग्णालय, जिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय इत्यादींचे सक्षमीकरण होण्याची गरज आहे. त्याठिकाणी अत्याधुनिक सोयीसुविधा मिळाल्या पाहिजेत. रुक्मिणी रुग्णालय, छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय, रत्नागिरी जिल्हा रुग्णालय, जे.जे. रुग्णालय इत्यादीं रुग्णालयांचे सक्षमीकरण झाले पाहिजे. यासाठी मिळणाऱ्या निधीचा योग्य पध्दतीने उपयोग होणे अत्यंत गरजेचे आहे.

सभापती महोदय, राजीव गांधी सुरक्षा योजनेंतर्गत गेल्या तीन वर्षापासून विद्यार्थ्यांच्या इन्शुरन्स पोटी लाखो रुपयांचा निधी इन्शुरन्स कंपनीला देण्यात येतो. परंतु विद्यार्थ्यांना होणारे अपघात वा अन्य नुकसान याबाबत त्यांना कंपनीकडून कोणत्याही प्रकारची भरपाई मिळत नाही. कंपनीबरोबर जो करार केलेला आहे त्यामध्ये काही अटी बसत नसतील तर त्याप्रमाणे करारामध्ये दुरुस्ती करण्यात यावी. आपण लाखो रुपये कंपनीला फुकट देत आहोत. तेव्हा या संदर्भात विचार होणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, या सभागृहामध्ये कोकण एस.एस.सी.बोर्ड करण्याचा निर्णय झालेला आहे. रायगड आणि ठाणे जिल्ह्यात नवीन शिक्षण उपसंचालक निर्माण करण्याचा निर्णय झालेला आहे. त्यानुसार अर्थसंकल्पामध्ये तरतूद होईल असे वाटले होते, पण तशी कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही.

यानंतर कु.गायकवाड.....

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री रामनाथ मोते सुरु .....

सभापती महोदय, महाराष्ट्रातील सर्व शासकीय कार्यालयांमध्ये कर्मचाऱ्यांना पाचव्या वेतन आयोगानुसार वेतन मिळत आहे. यास अपवाद म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालय. येथील शिक्षकांना व शिक्षकेतर कर्मचाऱ्याना शासकीय नियमाप्रमाणे वेतन मिळत नाही. या संदर्भात विचार होणे अत्यंत आवश्यक आहे. शिक्षकांच्या पाल्यांना आपण मोफत शिक्षण योजना लागू केलेली आहे. त्यांच्या पाल्यांनी भरलेली फी परत मिळावी यासाठी प्रयत्न करीत आहेत. परंतु 4-4 वर्षे होऊनसुध्दा या मुलांना त्यांचे पैसे मिळत नाही, प्रतिपूर्ती होत नाही. याबाबतीत आपण कोणतीही तरतूद केलेली नाही. सभापती महोदय,अनेक ठिकाणी कार्यालयांचे एकत्रिकरण होणे आवश्यक आहे. रायगड जिल्हयाचे पे युनीट कार्यालय पेण मध्ये आहे .पेण आणि अलिबाग या दोन तालुक्यांमध्ये सुमारे 26 किमीचे अंतर आहे. पेणच्या अधिकाऱ्यांना शेकडो रुपये खर्च करुन अलिबागला यावे लागते . त्यामुळे जिल्हयांना वेगवेगळे कार्यालय असणे आवश्यक आहे. ही सगळी कार्यालये एकत्र आणण्याच्या संदर्भात उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक आहे. या शासनाने या राज्यामध्ये शिक्षण सेवक योजना सुरु केलेली आहे. या शिक्षण सेवक योजने अंतर्गत मागासवर्गीयांची व अप्रशिक्षित शिक्षकांची नेमणूक करण्याची तरतूद शासनाने केलेली आहे. परंतु शासनाने 3 वर्षामध्ये या अप्रशिक्षित शिक्षकांना प्रशिक्षित होण्यासाठी कोणत्याही प्रकारची उपाययोजना केलेली नाही. त्यामुळे या शिक्षण सेवकांच्या सेवेचा आता कालावधी संपत आलेला आहे तरीही त्यांच्या प्रशिक्षणाची सोय केली गेलेली नाही. म्हणून या मागासवर्गीय शिक्षण सेवकांना नोकरीतून बाहेर पडावे लागते की काय असा प्रश्न निर्माण झालेला आहे. या सर्व गोष्टींचा विचार होणे आवश्यक आहे. सभापती महोदय, वेळेवअभावी मी माझे भाषण येथेच थांबवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सन 2007-08 चा अर्थसंकल्प हा जनतेची दिशाभूल करणारा व वस्तूनिष्ठ नाही. माननीय मंत्री महोदयांनी दरवर्षी प्रमाणे आकडेवारी मांडून अर्थसंकल्प सादर केलेला आहे. या अर्थसंकल्पावर भाषण करत असतांना विरोधी आणि सत्ताधारी पक्षांच्या सदस्यांकडून अनेक सूचना दिल्या गेलेल्या आहेत. परंतु या सगळया सूचना केवळ कागदोपत्रीच राहतात. त्यांची अंमलबजावणी होत नाही. या अर्थसंकल्पामध्ये ज्या तरतुदी केल्या जातात त्यांना 50 टक्के कट लावला जातो. जनतेची दिशाभूल करुन हा अर्थसंकल्प सादर झालेला आहे या ठिकाणी या अर्थसंकल्पामध्ये कोकणासाठी भरीव तरतूद केली जाईल अशा प्रकारची कोकणातील जनतेला आशा होती. परंतु ती आशा आता पूर्णपणे मावळलेली आहे. शिवसेनेचे रेडीमेड नेते काँग्रेसमध्ये गेल्यानंतर काँग्रेसने त्यांना दुसऱ्या क्रमांकाचे खाते दिलेले आहे त्यामुळे सिंधुदुर्ग जिल्हयातील जनतेला निधी दिला जाईल अशी अपेक्षा वाटत होती. परंतु या जनतेची या ठिकाणी दिशाभूल करण्यात आलेली आहे. सभापती महोदय, मच्छिमारी व्यवसायामध्ये कोणत्याही प्रकारची भरीव तरतूद करण्यात आलेली नाही. विदर्भामध्ये ऊस, कापूस उत्पादित करणारा शेतकरी आत्महत्या करीत आहे. आत्महत्या रोखण्यासाठी कोणते पॅकेज .....

श्री नितीन गडकरी : सभापती महोदय, विधानसभेचे कामकाज आता संपलेले आहे. आपणही यावरील रिप्लाय उद्या घ्यावेत अशी मी आपणास विनंती करतो.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, मच्छिमारांसाठी कोणत्याही प्रकारच्या तरतुदी या अर्थसंकल्पात करण्यात आलेल्या नाहीत. केरळ कर्नाटक धर्तीवर छोटया मच्छिमारांना रॉकेल सबसिडी मिळावी अशा प्रकारची सूचना वारंवार या ठिकाणी करुनही कोणत्याही प्रकारची दखल घेतली गेलेली नाही.

यानंतर श्री. पूरी ...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.परशुराम उपरकर...

त्याचप्रमाणे रापण पारंपारिक व्यवसाय करणारे जे मच्छिमार आहेत, त्यांना आज समुद्रामध्ये मासे मिळत नाहीत. त्यामुळे त्यांना आपण कर्नाटक व केरळ राज्याच्या धर्तीवर पेन्शन सुरु करावी. याबाबतीत मी अनेकवेळा सूचना करुनही शासनाने कुठल्याही प्रकारची दखल घेतलेली नाही. एनसीडीसीमार्फत ज्या कर्जावर ट्रॉलर्स घेतल्या जातात त्यांना आज मच्छी मिळत नसल्यामुळे जानेवारी महिन्यांमध्येच त्या वर काढल्या जातात. डिझेलवरील खर्चामुळे मच्छिमारांना फार मोठा तोटा सहन करावा लागतो. म्हणून सर्वच मच्छिमार जानेवारी महिन्यांत ट्रॉलर्स समुद्राबाहेर काढतात. त्यामुळे याबाबतीत टॉलर्सधारकांसाठी जी 12 वर्षांच्या कर्जाची मर्यादा आहे ती आपण 15 वर्षे करावी. मच्छिमारांनी 12 वर्षामध्ये कर्ज फेडले नाही तर सबसिडी कर्जात वर्ग केली जाते. त्यामुळे आपण याबाबतीत 15 वर्षे मुदवाढ द्यावी. याबाबतीत मी अनेकवेळा निवेदने व मागणीही केलेली आहे. परंतु याची दखल अर्थसंकल्पात घेतली गेली नाही, हे योग्य नाही. सभापती महोदय, शेतकरी आत्महत्या करीत असल्यामुळे त्यांना आपण 6 टक्के दराने कर्जपुरवठा करण्याचे मान्य केले. त्याचप्रमाणे आमच्या जिल्हयात आज मच्छीचा दुष्काळ असल्यामुळे आपण मच्छिमारांना 6 टक्के दराने कर्ज उपलब्ध करुन द्यावे, ही विनंती.

सभापती महोदय, आमच्याकडील खार भूमीवर सन 1992-93 पासून धूप प्रतिबंधक बंधाऱ्याचे काम सुरु आहे. परंतु त्या कामासाठी कुठल्याही प्रकारची आर्थिक तरतूद न झाल्यामुळे आज तेथील काही गांवे विस्थापित होण्याच्या मार्गावर आहेत. आज त्या गावांना पुरामुळे व अतिवृष्टीमुळे धोका निर्माण झालेला आहे. देवबाग व तळशील गावाच्या एका बाजूने समुद्र व दुसऱ्या बाजूने खाडी असून 45 मिटर अंतरावर गाव वसले आहे. आज त्याठिकाणी समुद्राचे पाणी कोणत्याही क्षणी अतिक्रमण करुन त्या गावामध्ये जाऊ शकते, अशी परिस्थिती आहे. त्यामुळे त्याठिकाणी धूप प्रतिबंधक बंधारा असणे अत्यंत आवश्यक आहे. त्याचप्रमाणे देवगड तालुक्यातील तांबळडे व मिठबाव या गावांमध्येही अशाप्रकारचा प्रश्न निर्माण झालेला आहे. त्यामुळे खार जमिनीवरील धूप प्रतिबंधक बंधाऱ्याच्या कामासाठी भरीव तरतूद करण्याची गरज असतानाही शासनाने यासाठी तरतूद केलेली नाही, हे योग्य नाही. समुद्र किनारी मच्छिमारांची शेतजमिनी आहेत, त्या जमिनी खाऱ्या पाण्यामुळे व्यापल्या असून त्याठिकाणी मच्छिमारांना शेती करता येत

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर....

नाही. त्या जमिनी नापीक झालेल्या आहेत. त्याठिकाणी आपण बंधारे बांधले, परंतु अनेक बंधारे आज फुटले आहेत. त्याठिकाणी निकृष्ठ दर्जाची बांधकामे झाल्यामुळे ती सतत फुटत असतात. बंधाऱ्याचे काम दर्जेदार होण्याच्या दृष्टीने व्यवस्था व्हावी, ही विनंती.

सभापती महोदय, उद्योगाच्या बाबतीत आमच्या जिल्हयास या शासनाने उपेक्षित ठेवले आहेत. देवगड तालुक्यातील आंदवाडी आणि मालवण तालुक्यातील माननीय पालकमंत्री यांच्या मतदारसंघातील सर्जकोट येथील बंधारे विकसित करण्यासाठी शासनाने दहाव्या पंचवार्षिक योजनेंतर्गत तरतूद होऊनही या दोन बंधाऱ्याकडे शासनाने दुर्लक्ष केलेले आहे. दहावी पंचवार्षिक योजना दि.31 मार्च,2007 रोजी संपत असून अद्यापही काम सुरु झालेले नाही, याबाबत मी खेद व्यक्त करतो. आज गोवा राज्यातून मच्छी नौका मच्छिमारीसाठी अतिक्रमण करीत आहेत.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय कुलकर्णी साहेब हे सिंधुदुर्ग जिल्हयातील दमदार नेते असूनही ते या दोन बंधाऱ्यांकडे लक्ष देत नाहीत, हे योग्य नाही.

नंतर श्री.रोझेकर....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, कोकणातील बंदरे हा एक महत्वाचा व गंभीर विषय आहे. या बंदरांमध्ये गाळ साचल्यामुळे गाळ काढल्याशिवाय बंदरे व्यवस्थित होऊ शकत नाहीत. त्यासाठी कोकण पॅकेजअंतर्गत 10 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती पण एकही पैसा यावर खर्च झाला नाही. सन्माननीय सदस्य, श्री.परशुराम उपरकर जे सांगत आहेत, ते बरोबर आहे.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य, ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांनी जो मुद्दा या ठिकाणी मांडला आहे, त्या मुद्याच्या बाबतीतच मी बोलणार आहे. मागील नागपूर अधिवेशनात मत्सोद्योग मंत्र्यांनी बंदरातील गाळ काढण्यासाठी समिती नियुक्त केली होती. या समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर उपाययोजना करण्यात येईल, असे सांगण्यात आले. परंतु, हा गाळ काढण्यासाठी कोणत्याही प्रकारची तरतूद शासनाने या अर्थसंकल्पात केलेली नाही.

सभापती महोदय, रोजगार उपलब्ध करुन देण्याबाबतचे आश्वासन सातत्याने पालकमंत्र्यांनी दिले आहे. परंतु, पूर्वी असलेले उद्योगधंदे बंद पडलेले आहेत, याकडे मात्र पालकमंत्र्यांचे लक्ष नाही. कोकण विकास महामंडळाने करुळ येथे काच कारखाना सुरु केला होता, तोही आता बंद झाला आहे. हा कारखाना सुरु करण्यासाठी कोणत्याही प्रकारची उपाययोजना शासनाकडून झालेली नाही. कुडाळ एम.आय.डी.सी.साठी शेतक-यांनी उदात्त हेतूने आपल्या जमिनी दान दिल्यानंतर त्याच जमिनीवर जे कारखाने उभे आहेत त्यातील 80 टक्के कारखाने आज बंद अवस्थेत आहेत. कारखाने बंद झाल्यामुळे कारखानदारांनी त्या ठिकाणी निवासी प्रकल्प उभे केले आहेत. त्याचप्रमाणे कुडाळ येथील एम.आय.डी.सी.मध्ये महानंदाने सहकारी तत्वावरील पशुखाद्य कारखाना काढला. एक वर्षात हा कारखाना बंद पडला. हा कारखाना कशामुळे बंद पडला, कोणी बंद पाडला, याची चौकशी करुन योग्य ती उपाययोजना करण्याची गरज आहे. तसेच, इन्सुली या ठिकाणी सूतगिरणीसाठी 105 एकर जमीन शेतक-यांनी केवळ 15 रुपये गुंठा या दराने दिली. योग्यरितीने कारखाना न चालविल्यामुळे व संचालकांनी 25 कोटी रुपयांचे कर्ज काढल्यामुळे राज्य सहकारी बँकेने जमिनीचा लिलाव 5 कोटी रुपयांना काढला आहे. एवढेच नव्हे तर, उषा इस्पात या कंपनीने 200 एकर जमीन घेतली, आयडीबीआय या बँकेकडून 1200 कोटी रुपयांचे कर्ज घेतले, कर्जफेड न झाल्यामुळे ही जमीन लिलावात काढण्यात आली. कंपनीचे

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर.....

अधिकारी, आयडीबीआय बँकेचे अधिकारी, केंद्र सरकारचे अधिकारी यांनी संगनमताने 1200 कोटी रुपयांची जमीन केवळ 4 कोटी रुपयांना लिलावात विकत घेतली आहे. अशी अनेक उदाहरणे या ठिकाणी सांगता येतील. एसईझेडसाठी सिंधुदूर्ग जिल्हयातील जमीन संपादित करण्यात येत आहे. हे भूसंपादन थांबवून आधी उद्योगांसाठी संपादित केलेल्या जमिनींवर एसईझेड उभारावा, जेणेकरुन या जिल्हयाचा विकास होईल. दोडामार्गसारख्या ठिकाणी एका कंपनीने 1400 एकर जमीन घेतली आहे आणि त्या ठिकाणी अफु-गांजाची लागवड होत आहे. या प्रकरणी पोलीस तपास सुरु झाला होता, जमिनदारांवर गुन्हा दाखल करण्याचे काम सुरु झाले होते, नंतर कुणाच्या तरी फोनमुळे हा तपास थांबला आहे. या प्रकरणाची देखील चौकशी होणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, सिंधुदूर्ग जिल्हयाची स्थापना होऊन आता 25 वर्षे पूर्ण झाली आहेत. या जिल्हयात असंख्य साहित्यिक, लेखक निर्माण झाले, बुद्धिजीवी लोकांचा जिल्हा म्हणून या जिल्याकडे पाहिले जाते. परंतु, या जिल्हयामध्ये मेडिकल कॉलेज नाही, लॉ कॉलेज देखील नाही. ही महाविद्यालये या जिल्हयात सुरु करण्याची नितांत आवश्यकता आहे.

यानंतर कुमारी जयश्री.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर.....

आज या ठिकाणी एकमेव आय.टी.आय.सारखे व्यवसाय प्रशिक्षण देणारी शासनाची सुविधा आहे. तेथे जुने ट्रेड चालू करुन प्रशिक्षण दिले जाते, नवीन अभ्यासक्रम चालू करुन नवीन व्यवसाय करणा-या उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी शासनाने पुढाकार घ्यावा. या जिल्हयामध्ये पाटबंधारे प्रकल्पासाठी " पाणी अडवा पाणी जिरवा " या योजनेंतर्गत पावसाचे पाणी अडविण्याकरिता स्वामीनाथन अहवाल तयार करण्यात आला, या जिल्हयात जवळ जवळ एकूण 13 सिंचन प्रकल्प सुरु आहेत त्यातील एक मोठा, 4मध्यम प्रकल्प आणि 8 लघुपाटबंधारे प्रकल्प आहेत. सदर प्रकल्प उभारतांना ज्या शेतक-यांच्या जमिनी गेलेल्या आहेत त्यांचे अद्यापही पुनर्वसन झालेले नाही. अशा प्रकारची दयनीय परिस्थिती या पाटबंधारे विभागाची झालेली आहे. शासनाचे आधी पुर्नवसन व नंतर धरण असे धोरण आहे. या धोरणानुसार सर्व धरणाचे पुनर्वसन व बुडित क्षेत्रातील जमिनीचे पैसे द्यावे यासाठी शासनाने पुनर्वसनासाठी भरीव तरतूद केलेली नाही. या जिल्हयामध्ये युतीच्या काळामध्ये डोमेस्टीक एअरपोर्ट,इंटरनॅशनल एअरपोर्ट होणार अशा प्रकारची घोषणा देणा-या शिवसेनेतून कॉंग्रेसमध्ये गेलेल्या आपल्या महसूल मंत्र्यांनी शिवसेनेची सत्ता गेल्यानंतर या एअरपोर्टचे पैसे माननीय मुख्यमंत्री साहेबांनी आपल्या लातूर जिल्हयामध्ये एअरपोर्ट बनविण्याकरिता नेले अशा प्रकारचा गाजावाजा केला होता. परंतु माननीय महसूलमंत्र्यांच्या जिल्हयामध्ये सुध्दा एअरपोर्ट तयार करण्यासाठी निधीची तरतूद नाही. ही बाब निषेधार्ह आहे. मोर्चेमाढ,वेंगुर्ला देवगड येथे पंचतारांकित हॉटेल्स निर्माण करण्यासाठी काही जागा शेतक-यांकडून संपादित करण्यात आल्या होत्या पण या जागांवरती व्यवसायिकांकडून अद्याप पंचतारांकित हॉटेल्सची वीट देखील लावली गेली नाही. तेथील पालकमंत्री आणि कलेक्टर यांनी पर्यटनाचा या कामाच्या निधीचे व्यवस्थित नियोजन न केल्यामुळे कोटयवधी रुपयांचा निधी अखर्चित पडलेला आहे.

आरोग्य विभागावर बोलतांना सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत, ॲड.गुरुनाथ कुलकर्णी,श्री.विनोद तावडे यांनी सिंधुदूर्ग जिल्हयाच्या शासकीय रुग्णालयाबद्दल अनेक प्रश्न उपस्थित केले, त्यावेळी सभापती स्थानी आपणच होतात, आपण सबंधित माननीय मंत्रीमहोदयांना निदेश दिले होते की, 15 दिवसांमध्ये सदर रुग्णालयांमध्ये डॉक्टर्स उपलब्ध करुन द्यावेत, डॉक्टर्स उपलब्ध करुन देण्यात आले होते, परंतु काही दिवसांनी शासनाचा आदेश आला की,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर.....

प्रतिनियुक्तीवर डॉक्टर्स देता येत नाहीत म्हणून दिलेले डॉक्टर्स परत बोलावून घेण्यात आले. सध्या तेथे 16 पदांपैकी 13 डॉक्टर्सची पदे रिक्त आहेत. शासनाने सदर दवाखाना बंद करावा नाहीतर मग तो बी.ओ.टी.तत्वावर चालविण्याकरिता द्यावा. सिंधुदूर्ग जिल्हयातील जनतेला आरोग्य सेवा व्यवस्थित मिळत नाही. सदर रुग्णालयातील अपघात व अतिदक्षता विभागामध्ये गेल्यानंतर उपचार न झाल्यामुळे कोल्हापूर,गोवा,मुंबईतून आलेले लोक मृत्युमूखी पडतात. या ठिकाणी असलेल्या जनतेला पूर्णपणे न्याय मिळत नाही. अध्यक्ष महोदय, या ठिकाणी कृषि विभागाबद्दल बोलावयाचे झाले तर कृषि विभागाचा " पाणी अडवा पाणी जिरवा " व नालेबांध याकरिता असलेला पैसा शासनाच्या निर्णयाप्रमाणे वापरला जात नाही. सदर कृषि अधिका-यांमार्फत जी कामे केलेली आहेत ती अत्यंत निकृष्ट दर्जाची आहेत, तेथील सिंचनाच्या नालाबांध कामांचे नीट मोजमापही केले जात नाही,ग्रामपंचायतीला सिंचनाची कामे कुठे होतात हे माहिती नसते, म्हणून या शासनाच्या जी.आर.च्या अगेन्स्ट काम करत असलेल्या कृषि अधिका-यांविरुध्द मी जिल्हापरिषदेमध्ये असतांना सन 2003 - 2004 मध्ये हायकोर्टामध्ये रिट पिटीशन दाखल केली होती, त्याचे मला काल संचालकांकडून असे उत्तर आले की, तेथे कार्यरत असलेल्या 16 कर्मचा-यांची खातेनिहाय चौकशी करुन 18 कामांपैकी 2,39,000रुपयांची वसुली करण्याचे आदेश पाठविण्यात आलेले आहेत.

यानंतर श्री.बोरले.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर .....

अशा प्रकारे कृषी विभागाचे कोटयावधी रुपये वाया जात आहेत. कोकणामध्ये मोठया प्रमाणावर पाऊस पडतो. परंतु पाणी अडविले जात नाही. पाऊस पडल्यानंतर नालाबांधमध्ये दोन दिवसांनी पाणी दिसत नाही, अशा प्रकारची कामे कृषी विभागामार्फत केली जातात. अर्थसंकल्पामध्ये कोकणाच्या विकासासाठी मोठया प्रमाणावर निधीची तरतूद केली जाईल, अशी आम्हाला अपेक्षा होती. परंतु कोकण विकासासाठी आघाडी शासनाने कोणत्याही प्रकारची तरतूद न करता कोकणाला सातत्याने उपेक्षित ठेवण्याचे काम केलेले आहे. सभापती महोदय, आघाडी शासनाने भविष्यात कोकणातील विकास कामांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे, अशी माझी आपल्या माध्यमातून शासनाला विनंती आहे. कोकणातील अपूर्ण असलेले प्रकल्प पूर्ण करण्यासाठी, कोकणातील उद्योगधंद्यांना चालना देण्यासाठी निधीची भरीव तरतूद करावी, अशी मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, सन 2007-08 च्या अर्थसंकल्पामुळे राज्यातील जनतेची घोर निराशाच झालेली आहे. शेतक-यांच्या आत्महत्या, विजेचे भारनियमन, महागाईचा भडका, बरोजगारी अशा अनेक प्रश्नांची तळ लावण्यासाठी शासनाने ठोस उपाययोजना केल्याचे अर्थसंकल्पामध्ये दिसून येत नाही. गहू, तांदूळ, डाळी व त्यांची पीठे, मिरची, नारळ, चहा टॉवेल आणि सोलापूरी चादर आदी जीवनावश्यक वस्तूंवरील व्हॅट आकारणीला सहा महिने मुदतवाढ देऊन सामान्य जनतेचे आजचे मरण उद्यावर ढकलण्यात आले आहे. यातून पुढील सहा महिन्यांनी जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती वाढणार असल्याचे संकेत मिळत आहेत. माझी माननीय अर्थमंत्र्यांना विनंती आहे की, महागाई स्थिर ठेवावयाची असेल तर ही सवलत संपूर्ण वर्षासाठी दिली पाहिजे. मागच्या वर्षी अर्थसंकल्पात भरमसाठ करवाढ लादण्यात आली होती. त्याबाबत उल्लेख न करता वाढलेल्या करवाढीचा बोजा जनतेच्या डोक्यावर कायम ठेवण्यात आला आहे. त्यामुळे महागाईतून सुटका होणार नसल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये काही नवीन जिल्हयांची निर्मिती झालेली आहे. मुद्रांक शुल्क हे राज्याचे उत्पन्नाचे महत्वाचे साधन आहे. नवीन जिल्हयांमध्ये मुद्रांक शुल्क कार्यालयांची आवश्यकता आहे. नवीन जिल्हयांमध्ये मुद्रांक शुल्क कार्यालयासाठी इमारती नाहीत. तेथे जनतेला बसण्यासाठी पुरेशी जागा नाही, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही. सभापती महोदय, मला आपल्यामार्फत माननीय मंत्री महोदयांना विनंती करावयाची आहे की, ज्या नवीन जिल्हयांतून मुद्रांक शुल्काच्या माध्यमातून शासनाला जास्त उत्पन्न मिळते त्या जिल्हयांमध्ये उपनिबंधकांची कार्यालये असली पाहिजेत.

सभापती महोदय, लाखेच्या उत्पादनावर कर लावला असता तर आम्ही समजू शकलो असतो. शेतक-यांनी उत्पादन केलेल्या मालावर कर न लावता त्यापासून तयार केलेल्या पदार्थांवर कर आकारणी केली पाहिजे. व्यापारी 40 ते 50 रुपये किलोने लाख खरेदी करतात. व्यापा-यांनी तयार केलेला माल बंगाल आणि कलकत्ता येथे विकला जातो. व्यापा-यांना लाखेच्या उत्पादनावर कर माफी देण्यात आलेली आहे, ती अयोग्य आहे. पूर्व विदर्भातील सर्व लाख कलकत्ता येथे पाठविली जाते. शासनाने त्यावर कर लावावा आणि महाराष्ट्राच्या उत्पादनामध्ये वाढ करावी, अशी माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे.

..3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर .....

सभापती महोदय, मागच्या 7 वर्षापासून गोंदिया जिल्हयामध्ये शेतक-यांना जवाहर विहिरींसाठी अनुदान मिळालेले नाही. जवाहर विहिरींसाठी अर्थसंकल्पामध्ये निधीची तरतूद केली जाते. गोंदिया जिल्हयातील शेतक-यांना दरवर्षी जवाहर विहिरींसाठी अनुदान मिळाले पाहिजे. गोंदिया जिल्हयामध्ये शेतक-यांना जवाहर विहिरींसाठी अनुदान का मिळाले नाही, याचा माननीय मंत्री महोदयांनी उत्तराच्या भाषणामध्ये खुलासा करावा.

सभापती महोदय, गोंदिया हा नवीन जिल्हा आहे. गोंदिया जिल्हयामध्ये न्यायालयासाठी इमारत नाही. न्यायालयासाठी इमारत नसल्यामुळे जनतेची गैरसोय होत आहे. न्यायालयाच्या इमारतीसाठी अर्थसंकल्पामध्ये तरतूद करावयास पाहिजे. परंतु अर्थसंकल्पामध्ये न्यायालयाच्या इमारतीसाठी तरतूद करण्यात आलेली नाही. गोंदिया जिल्हयातील न्यायालयाच्या इमारतीसाठी शासनाने निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे.

यानंतर श्री.गागरे ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर.....

सभापती महोदय, मी सांगू इच्छितो की, विदर्भातील भंडारा व गोंदिया जिल्हयांची निर्मिती झाल्यानंतर गोंदिया जिल्हयात मुख्यालयाच्या ठिकाणी शासनाची विविध कार्यालये सुरु करणे आवश्यक आहेत. या जिल्हयात शिक्षण क्षेत्रात शाळा महाविद्यालयाची संख्या वाढली आहे, त्यामुळे शिक्षणासंबंधी शासकीय कार्यालयांची आवश्यकता आहे. यासाठी प्रस्ताव दाखल केला असून आवश्यक ती पुर्तता केलेली आहे, पण शासनाने या कार्यालयांना मंजूरी न देण्याचे कारण काय ? हे कळाले नाही. गोंदिया येथे कार्यालयासाठी जागा उपलब्ध आहे. शासनाने जिल्हा परिषदेची मोठी इमारत बांधलेली आहे. अर्थसंकल्पाद्वारे दोन स्वतंत्र कार्यालये गोंदिया जिल्हयाकरिता देऊ शकत नाही, ही शोकांकिका आहे. स्वतंत्र कार्यालये सुरु करण्यासाठी मान्यता प्रदान करावी अशी आग्रहाची विनंती करतो.

सभापती महोदय, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर आहे. अनेक ठिकाणी नळ योजना आहे, वीज भारनियमन होत असल्यामुळे पिण्याचे पाणी असले तरी मिळत नाही. काही ठिकाणी 10-20 मिनिटे तर काही ठिकाणी अर्धा तास पाणी मिळते. त्यासाठी पुरेशा पिण्याच्या पाण्याची व्यवस्था असणे आवश्यक आहे. जलस्वराज्य योजनेबाबत मला विनंती करावयाची आहे, संबंधित आमदार सुचवतील त्या ठिकाणी आमदार निधीतून काम करुन पाण्याचे प्रश्न सोडविण्यात यावेत. पिण्याच्या पाण्याच्या लहान योजनांसाठी माननीय अर्थमंत्र्यांनी तरतूद करावी अशी माझी आग्रहाची विनंती आहे. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आभार मानतो व माझे भाषण संपवितो.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ SBT/ MAP/ KGS/ KTG/

श्रीमती मंदा म्हात्रे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, महाराष्ट्राचे अर्थमंत्री माननीय श्री.जयंत पाटील यांनी विधानसभेत तसेच अर्थराज्यमंत्री माननीय डॉ.सुनील देशमुख यांनी विधान परिषदेत 2006-2007 या वर्षाचा अर्थसंकल्प सादर केलेला आहे त्यावर विचार व्यक्त करण्यासाठी मी उभी आहे. माननीय अर्थमंत्री यांनी सलग आठ वर्षे अर्थसंकल्प सादर करुन विक्रम केल्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करते.

सभापती महोदय, आघाडी सरकारचा हा सातवा अर्थसंकल्प आहे. सामाजिक न्याय प्रस्तापित करण्याचे काम खऱ्या अर्थाने महाराष्ट्र सरकारने केलेले आहे. सामान्य माणसाला दिलासा देण्याचे काम अर्थसंकल्पाच्या माध्यमातून केले आहे. सभागृहात सदस्यांनी यातील अनेक बाबींवर चर्चा घडवून आणली आहे. मी फक्त 2-3 विषयांना स्पर्श करणार आहे. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री व गृहमंत्री माननीय श्री.आर.आर.पाटील यांनी पोलीस दलाचे सक्षमीकरण करण्यासाठी व पोलीस दलाचे राहणीमान उंचावण्यासाठी अनेक योजना राबविण्याचा प्रयत्न केलेला आहे. मी पोलीस दल व गृहखात्यावर बोलणार आहे. पोलीस दल, पोलीस अधिकारी हे 16-16 तास कर्तव्य बजावून या राज्याची सेवा करीत असतात. आपण त्यांच्यासाठी निधी उपलब्ध करुन दिला आहे, ही चांगली बाब आहे. पोलिसांचे राहणीमान उंचवावे यासाठी त्यांच्या गृहनिर्माण योजनेसाठी 120 कोटींची तरतूद केलेली आहे. सध्या सुमारे 56 हजार पोलीस अधिकाऱ्यांना घरे नाहीत, ज्या पोलीस अधिकाऱ्यांना अद्याप घरे मिळालेली नाहीत, ते या योजनेचे स्वागत करुन धन्यवाद देत आहेत. पोलीस कर्मचाऱ्यांच्या व्यथांबद्दल उदाहरण द्यावयाचे झाले तर, नवी मुंबई येथे पोलीस कर्मचाऱ्यांना जी घरे देण्यात आलेली आहेत, ती घरे जाऊन पाहिली तर असे लक्षात येते की, ती कोंबडीच्या खुराडयासारखी आहेत. अशा घरामध्ये पोलीस कर्मचारी राहात आहेत. पोलीस कर्मचाऱ्यांच्या घरांसाठी 120 कोटींची तरतूद केलेली आहे. मला असे वाटते की, ही फार कमी तरतूद केलेली आहे. ही तरतूद वाढवून मिळाली पाहिजे, कारण हे कर्मचारी 15-16 तास काम करुन या राज्याची सेवा करीत असतात.

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

नंतर श्री.सुंबरे.....

श्रीमती मंदा म्हात्रे .....

किंवा त्यांना जेवण-पाणी वेळेवर मिळत नसते, केव्हा केव्हा त्यांना मोर्चा, आंदोलने वा अन्य प्रकरणांमुळे 12-15 तास ड्युटी करावी लागते आणि त्यानंतर ते जेव्हा आपल्या घरी जातात तेव्हा, पावसाळा असेल तर त्यांच्या त्या घराच्या गळकी छपरे, तुटलेल्या खिडक्या पाहिल्या तर वाईट वाटते. सभापती महोदय, नवी मुंबईमध्ये सिडको निर्माण झाली तेव्हा सिडकोने पोलिसांसाठी जागा देऊन घरे निर्माण केली होती. परंतु आज त्या घरांची अत्यंत वाईट अवस्था आहे, अगदी कोंबड्यांच्या खुराड्या सारखी त्यांची ती घरे आहेत. म्हणून माझी या निमित्ताने माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, या राज्यामध्ये नवी मुंबईपासून सुरूवात करून, विशेषत: नवी मुंबईमध्ये सिडकोने जी जागा पोलिसांना घरांसाठी उपलब्ध करून दिलेली आहे तेथील त्यांच्या घरांसाठी, जास्तीत जास्त तरतूद करावी. आज काही पोलीस अधिकारी चांगल्या घरांमध्ये राहत आहेत परंतु पोलीस कर्मचाऱ्यांची घरे मात्र भयानक अवस्थमध्ये आहेत. त्या पार्श्वभूमीवर पोलिसांना चांगली घरे मिळावीत यासाठी आपण जास्तीत जास्त तरतूद करावी असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, या शासनाने सामूहिक विवाह योजना आणल्याबद्दल या ठिकाणी मला शासनाचे कौतुक करावयाचे आहे. खरोखरी या पद्धतीतून राष्ट्रीय एकात्मता, जातीय सलोखा निश्चितपणे निर्माण होणार आहे आणि त्यासाठी या राज्यामध्ये ग्रामीण आणि शहरी भागांमध्ये देखील अधिकाधिक सामूहिक विवाह योजना राबविण्यात यावी. जेथे अशा प्रकारे सामूहिक विवार हातात तेथे त्या निमित्ताने सर्व समाजातील लोक एकत्र येतात आणि त्यातून एकोपा वाढतो, जातीय सलोखा निर्माण होतो. हे लक्षात घेऊन आज आपण सहा जिल्ह्यांमध्येच ही योजना लागू केलेली आहे तिची व्याप्ती वाढवून भविष्यात इतर जिल्ह्यांमध्येही ती लागू करावी. विशेष करून शहरी विभागामध्ये देखील ही योजना राबविण्याच्या दृष्टीने तरतूद केल्यास अधिक चांगले होईल. कारण शेवटी ग्रामीण भागातीलच लोक शहरामध्ये रोजी-रोटी कमाविण्यासाठी म्हणून येत असतात आणि ते काही आपले घर, आपली जमीन घेऊन शहरामध्ये येत नसतात. तर शहरामध्ये अशा प्रकारे आलेली जी कुटुंबे आहेत त्यांच्यासाठी तरी ही योजना केली गेली पाहिजे. आणि ज्या संस्था, एनजीओज अशा प्रकारे सामूहिक विवाह सोहळे आयोजित करीत असतील त्यांना तसेच सामूहिक विवाह योजनेतील जोडप्यांना आज जे 1 हजार रूपये अनुदान दिले जाते ते वाढवून 11 हजार रूपयांपर्यंत केले तर असे सामूहिक विवाह सोहळे मोठ्या प्रमाणात होतील आणि त्यातून जातीय

..... 5 एम 2 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे .....

सलोखा, एकोपा निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही. सभापती महोदय, मी माननीय अर्थ राज्यमंत्र्यांकडे दोन तीन मागण्या करू इच्छिते. या निमित्ताने मला असे सुचवावेसे वाटते की, महिला सरपंच आहेत त्यांना देखील काही मानधन दिले जावे. आज त्यांना सरपंच म्हणून लांब लांब खेडेगावांमध्ये एसटीतून प्रवास करून जावे लागते. त्यासाठी त्यांना कोठल्याही प्रकारे मानधन दिले जात नाही किंवा त्या खाजगी गाडीतून जातील एवढी त्यांची क्षमता नसते. तेव्हा त्यांना किमान एसटीचा पास मोफत दिला गेला पाहिजे. दुसरे म्हणजे आपण नेहमीच म्हणतो की, महिलांचे बचत गट सक्षम केले पाहिजेत, महिलांना सक्षम केले पाहिजे. आता बचत गट सक्षम करायचे म्हणजे काय करायचे ? आज आपण अंगणवाड्यांच्या माध्यमातून या बचत गटांना काम देत असतो पण त्यांचे पेमेंट त्यांना 6-6 महिने मिळत नाही. अशा अनेक बचतगटांची नावे माझ्याकडे आहेत. एकीकडे आपण म्हणतो की, महिलांना सक्षम केले पाहिजे, त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहता यावे यासाठी त्यांना स्वयंरोजगार उपलब्ध करून दिला पाहिजे. आपण हे सर्व ग्रामीण भागामध्ये करीत असताना शहरी भागातील महिला आहेत, ज्यांचे कौटुंबिक उत्पन्न अत्यल्प आहे. मात्र त्यांनाही इतर शहरी लोकांप्रमाणे दूध, पाणी, भाजीपाला, लाईटचे बिल वगैरे खर्च असतात शिवाय मुलांच्या शिक्षणासाठीचा खर्च, शाळांची फी इत्यादी खर्च असतात. हे सर्व खर्च भागविण्यासाठी या महिलांनादेखील काही जोडधंदा आपण उपलब्ध करून दिला पाहिजे. शहरामध्ये देखील महिलांचे बचत गट आहेत पण त्यांना आपण काहीच अनुदान वा मानधन देत नाही. ग्रामीण भागातील महिला बचत गटांनाच केवळ आपण अनुदान देतो. त्याप्रमाणे शहरातील महिला बचत गटांना देखील अनुदान दिले तर त्यातून त्यांना जोडधंदा निर्माण करता येऊ शकेल असे मला वाटते. शहरातील महिलांचे बचत गटांच्या बाबतीत तेथील महिलांचे वार्षिक उत्पन्न किती आहे, त्या बीपीएलमध्ये येतात किंवा काय वगैरे प्रश्न उपस्थित केले जातात. त्यामुळे शहरातील मराठा, ब्राह्मण समाजातील भगिनींचे बचतगट असतील तर त्यांना आपण अनुदान देत नाही. ...

(यानंतर श्री. सरफरे .....5एन 1 ...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे...

त्यामुळे त्यांच्या हाताला काम मिळत नाही. शहरातील लोकांना 4 हजार ते 5 हजार रुपयांचे उत्पन्न आहे. त्यामध्ये पूर्ण महिन्याचा खर्च भागवू शकत नाहीत. मुंबई शहरामध्ये अनेक ठिक्राणी छोटे उद्योग सुरु आहेत. परंतु नव्या मुंबईमध्ये मुंबईतील उद्योगाचा माल न्यावयाचा झाला तर त्याकरिता ऑक्ट्राय भरावा लागतो. छोटे उद्योग करणाऱ्या महिला हा ऑक्ट्राय देऊ शकत नाहीत. त्या महिलांच्या हाताला काम देण्यासाठी आपण शहरामध्ये छोटे-मोठे उद्योग सुरु केले पाहिजेत.

सभापती महोदय, क्रीडा विभागाकरिता अर्थसंकल्पामध्ये 60 कोटींची भरपूर तरतूद करण्यात आली आहे. ज्याप्रमाणे आपण पुण्याच्या बालेवाडी भागामध्ये क्रीडा स्पर्धाकरिता स्टेडियम बांधले आहे त्याप्रमाणे नवी मुंबईच्या ऐरोली, बेलापूर, पनवेल आणि उरण भागामध्ये भव्य क्रीडा स्टेडियम उभारले तर त्या ठिकाणी अनेक तरुणांना आपल्याला क्रिडा प्रशिक्षण देता येऊ शकेल. मुंबई शहरामध्ये भव्य स्टेडियम आहे, पुणे येथे भव्य स्टेडियम आहे. तेव्हा मुंबईला लागून असलेल्या या शहरामध्ये देखील भव्य स्टेडियम करण्यासंबंधीची घोषणा मंत्रिमहोदयांनी करावी अशी विनंती करते. सभापती महोदय, बेलापूर येथे शिवकालीन प्राचीन किल्ला आहे. आपण पर्यटन विभागाकरिता अर्थसंकल्पामध्ये भरपूर तरतूद केली आहे. तेव्हा या ऐतिहासिक किल्ल्याचे स्मारक जतन करण्यासाठी व त्याची डागडुजी करण्यासाठी व किल्ल्याचा विकास करण्यासाठी त्याठिकाणी पर्यटन स्थळ निर्माण करण्याची गरज आहे.

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. उल्हास पवार)

सभापती महोदय, खाजगी रुग्णालयांमध्ये आजारी असलेल्या गरिबांकरिता शस्त्रक्रियेसाठी 70 हजारावरुन दीड लाख रुपये खर्चाची मर्यादा वाढविली आहे. त्याबाबत हे शासन कौतुकास पात्र आहे. मला या निमित्ताने एकच सूचना करावयाची आहे की, जी देयकांची प्रकरणे प्रलंबित राहिली आहेत ती लवकरात लवकर निकालात काढली पाहिजेत. रुग्णांच्या हृदयावरील शस्त्रक्रियेकरिता लवकरात लवकर पैसे दिले तर रुग्णांना दिलासा मिळेल. एवढे बोलून मी ज्या दोन-तीन सूचना केलेल्या आहेत त्यासंबंधी मंत्रिमहोदयांनी खुलासा करावा एवढे बोलून व या अर्थसंकल्पाचे स्वागत करुन माझे भाषण संपविते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय अर्थ राज्यमंत्र्यांनी सन 2007-08 चा अर्थसंकल्प सभागृहामध्ये मांडला आहे.त्यासंबंधी थोडक्यात सांगावयाचे झाले तर एखाद्या खाजगी व्यापाऱ्याचे बॅलन्स शीट आणि हा अर्थसंकल्प यामध्ये फरक वाटत नाही. एखाद्या खाजगी व्यापाऱ्याचे बॅलन्स शीट टॅक्स कन्सल्टंट कशाप्रकारे बनवितो? ते बनविण्यापूर्वी तो व्यापाऱ्याला विचारतो की, आपण किती नफा दाखवावयाचा? त्याच्याकडे कर भरण्यासाठी असलेले पैसे विचारात घेऊन तो टॅक्स कन्सल्टंटला एक, दीड, दोन लाख रुपयांनी नफा कमी झाल्याचे दाखवितो. त्यानंतर बॅलन्स शीट तयार केली जाते. अशाप्रकारे या अर्थसंकल्पाची अवस्था झाली आहे. सभापती महोदय, सन 2005-06 मध्ये पहिला शिलकी अर्थसंकल्प मांडण्यात आला. त्यावेळी 256 कोटी रुपयांची शिल्लक दाखविण्यात आली. परंतु प्रत्यक्षात 3841 कोटींची तूट असल्याचे दिसले. त्यानंतर सन 2006-07 मध्ये 305 कोटींची शिल्लक असल्याचे दाखविण्यात आले. वास्तविक पहातां, त्याठिकाणी 3192 कोटींची तूट झाली. चालू वर्षी देखील काय होणार आहे? शासनाने यावर्षी शिलकीचा अर्थसंकल्प मांडावयाचा ठरविले.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे (पुढे सुरू...

अखेर ठरल्याप्रमाणे अर्थसंकल्प मांडण्यास सुरुवात झाली. चालू वर्षामध्ये देखील 510 कोटीचा शिलकी अर्थसंकल्प दाखविला. माझ्या माहितीप्रमाणे किमान हजार कोटीची प्रत्यक्षात तूट येणार आहे हे भविष्यकाळात सांगण्याची आवश्यकता नाही. व्यापाऱ्यांचा प्रायव्हेट बॅलन्स शीट असतो तशा प्रकारचा सरकारचा अर्थसंकल्प असल्याचे दिसते.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पामध्ये पोलीस गृहनिर्माण योजनेसाठी 120 कोटी रुपयाची तरतूद केली, ही चांगली गोष्ट आहे. वास्तविक पहाता, यापेक्षा जास्त तरतूद व्हायला पाहिजे होती परंतु आपल्याला शिलकी अर्थसंकल्प दाखवायचा होता, म्हणून कदाचित कमी तरतूद केली असावी. पुढच्या वर्षी पुरवणी मागण्यांमध्ये भरीव तरतूद केली जाईल, अशी आशा आहे. पोलीस दल सक्षम बनविण्यामध्ये जी काही तरतूद आवश्यक आहे ती केली पाहिजे. परंतु अर्थसंकल्पामध्ये भरीव अशी तरतूद केलेली दिसत नाही. पोलीस कृत्याच्या सक्षमतेविषयी काय बोलावे ? दिवसाढवळ्या महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यात दरोडे पडत आहेत. यामध्ये किरकोळ गुन्हे लोकांचे बळी जात आहेत, स्त्रियांवर अत्याचार होत आहेत. भटक्या व विमुक्त जातीच्या लोकांना पोटासाठी महाराष्ट्रातील दऱ्याखोऱ्या मध्ये वणवण भटकावे लागत असते. परंतु तेही आता अशक्य होऊन बसलेले आहे. याच महिन्यामध्ये "मुक्ताई नगर" येथे शेळ्यामेंढ्या घेऊन वणवण भटकत असताना "मुक्ताई" शिवारातील धनगर समाजाच्या मेंढपाळांवर रात्री दरोडा पडला. दरोडेखोरांनी फक्त मेंढ्या चोरून नेल्या असत्या तर मी समजू शकतो. परंतु या साधमांनी या मेढपाळ कुटुंबावर सशस्त्र हल्ला करून सर्व पुरुषांना जखमी करून एका अठरा वर्षाच्या अविवाहित महिलेवर अत्याचार केला. आज महिना उलटून गेला तरी जळगाव पोलीस आरोपींना अटक करू शकलेले नाहीत. यावरून पोलीस दल कशाप्रकारे दक्षता घेते याची कल्पना येते. तसेच चौसाळा येथील एका भटक्या महिलेवर ॲसिड फेकून तिची धिंड काढली. त्या ठिकाणच्या एका डॉक्टरला दया आली त्याने आपल्या कोटवरील बेडशीट काढून तिच्या अंगावर पांघरले. परंतु पोलिसांनी काही केले नाही. याच पोलिसांना या साधमाबरोबर ओली पार्टी करत असताना रंगेहात पकडले. पोलीस दलासाठी किती तरतूद केली तरी पोलीस दल महाराष्ट्रातील जनतेला न्याय देईल असे वाटत नाही. माझी या निमित्ताने मागणी आहे की, भटक्या, विमुक्त जातीचे लोक पोटासाठी दिवसाढवळ्या, रात्री फिरतात त्यांना त्यांचे स्वत:चे संरक्षण करण्यासाठी मोफत शस्त्र पुरवठा करावा, त्यांना मोफत रिव्हॉल्व्हर द्यावी, अशी या निमित्ताने मी मागणी करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

श्री.प्रकाश शेंडगे (पुढे सुरु....

त्यानंतर सामाजिक न्याय विभागाच्या संबंधात मला बोलावयाचे आहे. सामाजिक न्यायासाठी सन 2003 च्या अर्थसंकल्पामध्ये सरकारने प्रोजेक्ट युनायटेड ही फार मोठी घोषणा केली होती. प्रामुख्याने यामध्ये दारिद्र्, वय, लिंग, आरोग्य, व्यवसाय, ठिकाण व जात यामुळे आलेला दुरावा नष्ट करणे व अशा घटकांना मूळ प्रवाहात आणून त्यांना समान करण्यासाठी प्रोजेक्ट युनायटेडची घोषणा केली होती. परंतु सन 2006-07 च्या अर्थसंकल्पामध्ये या संबंधीचा उल्लेख करण्यात आलेला नाही. त्याचा उल्लेख अर्थसंकल्पामध्ये करावयास पाहिजे होता. अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकासासाठी एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात 10-20 टक्के एवढा निधी दिला जातो. सन 2007-08 मध्ये 2060 कोटी एवढा निधी उपलब्ध करून दिला. हेच सामाजिक न्यायाचे माप भटक्या, विमुक्त जातीच्या लोकांच्या ओंजळीत कोण टाकणे जात नाही ? यासंबंधीचा खुलासा व्हावा. वास्तविक भटक्या,विमुक्त जातीतील लोकांची सामाजिक अवस्था ही एस.सी, एस.टी मधील लोकांपेक्षा कमी असतानासुध्दा त्यांना वाऱ्यावर सोडून दिलेले आहे.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे ....

इतर मागावर्गीय, भटके विमुक्त यांच्या आर्थिक विकासासाठी शासनाने या आधीच वेगळे महामंडळ स्थापन केले आहे. परंतु या अर्थसंकल्पात शासनाने फक्त मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाला 1 कोटी 54 लाख रुपयांचा निधी दिला. परंतु इतर सर्व जी महामंडळे आहेत त्यामध्ये ओ.बी.सी. महामंडळ, अण्णाभाऊ साठे महामंडळ, अहिल्यादेवी शेळी मेंढी महामंडळ, वसंतराव नाईक आर्थिक विकास महामंडळ या सर्व महामंडळांना वाटाण्याच्या अक्षता लावण्यात आलेल्या आहेत. मागच्या निवडणुकीच्या वेळी या शासनाने एक फसवी घोषणा केली. निवडणूक तोंडावर होती. या सर्व गरीब जमातींना शासनाने सांगितले की, या निवडणुकीमध्ये तुम्ही आम्हाला मत द्या आम्ही तुमची शिफारस केंद्राकडे तिसऱ्या सूचीसाठी करु जेणेकरुन तुमचा आर्थिक, सामाजिक विकास होईल. धनगर, हलबा, माना, कोष्टी यांची शिफारस तिसऱ्या सूचीसाठी करण्यात आली. वर्तमानपत्रामध्ये मोठमोठ्या बातम्या आल्या. परंतु याच सभागृहात त्याबाबतचे सत्य बाहेर आले. अशा प्रकारची कोणतीही तिसरी सूची केंद्रात नसताना नसलेल्या सूचीत समावेश करण्याबाबत ही शिफारस करण्याची प्रक्रिया या सरकारने दलित समाजाच्या बाबतीत केली. सरकारला माझे आव्हान आहे. जी शिफारस आपण केली ती शासनाने सिध्द करुन दाखवावी. दिल्लीतील कोणत्या गल्लीत तिसरी सूची उपलब्ध आहे ते सांगावे. तशी सूची नसेल तर सरकारने या सर्व समाजाची जाहीर माफी मागावी अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. महाराष्ट्रात 3 हजारच्या वर शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची पाळी आली हे या पुरोगामी महाराष्ट्राला भूषणावह नाही. नुसते पॅकेज देऊन हा प्रश्न सुटणार नाही हे उघड झाले आहेच. खरेच जर शासन या प्रश्नावर गंभीर असेल तर आता पूर्ण कर्जमाफी हा एकमेव पर्याय आपल्यापुढे आहे. त्यासाठी जी चार पाच हजार कोटी रुपयांची तरतूद करावयाची असेल ती आणखी कर्ज उभारुन करावी अशी मी शासनाला विनंती करतो. महाराष्ट्र शासनावर 1 लाख 44 हजार कोटी रुपयांचे कर्ज आहेच त्यात आणखी चार पाच हजार कोटी रुपयांची भर पडली तर काही बिघडणार नाही. नाही तरी माननीय अर्थमंत्री जाहीरपणे सांगतात की, कर्जाची चिंता कोणी करु नये. मग या पाच हजार कोटी रुपयाच्या कर्जाची चिंता सरकारने का करावी असा प्रश्न मी शासनाला विचारत आहे. आणखी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS/

श्री. प्रकाश शेंडगे .....

चार पाच हजार कोटी रुपयांचे कर्ज काढून हा प्रश्न कायमचा धसास लावावा अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, दुष्काळी तालुक्यांचा प्रश्न या सभागृहामध्ये कोणीही उपस्थित केलेला नाही. मी या दुष्काळी तालुक्यांच्या व्यथा या ठिकाणी मांडत आहे. दुष्काळ हा या महाराष्ट्रातील जत, मवठेमहांकाळ, सांगोला, आटपाडीसारख्या जवळपास 72 तालुक्याच्या पाचवीला पूजलेला असून सांगली जिल्ह्यात तर एकीकडे 800 टी.एम.सी. पुराचे पाणी वाहून गेले तर अगदी 25 किलोमीटरवर असलेल्या कवठेमहांकाळ, जत तालुक्यात मात्र भर पावसाळ्यात पिण्याच्या पाण्यासाठी टँकरने पाणीपुरवठा सुरु असतो. या भागातील ताकारी, म्हैसाळ, टेंभू योजनेच्या पाण्याची वाट पहात दोन पिढ्या गारद झाल्या आहेत. अनुशेषाच्या तलवारीचा घाव शेवटी याच दुष्काळी जनतेला सोसावा लागत आहे. मागच्या पावसाळी अधिवेशनात मोठा गाजावाजा करीत दुष्काळी तालुक्यांसाठी विशेष पॅकेज जाहीर करण्यात आले. परंतु या अर्थसंकल्पात सुध्दा या दुष्काळी जनतेला वाटाण्याच्या अक्षता लावण्यात आल्या आहेत. हे अधिवेशन संपण्याच्या आत पॅकेज जाहीर करुन या जनतेला दिलासा द्यावा अशी मागणी मी या संपूर्ण दुष्काळी जनतेच्या वतीने सरकारकडे करीत आहे.

सभापती महोदय, वीज पुरवठ्याच्या बाबतीत सांगावयाचे म्हणजे विकतची द्यायला वीज नसताना सुध्दा फुकटची वीज देतो असे सांगून या महाराष्ट्रातील जनतेची घोर फसवणूक या सरकारने केली आहे. 16 तासाच्या लोड शेडींगने महाराष्ट्रातील शेतकरी, विद्यार्थी पिंजून गेला आहे. अशा परिस्थितीत नुसतेच फसवे आश्वासन देण्यापेक्षा आता प्रत्यक्ष कृतीची आवश्यकता आहे. विजेची टंचाई दूर करण्यासाठी शासनाने पवन ऊर्जेला प्राधान्य देण्याचे प्रयोजन केले परंतु या विजेच्या मळ्यात अंधाराचे साम्राज्य पसरले आहे. ते साम्राज्य दूर करण्याची नितांत आवश्यकता आहे. या पवनचक्क्या सांगली, सातारा, नंदुरबार या जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर येत आहेत. परंतु या शेतकऱ्यांची फसवणूक होत आहे. त्यांच्या जमिनीला अवघे 20 ते 40 हजार रुपये भाव देऊन त्यांची बोळवण केली जात आहे.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. प्रकाश शेंडगे...)

त्यांच्या जमिनीला योग्य किंमत देऊन त्यांच्या कुटुंबातील किमान दोन व्यक्तींना कायम सवरुपी रोजगार देऊन त्यांच्या आयुष्यातील अंधार दूर करण्याचा हे शासन प्रयत्न करणार आहे काय असा सवाल करुन, सभापती महोदय, आपण मला बोलण्यासाठी वेळ दिला त्याबद्दल आपले आभार मानून मी माझे भाषण संपवितो.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गोपीकिसन बाजोरिया (अकोला तथा वाशिम तथा बुलढाणा स्थानिक प्राधिकारी संस्था): सभापती महोदय, अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे. या अर्थसंकल्पामध्ये शेतक-यांच्या आत्महत्या आणि विजेचे भारनियमन या संदर्भात कोणत्याही प्रकारचे नियोजन करण्यात आलेले नाही ही दु:खाची बाब आहे. विदर्भातील 6 जिल्ह्यामध्ये पुष्कळ शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. माननीय पंतप्रधानानी 3750 कोटीचे पॅकेज जाहीर केले. राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी नांदेडमध्ये 400 कोटीचे पॅकेज जाहीर केले. नागपूरच्या हिवाळी अधिवेशनामध्ये 175 कोटीचे पॅकेज जाहीर करण्यात आले. या जाहीर केलेल्या पॅकेजच्या संदर्भात कोणतेही नियोजन या अर्थसंकल्पामध्ये नाही. या निमित्ताने एक महत्वाची बाब मी माननीय अर्थमतंत्र्यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, आपल्या देशामध्ये झोपडपट्टी निर्मूलन विभाग आहे. देशातील झोपडपट्टी निर्मूलनासाठी 1 लाख कोटीची योजना केन्द्र शासनाने जाहीर केलेली आहे. जेएनयूआरएमसाठी 70 हजार कोटी रुपये आणि यूडीआयएसएसएमपीसाठी 30 हजार कोटी रुपये निर्धारित केलेले आहेत. आयएसएचडीसाठी देखील एक मोठी योजना केन्द्र शासन राबवित आहे. या योजनेअंतर्गत झोपडपट्टी धारकांना 80 हजारामध्ये घरकुल बांधून देण्यात येणार आहे. यामध्ये 80 टक्के वाटा केन्द्राचा, 10 टक्के वाटा राज्य शासनाचा आणि 10 टक्के वाटा लाभार्थ्याचा असणार आहे. या योजनेसाठी राज्य शासनाने पुरवणी मागण्याद्वारे 30 कोटीची तरतूद केलेली आहे. राज्य शासनाने 30 कोटी रु. तरतूद केल्यामुळे केन्द्र शासनाकडून 300 कोटी रुपये मिळणार आहेत. या रकमेतून लोखंड आणि सिमेंट खरेदी करावयाचे आहे. राज्याला व्हॅटच्या माध्यमातून 12 टक्के मिळणार आहेत. आपण 30 कोटीची तरतूद केल्यामुळे राज्याला व्हॅटच्या माध्यमातून 42 टक्के मिळणार आहेत. यामध्ये राज्य शासनाला दोन टक्के फायदाच होणार आहे. या योजनेसाठी झारखंड आणि उत्तरांचल राज्यांनी 500 - 500 कोटीची तरतूद केलेली आहे. तेव्हा आपल्या राज्य शासनाने देखील 30 कोटी ऐवजी 500 कोटीची तरतूद केली तर केन्द्राकडून जास्तीत जास्त निधी आपल्याला मिळू शकेल. म्हणून या योजनेसाठी भरीव तरतूद करावी अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुधाकर गणगणे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2007-08 च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेत भाग घेत असताना अर्थसंकल्पाचे स्वागत करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, स्वागत करीत असताना मी निराशाही व्यक्त करतो. या राज्यामध्ये आज 52 टक्के लोकसंख्या ओबीसी संवर्गाची असून या समाजाच्या विकासासाठी ज्या प्रमाणात तरतुदी व्हावयास पाहिजे होत्या त्यांचा लवलेशही या अर्थसंकल्पामध्ये दिसून येत नाही हे मला आपल्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे. अनुदानित शिक्षण संस्थांना शिष्यवृत्ती योजना लागू करुन आणखी एक चांगला निर्णय इतर राज्यांपेक्षा या महाराष्ट्राने घेतला त्याबद्दल मी शासनाने अभिनंदन केले. परंतु विनाअनुदानित तत्वावर ज्या शिक्षण संस्था कार्यरत आहेत त्यांचे अद्यापही 70 ते 75 कोटी रुपये देणे आहे, त्याबाबत तरतूद करावयास पाहिजे असताना ती केलेली दिसत नाही. वारंवार आम्ही सभागृहात ही बाब शासनाच्या निदर्शनास आणून दिली. या प्रश्नावर सभात्याग देखील केलेला होता. परंतु अद्यापही या कामासाठी तरतूद केलेली नाही. या संदर्भातील जी.आर.अद्याप काढण्यात आलेला नाही. हा जी.आर.काढण्यासंबंधी अर्थमंत्री आपल्या उत्तराच्या भाषणात निवेदन करतील अशी अपेक्षा व्यक्त करतो. त्याचप्रमाणे आज जात पडताळणी प्रमाणपत्र मिळण्याकरीता निरनिराळया जिल्हयांमध्ये मोठया प्रमाणात कार्यालये असणे आवश्यक आहे. समाजकल्याण विभागाकडे कामाचा अधिक लोड असल्यामुळे समाजकल्याण विभागामार्फत या जात पडताळणी प्रमाणपत्रासाठी वेगळे कार्यालय व आवश्यक तो कर्मचारीवर्ग उपलब्ध करुन दिला पाहिजे. या संदर्भात आम्ही वेळोवेळी मागणी करुनही यासंबंधी विचार झालेला दिसत नाही. सन्माननीय अर्थमंत्र्यांनी भविष्यामध्ये या बाबीचा विचार करावा अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: अंगणवाडीच्या मुलांना जीवनसत्वासह शक्तिवर्धक अर्क असलेले सिरप पुरविणे.

मु.शी.: अंगणवाडीच्या मुलांना जीवनसत्वासह शक्तिवर्धक अर्क असलेले सिरप पुरविणेसंबंधी माननीय आदिवासी विकास मंत्र्यांचे निवेदन.

डॉ.विजयकुमार गावित (आदिवासी विकास मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

नि वे द न

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री.उल्हास पवार) : सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. उद्या गुरुवार, दिनांक 29 मार्च, 2007 रोजी सकाळी 11.00 ते 11.45 पर्यंत सभागृहाची विशेष बैठक होईल व दुपारी 12.00 वाजता सभागृहाची नियमित बैठक सुरु होईल.

(सभागृहाची बैठक रात्रौ 8.37 वाजता गुरुवार, दिनांक 29 मार्च, 2007 च्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही